**अपंगांच्या विशेष शाळा, कर्मशाळा प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतीगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्राकरीता सुधारीत विशेष शाळा संहिता लागू करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्र. इडीडी-२०१८/प्र.क्र.२८८/अ.क.१**
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२
दिनांक :- १८ जुलै, २०१८.

<u>वाचा</u>:- १) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा, पर्यटन विभाग शासन निर्णय क्र.इडीडी-१०८२/सीए-२, दिनांक १ नोंव्हेबर,१९८५.
२) समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा विभाग अ.शा.पत्र क्र.इडीडी/१०९०/६०५१/प्र.क्र.२४५/९६, दिनांक २७ ऑगस्ट १९९७
३) आयुक्त, अपंग कल्याण,म.रा.पुणे यांचे पत्र क्र.अकआ/सर्व प्रवर्ग/सुधारित शाळा संहिता प्रारुप/२०१८-१९/१७१८, दिनांक १३ एप्रिल,२०१८.

**प्रस्तावना :-**

राज्यातील अपंगांच्या विशेष शाळा संहितेस संदर्भ क्रमांक १ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली होती. या संहितेतील अटी व शर्ती सर्व शासन मान्य अपंग शाळांतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना लागू करण्यात आल्या आहेत. तद्नंतर अपंगाच्या शिक्षणासंबंधी भारतीय पुनर्वसन परिषद अधिनियम १९९२ व अपंग व्यक्तीसाठी अपंग व्यक्ती (समान संधी, हक्काचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हे दोन कायदे केंद्र शासनाने अंमलात आणल्यानंतर या कायद्यातील तरतूदीशी सुसंगत अशी विशेष शाळा संहिता १९९७ संदर्भ क्रमांक २ अन्वये दिनांक २७ ऑगस्ट १९९७ पासून लागू करण्यात आली आहे. सध्या या संहिते प्रमाणे शासन मान्य अपंगाच्या विशेष /कार्यशाळेचे कामकाज चालविले जात आहे.

शिक्षण क्षेत्रातील मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियम २००९ व अपंग व्यक्तींकरीता नव्याने लागू करण्यात आलेला अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ तसेच अपंगाच्या शैक्षणिक क्षेत्रात वेळोवेळी झालेले बदल, शासनाने निर्गमित केलेले शासन निर्णय व परिपत्रके तसेच शालेय अभ्यासक्रम व वर्गरचना यामध्ये झालेल्या बदलाप्रमाणे अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा (प्रशिक्षण केंद्र) करीता संहिता १९९७ मध्ये बदल करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे. त्याचप्रमाणे अपंगाच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या संस्था व्यवस्थापन, कर्मचारी व कर्मचारी संघटाकडून देखील १९९७ च्या अपंग शाळा संहितेत सुधारणा करुन सुधारीत शाळा संहिता लागू करण्याबाबतची मागणी होत आहे. त्यानुसार अपंगाच्या शाळा कर्मशाळा, प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतीगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्राकरीता यापूर्वीच्या विशेष शाळा संहिता अधिक्रमित करुन सुधारित विशेष शाळा संहिता लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-**

राज्यातील सर्व शासकीय तथा स्वंयसेवी संस्थेव्दारा चालविण्यात येणाऱ्या अनुदानित अपंगाच्या विशेष शाळा, कर्मशाळा, प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतीगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व उपचार केंद्र यामध्ये कार्यरत शासन मान्यता प्राप्त मुख्याध्यापक, शाळा प्रमुख, शिक्षक, निदेशक व शिक्षकेत्तर कर्मचारी

यांना सेवा शर्ती व अटी, कर्तव्य, शिस्त, वर्तणूक, अपील, सेवानिवृत्ती वेतन, वैद्यकीय प्रतिपूर्ती, अनुदान तसेच इतर सवलती लागू करण्यासाठी सोबतच्या अपंगाच्या सुधारित विशेष शाळा संहितेस मान्यता देण्यात येत आहे. सदर विशेष शाळा संहितेतील अटी-शर्ती, नियम व सवलती अपंगाच्या विशेष शाळा, कर्मशाळा, प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतीगृह, मतीमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्रामधील सर्व शासनमान्य कर्मचाऱ्यांना सदर शासन निर्णय निर्गमित झाल्यापासून लागू होतील. त्याचप्रमाणे अपंगाकरीता विनाअनुदान तत्वावर उपरोक्त उपक्रमात कार्यरत असलेल्या स्वंयसेवी संस्था व त्यामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांना या विशेष शाळा संहितेमधील शिस्तविषयक नियम, अटी व शर्ती लागू राहतील.

सदरहू शासन निर्णय व सुधारीत विशेष शाळा संहितेची प्रत ही महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आली असून त्याचा सांकेतांक क्रमांक २०१८०७१८१४५१४६३७२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dnyandev Laxman Sul

Digitally signed by Dnyandev Laxman Sul
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Social Justice Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a19e16d10b98348341561863c7561e9fc35bb428cdc3ea443c0263495f76285a, serialNumber=0a540933faf44a550ca357b423fa83e6fdce81a4746d167dae68daa29726d41d, cn=Dnyandev Laxman Sul
Date: 2018.08.01 19:22:03 +05'30'

**( ज्ञा.ल.सुळ )**
सह सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे खाजगी सचिव
३) मा.मंत्री,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई ३२.
४) मा. राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे खाजगी सचिव
५) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे स्वीय सहायक,
६) मा. सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई
७) आयुक्त, समाज कल्याण/अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) महालेखापाल, महाराष्ट्र शासन (१/२), मुंबई, नागपूर
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद सर्व
१०) प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग सर्व.
११) .सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण सर्व
१२) समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद सर्व.
१३) जिल्हा कोषागार अधिकारी सर्व.
१४) निवडनस्ती (अपंग कल्याण -१)

*****

## प्रकरण १

## प्रारंभिक

(१) संक्षिप्त नांव व प्रारंभ - या नियमांना, "महाराष्ट्र अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संहिता २०१८" असे संबोधण्यात येईल.

(२) व्याप्ती - महाराष्ट्र अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संहिता २०१८ हा नियम राज्यातील कायम विना अनुदानित, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, मतिमंदांकरीता कायम स्वरुपी आधार गृह, शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्प इत्यादींना लागू राहील.

(३) व्याख्या -

(i) अधिनियम - अधिनियम म्हणजे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हा होय.

(ii) कलम - कलम म्हणजे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदींचा या संहीतेत कलम म्हणून संदर्भ देण्यात आलेला आहे ते कलम.

(iii) नियम व उपनियम - प्रस्तुत संहितेत जी तरतुद करण्यात आली आहे ती तरतुद व तिला देण्यात आलेल्या क्रमांकास नियम व उपनियम असे संबोधण्यात येईल.

(iv) शिक्षक कर्मचारी - शिक्षक कर्मचारी म्हणजे मुख्याध्यापक, व्यवस्थापकीय अधिक्षक, विशेष शिक्षक, कला शिक्षक, निदेशाक, भौतिकोपचार तज्ञ, मानसोपचार तज्ञ, व्यवसायोपचार तज्ञ, वाचा उपचार तज्ञ, चलनवलन अवयव निदेशाक, सामाजिक कार्यकर्ता हे कर्मचारी.

(v) शिक्षकेत्तर कर्मचारी - शिक्षकेत्तर कर्मचारी म्हणजे उक्त शिक्षक कर्मचारी व्याख्येत समाविष्ट नसलेले इतर सर्व कर्मचारी.

(vi) पुनर्वसन व्यावसायिक - पुनर्वसन व्यावसायिक म्हणजे भारतीय पुनर्वास परिषद अधिनियम १९९२ अंतर्गत भारतीय पुनर्वास परिषदेने प्रमाणित केलेले व्यावसायिक.

(vii) व्यक्तीगत शैक्षणिक कार्यक्रम (IEP) - If your child receives special education services, he must have an Individualized Education Program (IEP). Thatus the law. An IEP is an important legal document. It spells out your childus learning needs, the services the school will provide and how progress will be measured.Several people, including parents, are involved in creating the document. The entire process can be a great way to sort out your childus strengths and weaknesses. Working on the IEP can help you figure out ways to help him succeed in school.

(viii) कौशल्य विकास (Skilling) - Skill Development | Meaning and Focus

The objective of Skill Development is to create a workforce empowered with the necessary and continuously upgraded skills, knowledge and internationally recognized qualifications to gain access to decent employment and ensure India's competitiveness in the dynamic global market. It aims at increasing the productivity

and employability of workforce (wage and self-employed) both in the organized and the unorganized sectors. It seeks increased participation of youth, women, disabled and other disadvantaged sections and to synergize efforts of various sectors and reform the present system with the enhanced capability to adapt to changing technologies and labour market demands. According to the International Labour Organization (ILO) "Skill Development is of key importance in stimulating a sustainable development process and can make a contribution in facilitating the transition from an informal to formal economy. It is also essential to address the opportunities and challenges to meet new demands of changing economies and new technologies in the context of globalization." Skills development can help build a "virtuous circle" in which the quality and relevance of education and training for women and men fuels the innovation, investment, technological change, enterprise development, economic diversification and competitiveness that economies need to accelerate the creation of more jobs.

(ix) सांकेतिक भाषा (Sign Language) - Definition ofusign LANGUAGE

१: a formal language employing a system of hand gestures for communication (as by the deaf)

२: an unsystematic method of communicating chiefly by manual gestures used by people speaking different languages

(x) विशेष शाळा - विशेष शाळा म्हणजे, जिच्यामध्ये अपंग मुलांसाठी विशेष शैक्षणिक व पुनर्वसनात्मक कार्यक्रम राबविला जातो. अशी निवासी/बिगर निवासी अथवा अनुदानित/विना अनुदानित/कायम विना अनुदानित शाळा होय.

(xi) निवासी विशेष शाळा - निवासी विशेष शाळा म्हणजे, विशेष शाळा संलग्न वसतिगृहामध्ये अपंग मुलांची निवास, भोजन, वैद्यकिय देखभाल, संरक्षण व काळजी इत्यादी व्यवस्था करणारी शाळा होय. संलग्न वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना विशेष शाळेमध्ये शालेय शिक्षणाची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल अथवा नजिकच्या सर्वसाधारण शाळेमध्ये अव्यंग/सामान्य मुलांबरोबर विद्याविषयक शिक्षणाची सोय करण्यात येईल व या विद्यार्थ्यांना शैक्षणिक व पुनर्वसनात्मक साहित्य आणि सेवा उपलब्ध करुन देणारी शाळा म्हणजे निवासी शाळा होय.

(xii) प्रशिक्षण केंद्र - म्हणजे प्रौढ अपंग व्यक्तींसाठी ज्या प्रशिक्षण केंद्रामध्ये अपंगत्वानुरुप कुशल व अकुशल व्यवसाय प्रशिक्षणासह कौशल्य विकास कार्यक्रम राबविला जातो आणि व्यावसायिक पुनर्वसनासाठी विशेष प्रयत्न केले जातात असे निवासी अथवा अनिवासी प्रशिक्षण केंद्र होय. या मध्ये अपंग व्यक्तींच्या कर्मशाळा, संरक्षित कर्मशाळा तत्सम उपक्रमाचा समावेश राहील.

(xiii) विना अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र - विना अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र म्हणजे (१) शासनाचे अनुदान मिळत नाही. (२) समाजाच्या मदतीने विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहेत. तथापि यामध्ये शासनाच्या पदभरतीच्या नियमानुसार व शासनाने ठरविलेल्या पारदर्शक

पदभरतीनुसार कर्मचारी पदे भरली आहेत. (३) शासनाच्या आर्थिक परिस्थितीनुसार व धोरणानुसार या शाळा/प्रशिक्षण केंद्रांना भविष्यात शासन प्राधान्यक्रमाने अनुदान द्यायचे ठरवू शकते.

(xiv) कायम विना अनुदानित शाळा/प्रशिक्षण केंद्र - अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदींनुसार स्वयंसेवी संस्थेस, अपंगांकरीता विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास नोंदणी प्रमाणपत्र देण्यात आले आहे. मात्र संबंधित जिल्हयातील कार्यरत अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व लोकसंख्या विचारात घेता अगोदर कार्यरत असलेल्याच अपंगांच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र भौगोलिक दृष्टया त्या ठिकाणी अधिक असल्याने, व अपंग व्यक्तीसाठीचा शासनाचा अर्थ संकल्प लक्षात घेता या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रांना शासनाकडून अनुदान देण्याची शक्यता नाही अशा विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र होय.

**(राज्यातील सर्व जिल्हयात समान प्रमाणात अपंगांचे अनुदानित उपक्रम असावेत यासाठी केलेली ही व्याख्या.)**

(xv) मतिमंदांची बालगृहे u राज्याच्या महिला व बाल विकास विभागाकडून सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेली १४ अनुदानित व ५ विना अनुदानित मतिमंद मुलांची बालगृहे व शासनाने नव्याने मतिमंद बालगृहे म्हणून मंजूरी दिल्यास अशी बालगृहे. ज्यामध्ये अनाथ अपंगांना आश्रय दिला जातो.

(xvi) उपक्रम - अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण व संपुर्ण सहभाग) अधिनियम १९९५ अथवा अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ हया अधिनियम मधील तरतुदी अन्वये ज्या कायम विना अनुदातिन, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, मतिमंदांकरीता कायम स्वरुपी आधार गृह, शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्पांना सक्षम प्राधिकारी यांनी नोंदणी प्रमाणपत्र प्रदान केलेले आहे ते उपक्रम.

(xvii) शीघ्र निदान व उपचार - (Early Detection & Intervention) is a system of coordinated services that promotes the child's age-appropriate growth and development and supports families during the critical early years. Starting with a partnership between parents and professionals at this early stage helps the child, family and community as a whole.Early intervention services delivered within the context of the family can aid with the below through the services of physical, occupational, and speech therapy. examples include:

lHelp prevent child abuse and neglect

Mitigateg the effects of abuse and neglect

Improve parenting skills

Strengthen families

Improve the child's ddevelopmental, social, and educational gains;

Reduce the future costs of special education, rehabilitation and health care needs;

Reduce feelings of isolation, stress and frustration that families may experience;

Help alleviate and areduce behaviors by usingi positive behaviour strategies and interventions;

and

Help children with disabilities grow up to become productive, independent individuals.

Assistance with technological devices, counseling, and family training.

The earlier children at high risk for abuse or neglect, of children with or at risk of disabilities receive assistance and the sooner their families receive support towards their child's' development, the *farthere they will go in life.*

हा **कार्यक्रम प्रत्येक अनुदानित विशेष शाळेत घेणे अपेक्षित आहे.**

(xviii) पुनर्वसन - म्हणजे अपंगत्व असणाऱ्या व्यक्तीस भौतिक, भावनिक, बौध्दिक, मानसिक, आर्थिक, शैक्षणिक आणि सामाजिक दर्जा मिळवून देण्यासाठी करण्यात येणारे प्रयत्न.

(xix) नोंदणी प्रमाणपत्र - अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील तरतुदी अन्वये शासन व्दारा नियुक्त सक्षम प्राधिकारी यांनी अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या अथवा करु इच्छिणाऱ्या विशिष्ट उपक्रमाकरीता दिलेले नोंदणी प्रमाणपत्र व त्याचे वेळोवेळी केलेले नुतनीकरण प्रमाणपत्र होय.

(xx) आयुक्त - अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ७९ उपकलम १ अन्वये शासनाने राज्य आयुक्त म्हणून नियुक्त केलेला अधिकारी.

(xxi) संस्था - संस्था म्हणजे संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० मधील तरतुदी अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याकडे नोंदणीकृत असलेली संस्था होय.

(xx) कार्यकारी मंडळ - कार्यकारी मंडळ म्हणजे उक्त नोंदणीकृत संस्थेचे उक्त कायद्यान्वये सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केलेले परिशिष्ट एक वरील संचालक मंडळ हे होय.

(xxi) व्यवस्थापन मंडळ - व्यवस्थापन मंडळ म्हणजे उक्त प्रमाणे नोंदणीकृत संस्थाव्दारा स्थापित व्यवस्थापन मंडळ.

(xxii) शाळा समिती - शाळा समिती म्हणजे या संहितेमध्ये नमूद केलेले उपक्रम कार्यक्षमतेने चालविण्यासाठी या संहितेतील तरतुदीप्रमाणे संस्थेच्या कार्यकारी मंडळाने गठीत केलेली शाळा व्यवस्थापन समिती होय.

(xxiii) आयुक्तालय - अपंग व्यक्तींचे शैक्षणिक, सामाजिक, भौतिक, बौध्दिक, आर्थिक, व्यावसायिक विकासासोबत त्यांचे शिक्षण, प्रशिक्षण, पुनर्वसन इत्यादींच्या प्रयोजनाकरीता शासन राबवित असलेल्या योजनांचे संचलन व संनियंत्रण करणारे राज्यस्तरीय कार्यालय.

(xxiv) सक्षम प्राधिकारी - अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम ४९ अन्वये शासनाने अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या अथवा करु इच्छिणाऱ्या अधोरेखित उपक्रमाकरीता नोंदणी प्रमाणपत्र प्रदान करण्याकरीता नियुक्त केलेला अधिकारी.

(xxv) प्रतिक्षा यादी - सक्षम प्राधिकारी यांनी नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे बंद पडलेल्या अथवा सक्षम प्राधिकारी यांनी मंजूर विदयार्थी संख्या कमी केल्यामुळे त्या विदयार्थी संख्येच्या प्रमाणात संबंधित उपक्रमाच्या आस्थापनेवरील कर्मचाऱ्यांच्या संख्येत झालेल्या वजावटीमुळे अतिरीक्त

ठरलेल्या अनुदानित विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्रामधील नियमाप्रमाणे भरती केलेल्या व प्रशासकीय मान्यता प्राप्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची महाराष्ट्र खाजगी शाळा कर्मचारी (सेवेच्या शर्ती) नियम १९८१ मधील तरतुदींप्रमाणे ज्येष्ठतेनुसार ठेवण्यात आलेली यादी. या यादीत समाविष्ट कर्मचाऱ्यांच्या कुकर्मामुळे आधीची शाळा/प्रशिक्षण केंद्र बंद पडली असेल अथवा अपंगांचे नुकसान या कर्मचाऱ्याने केले असेल तर त्यास सक्षम अधिकारी कारण देऊन प्रतिक्षा यादीत त्याचे नांव समाविष्ट करणार नाही व तसे समाविष्ट झाले असल्यास चौकशी करुन नांव काढण्याची कार्यवाही करेल.

स्पष्टीकरण -- ज्येष्ठता◌ा म्हणजे कर्मचाऱ्याचे रुजू दिनाकापासून संबंधीत कर्मचाऱ्याची नोकरी संपुष्टात आल्याची तारीख या मधील नियमित सेवेचा कर्तव्य कालावधी होय.

(xxvi) अतिरीक्त संवर्ग - शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या सुधारीत कर्मचारी आकृतीबंधामुळे जुन्या आकृतीबंधातील व्यपगत झालेल्या/ठरलेल्या पदांवरील प्रशासकीय मान्यता प्राप्त शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा संवर्ग म्हणजे अतिरिक्त संवर्ग होय.

(xxvii) अतिरीक्त संवर्ग कक्ष - वित्त विभागाचा शासन निर्णय दिनांक १०/०९/२००१ च्या अनुषंगाने सामाजिक न्याय विभागाचा शासन निर्णय दिनांक २५/१०/२०१२ अन्वये उक्त अतिरिक्त संवर्गातील कर्मचाऱ्याची प्रतिक्षा यादी ठेवणे, अदयावत करणे व जेष्ठतेनुसार सदर यादीवरील कर्मचाऱ्यांचे रिक्त पदी समायोजन करणे या कारणाकरीता आयुक्तालय स्तरावर स्थापन करण्यात आलेला कक्ष होय.

(xxviii) ना-हरकत प्रमाणपत्र - अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह मधील मंजूर पदांपैकी सरळसेवेने अथवा पदोन्नतीने भरावयाची पदे कोणत्याही कारणाने रिक्त झालेली असतील ती पदे त्या-त्या वेळच्या शासन धोरणानुसार भरता येणार आहेत अशी पदे भरण्याकरीता प्रतिक्षा यादीवर उमेदवार उपलब्ध नसल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याने संबंधित संस्थेस दिलेले प्रमाणपत्र.

(xxiv) अपंग व्यक्ती - अपंग व्यक्ती म्हणजे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २ उपकलम झेड (सी) व परिशिष्ट मध्ये नमूद केलेले अपंगत्व असलेली व्यक्ती.

(xxv) निरीक्षण अधिकारी - उक्त उपक्रमाचे निरीक्षण व तपासणी करणारे आयुक्तालयातील उपायुक्त, सहाय्यक आयुक्त, निरिक्षक, लेखाधिकारी, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, सहाय्यक सल्लागार अथवा आयुक्तालयाने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी तसेच क्षेत्रीय कार्यालयातील जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता, सहाय्यक सल्लागार अथवा त्यांनी प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी/कर्मचारी म्हणजे निरिक्षण अधिकारी होय.

(xxvi) विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र, मतिमंद बालगृहातील प्रवेशित विद्यार्थी -

शासन मान्यता प्राप्त रुग्णालयाच्या संबंधित सक्षम वैद्यकीय मंडळाकडून प्रमाणित केल्या नंतर किंवा बालकल्याण समितीच्या आदेशाने मान्यता प्राप्त विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र, मतिमंद बालगृहे इत्यादीमध्ये प्रवेश मिळालेला विद्यार्थी.

(xxvii) एकात्मिक शिक्षण - म्हणजे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ मधील कलम २ उपकलम u ओे नियम (एम) अन्वये केलेली व्याख्या.

(xxviii) बाल कल्याण समिती - म्हणजे बाल हक्क अधिनियम २०१५ मधील तरतुदी अन्वये महिला व बाल विकास विभागाव्दारे स्थापित समिती.

स्पष्टीकरण - बाल कल्याण समिती या संज्ञेचा या संहिते मध्ये अनाथ मतिमंद बालके व मतिमंद बालगृहे या संदर्भाने सहसंबंध जोडण्यात आलेला आहे.

*   *   *

## प्रकरण २

## अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्पांना मान्यता, नोंदणी प्रमाणपत्र व नुतनीकरणाचे निकष व कार्य पध्दती

(४) (एक) अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेस अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या कायद्याप्रमाणे व त्या अनुषंगाने राज्य शासनाने तयार केलेल्या/केल्या जाणाऱ्या नियमाप्रमाणे सक्षम प्राधिकाऱ्याची मान्यता असणे आवश्यक आहे. मान्यतेअंती या संस्था खालीलप्रमाणे कार्य करु शकतात.

(i) विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र. (निवासी अथवा अनिवासी)

(ii) वसतिगृह.

(iii)बालगृह.

(iv) शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र.

(v) पुनर्वसन प्रकल्प.

(vi) व्यवसाय व जीवन कौशल्य शिकवणारे केंद्र.

(vii) जनजागृती अभियान.

(viii) अपंगांच्या सहाय्यासाठी पुस्तके, अपंगांसाठी साहित्य उपलब्ध करुन देणे, अपंगांच्या कायद्यांच्या बाबी मांडणाऱ्या संस्था, जनसमुदायास अपंगांनी तयार केलेल्या वस्तू घेण्यासाठी प्रोत्साहीत व मदत करणारे संस्था, चित्रपट व इतर माध्यमातून अपंगांचे प्रश्न मांडणाऱ्या संस्था, अपंग व्यक्तींना समुपदेशन करणाऱ्या संस्था इत्यादी.

(दोन) अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ व सदर अधिनियमांतर्गत शासनाकडून तयार करण्यात आलेल्या नियमानुसार व भविष्यात यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्ती प्रमाणे राज्यात स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या उपरोक्त नियम (एक) मधील प्रकल्पांना नोंदणी प्रमाणपत्र हे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत देण्यात येईल व त्यांचे वेळोवेळी नुतनीकरण करण्यात येईल.

(तीन) उक्त नियम (एक) मधील उपक्रमांना अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ च्या तरतूदीप्रमाणे तयार करण्यात आलेल्या राज्य नियमामध्ये दिल्याप्रमाणे अर्ज करणे व नोंदणी प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

(चार) हे उपक्रम राबविण्यासाठी त्यांना शासनाकडून शासनाच्या धोरणाप्रमाणे अनुदान मिळेल अथवा ते विनाअनुदान तत्वावर कार्य करु शकतील. अथवा कायम स्वरुपी विना अनुदानित असतील.

(पाच) नोंदणी प्रमाणपत्र घेण्यासाठी स्वयंसेवी संस्थांनी **(परिशिष्ट १)** प्रमाणे त्यांचे अर्ज आवश्यक त्या कागद पत्रासह जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर यांचे मार्फत सक्षम अधिकाऱ्यांस सादर करावेत.

(सहा) नवीन नोंदणी प्रमाणपत्राच्या अर्जा सोबत शुल्का पोटी रुपये २०००/- व नुतनीकरणाच्या अर्जा सोबत रुपये १०००/- रकमेचा धनाकर्ष नोंदणी प्रमाणपत्र देणाऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याच्या कार्यालयातील अहरण व संवितरण अधिकाऱ्याच्या नांवे पाठविणे बंधनकारक राहील.

(सात) (अ) सक्षम प्राधिकारी यांना संबंधित अहवाल समाधानकारक वाटल्यास नोंदणी प्रमाणपत्र देतील. परंतु सदर अहवालावरुन उपक्रमामध्ये त्रुटी असल्याचे निदर्शनास आल्यास त्या त्रुटी सक्षम प्राधिकारी हे संबंधित संस्थेस कळवतील व त्रुटी पुर्तता करण्याची वाजवी संधी देऊन सदर उपक्रमाच्या नोंदणी प्रमाणपत्राबाबत योग्य तो निर्णय घेतील. प्रत्येक प्रकल्प हा सर्व प्रथम कायम विना अनुदानित असेल.

(ब) शासनाचे ध्येय धोरणानुसार शासन सक्षम अधिकाऱ्याच्या अहवालाप्रमाणे हा प्रकल्प विना अनुदानित असावा का कसे हा निर्णय घेईल.

(आठ) सदरची शाळा संहिता अंमलात आल्याच्या दिनांकापासून नवीन अस्थिव्यंग शाळांना कोणत्याही परिस्थितीत नव्याने मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र दिले जाणार नाही.

(नऊ) परंतु सेरेब्रेल पालसी विदयार्थ्यांची उपलब्धता विचारात घेऊन अस्थिव्यंग शाळां ऐवजी सेरेब्रेल पालसीने बाधीत अपंग विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हितसंबंध जोपासण्याच्या उद्देशाने सेरेब्रेल पालसी करीता निधीच्या उपलब्धतेनुसार नवीन उपक्रम म्हणून निवासी/अनिवासी शाळांकरीता शासन मान्यता देईल.

(दहा) परंतु, सदर संहिता अंमलात येण्यापुर्वी जी अस्थिव्यंग शाळा शासन मान्यता व सक्षम प्राधिकारी यांच्याकडून नोंदणीप्रमाणपत्र प्राप्त असेल व त्या शाळेची शासन मान्यता व नोंदणीप्रमाणपत्र अनुक्रमे शासनाने व सक्षम प्राधिकारी यांनी विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करून रद्द केलेले असेल आणि शासन धोरणानुसार सदरची अस्थिव्यंग शाळा सक्षम संस्थेस हस्तांतर किंवा स्थलांतर किंवा हस्तांतर आणि स्थलांतर केलेली असेल व ती सेरेब्रल पालसी मुलांसाठी शाळा चालवायला तयार असेल अशा शाळेस नियम ४(आठ) बाधा येणार नाही.

**(५) अनुदानतत्वावर मान्यता**

(एक) अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मध्ये अपंग व्यक्तींच्या शिक्षण प्रशिक्षणाबरोबरच रोजगार, स्वयंरोजगार, अडथळाविरहीत वातावरण निर्मिती, सहाय्यभूत साधने व पुनर्वसना विषयी

करण्यात आलेल्या तरतुदींची अंमलबजावणी इत्यादी बाबी तसेच शासनाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक, भौगोलिक व राजनितीक धोरण, नियोजन व आर्थिक निधीची उपलब्धता लक्षात घेऊन शासनाने ठरविलेल्या धोरणाप्रमाणे अनुदानतत्वावर शासनमान्यता व अनुदान देण्यात येईल.

(दोन) नोंदणी प्रमाणपत्र हा अनुदानतत्वावरील मान्यतेसाठी हक्क नाही. मात्र अनुदान देतेवेळी नोंदणी प्रमाणपत्र असणे व त्याचे नुतनीकरण असणे बंधनकारक राहील.

(तीन) अनुदान तत्वावर मान्यता देताना भौगोलिक असमतोल दूर करण्यात येईल.

(चार) ज्या संस्थानी अनाथ अपंग मुलांकरीता शाळा अथवा कार्यशाळा सुरु केलेली आहे किंवा अनाथ मतिमंद मुलांकरीता मतिमंद बालगृह संलग्नित शाळा अथवा कार्यशाळ सुरु केलेली आहे. अशा उपक्रमांना अनुदान तत्वावर मान्यता देण्याबाबत प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

(पाच) अनुदान तत्वावर मान्यता देण्यासाठी जिल्हाधिकारी व इतर विभागामार्फत झालेली तपासणी व दिलेले श्रेणीकरण हे भौतिक सुविधा पुरतेच व मुलांच्या उपस्थितीबाबत पडताळणी करणे या पुरतेच ग्राहय धरण्यात येईल, व त्यास ३०% भार (Weightage) देण्यात येईल व,

(सहा) केंद्र शासनाच्या संस्थांमार्फत अथवा त्रयस्थ अपंगाच्या श्रेत्रात कार्यकरणाऱ्या नामवंत संस्थांमार्फत केलेल्या तपासणीमध्ये उपक्रम अ अथवा ब श्रेणीत येणे आवश्यक राहील व यास ७०% भार (Weightage) देण्यात येईल.

(सात) शाळा व्यतिरीक्त इतर उपक्रमांना निधी दिला जात असेल तर शाळांचा खर्च सिमित करण्यासाठी फक्त गुणवंत शाळांचाच विचार करण्यात येईल.

**(६) अनुदानाची शासन मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे**

(एक) उपरोक्त नियम (एक) मधील अपंग क्षेत्रात कार्य करणाऱ्या उपक्रमांना शासनाची अनुदान तत्वावर मान्यता आहे अशा उपक्रमांची अनुदानाची मान्यता खालील सर्व साधारण कारणांस्तव रद्द करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(i) प्रवेशितांचे लैंगिक शोषण व बाल अत्याचार झाल्याची घटना घडणे (POSCO या कायद्याप्रमाणे).

(ii) शासनाच्या नियमाप्रमाणे सेवाभरती प्रक्रीयेचा अवलंब न करता व पद भरतीच्या नियमांचे (आरक्षण, शैक्षणिक अर्हता, वयोमर्यादा, गुणवत्ता इ.) उल्लंघन करुन संस्थेने परस्पर पद भरती करणे.

(iii) प्रवेशितांचे वैयक्तीक प्रगती दर्शक माहिती न ठेवणे.IEP

(iv) शैक्षणिक गुणवत्तेत सुधार न करणे.

(v) सर्वसमावेषक शिक्षणासाठी प्रवेशितांची तयारी करुन न घेणे व त्यासाठी प्रयत्न न करणे.

(vi) सरल या संगणकीय प्रणालीमध्ये माहिती न भरणे व अद्यावत न करणे.

(vii) बायोमॅट्रीक हजेरी न घेणे.

(viii) सी सी कॅमेरे न ठेवणे.

(ix) संस्थेच्या दर्लक्ष व बेजबाबदारपणामुळे प्रवेशितांचे आरोग्य धोक्यात येईल अशा घटना घडल्यास.

(x) मा. न्यायालयाच्या अथवा शासनाच्या आदेशांचे जाणूनबूजून उल्लंघन करणे.

(xi) नोंदणी प्रमाणपत्राच्या निकषाप्रमाणे सोईसुविधा उपलब्ध करुन न देणे.

(xii) शासनाच्या अथवा सार्वजनिक निधीचा अपव्यय अथवा अपहार करणे.

(xiii) व्यवस्थापनामधील अथवा कर्मचाऱ्यांमधील वाद संधी देऊनही न मिटणे व त्यामुळे प्रवेशितांना सोईसुविधा उपलब्ध करुन देण्यात अक्षम्य दुर्लक्ष होणे.

(xiv) शासनाच्या निधी व्यतीरीक्त इतर स्त्रोतामधून निधी संकलन करुन संस्था आर्थिकदृष्टया सक्षम बनविण्याकरीता प्रयत्न न करणे.

(xv) तपासणीमध्ये सोईसुविधाचा मोठयाप्रमाणात अभाव आढळून येणे व तपासणीचा दर्जा क क्षेणीत असल्यास व त्यात संधी देऊनही संस्थेने सुधारणा न केल्यास.

(xvi) या संहितेच्या प्रारंभिकमध्ये नमूद केलेल्या तत्वाचे उल्लंधन करणे.

(७) अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ व सदर अधिनियमांतर्गत शासनाकडून तयार करण्यात आलेल्या नियमानुसार व भविष्यात यामध्ये वेळोवेळी होणाऱ्या दुरुस्तीप्रमाणे तसेच या संहितेतील तरतुदींचे उल्लंघन केल्यास व शासनाच्या ध्येय धोरणाप्रमाणे उपक्रम चालू नसलेल्या कायमस्वरुपी विनाअनुदानित, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्प इत्यादींना देण्यात आलेले नोंदणी प्रमाणपत्र शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत रद्द करण्यात येईल.

(८) विनिर्दीष्टे नियमानुसार सक्षम अधिकारी यांनी नोंदणी प्रमाणपत्र रद्द केलेल्या आदेशाविरुध्द संस्थेने शासनाकडे अपिल दाखल केलेले असल्यास व ते न्यायप्रविष्ठ असल्यास व त्याप्रमाणे शासनाने स्थगन आदेश दिला असल्यास दरम्यानच्या कालावधीत संस्थेस सदरचा उपक्रम चालू ठेवता येईल. परंतु अपिलात अंतिम निर्णय होईपर्यंत या कालावधीचे वेतन व वेतनेत्तर अनुदान देण्यात येणार नाही.

(९) सक्षम अधिकारी यांनी प्रकरणाचे गांभिर्य विचारात घेऊन संबंधित शैक्षणिक वर्षाच्या मध्यावधीत नोंदणीप्रमाणत्र रद्द केले असल्यास संबधीत विशेष शाळा अथवा प्रशिक्षण केंद्रामध्ये अपिलाचा निर्णय होईपर्यंत देखील विशेष शाळा अथवा प्रशिक्षण केंद्र चालू ठेवणे हितावह नसल्याचे सक्षम अधिकारी तथा आयुक्त यांची खात्री झाल्यास अशा विशेष शाळा अथवा प्रशिक्षण केंद्र तात्काळ बंद करण्यात येईल व अशा विशेष शाळा अथवा प्रशिक्षण केंद्रामधील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन नजीकच्या इतर अनुदानित विशेष शाळा अथवा प्रशिक्षण केंद्रामध्ये समायोजित करण्यात येईल व त्यावर शासन नियमानुसार समायोजित विद्यार्थ्यांपुरतेच परिपोषण अनुदान संबंधित समायोजित संस्थेस अदा करेल.

## प्रकरण ३
## उपक्रमाचे स्वरुप
## शालेय विभाग
## भाग १

(१०) या संहितेत नमूद केलेल्या अपंगत्वाच्या सर्व प्रवर्गाच्या विशेष शाळांमध्ये शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र (Early Detection & Intervention centre) कार्यरत असेल.

**शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र (Early Detection & Intervention centre)**

(एक) **केंद्राची उद्दिष्टे**

- सर्वेक्षण व जनजागृती.
- अपंगत्वाची ओळख व निदान करणे.
- मूळ अपंगत्वाबरोबर इतर सहअपंगत्व आले आहे का याचे निदान करुन उपाय योजना करणे.
- उपचारात्मक सेवा (Therapeutic Services) व मुलांच्या गरजेनुसार इतर आवश्यक सेवा पुरविणे.
- शाळेत जाण्याकरिता लागणारे विशेष शाळापूर्व कौशल्य मुलांमध्ये विकसित करणे.
- मानसशास्त्रीय समुपदेशन पालक मार्गदर्शन व कुटुंबासाठी व्यक्तीगत सहाय्यक उपक्रम राबविणे.
- गृह निर्देशित कार्यक्रम राबविणे (Home Based Programme)

**(दोन) वयोगट**

- ० ते ३ वयोगटातील अपंग सदृश्य बालकांना या केंद्रामध्ये प्रवेश देण्यात येईल.
- बालकासोबत त्यांच्या पालकांना उपस्थित रहाणे अनिवार्य राहील.

**(तीन) किमान संख्याबळ**

- केंद्र सुरु करण्याकरिता किमान १० बालके किंवा शाळेच्या एकूण मान्य विद्यार्थी संख्येच्या १० टक्के बालके प्रवेशित असल्यास असे केंद्र चालू करण्यास मान्यता मिळेल.
- हे केंद्र दिवसातून ६ तास व आठवडयातून ५ दिवस सुरु राहील मात्र प्रवेशित बालक त्यांच्या क्षमतेनुसार अथवा आठवडयातून किमान दोन दिवस व रोज किमान दोन तास (मुलांच्या क्षमतेनुसार) उपस्थित राहतील.

## विशेष शाळा
## भाग १ (एक) मतिमंद प्रवर्ग

(११) मतिमंद विद्यार्थ्यांचे बोधनिक, कारक, संवेदनिक, सामाजिक व भावनिक कौशयल्य विकसित करुन त्यांचा समायोजित वर्तन विकास साधून त्यांना पुनर्वसनासाठी आत्मनिर्भर करणे हा मतिमंदांच्या विशेष शाळेचा उद्देश असेल.

**(एक) मतिमंदांच्या विशेष शाळेचे/मतिमंद बालगृह संलग्नित शाळेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

**विशेष शाळा** - जी मतिमंद मुले सामन्य शाळेत समावेशित होऊ शकत नाहीत अशा मुलांमध्ये दैनंदिन जीवनासाठी आवश्यक असणारी कौशल्ये विकसित करुन त्यांना आत्मनिर्भर व स्वावलंबी बनविणे हा विशेष शाळेचा उद्देश असेल त्यासाठी शाळेची वर्ग रचना खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | वर्ग रचना | वयोगट |
|---|---|---|
| अ | **शीघ्र** निदान व उपचार गट | ० ते ३ वर्षे |
| ब | शिशू वर्ग (प्ले ग्रुप) | ३ ते ६ वर्षे |
| क | पूर्व प्राथमिक | ६ ते १२ वर्षे |
| ड | प्राथमिक | ८ ते १४ वर्षे |
| इ | माध्यमिक | १२ ते १६ वर्षे |
| फ | व्यवसाय पूर्व | १४ ते १८ वर्षे |

**शिशू वर्ग (प्ले ग्रुप)** - वय वर्षे ३ ते ६ मधील मुले शिशू वर्गात प्रवेशासाठी पात्र राहतील. या वर्गासाठी प्रत्येक मुलाचे शारिरीक व मानसिक वय तसेच बुध्दयांक विचारात घेऊन नॅशनल इन्स्टीटयूट फॉर पर्सन्स विथ इंटेल्केच्यूली डिसेबल सिकंदराबाद यांनी तयार केलेल्या मूल्यमापन व मूल्यांकन पध्दतीचा अवलंब करुन व्यक्तीगत (IEP) अभ्यासक्रम राबविण्यात यावा. यामध्ये खालील कौशल्याचा समावेश असावा.

कारक विकास कौशल्य, संवेदनिक विकास कौशल्य, बोधनिक विकास कौशल्य, सामाजिक विकास कौशल्य, भावनिक विकास कौशल्य, समायोजित वर्तन विकास, शरीर स्वास्थ (योगा, प्राणायम इ.)

शिशू वर्गाचे शिक्षण संपल्यानंतर मुलांना सामान्य शाळेत सामान्य मुलाबरोबर शिक्षण घेण्यासाठी प्रोत्साहित करावे. मतिमंदत्वाच्या तिव्रतेमुळे जी मुले सामान्य शाळेत शिक्षण घेऊ शकत नाहीत अशा मुलांचा विशेष शाळेमध्ये पुढे प्रवेश चालू ठेवावा.

**टिप** u या विभागातील जे विद्यार्थी शाळेच्या वेळेत पूर्णवेळ बसू शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या क्षमतेप्रमाणे त्यांना वेळ शिथिल राहील.

**पूर्व प्राथमिक ते व्यवसाय पुर्व वर्ग** - या वर्गासाठी नॅशनल इन्स्टीटयूट फॉर पर्सन्स विथ इंटेल्केच्यूली डिसेबल सिकंदराबाद यांनी तयार केलेल्या मूल्यमापन व मूल्यांकन पध्दतीचा तसेच इतर संस्थांनी तयार केलेल्या अभ्यासक्रमचा (उदा- जय वकील स्कूल, कामयनी, अक्षर वाई इंन्स्टीटयूट, पुनर्वास स्पेशल स्कूल गोरेगांव, सुलभा स्पेशल स्कूल चेंबूर, जिज्ञासा कोल्हापूर इ) अवलंब करुन प्रत्येक वर्गासाठी/मुलासाठी एकत्रित व व्यक्तीगत (IEP) अभ्यासक्रम तयार करावा व तो अभ्यासक्रम शिकविण्यात यावा. अभ्यासक्रम तयार करताना त्या अभ्यासक्रमाचे हेतू व ध्येय निश्चित करण्यात यावे. अभ्यासक्रमात कौशल्य विकास कार्यक्रमाचा समावेश असावा.

**विद्यार्थ्यांचे मुल्यांकन** - मतिमंद प्रवर्गाच्या विशेष शाळेतील विद्यार्थ्यांचे मुल्यांकन शाळेत घेतल्या जाणाऱ्या परिक्षा व सातत्यपूर्ण निकषाच्या आधारे करण्यात यावे. हे निकष गुणात्मक व संख्यात्मक असे दोन्ही प्रकारचे असावेत जेणेकरुन मुलांची काय? किती? व कशी प्रगति होत आहे याची माहिती शिक्षकांना व पालकांना समजणे सोईचे होईल.

**(दोन) प्रवेशासाठी निकष –**

**वयोमर्यादा** – मतिमंदांच्या विशेष शाळेसाठी ३ ते १८ वर्षाची वयोमर्यादा राहील. जी मतिमंद मुले नॅशनल इन्स्टीटयूट ओपन स्कूलींग (NIOS) मार्फत घेतल्या जाणाऱ्या परिक्षेची तयारी करीत असतील त्यांच्यासाठी कमाल वयोमर्यादा १८ ऐवजी २१ अशी राहील.

**अपंगत्वाचे प्रमाणपत्र** – प्रवेशासाठी विद्यार्थ्याकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे (मतिमंद अथवा मतिमंदत्वासह इतर अपंगत्व) प्रमाणपत्र असावे. ज्या विद्यार्थ्याकडे प्रवेशाच्या वेळी असे प्रमाणपत्र नसेल अशा विद्यार्थ्याला मानसशास्त्रज्ञाच्या बुध्दयांक अहवालावरुन प्रवेश देण्यात यावा मात्र सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे त्यास बंधनकारक असेल. सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याचा प्रवेश पुढे चालू ठेवता येणार नाही. प्रवेशितामध्ये तिव्र व अतितीव्र अपंगत्व असणाऱ्या विध्यार्थ्यास प्राधान्य देण्यात यावे.

**मतिमंद बालगृह संलग्न शाळा** – मतिमंद बालगृहामध्ये मतिमंद बालकांना बालहक्क (काळजी व संरक्षण) अधिनियम २००० व सुधारीत नियम २००६ अन्वये गठित केलेल्या बालकल्याण समितीच्या आदेशाप्रमाणे प्रवेश देण्यात येईल.

**(तीन) मतिमंदत्वाची बुध्दयांकाप्रमाणे वर्गवारी** – प्रवेशितांची बुध्दयांकाप्रमाणे खालीलप्रमाणे वर्गवारी राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | सौम्य मतिमंदत्व | बुध्दयांक ५० u ६९ | (५० टक्के अपंगत्वाचे प्रमाण) |
| २ | मध्यम मतिमंदत्व | बुध्दयांक ३५ u ४९ | (७५ टक्के अपंगत्वाचे प्रमाण) |
| ३ | तीव्र मतिमंदत्व | बुध्दयांक २० u ३४ | (९० टक्के अपंगत्वाचे प्रमाण) |
| ४ | अतितीव्र मतिमंदत्व | बुध्दयांक २० पेक्षा कमी | (१०० टक्के अपंगत्वाचे प्रमाण) |

**(चार) मतिमंदत्व संलग्न अपंगत्व** – विशेष शाळांमध्ये खालील प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देता येईल.

१. मतिमंदत्वासह स्वमग्नता
२. मतिमंदत्वासह मेंदूचा पक्षाघात
३. मतिमंदत्वासह इतर अपंगत्व (अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ प्रमाणे इतर अपंगत्व)

## भाग १ (दोन) स्वमग्न (Autism)

**(१२) स्वमग्न (Autism) प्रवर्ग** – स्वमग्न बालकामध्ये असमान कौशल्य विकासाची स्थिती असते की ती व्यक्ती संपर्क, व्यवहार आणि सामाजिक क्षमतावर परिणाम करते. ज्याला पुनरावृत्ती वर्तन म्हणून चिन्हीत केले जाते. आत्मकेंद्रीता निदान झालेल्या मुलांना गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागते

अशा मुलांना कार्यात्मक जीवनासाठी मुख्य कौशल्य प्राप्त करण्याकरीता विशेष हस्तक्षेप आणि प्रशिक्षणाची गरज भासते त्यासाठी विशेष शाळेची आवश्यकता आहे.

**(एक) स्वमग्न (Autism) मुलांच्या विशेष शाळेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

**विशेष शाळा** - स्वमग्न मुलांच्या विशेष शाळेचा पाठयक्रम खालीलप्रमाणे राहील.

| अ.क्र. | पाठयक्रम | वयोगट |
|---|---|---|
| अ | **शीघ्र** निदान व उपचार गट | ० ते ६ वर्षे |
| ब | पूर्व प्राथमिक | ६ ते ७ पर्यंत |
| क | प्राथमिक - १ | ७ ते १० वर्षे |
| ड | प्राथमिक - २ | ९ ते १४ वर्षे |
| इ | माध्यमिक | ११ ते १४ वर्षे |
| फ | व्यवसाय पूर्व | १५ ते १८ वर्षे |

**पूर्व प्राथमिक** -

- वय वर्षे ६ पूर्ण झाल्यानंतर पूर्व प्राथमिकस्तरामध्ये प्रवेश देण्यात येईल. प्रवेशित विद्यार्थी तीन वर्षाच्या कालावधीसाठी या गटात राहतील.
- तज्ञ बहुउद्देशिय संघाने प्रत्येक मुलासाठी वैयक्तिक कौटुंबिक सेवा योजना (IFSP) विकसित करावी.
- पूर्व प्राथमिक गटामध्ये राबविल्या जाणाऱ्या कार्यक्रमाव्दारे सामाजिक आदान-प्रदान, भाषेच्या विकासासाठी असणारी कौशल्य विकसित करुन संवादासाठी सक्षम बनविणे. खेळ व मुलांच्या नैसर्गिक उपक्रमामार्फत ही कौशल्य विकसित केली जातील.
- मुलांच्या शैक्षणिक कार्यक्रमात पालकांची भुमिका आणि त्यांच्या सहभागावर IFSP मध्ये लक्षपुर्वक भर देण्यात येईल.
- वैयक्तीक कौटुंबिक सेवा योजना (IFSP) मध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक मुलाच्या ध्येयाचे दर तीन महिन्याने मुल्यांकन करण्यात येईल.
- जेव्हा शक्य असेल तेव्हा वयोगटानुसार सामान्य शाळेप्रमाणे अभ्यासक्रम शिकविण्याचा प्रयत्न केला जाईल अथवा नॅशनल इन्स्टीटयूट ओपन स्कूलींग (NIOS) चा समतुल्य अभ्यासक्रम शिकविण्यात येईल.

**प्राथमिकस्तर १** -

- वयवर्षे ७ ते १० वर्षे वयोगटातील विद्यार्थी या विभागात राहतील.
- या विभागासाठी राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमाची उद्दीष्टे पुर्व शैक्षणिक कौशल्य, रोजच्या जीवनातील दैनंदिन कारक कौशल्य, जीवन कौशल्य, वयानुरुप सामाजिक व्यवहार आणि संभाषण कौशल्य विकसित करणे ही राहतील.

- प्रत्येक मुलासाठी व्यक्तीगत शिक्षण योजना (IEP) बनविण्यात येईल. ईएसीए (Educational Assessment of Children with Autism - EACA), एफएसीपी (Functional Assessment Checklist for Programming u FACP), एबीएलएलएस (Assessment of Basic Language and Learning Skills u ABLLS) पडतावा सूची, बौध्दिक विकलांगता असलेल्या मुलांचे शैक्षणिक मुल्यांकन (Educational Assessment of Checklist for Children with Intellectual Disabilities u EACCID) इ. अभ्यासक्रम मार्गदर्शक तत्वे आयईपी उद्दीष्टय निवडीसाठी वापरण्यात यावीत.
- स्वमग्नता विशिष्ट शिक्षण पध्दतीचा वापर करावा की, ज्यामध्ये उदा. दृश्यनित पध्दतीत, पर्यायी आणि योग्य संवाद, वर्तन विश्लेषण (Applied Behaviour Analysis) आणि संरचित शिक्षण इत्यादीचा समावेश असेल.
- प्रत्येक मुलाला गरजेनुसार आवश्यक उपचार व थेरॅपी पुरविण्यात यावी.
- पालकांना आयईपी उद्दीष्टय आधारीत घरगुती कार्यक्रम देण्यात येईल की, घरी गेल्यावर पालक त्याचा पाठपुरावा करतील.
- प्रत्येक मुलाच्या प्रगतीचे दर तीन महिन्याने मुल्यांकन करण्यात येईल.
- या गटातील जे विद्यार्थी ८०% कौशल्य आत्मसात करु शकले नाहीत अशा विद्यार्थ्यांना पुनश्च प्राथमिक गट १ प्रवेश चालू ठेवण्यात येईल.

**प्राथमिकस्तर २** -

- प्राथमिक स्तर गट मधील ८०% किंवा त्यापेक्षा जास्त निर्धारीत केलेली कौशल्य पुर्ण केलेल्या वयवर्षे ९ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना प्राथमिकस्तर २ मध्ये प्रवेश देण्यात येईल.
- कार्यात्मक कौशल्य, स्वदक्षता कौशल्य आणि समुदाय आधारीत सामाजिक संवाद कौशल्याचा विकास हे शैक्षणिक उद्दीष्टे असतील.
- प्रत्येक मुलासाठी व्यक्तीगत शिक्षण योजना (IEP) बनविण्यात येईल. ईएसीए, एफएसीपी, एबीएलएलएस चेकलिस्ट, बौध्दिक विकलांगता असलेल्या मुलांचे शैक्षणिक मुल्यांकन (Educational Assessment of Checklist for Children with Intellectual Disabilities uEACCID) इ. अभ्यासक्रम मार्गदर्शक तत्वे आयईपी ध्येय निवडीसाठी वापरण्यात यावीत.
- आयपीएफच्या उद्दीष्टामध्ये वातावरणाशी संवाद साधण्याचा आणि वास्तविक जीवनातील अनुभवातून शिकण्याच्या संधीचा समावेश असेल.
- प्रत्येक मुलाला गरजेनुसार आवश्यक उपचार व थेरॅपी पुरविण्यात यावी.
- प्रत्येक मुलाच्या प्रगतीचे दर तीन महिन्याने मुल्यांकन करण्यात येईल.

**माध्यमिकस्तर** -

- प्राथमिक स्तरामधील मधील ८०% किंवा त्यापेक्षा जास्त निर्धारीत केलेली कौशल्य संपादित केलेल्या वयवर्षे ११ ते १४ वयोगटातील विद्यार्थ्यांना माध्यमिकस्तर मध्ये प्रवेश देण्यात येईल.

- शैक्षणिक कार्यक्रमामध्ये शैक्षणिक कौशल्य, स्व-नियमन आणि व्यवस्थापन कौशल्य व वयानुसार मनोरंजन कौशल्य यावर लक्ष केंद्रीत करण्यात येईल.
- आयपीईएफ च्या उद्दीष्टामध्ये वातावरणाशी संवाद साधण्याचा आणि वास्तविक जीवनातील अनुभवातुन शिकण्याच्या संधीचा समावेश असेल.
- सामाजिक कथेचा वापर, दृष्य कार्यक्रम वेळापत्रक आणि सामाजिक वागणूक संवाद आणि स्वावलंबन कारक कौशल्य शिकविण्यासाठी एबीए पध्दती बनविण्यात येईल.
- कार्यक्रम नियोजन ईएसीए, एफएसीपीए आणि ईएसीसीआयडी मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वाच्या आधारीत करण्यात येईल.
- प्रत्येक मुलाच्या प्रगतीचे दर तीन महिन्याने मूल्यांकन करण्यात येईल.

### व्यवसाय पूर्व गटट

- माध्यमिक स्तरामधील मधील ८०% किंवा त्यापेक्षा जास्त निर्धारीत केलेली कौशल्य संपादित केलेल्या वयवर्षे १५ ते १८ वयोगटातील विद्यार्थ्यांना व्यवसाय पूर्व गटामध्ये प्रवेश देण्यात येईल.
- शैक्षणिक कार्यक्रमामध्ये व्यवसायिक कौशल्ये जसे की, पॅकींग, मुंद्रण करणे, मुलभूत हस्तकला, वेळेचे व्यवस्थापन, सामाजिक संवाद आणि सहयोग, समुदाय मांडणे, स्वावलंबन व जीवन कौशल्याचा समावेश असावा.
- प्रत्येक विद्यार्थ्यासाठी वैयक्तिक संक्रमण योजना (ITP) असेल यामुळे शाळेच्या वातावरणातून मुलाला प्रशिक्षण केंद्रात प्रवेशासाठी तयार होण्यास मदत करेल.
- कार्यक्रमाचे नियोजन ईएसीपी मध्ये दिलेल्या मार्गदर्शक तत्वावर आधारीत राहील.
- सामाजिक कथेचा वापर, दृष्य कार्यक्रम वेळापत्रक आणि सामाजिक वागणूक संवाद आणि स्वावलंबन कारक कौशल्य शिकविण्यासाठी एबीए पध्दती बनविण्यात येईल.

### (दोन) स्वमग्नसाठी विशेष शाळेसाठी आवश्यक असणारे उपकरणे व संसाधने

- मॉडिफाइड चेकलिस्ट फॉर ऑटिझम टॉडलर्स (Modifiied Checklist for Autism in Toddlers (M-CHAT) u ऑन लाइन मोफत डाउललोड उपलबध
- चिल्डहूड ऑटिझम रेटिंग स्केल (CARS) पीयर्सन इंडिया, बॅगलोर (Chidhood Autism Rating Scale (CARS) Available with Pearsonus India, Bangalore)
- डायग्नोस्टिकल अॅड स्टँटेस्टिकल मॅन्युअल-५ (Diagnostic and Statistical Manual-५ (Section onAutism)) (सेकशन व ऑटिझम) ऑन लाइन मोफत डाउनलोड उपलब्ध
- कामथ-बिनॅट टेस्ट ऑफ इंटेलिजन्स : मानसायन पब्लिकेशन्स, दिल्ली (Kamath-Binet Test of intelligence)
- व्हिनलेंड सोशल मॅच्युरिटी स्केल: मनसयन प्रकाशने दिल्ली (Vineland Social maturity Scale: Available with Manasayan Publications, Delhi)

**शैक्षणिक आणि व्यावसायिक मूल्यांकन चाचणी**

- फंक्शनल ॲसेटमेंट चेकलिसट फॉर प्रोग्रामिंग (एफएसीपी) : एनआयईपीआयडी, सिकंदराबाद (Functional Assessment Checklist for Programming (FACP):
- एज्युकेशनल ॲसेसमेंट चेकलिस्ट फॉर चिल्ड्रेन विथ इंटेलेच्युअल डिसॅबिलिटी (इएसीसीडी) प्रसाद सायको पब्लिकेशन, दिल्ली अमेझॉन वरती उपलब्ध: (Educational Assessment Checklist for Children with Intellectual Disability (EACCID): available with Prasad Psycho Publications, Delhi
- एज्युकेशनल असेसमेंट ऑफ चिल्ड्रेन विथ ऑटिझम (इएसीए) सोपान मुंबई (Educational Assessment of Children with Autism (EACA) : Developed by SOPAN, Mumbai
- असेसमेंट ऑफ बेसिक लॅग्वेज ॲड लर्निंग स्किल (एबीएलएलएस): अमेझॉन इन ऑनलाइन उपलब्ध (Assessment of Basic Language and Learning Skills (ABLLS) : available online at amazon.in
- वोकॅशनल असेसमेंट टेस्ट : एन आय पी आय डी, सिकंदराबाद (Vocational Assessment Test: available with NIEPID, Secunderabad)

**थेरपीटिक्स (Therapeutics)**

- थेरपी बॉल, लाइक्रा स्विंग, ट्रॅम्पोलिन, टेक्चरेट मट्स, बॉल पूल, थेरपुतटी इ. संवेदी एकीकरण प्रशिक्षण सामग्री आहेत (Sensory integration training material such as therapy ball, bolster, Lycra swing, trampoline, textured mats, ball pool, theraputty etc.
- ऑगमेंटीव्ह ॲड अल्टरनेटीव्ह कोम्मुनिकेशन एड साधने जसे की AWAZ, कठमाला, पीईसीएस कार्ड, कम्युनिकेशन कोर्ड इ. (Augmentative and Alternative Communication aids and devices such as AWAZ, Kathamala, PECS cards, Communicationa boards)

**(तीन) शिक्षण-शिकणे साधने (मुलांच्या गरजेनुसार विकसित करणे)**

- दृश्य वेळापत्रक (Visual Schedule)
- चित्र आणि प्रतीक कार्ड (Picture and symbol cards)
- टीइएसीसीए बॉक्स (TEACCH Boxes)
- सामाजिक कथा (Social Story)

स्वमग्नसाठीच्या विशेष शाळेने वरील कौशल्याबरोबरच मतिमंद विद्यार्थ्यांसाठी खालील कार्यक्रम राबविणे संस्थांना अनिवार्य राहील.

- शरीर स्वास्थासाठी प्राणायम, योगा, अनापान, व्यायाम व खेळ
- नृत्य आणि संगीत
- शैक्षणिक सहल
- कला व हस्तकला

- पाणी चिकित्सा (Hydrotherapy)
- कृषि आधारित उपक्रम व बागकाम (Agrobased Activity & Gardening)
- Lafter Therapy, Accuprasure, Story Talling & other Assistive Therapies
- Animal Assisted Theraphy
- Art Based Theraphy
- नॅशनल ओपन स्कूलिंग सिस्टीम (एन आय ओ एस) च्या अभ्यासक्रमातील उद्दीष्टांचा समावेश
- पालक मार्गदर्शन आणि समुपदेशन (Self Advocacy)
- समुदाय जागरुकता आणि समर्थन
- मुख्य समूहातील समावेशक शाळासोबत संबंध प्रस्तापित करणे.

**(चार) स्वमग्नत्वासह संलग्न अपंगत्व** - विशेष शाळांमध्ये खालील प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देता येईल.

स्वमग्नत्व इतर अपंगत्व (अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ प्रमाणे इतर अपंगत्व)

उदा. स्वमग्नत्वासह अंधत्व, कर्णबधिरत्व, शारिरीक अपंगत्व, मतिमंदत्व इ.

## भाग १ (तीन) अंध प्रवर्ग

(१३) अंध मुलांच्या दृष्टीहिनतेमुळे येणाऱ्या मर्यादा कमी करण्यासाठी ब्रेल शिक्षण, गतिशीलता, इंद्रिय प्रशिक्षण दैनंदिन कार्यकुशलता, संगीत, क्रीडा व कार्यानुभवाचे व्यक्तिगत स्तरावर शिक्षण देऊन शारिरीक, मानसिक, बौध्दिक व भावनिक असा सर्वांगिण विकास साधून समाजाच्या मुख्यप्रवाहात आणणे हा अंध मुलांच्या विशेष शाळेचा उद्देश असेल.

**(एक) अंध मुलांच्या विशेष शाळेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

**पाठयक्रम -**

1. शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्र (Early Detection & Early Intervention centre)
2. प्राथमिक विभागः इयत्ता पहिली ते पाचवी
3. उच्चप्राथमिक विभागः इयत्ता सहावी ते आठवी
4. माध्यमिक विभागः इयत्ता नववी ते दहावी

विशेष शाळांना नवीन माध्यमिक विभागा सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही तथापि ज्या विशेष शाळांमध्ये ही संहिता अंमलात येण्यापूर्वी माध्यमिक विभाग अस्तित्वात असतील ते पूर्ववत सुरु राहतील. दोन वर्षानंतर नववी व दहावीचे विदयार्थी नजीकच्या सामान्य शाळेत समावेशित शिक्षण

घेतील व ते संलग्न वसतिगृहात निवास ,भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील, मान्य विद्यार्थी संख्या कमी असलेल्या शाळांमधील इयत्ता सहावी पासूनपुढे इयत्ता दहावी पर्यंतचे विद्यार्थीदेखील वरील प्रमाणे सामान्य शाळेमध्ये समावेशित शिक्षण घेण्यास व वसतिगृहात निवास, भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील .अशा विद्यार्थ्यांना शाळेमार्फत विशेष शिक्षकांच्या सेवेसह अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

**या पाठयक्रमाबरोबरच अंध मुलांच्या विशेष शाळेमध्ये खालीलप्रमाणे स्वतंत्र वर्ग असावेत.**

१. ब्रेलपूर्व तयारी व मंददृष्टी अध्यापन साहित्य वर्ग.
२. बहुविकलांग मुलांकरीता वर्ग.
३. संगीत, गायन-वादन वर्ग.
४. संगणक प्रशिक्षण वर्ग.

**दोन अभ्यासक्रम-**

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग यांनी ठरविलेला अभ्यासक्रम राबवावा. अभ्यासक्रमाचे धोरण राबविताना महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडील विषयांच्या क्रमिक पुस्तकांचा वापर करावा. यासोबत खाली विषय विदयार्थ्यांना शिकवावेत.

(१ब्रेल शिक्षण
(२गतिशिलता
(३संगीत) गायन -वादन
(४इंद्रीय प्रशिक्षण
(५दैनंदिन कार्यकुशलता.
(६शारिरीक शिक्षण व योगाचे प्रशिक्षण
(७कला कार्यानुभव
(८संगणक )इ .तिसरी ते आठवी करीता अभ्यासक्रम तयार करावा.)
(९मंददृष्टी प्रशिक्षण
(१०शारिरीक शिक्षण व व्यायाम, कला व कार्यानुभव या विषयातील अभ्यासक्रमाची आखणी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तके निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडील क्रमीक पुस्तकांप्रमाणे न करता दृष्टिहीन मुलांकरीता त्यांच्या अपंगत्वाचा विचार करून योग्य ते फेरबदल करून अभ्यासक्रम शिकविण्यात यावा.
(११इयत्ता दहावीचे गणित शिकवताना ४०/६० प्रमाण असावे. म्हणजेच साठ टक्के मुलांना दहावीचे गणित अनिवार्य व चाळीस टक्केंना एच्छिक असावे व दहावीच्या गणितातील भूमितीला विकल्प विषय असावा किंवा एस.एस.सी.) माध्यमिक परीक्षा बोर्ड (च्या नियमानुसार याची अमंलबजावणी करावी .
(१२विज्ञानात आकृती, चित्रे ,आलेख याला पर्यायी प्रश्न असावेत.

(१३विज्ञानात प्रयोग/प्रात्यक्षिकांकरीता तोंडी प्रश्न असावेत.
(१४विशेष गरजा असणाऱ्या )दिव्यांग (विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या परीक्षेमध्ये सोयी-सवलती शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०१५/(११९-अ)/एस.डी.६, दिनांक ०८ .जानेवारी (२०१६ देण्यात येतील. यामध्ये शासन वेळोवेळी बदल करेल ते लागू राहतील.

बहूविकलांग) अंधत्वासह इतर अपंगत्व (विद्यार्थ्यासाठी आवश्यक सोईसुविधा-

१) स्वतंत्र वर्गाची व्यवस्था असावी.
२) बहुविकलांगाचे प्रशिक्षण पुर्ण केलेला आर. सी. आय. मान्यताप्राप्त प्रशिक्षित शिक्षक असावा अथवा असा शिक्षक उपलब्ध नसल्यास विशेष शिक्षकास प्रशिक्षण देण्यात यावे.
३) पाच विद्यार्थ्यांसाठी एक शिक्षक (१:५) असे विदयार्थी शिक्षक प्रमाण असावे.
४) वैयक्तिक शैक्षणिक कार्यक्रम(IEP) तयार करुन मुलांना शिकविण्यात यावे.
५) या विद्यार्थ्यांना वर्ग उन्नती देवू नये. तसेच परीक्षा घेवू नयेत.
६) या विद्यार्थ्यासाठी वेगळा अभ्यासक्रम तयार करावा. यात कला ,कार्यानुभव, शारिरीक शिक्षण , संगीत ,दैनंदिन कार्यकुशला ,गतीशिलता ,इंद्रीय प्रशिक्षण ,सामाजिक शिक्षणाचा समावेश असावा.
७) शाळेला मान्यता ज्या इयत्तेपर्यंत आहे. त्या इयत्तेतील विद्यार्थ्याच्या वयापर्यंत या विद्यार्थ्यांना शाळेत ठेवावे.

**(तीन) प्रवेशासाठी निकष** -

**वयोमर्यादा** u अंधांच्या विशेष शाळेसाठी ० ते १८ वर्षाची वयोमर्यादा राहील. शीघ्र निदान व शीघ्र उपचार केंद्रातील ० ते ६ वयोमर्यादेनंतर, इयत्ता पहिले मध्ये सहा वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. मात्र उशिरा व सामान्य शाळेमधून विशेष शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम ब्रेल वर्गात प्रवेश दिला जाईल. यामध्ये ब्रेल लेखन, वाचन, पाटीवर अंक मांडणे इ. शिक्षण दिले जाईल. विद्यार्थ्याची प्रगती समाधानकारक असल्यास त्यास वयानुरुप असणाऱ्या इयत्तेमध्ये प्रवेश देण्यात येईल.

**अपंगत्वाचे प्रमाणपत्र** - प्रवेशासाठी विद्यार्थ्याकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे (अंध अथवा अंधत्वासह इतर अपंगत्व) प्रमाणपत्र असावे. ज्या विद्याथ्याकडे प्रवेशाच्या वेळी असे प्रमाणपत्र नसेल अशा विद्यार्थ्याला नेत्र तज्ञांच्या अहवालावरुन प्रवेश देण्यात यावा मात्र सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे त्यास बंधनकारक असेल. सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याचा प्रवेश पुढे चालू ठेवता येणार नाही.

**(चार) अंधत्वासह अपंगत्व** u विशेष शाळांमध्ये खालील प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देता येईल.

अंधत्वासह इतर अपंगत्व (अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ प्रमाणे इतर अपंगत्व)
उदा. अंधत्वासह कर्णबधिरत्व, शारिरीक अपंगत्व, मतिमंदत्व इ.

## भाग १ (चार) कर्णबधिर प्रवर्ग

(१४) श्रवणदोष (कर्णबधिरत्व) मुलांच्या श्रवणऱ्हासामुळे येणाऱ्या मर्यादा कमी करण्यासाठी इलेक्ट्रोनिक श्रवणसहाय्य उपकरणांचा (श्रवणयंत्रे) वापर करुन श्रवण व वाचा उपचार मार्गदर्शन (speech Therapy), तसेच मौखिकता व सांकेतिक भाषेच्या माध्यमातून भाषा (वाचन व लेखन कौशल्य) आणि संभाषण कौशल्य विकसित करुन त्यांना शालेय शिक्षण, क्रीडा, कार्यानुभव व व्यवसायपूर्व कौशल्याचे शिक्षण देऊन शारीरिक, मानसिक, बौध्दिक व भावनिक असा सर्वांगिण विकास साधून सामान्य शाळेत शिक्षण घेण्यासाठी सक्षम बनविणे व समाजाच्या मुख्यप्रवाहात आणणे हा कर्णबधिर मुलांच्या विशेष शाळेचा उद्देश असेल.

**(एक) कर्णबधिर मुलांच्या विशेष शाळेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

**पाठयक्रम –**

**शीघ्र निदान व उपचार केंद्र** (Early Detection & Early Intervention centre)

१. वयोगट ० ते ३
२. पुर्व प्राथमिक विभाग – पायरी १, पायरी २, पायरी ३, पायरी ४, (वयोगट ३ ते ६ पर्यंत)
३. प्राथमिक विभागः इयता पहिली ते पाचवी, वयोगट७ पासून पुढे
४. उच्चप्राथमिक विभागः इयत्ता सहावी ते आठवी
५. माध्यमिक विभागः इयत्ता नववी व दहावी
६. उच्च माध्यमिक विभाग: इयत्ता अकरावी व बारावी

विशेष शाळांना उच्चप्राथमिक विभागापर्यंत शाळा सुरु करण्यास परवानगी राहील. उच्चप्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना सर्वसमावेशित शिक्षणासाठी सामान्य शाळेत शिक्षण घेण्यास पाठविण्यात यावेत. असे विद्यार्थी नजीकच्या सामान्य शाळेत समावेशित शिक्षण घेतील व ते संलग्न वसतिगृहात निवास ,भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील ,मान्य विद्यार्थी संख्या कमी असलेल्या शाळांमधील इयत्ता सहावी पासूनपुढे इयत्ता दहावी पर्यंतचे विद्यार्थीदेखील वरील प्रमाणे सामान्य शाळेमध्ये समावेशित शिक्षण घेण्यास व वसतिगृहात निवास, भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील .अशा विद्यार्थ्यांना शाळेमार्फत विशेष शिक्षकांच्या सेवेसह अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल.

शाळेचा माध्यमिक विभाग सुरु करण्यासाठी शाळांनी किमान पन्नास टक्के विद्यार्थी सक्षम करुन सामान्य शाळेत शिक्षणासाठी पाठवली आहेत अशाच शाळांना माध्यमिक व उच्चमाध्यमिक विभाग सुरु करण्याकरीता परवानगीसाठी अर्ज करता येईल. अर्ज प्राप्त झाल्यानंतर शाळेकडे आवश्यक इमारत, प्रशिक्षित कर्मचारी वर्ग ,शैक्षणिक व भौतिक साहित्य आणि वर्गासाठी असणारे किमान विद्यार्थी संख्या )माध्यमिकसाठी एका वर्गात किमान आठ विद्यार्थी व उच्चमाध्यमिकसाठी शिक्षण विभागाच्या नियमाप्रमाणे) उपलब्ध असल्याची तज्ञांच्या तपासणी अहवालावरुन खात्री करुन परवानगी देण्यात येईल. या परवानगी बरोबरच शालेय शिक्षण विभागाची माध्यमिक व उच्चमाध्यमिक विभाग

सुरु करण्यापुर्वी परवानगी घेणे अनिवार्य राहील. अशी परवानगी न घेतल्यास या विभागाने दिलेली परवानगी आपोआप संपुष्टात येईल. विनापरवानगी माध्यमिक व उच्चमाध्यमिक विभाग सुरु करता येणार नाही.

**दोन अभ्यासक्रम**

१. **पूर्व प्राथमिक** - पूर्व प्राथमिक विभाग ८ (पायरी १, पायरी २, पायरी ३, पायरी ४) या वर्गासाठी शाळांनी खालील विकास श्रेत्राचा अंतर्भाव करुन पायऱ्यांच्या वर्गासाठी अभ्यासक्रम तयार करावा. असा अभ्यासक्रम तयार करत असताना महाराष्ट्र शासनाने तयार केलेला समान अभ्यासक्रम तसेच अलियावरजंग नॅशनल इंन्स्टीटयूट फॉर हेअरींग इंपॅड, बांद्रा, मुंबई यांनी तयार केलेल्या मूल्यमापन व मूल्यांकन पध्दतीचा अवलंब करावा.

१. वाचनपूर्व कौशल्य
२. लेखनपूर्व कौशल्य
३. वाचा विकास
४. श्रवण विकास
५. सांकेतिक भाषेचा विकास
६. कारक कौशल्यांचा विकास
७. बोधात्मक क्षमतांचा विकास
८. अवधानखंड व एकाग्रतता विकास
९. शारिरीक शिक्षण
१०.गणितपूर्व कौशल्यांचा विकास
११.चित्रकला, खेळ, गोष्टी-गाणी, मार्गदर्शित व्यवसाय
१२.सामाजिक आदान-प्रदानात्मक विकास

**प्राथमिक विभाग-** प्राथमिक विभाग) इयत्ता पहिली ते पाचवी (महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाने तयार केलेला अभ्यासक्रम शिकविण्यात येईल यामध्ये भाषा मराठी व इंग्रजी, गणित ,परिसर अभ्यास , इतिहास व नागरीक शास्त्र, भूगोल ,हस्तकला ,चित्रकला ,खेळ ,नृत्य ,नाटय ,योगा ,आरोग्य व शारिरीक शिक्षण ,विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सांकेतिक भाषा ,व्यावसायिक कौशल्याच्या विकसनासाठी कौशल्य विकसनाचे कोणतेही दोन विषय) केंद्र शासनाच्या कौशल्य संपादन विषयक पुस्तिकेमध्ये कर्णबधिर मुलांसाठी दिलेल्या विषयापैकी शाळेमध्ये उपलब्ध संसाधनानुसार शाळेने निवडलेले सोईचे विषय) श्रवण प्रशिक्षण ,वाचा प्रशिक्षण व सांकेतिक भाषेचे प्रशिक्षण इत्यादींचा समावेश असेल.

**उच्चप्राथमिक विभाग**) - इयता सहावी ते आठवी( महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाने तयार केलेला अभ्यासक्रम शिकविण्यात येईल यामध्ये भाषा मराठी व इंग्रजी, गणित ,इतिहास व नागरीक शास्त्र , भूगोल ,हस्तकला ,चित्रकला ,खेळ ,नृत्य ,नाटय ,योगा ,आरोग्य व शारिरीक शिक्षण ,विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सांकेतिक भाषा ,व्यावसायिक कौशल्याच्या विकसनासाठी कौशल्य विकसनाचे कोणतेही

दोन विषय )केंद्र शासनाच्या कौशल्य संपादन विषयक पुस्तिकेमध्ये कर्णबधिर मुलांसाठी दिलेल्या विषयापैकी शाळेमध्ये उपलब्ध संसाधनानुसार शाळेने निवडलेले सोईचे विषय).

अभ्यासक्रमामध्ये माध्यमिक शिक्षणाची पूर्व तयारी या वयोगटासाठी आवश्यकत्या सर्व मानसिक, बौध्दिक क्षमतांचा विकास, अभ्यासक्रमातील सर्व संकल्पनाचा विकास, व्यवहारिक जीवन कौशल्याचा विकास, शारिरीक व आरोग्य शिक्षण, भाषा विकास, संपर्क कौशल्याचा विकास, सांकेतिक भाषा विकास इत्यादी उद्दीष्टे असतील.

**माध्यमिक विभाग**) इयता नववी व दहावी) महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक मंडळाने तयार केलेला अभ्यासक्रम शिकविण्यात येईल यामध्ये खालील विषयांचा समावेश असेल.

१. भाषा एक - तीन भाषांपैकी कोणतीही एक भाषा (मराठी, हिंदी, इंग्रजी)
२. भाषा दोन - इंग्रजी
३. भाषा तीन - कार्यानुभवाचा विषय (एस. एस. सी. बोर्डाने मान्य केलेला)
४. गणित - दहावीचे गणित किंवा सातवीचे गणित + कार्यानुभवाचा विषय (एस. एस. सी. बोर्डाने मान्य केलेला)
५. विज्ञान - दहावीचे विज्ञान किंवा शरीर शास्त्र व आरोग्य शास्त्र किंवा गृह विज्ञान
६. इतिहास व नागरीक शास्त्र, भूगोल
७. व्यावसाय कौशल्याच्या विकासासाठी - **व्यावसायिक कौशल्याच्या विकसनासाठी कौशल्य विकसनाचे कोणतेही दोन विषय )केंद्र शासनाच्या कौशल्य संपादन विषयक पुस्तीकेमध्ये कर्णबधिर मुलांसाठी दिलेल्या विषयापैकी शाळेमध्ये उपलब्ध संसाधनानुसार शाळेने निवडलेले सोईचे विषय.(**

अभ्यासक्रमामध्ये उच्चमाध्यमिक शिक्षणाची पूर्व तयारी या वयोगटासाठी आवश्यकत्या सर्व मानसिक, बौध्दिक क्षमतांचा विकास, शारिरीक व आरोग्य शिक्षण, भाषा विकास, संपर्क कौशल्याचा विकास, अभ्यासक्रमातील सर्व संकल्पनाचा विकास, व्यवहारीक जीवन कौशल्याचा विकास, सांकेतिक भाषा विकास व आत्मनिर्भरता इत्यादी उद्दीष्टे असतील.

**उच्च माध्यमिक विभाग ) इयता अकरावी व बारावी)**

- उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ठरवून दिलेल्या अभ्यासक्रमातील एकुण आठ विषय.
  यामध्ये अनिवार्य विषय चार + वैकल्पिक विषय चार राहतील.
- अनिवार्य विषय (चार)
  १ इंग्रजी+व्यवसायाभिमूक विषय
  २ आधुनिक भारतीय भाषा मराठी अथवा हिंदी
  ३ पर्यावरण शिक्षण
  ४ आरोग्य आणि शारिरीक शिक्षण
- वैकल्पिक विषय (चार)

१ कला, वाणिज्य व विज्ञान या शाखाधारित विषय प्रत्येकी दोन
२ कौशल्य विकसन विषय दोन (कौशल्य विकसन/व्यावसायिक कौशल्य विकासासाठी उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ठरवून दिलेले विषय या व्यतिरीक्त शाळेने विषय निवडले तर या विषयासाठी उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची मान्यता घेणे आवश्यक राहील)

**टिप** - प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागासाठी पाठयपुस्तक मंडळाने/माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ठरवून दिलेला अभ्यासक्रम शिकविण्यात येईल यामध्ये होणारे बदल तसेच सामाजिक न्याय विभागाने सुचविलेले बदल या शाळांना लागू राहतील.

**(तीन) प्रवेशासाठी निकष** -

**वयोमर्यादा** - कर्णबधिरांच्या विशेष शाळेसाठी ३ ते १८ वर्षाची वयोमर्यादा राहील. पूर्व प्राथमिक विभागातील चार पायऱ्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर इयत्ता पहिले मध्ये सात वर्षे पूर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. मात्र उशिरा व सामान्य शाळेमधून विशेष शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुरुप असणाऱ्या इयत्तेमध्ये प्रवेश देण्यात येईल.

**अपंगत्वाचे प्रमाणपत्र** - प्रवेशासाठी विद्यार्थ्याकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे (कर्णबधिर अथवा कर्णबधिरत्वासह इतर अपंगत्व) प्रमाणपत्र असावे. ज्या विद्याथ्याकडे प्रवेशाच्या वेळी असे प्रमाणपत्र नसेल अशा विद्यार्थ्याला वाचा उपचार तज्ञांच्या अहवालावरुन (Audiograph) प्रवेश देण्यात यावा मात्र सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे त्यास बंधनकारक असेल. सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याचा प्रवेश पुढे चालू ठेवता येणार नाही. प्रवशितामध्ये किमान ३०% प्रवेशित हे तिव्र व अतितीव्र अपंगत्व असणारे असावेत.

**(चार) कर्णबधिरत्वासह अपंगत्व** - विशेष शाळांमध्ये खालील प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देता येईल.

कर्णबधिरत्वासह इतर अपंगत्व (अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ प्रमाणे इतर अपंगत्व)

उदा. कर्णबधिरत्वासह अंधत्व, शारिरीक अपंगत्व, मतिमंदत्व इ.

## भाग १ (पाच) अस्थिविकलांग

**(१५) अस्थिविकलांग मुलांच्या विशेष शाळेचे स्वरुप खालीलप्रमाणे असेल.**

**(एक) पाठयक्रम** -

१. **शीघ्र निदान व उपचार केंद्र** (Early Detection & Early Intervention centre)
२. प्राथमिक विभागः इ. पहिली ते पाचवी
३. उच्चप्राथमिक विभागः इ. सहावी ते आठवी
४. माध्यमिक विभागः इ. नववी ते दहावी

अस्थिव्यंगाच्या विशेष नवीन शाळांना व अस्तित्वात असलेल्या शाळांना नवीन माध्यमिक विभाग सुरु करण्यास परवानगी दिली जाणार नाही तथापि ज्या विशेष शाळांमध्ये ही संहिता अंमलात येण्यापुर्वी माध्यमिक विभाग अस्तित्वात असतील ते पुर्ववत सुरु राहतील. दोन वर्षानंतर नववी व दहावीचे विदयार्थी नजीकच्या सामान्य शाळेत समावेशित शिक्षण घेतील व ते संलग्न वसतिगृहात निवास, भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील ,मान्य विद्यार्थी संख्या कमी असलेल्या शाळांमधील इयत्ता सहावी पासूनपुढे इयत्ता दहावी पर्यंतचे विद्यार्थीदेखील वरील प्रमाणे सामान्य शाळेमध्ये समावेशित शिक्षण घेण्यास व वसतिगृहात निवास ,भोजन व शैक्षणिक साहित्य व सुविधेसाठी पात्र असतील. अशा विद्यार्थ्यांना शाळेमार्फत विशेष शिक्षकांच्या सेवेसह अभ्यासिकेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल .

**दोन (अभ्यासक्रम**

महाराष्ट्र माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण विभाग यांनी ठरविलेला अभ्यासक्रम राबवावा.
अभ्यासक्रमाचे धोरण राबविताना महाराष्ट्र राज्य पाठयपुस्तक निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडील विषयांच्या क्रमीक पुस्तकांचा वापर करावा. यासोबत खालील विषय/उपक्रम विदयार्थ्यांना शिकवावेत.

(१गतिशिलता कृत्रिम अवयव साधनांचा वापर तसेच व्यंगसुधारक शस्त्रक्रिया व भौतिकोपचार
(२संगीत) गायन -वादन(
(३दैनंदिन कार्यकुशलता.
(४शारिरीक शिक्षण व योगाचे प्रशिक्षण
(५कला कार्यानुभव
(६संगणक) इ .तिसरी ते आठवी करीता अभ्यासक्रम तयार करावा (.
(७शारिरीक शिक्षण व व्यायाम ,कला व कार्यानुभव या विषयातील अभ्यासक्रमाची आखणी महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तके निर्मीती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडील क्रमीक पुस्तकांप्रमाणे शिकविण्यात यावा .
(८विशेष गरजा असणाऱ्या) दिव्यांग (विद्यार्थ्यांना इयत्ता १ ली ते इयत्ता १२ वी पर्यंतच्या परीक्षेमध्ये सोयी-सवलती शालेय शिक्षण विभाग शासन निर्णय क्रमांक संकीर्ण२०१५/(११९ - अ)/एस.डी.६, दिनांक ०८ .जानेवारी (२०१६ देण्यात येतील. यामध्ये शासन वेळोवेळी बदल करेल ते लागू राहतील.

**(तीन) प्रवेशासाठी निकष** -

**वयोमर्यादा** - अस्थिव्यंगांच्या विशेष शाळेसाठी ६ ते १८ वर्षाची वयोमर्यादा राहील. इयत्ता पहिले मध्ये सहा वर्षे पुर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात येईल. मात्र उशिरा व सामान्य शाळेमधून विशेष शाळेत प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या वयानुरुप असणाऱ्या इयत्तेमध्ये प्रवेश देण्यात येईल.

**अपंगत्वाचे प्रमाणपत्र** - प्रवेशासाठी विद्यार्थ्याकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ नुसार सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे (अस्थिव्यंग अथवा अस्थिव्यंगत्वासह इतर अपंगत्व) प्रमाणपत्र असावे. ज्या विद्याथ्याकडे प्रवेशाच्या वेळी असे प्रमाणपत्र नसेल अशा विद्यार्थ्याला अस्थिशल्य चिकित्सकाच्या

अहवालावरुन प्रवेश देण्यात यावा मात्र सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर करणे त्यास बंधनकारक असेल. सहा महिन्याच्या आत सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र सादर न केल्यास त्याचा प्रवेश पुढे चालू ठेवता येणार नाही. प्रवशितामध्ये किमान ३०% प्रवेशित हे तिव्र व अतितीव्र अपंगत्व असणारे असावेत.

**(चार) अस्थिव्यंगत्वासह अपंगत्व** - विशेष शाळांमध्ये खालील प्रवर्गातील अपंग विद्यार्थ्यांना देखील प्रवेश देता येईल.

अस्थिव्यंगत्वासह इतर अपंगत्व (अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ प्रमाणे इतर अपंगत्व)
उदा. अस्थिव्यंगत्वासह कर्णबधिरत्व, अंधत्व, मतिमंदत्व इ.

**भाग २**

**प्रशिक्षण केंद्र विभाग**

**भाग २ (एक)**

**(१६) मतिमंद मुलांसाठी प्रशिक्षण केंद्र** -

(एक) वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व ४५ वर्षाच्या आतील मतिमंद प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्रात प्रेवश देण्यात येईल. प्रवेश घेतेवेळी मतिमंद प्रशिक्षणार्थ्याकडे अपंग हक्क अधिनियम २०१६ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र व वयासाठी जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला अथवा अधिकृत वयाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) प्रवेश दिल्यानंतर कमाल चार वर्षापर्यंत सौम्य मतिमंदत्व असणाऱ्या प्रशिक्षणार्थीस प्रशिक्षण केंद्रामध्ये राहता येईल. या कालावधीत किमान चार व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल. ही अट अनुदानित संस्थांसाठी राहील व याचा उद्देश इतर अपंग मुलांनाही प्रवेश मिळावा यासाठी राहील.

(तीन) प्रशिक्षणाचे व्यवसाय (Treads) हे कमी तंत्रज्ञान असलेले व अकुशल स्वरुपाचे असतील. त्यामुळे यासाठी व्यवसाय व तंत्र शिक्षण विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

(चार) प्रशिक्षण व्यवसायाची निवड करताना कार्यरत निदेशाकाच्या शैशणिक अहर्तेस अनुसरून चार व्यवसायापैकी दोन व्यवसायाची निवड ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत निवड केलेल्या व्यवसाय प्रशिक्षणाची निवड करण्यात यावी त्याचा तपशील नियम १६(नऊ) मध्ये दिलेला आहे. उर्वरित दोन व्यवसाय हे संस्थेने अकुशल व्यवसायाच्या खालील नियम १६(आठ) मध्ये दिलेल्या यादीमधून अथवा स्थानिक गरज विचारात घेऊन निवड करावी.

(पाच) संबंधीत व्यवसायाचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर संस्थेमार्फत परीक्षा घेण्यात येऊन प्रशिक्षण पूर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे. प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या एखाद्या व्यवसायास

जर तंत्र शिक्षण विभाग अथवा तत्सम विभागाची मान्यता असेल तर त्यांच्या मार्फत घेण्यात येणाऱ्या परीक्षेस प्रशिक्षणार्थ्यांना बसविण्यात यावे.

(सहा) चार वर्षाचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर अशा प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संस्थेने प्रयत्न करावेत. मध्यम, तीव्र व अतितीव्र मतिमंदत्वामुळे रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकत नसेल व पालकांचा संस्थेमध्येच प्रशिक्षणार्थ्यांचा प्रवेश चालू ठेवण्याचा मनोदय असेल तर अशा प्रशिक्षणार्थीस पुढे प्रशिक्षण केंद्रामध्ये संस्थेस शक्य असल्यास ठेवता येईल, व अशा प्रशिक्षणार्थीवर शासन वेतन/वेतनेत्तर अनुदान देईल. या प्रशिक्षणार्थीसाठी कमाल मर्यादेची अट राहणार नाही. परंतु सौम्य मतिमंदत्व असणाऱ्या प्रशिक्षणार्थ्यांचे व्यावसायिक पुनर्वसन करणे संस्थेस बंधनकारक आहे या बाबत दरवर्षी क्षेत्रीय अधिकाऱ्या मार्फत आयुक्त अपंग कल्याण यांना प्रगतीदर्शक अहवाल सादर करणे आवश्यक राहील.

(सात) मतिमंद मुलांच्या प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणारे व्यवसाय हे अकुशल स्वरुपाचे तसेच भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत मतिमंद व्यक्तिंकरीता निवड केलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल. प्रवेशितांचे बुदयांकाप्रमाणे वर्गवारी नियम ११(तीन) नमुद केलेप्रमाणे राहील. प्रवेशित प्रशिक्षणार्थींचा बुध्दयांक व क्षमता दिक्षित मुल्यमापन करुन प्रशिक्षणार्थींना कोणते कौशल्य (व्यवसाय) शिकवणे अनुरुप होईल याची निवड करुन त्या व्यवसायातील प्रशिक्षण केंद्रात प्रशिक्षण देण्यात येईल. मतिमंद मुलांच्या प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणारे व्यवसाय हे अकुशल व कमी तंत्रज्ञानाचे असल्याने या व्यवसाय तंत्रशिक्षण विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

(आठ) **अकुशल व्यावसायाची (ट्रेडसची) यादी खालीलप्रमाणे राहील.**

| अ. क्र | अकुशल व्यवसायाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १ | कृषी आणि कृषीपुरक व्यवसाय<br>१. कंपोस्टे खत, गांडूळ खत, शेळीपालन, गोपालन, कुकुट पालन, रोपवाटीका इ. | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल. |
| २ | सेवा विषयक व्यावसाय | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ३ | हातमाग व यंत्रमाग | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ४ | अन्न प्रक्रीया उदयोग | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ५ | पेपर श्रेडींग मशीन चालविणे | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे |

| | | |
|---|---|---|
| | | संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ६ | स्क्रीन प्रिंटींग | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ७ | दिवाळी निमित्त लागणाऱ्या वस्तुंची निर्मिती करणे | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |
| ८ | प्रशिक्षणार्थीच्या क्षमतेनुसार / भौगोलिक परिस्थिती नुसार / स्थानिक गरजेनुसार आवश्यक असे उद्योग | बुध्दयांक व क्षमताधिष्टित मुल्यमापनाप्रमाणे संस्थेने ठरविल्याप्रमाणे असेल |

(नऊ) भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत मतिमंद व्यक्तिंकरीता निवड केलेल्या व्यवसायाची यादी.

| Sr. No. | Name of the Trade | Duration of Training |
|---|---|---|
| १ | Envelope Making | ६ Months |
| २ | Card Board Box Making | ६ Months |
| ३ | Candle Making | ३ Months |
| ४ | Chair Making | ३ Months |
| ५ | Printing, Weaving & Dyeing | ६ Months |
| ६ | Carpentry | १२ Months |
| ७ | File Cover Making | ६ Months |
| ८ | Agarbatti Making | ३ Months |
| ९ | Umbrells Making | ६ Months |
| १० | Light Engineering | १२ Months |
| ११ | Soap & Detergent Making | ६ Months |
| १२ | Toys Making | ६ Months |
| १३ | Paper Bag Making | ६ Months |
| १४ | Spice Grinding | ४ Months |
| १५ | Handicraft | ६ Months |
| १६ | Beautician | ६ Months |
| १७ | Rakhee Making | ३ Months |
| १८ | Diya Making | ३ Months |
| १९ | Hand Embroidery | ६ Months |

| | | |
|---|---|---|
| २० | Zari Work | ६ Months |
| २१ | Mushroom Cultivation | ६ Months |
| २२ | Silk Screen Printing | ६ Months |

(दहा) वरील व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक असणारे तज्ञ मनुष्यबळ व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे प्रशिक्षण केंद्रे चालविणाऱ्या संस्थेस बंधनकारक राहील. या प्रशिक्षणासाठीचा अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती ही कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या व्यवसाय व तंत्र विभागाने विहित केल्याप्रमाणे राहील.

(अकरा) मतिमंदांची प्रशिक्षण केंद्रे ही निवासी तसेच अनिवासी स्वरुपाच्या राहतील. निवासी प्रशिक्षण केंद्रांना प्रशिक्षणाबरोबरच मानकाप्रमाणे निवासी सुविधा पुरविणे बंधनकारक असेल.

(बारा) शाळा विभागातील नियम क्र. ११(चार) मध्ये नमुद केलेल्या मतिमंदत्वासह इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. मात्र अशा व्यक्तिकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(तेरा) प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवसायाप्रमाणे यंत्र सामुग्री व प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षीत निदेशक उपलब्ध असावेत. आर सी आय मार्फत घेतल्या जाणाऱ्या डीप्लोमा इन व्होकेशनल ट्रेनिंग (DVT) प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारास निदेशक निवडताना प्राधान्य देण्यात यावे.

## भाग - २ (दोन)

### (१७) स्वमग्न मुलांसाठी प्रशिक्षण केंद्र u

(एक) वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व ४५ वर्षांच्या आतील स्वमग्न प्रशिक्षणर्थींना प्रशिक्षण केंदात प्रेवश देण्यात येईल. प्रवेश घेतेवेळी स्वमग्न प्रशिक्षणर्थींकडे अपंग हक्क अधिनियम २०१६ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र व वयासाठी जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला अथवा अधिकृत वयाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) प्रवेश दिल्यानंतर कमाल चार वर्षापर्यंत प्रशिक्षण केंद्रामध्ये राहता येईल. या कालावधीत किमान चार व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल. ही अट अनुदानित संस्थांसाठी राहील व याचा उद्देश इतर अपंग मुलांनाही प्रवेश मिळावा यासाठी राहील.

(तीन) प्रशिक्षणाचे व्यवसाय (Treads) हे कमी तंत्रज्ञान असलेले व अकुशल स्वरुपाचे असतील. त्यामुळे यासाठी व्यवसाय व तंत्र शिक्षण विभागाच्या मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

(चार) प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणारे व्यवसाय हे अकुशल स्वरुपाचे तसेच भारत सरकारच्या राष्ट्रीय बौद्धिक दिव्यांगजण सशक्तीकरण संस्थान कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत व्यक्तिंची निवड केलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल.

(पाच) अकुशल व्यवसायाची (ट्रेडसची) निवड स्थानिक बाजारपेठ व तसेच व्यवसाय व नोकरीची संधी विचारात घेवून तसेच प्रवेशितांचा बुध्दयांक व क्षमता विचारात घेवून संस्था निवड करले. यासाठीचा अभ्यासक्रम व परिक्षा हे संस्थास्तरावर करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर संस्थास्तरावर प्रमाणपत्र देण्यात येईल.

(सहा) व्हीटीसी मधील व्यवसाय ट्रेंड्स आणि तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत नोंदणीकृत/मान्यताप्राप्तची आवश्यक नाही.

(सात) निवडलेल्या व्यवसाय हा कौशल्य विकास आणि उद्योजकता संचालनालय, किंवा राज्य / केंद्र सरकारव्दारे मान्यताप्राप्त कोणत्याही अन्य एजन्सीव्दारे प्रमाणित केली जाऊ शकतात.

कौशल्य अकुशल व्यवसाय स्वमग्न ग्रस्त व्यक्ती करू शकतात ते खालीलप्रमाणे आहे.

| Sr. No. | Trade | Duration of Training |
|---|---|---|
| १. | Printing & Dyeing | २४ months |
| | Screen Printing | |
| | Block Printing | |
| | Stencil Printing | |
| | Tie & Dye | |
| २. | Jewellery Making | १२ months |
| ३. | Handicraft | १२ months |
| ४. | Candle making | ६ months |
| ५. | Diya making | १२ months |
| ६. | Paper bag making | १२ months |
| ७. | Greeting Cards & Envelope making | १२ months |
| ८. | Cardboard box making | १२ months |
| ९. | File making | १२ months |
| १०. | Rakhi making | ६ months |
| ११. | Office automation (photocopying) | २४ months |
| १२. | Computer operation | ३६ month |
| १३. | Toy making | २४ months |
| १४. | Carpentry | २४ months |
| १५. | Baking and confectionary | २४ months |
| १६. | Preparation of snacks/packed food items | २४ months |

| | | |
|---|---|---|
| १७. | Mushroom Cultivation | १२ months |
| १८. | Hand Embroidery | २४ months |
| १९. | Zari Work | २४ months |
| २०. | Gardening / organic farming | १२ months |
| २१. | Plumbing | २४ months |
| २२. | Vermiculture | १२ months |
| २३. | Catering | ३६ months |
| २४. | Tailoring | ३६ months |
| २५. | Laundry and house keeping | २४ months |
| २६. | Photography | As stipulated |
| २७. | ITI courses as applicable | As stipulated |

(आठ) चार वर्षाचा प्रशिक्षण कालावधी पुर्ण झाल्यानंतर अशा प्रशिक्षणार्थींना रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध होण्याच्या दृष्टीने संस्थेने प्रयत्न करावेत. ज्या प्रशिक्षणार्थींना प्रयत्न करुनही संस्था बाहय रोजगार अथवा स्वयंरोजगार उपलब्ध होऊ शकत नसेल व पालकांची संस्थेमध्येच प्रशिक्षणार्थीचा प्रवेश चालू ठेवण्याचा मनोदय असेल तर अशा प्रशिक्षणार्थीस पुढे प्रशिक्षण केंद्रामध्ये संस्थेस शक्य असल्यास ठेवता येईल, मात्र अशा प्रशिक्षणार्थीवर शासन वेतन/वेतनेत्तर अनुदान देणार नाही. या प्रशिक्षणार्थीसाठी कमाल मर्यादेची अट राहणार नाही.

(नऊ) स्वमग्न प्रशिक्षण केंद्र ही निवासी तसेच अनिवासी स्वरुपाच्या राहतील. निवासी प्रशिक्षण केंद्रांना प्रशिक्षणाबरोबरच मानकाप्रमाणे निवासी सुविधा पुरविणे बंधनकारक असेल.

(दहा) शाळा विभागातील नियम क्र. १२ (चार) मध्ये नमुद केलेल्या स्वमग्नता अपंगत्वासह इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. मात्र अशा व्यक्तिकडे अपंग व्यक्ती हक्क् अधिनियम २०१६ अन्वये प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(अकरा) प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवसायाप्रमाणे यंत्र सामुग्री व प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षीत निदेशक उपलब्ध असावेत. आर सी आय मार्फत घेतल्या जाणाऱ्या डीप्लोमा इन व्होकेशनल ट्रेनिंग (DVT) प्रशिक्षण पुर्ण केलेल्या उमेदवारास निदेशक निवडताना प्राधान्य देण्यात यावे.

## भाग - २ (तीन)

### (१८) अंधासाठी प्रशिक्षण केंद्र -

(एक) वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व ४५ वर्षांच्या आतील अंध प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्रात प्रेवश देण्यात येईल. प्रवेश घेतेवेळी अंध प्रशिक्षणार्थीकडे अपंग हक्क अधिनियम २०१६ अन्वये सक्षम

प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र व वयासाठी जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला अथवा अधिकृत वयाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) प्रवेश दिल्यानंतर कमाल चार वर्षापर्यंत प्रशिक्षण केंद्रामध्ये राहता येईल. या कालावधीत किमान चार व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल.

(तीन) प्रशिक्षणाचे व्यवसाय (Treads) हे कमी तंत्रज्ञान असलेले कुशल व अकुशल स्वरुपाचे असतील. कुशल व्यवसायास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता घेणे, त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षण देणे व त्यांच्या मार्फत होणाऱ्या परिक्षेस बसविणे अनिवार्य राहील. अकुशल व्यवसायास मान्यतेची आवश्यकता राहणार नाही.

(चार) प्रशिक्षण व्यवसायाची निवड करताना चार व्यवसायापैकी दोन व्यवसायाची निवड ही भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत निवड केलेल्या अथवा तंत्र शिक्षण विभागाच्या यादीतील व्यवसाय प्रशिक्षणाची निवड करण्यात यावी त्याचा तपशील खालील उपनियम (नऊ) मध्ये दिलेला आहे. उर्वरित दोन व्यवसाय हे संस्थेने अकुशल व्यवसायाच्या खालील उपनियम (आठ) मध्ये दिलेल्या यादीमधून अथवा स्थानिक गरज विचारात घेऊन निवड करावी.

(पाच) अकुशल व्यवसायाचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर संस्थेमार्फत परीक्षा घेण्यात येऊन प्रशिक्षण पुर्ण केल्याचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

(सहा) चार वर्षाचा प्रशिक्षण कालावधी राहील.

(सात) अंध प्रशिक्षणार्थीच्या प्रशिक्षण केंद्रात शिकविण्यात येणाऱ्या कुशल व्यवसाय हे भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत अंध व्यक्तींकरीता निवड केलेल्या यादीतील अथवा तंत्र शिक्षण विभाागाच्या यादीतील असावेत.

(आठ) **अकुशल व्यवसायाची (ट्रेडसची) यादी**

| अ. क्र. | व्यवसायाचे नांव | कालावधी |
|---|---|---|
| १ | एम एस सी आय टी | प्रशिक्षणार्थीच्या क्षमतेनुसार व व्यवसायाच्या स्वरुपानुसार संस्थेने प्रशिक्षणाचा कालावधी निश्चित करावा |
| २ | फिजीओथेरपी | |
| ३ | मराठी/इंग्रजी संगणक टायपिंग | |
| ४ | सुतार काम | |
| ५ | लघुलेखन | |
| ६ | मेडीकल प्रिसक्रीपशन कोर्स | |
| ७ | व्यक्तीमत्व विकास कोर्स | |
| ८ | फाईल मेकिंग | |
| ९ | योगा व मसाज प्रशिक्षण | |

| | | |
|---|---|---|
| १० | नॅचरोपॅथी प्रशिक्षण | |
| ११ | रेडीओ जॉकी | |
| १२ | फॉरेन लॅग्वेज | |
| १३ | कृषी आधारीत प्रशिक्षण (Agro Based) | |
| १४ | पेपर बॅग, एन्वलप मेकिग, ग्रिटींग, बुक मार्क, हस्तकला | |
| १५ | रिकेनिंग, मेणबत्ती बनविणे, शिवणकाम, लोकर काम | |
| १६ | झेरॉक्स, द्रोण, हातमाग | |
| १७ | लोकर रुमाल, टोप्या, लुमकॅप, वायर बास्केट, शिवणकामात नॅपकीन, कापडी पिशवी, ज्यूट बॅग, ज्यूट पर्स, डस्टर | |

(नऊ) भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत अंध व्यक्तींकरीता निवड केलेल्या व्यवसायाची यादी.

| Sr. No. | Name of the Trade | Duration of Training |
|---|---|---|
| १ | Chair Canning | ६ Months |
| २ | Handloom weaving | १२ Months |
| ३ | Light Engineering | १२ Months |
| ४ | Electrical/Electronics assembly | १२ Months |
| ५ | Braille Shorthand (Hindi/English) | १२ Months |
| ६ | Computer Application and Programming Skills | १२ Months |
| ७ | Web Designing and Interne Management | १२ Months |
| ८ | Physiotherapy | १२ Months |
| ९ | Office Management | १२ Months |
| १० | Salesmanship and Marketing | १२ Months |
| ११ | Telemarketing and Call Centre executive training | ३ to ६ Months |
| १२ | Music (Vocal and Instrumental) | ६ Months |
| १३ | Beautician and hair and skin care | ६ Months |
| १४ | Enterpreneurship training | ६ Months |
| १५ | Candle Making | १ Months |
| १६ | Agarbatti Making | १ Months |
| १७ | Detergent Powder Making | १ Months |

| | | |
|---|---|---|
| १८ | Chalk Making | १ Months |
| १९ | File Cover Making | २ Months |
| २० | Umbrella Making | २ Months |
| २१ | Paper Bag Making | ३ Months |
| २२ | Envelop Making | २ Months |
| २३ | Nylon Plastic Bags Making | २ Months |
| २४ | TelhoneOeration | २ Months |

(दहा) वरील व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक असणारे तज्ञ मनुष्यबळ व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे प्रशिक्षण केंद्रे चालविणाऱ्या संस्थेस बंधनकारक राहील. या प्रशिक्षणासाठीचा अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती ही कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या व्यवसाय व तंत्र विभागाने विहित केल्याप्रमाणे राहील.

(अकरा) अंधांची प्रशिक्षण केंद्रे ही निवासी तसेच अनिवासी स्वरुपाच्या राहतील. निवासी प्रशिक्षण केंद्रांना प्रशिक्षणाबरोबरच मानकाप्रमाणे निवासी सुविधा पुरविणे बंधनकारक असेल.

(बारा) शाळा विभागातील नियम क्र. १३(चार) मध्ये नमुद केलेल्या अंधत्वासह इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. मात्र अशा व्यक्तिकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(तेरा) प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवसायाप्रमाणे यंत्र सामुग्री व प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षीत निदेशक उपलब्ध असावेत.

## भाग २ (चार)

**(१९) कर्णबधिरांसाठी प्रशिक्षण केंद्र –**

(एक) वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व ४५ वर्षांच्या आतील कर्णबधिर प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्रात प्रेवश देण्यात येईल. प्रवेश घेतेवेळी कर्णबधिर प्रशिक्षणार्थीकडे अपंग हक्क अधिनियम २०१६ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र व वयासाठी जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला अथवा अधिकृत वयाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) प्रवेशित प्रशिक्षणार्थींना तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या व्यवसायाचे तसेच भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत निवड केलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी वरील प्राधिकाऱ्याने (विभागाने) ठरवून दिलेप्रमाणे राहील. संबंधीत व्यवसायाचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण केंद्रामध्ये त्याचा प्रवेश सुरू ठेवता येणार नाही अथवा इतर व्यवसायाच्या (Trade) प्रशिक्षणासाठी त्या प्रशिक्षण केंद्रात अथवा अन्य प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

(तीन) कुशल व्यवसायास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता घेणे, त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षण देणे व त्यांच्या मार्फत होणाऱ्या परिक्षेस बसविणे अनिवार्य राहील.

(चार) भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत कर्णबधिर व्यक्तिंकरीता निवड केलेल्या व्यवसायाची यादी.

| Sr. No. | Name of the Trade | Duration of Training |
|---|---|---|
| १ | Metal Trade (Filter, Welder, Turner) | ३ to ६ Months |
| २ | Carpentry | ३ to ६ Months |
| ३ | Cutting and Tailoring | ३ Months |
| ४ | Printing and Composing and book Binding | ३ Months |
| ५ | Art & Crafts | ३ Months |
| ६ | Screen Printing | ३ Months |
| ७ | General Mechanic | ३ to ६ Months |
| ८ | Photography | ३ Months |
| ९ | Textile Printing | ३ Months |
| १० | Automobile Engineering | ३ Months |
| ११ | Computer Courses | ३ Months |
| १२ | Electrical Courses | ३ Months |
| १३ | Commercial Practice | ३ Months |
| १४ | Toys making | ३ Months |
| १५ | Envelope/Paper Bag Making | ३ Months |
| १६ | Candle Making | ३ Months |
| १७ | Spice Grinding | ३ Months |
| १८ | File Cover Making | ३ Months |
| १९ | Handicraft | ३ Months |
| २० | Beautician | ३ Months |
| २१ | Food Processing | ३ Months |
| २२ | Hand Embroidery | ३ Months |
| २३ | Zari Work | ३ Months |
| २४ | Mushroom Cultivation | ३ Months |

(पाच) वरील व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक असणारे तज्ञ मनुष्यबळ व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या संस्थेस बंधनकारक राहील. या प्रशिक्षणासाठीचा अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती ही कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या व्यवसाय व तंत्र विभागाने विहित केल्याप्रमाणे राहील.

(सहा) कर्णबधिरांची प्रशिक्षण केंद्र ही निवासी तसेच अनिवासी स्वरुपाच्या राहतील. निवासी प्रशिक्षण केंद्रांना प्रशिक्षणाबरोबरच मानकाप्रमाणे निवासी सुविधा पुरविणे बंधनकारक असेल.

(सात) शाळा विभागातील नियम क्र. १४(चार) मध्ये नमुद केलेल्या कर्णबधिरत्वासह इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. मात्र अशा व्यक्तिकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(आठ) प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवसायाप्रमाणे यंत्र सामुग्री व प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षीत निदेशक उपलब्ध असावेत.

## भाग २ (पाच)

**(२०) अस्थिव्यंगांसाठी प्रशिक्षण केंद्र** -

(एक) वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या व ४५ वर्षांच्या आतील अस्थिव्यंग प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण केंद्रात प्रेवश देण्यात येईल. प्रवेश घेतेवेळी अस्थिव्यंग प्रशिक्षणार्थीकडे अपंग हक्क अधिनियम २०१६ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र व वयासाठी जन्मतारखेचा दाखला/शाळा सोडल्याचा दाखला अथवा अधिकृत वयाबाबतचा पुरावा सादर करणे आवश्यक आहे.

(दोन) प्रवेशित प्रशिक्षणार्थींना तंत्र शिक्षण विभागाने मान्यता दिलेल्या व्यवसायाचे तसेच भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत निवड केलेल्या व्यवसायाचे प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रशिक्षणाचा कालावधी वरील प्राधिकाऱ्याने (विभागाने) ठरवून दिलेप्रमाणे राहील. संबंधीत व्यवसायाचे प्रशिक्षण पुर्ण झाल्यानंतर प्रशिक्षण केंद्रामध्ये त्याचा प्रवेश सुरू ठेवता येणार नाही अथवा इतर व्यवसायाच्या (Trade) प्रशिक्षणासाठी त्या प्रशिक्षण केंद्रात अथवा अन्य प्रशिक्षण केंद्रामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

(तीन) कुशल व्यवसायास तंत्र शिक्षण विभागाची मान्यता घेणे, त्यांच्या अभ्यासक्रमाप्रमाणे प्रशिक्षण देणे व त्यांच्या मार्फत होणाऱ्या परिक्षेस बसविणे अनिवार्य राहील.

(चार) भारत सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालयाने राष्ट्रीय कौशल्य विकास कार्यक्रमातंर्गत अस्थिव्यंग व्यक्तिंकरीता निवड केलेल्या व्यवसायाची यादी.

| Sr. No. | Name of the Trade | Duration of Training |
|---|---|---|
| i | Automobile Industry Related Trades | |
| १ | Auto Mechanic (Three Wheeler) | ३ Months |
| २ | Tyre Retreading Vulcanising & Rebuttoning | ३ Months |
| ii | Electrical and Electronics Technology Related Trades | |

| | | |
|---|---|---|
| १ | Electrical Motor | ३ to ६ Months |
| २ | Electronic/Electrical Applicances Repairing | ३ to ६ Months |
| ३ | House Wiring and Repair | ३ to ६ Months |
| ४ | Electrical/Electronics assembly | ३ to ६ Months |
| ५ | Computer Application and Programming Skills | ३ to ६ Months |
| ६ | Web Designing and Internet Management | ३ to ६ Months |
| ७ | Telephone Operation | ३ to ६ Months |
| ८ | Mobile Repairing | ३ to ६ Months |
| iii | Mechanical Industry Related Trades | |
| १ | Draughtsman (Mechanical) | ३ to ६ Months |
| २ | Drilling (Fitters) | ३ to ६ Months |
| ३ | General Mechanics | ३ to ६ Months |
| ४ | Mechanical Watch & Clock | ३ to ६ Months |
| ५ | Sheet Metal Worker, Blacksmith and Welding | ३ to ६ Months |
| iv | Other Engineering Related Trades | |
| १ | Boiler Attendant | ३ Months |
| २ | Detergent & Cleaning Powder/Phenyl Making | २ Months |
| ३ | General Engineering (Leather Work) | ३ to ६ Months |
| ४ | Glasses Beads and Bangles | ३ to ६ Months |
| ५ | Manufacture of Footwear | ३ to ६ Months |
| ६ | Manufacturing of paints, pigments, distemper etc | ३ to ६ Months |
| ७ | Moulding | ३ to ६ Months |
| ८ | Photography and video shooting | ३ Months |
| ९ | Plumbing | ३ Months |
| १० | Pottery (Ceramic) | ३ Months |
| ११ | Upholstery & Plastic Work | ३ Months |
| १२ | Welding | ३ to ६ Months |
| v | Printing Industry Related Trades | |
| १ | Book Binding Printing | ३ Months |
| २ | Desktop Publishing | ३ Months |
| ३ | Offset Printing Machine Operator | ३ Months |
| ४ | Photo Lamination | ३ Months |
| ५ | Plate Making | ३ Months |

(पाच) वरील व्यवसाय प्रशिक्षण देण्याकरीता आवश्यक असणारे तज्ञ मनुष्यबळ व मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देणे प्रशिक्षण केंद्र चालविणाऱ्या संस्थेस बंधनकारक राहील. या प्रशिक्षणासाठीचा अभ्यासक्रम व परिक्षा पध्दती ही कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत राज्याच्या व्यवसाय व तंत्र विभागाने विहित केल्याप्रमाणे राहील.

(सहा) अस्थिव्यंगांची प्रशिक्षण केंद्र ही निवासी तसेच अनिवासी स्वरुपाच्या राहतील. निवासी प्रशिक्षण केंद्रांना प्रशिक्षणाबरोबरच मानकाप्रमाणे निवासी सुविधा पुरविणे बंधनकारक असेल.

(सात) शाळा विभागातील नियम क्र. १५(चार) मध्ये नमुद केलेल्या अस्थिव्यंगत्वासह इतर अपंगत्व असणाऱ्या व्यक्तिस प्रशिक्षणासाठी प्रवेश देण्यात येईल. मात्र अशा व्यक्तिकडे अपंग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अन्वये प्राधिकृत केलेल्या सक्षम प्राधिकाऱ्याचे अपंगत्वाचे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

(आठ) प्रशिक्षण केंद्रामध्ये शिकविण्यात येणाऱ्या व्यवसायाप्रमाणे यंत्र सामुग्री व प्रशिक्षण साहित्य व प्रशिक्षीत निदेशक उपलब्ध असावेत.

## भाग - ३

### (२१) **अपंग मुलांसाठी मनोरंजन व करमणूक केंद्र**

(एक) सर्व प्रवर्गाच्या अपंग मुलांमधील क्रीडा, कला, नृत्य, गायन, कौशल्ये, उपचारात्मक सेवा (Therapies) इत्यादींचा विकास व मनोरंजन आणि करमणूकीच्या सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाने पुणे येथे बाल कल्याण संस्था, पुणेची स्थापना केलेली आहे. या केंद्रास वरील उपक्रमांबरोबरच अपंग मुलांच्या पुनर्वसनाच्या द्दष्टीने उपयुक्त असे अन्य उपक्रम आयुक्त, अपंग कल्याण यांच्या पुर्व परवानगीने राबविण्यात येतील. या केंद्राचा लाभ स्थानिक, राज्यातील नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त शाळा/प्रशिक्षण केंद्रातील प्रवेशित तसेच शाळा/प्रशिक्षण केंद्र बाहय अपंगांना घेता येईल. अशा प्रकारचे केंद्र भविष्यात अन्य ठिकाणी शासन आवश्यकतेनुसार स्थापन करील.

(दोन) या केंद्रासाठी शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आकृतीबंध हा शासन/आयुक्त अपंग कल्याण यांनी ठरविल्याप्रमाणे राहील. या केंद्रास शाळा/प्रशिक्षण केंद्रासाठीचा कर्मचारी आकृतीबंध लागू राहणार नाही. मात्र कर्मचाऱ्यांना शाळेप्रमाणे इतर सेवाशर्ती रजा व अन्य सुविधा लागू राहतील. नियुक्ती/पदोन्नती तसेच ज्येष्ठता इत्यादी बाबी शासन/आयुक्त यांनी स्वतंत्ररीत्या ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.

(तीन) या केंद्रासाठी वेतनेत्तर अनुदान हे शासन/आयुक्त अपंग कल्याण यांनी ठरवून दिल्याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

(चार) अपंग विद्यार्थ्यांकरीता जिल्हा स्तरीय, राजय स्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन, ॲबिलिंपिक, स्पेशल ऑलिंपिक, कौशल्य विकास कार्यक्रम तसेच शिक्षकांसाठी अल्प प्रशिक्षण शिबीरे इत्यादी शासनाचे उपक्रम राबविण्यासाठी या संस्थेच्या सेवा घेण्यात येतील.

## भाग - ४

(२२) **विद्यार्थी संख्या वाढ**

(एक) शैक्षणिक वर्षाच्या ३१ जुलै तारखेपर्यंत प्रवेश प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर मान्य संख्येपेक्षा जास्त दिलेल्या प्रवेशित विद्यार्थ्यांच्या यादीसह शाळा/प्रशिक्षण केंद्राने विद्यार्थी संख्या वाढीचे प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेमार्फत आयुक्तालयास सादर करावेत.

(दोन) मान्य संख्येपेक्षा जादाचे प्रवेश देत असताना वाढीव प्रवेशितांसाठी मानकाप्रमाणे विशेष शिक्षक/निदेशाक, शैक्षणिक साधन सामुग्री, इमारत, स्वच्छता-स्नानगृहे व इतर सोईसुविधा संस्थेमध्ये उपलब्ध असणे आवश्यक आहे.

(तीन) आयुक्तलयामार्फत प्रस्तावाची छाननी व पडताळणी करुन वाढीव विद्यार्थी संख्येचा प्रस्ताव शासन स्तरावर सादर करण्यात येईल. या वाढीव विद्यार्थी संख्येवर शासनाकडून वेतन वेतनेत्तर बाबींवर कोणतेही अनुदान मिळणार नाही. यावरील खर्च संस्था स्वत:च्या निधीतून करेल असे बंधपत्र संस्थांना सादर करावे लागेल.

(चार) तत्वत: विद्यार्थी संख्या वाढ दिलेल्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राची एकत्रित यादी प्रतिवर्षी आयुक्तालयामार्फत शासनास सादर करण्यात येईल. तसेच ही यादी आयुक्तालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

(पाच) नवीन शाळा/प्रशिक्षण केंद्रास अनुदान तत्वावर शासन मान्यता देण्यापूर्वी ही यादी विचारात घेण्यात येईल.

## भाग – ५

(२३) **पत्रव्यवहाराची प्रणाली**

(एक) शाळा/ प्रशिक्षण केंद्राच्या शैक्षणिक, आर्थिक व प्रशासकीय बाबतचा शासन व संस्थेबरोबर पत्र व्यवहार करण्याची जबाबदारी ही शाळा/ प्रशिक्षण केंद्राचा मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक/संस्थेने नियुक्त केलेला प्रशासकीय अधिकारी यांची राहील.

(दोन) ज्या शाळा/प्रशिक्षण केंद्रास मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाचे पद मंजूर नसेल अथवा मंजूर असलेले पद रिक्त असेल अशा वेळी शाळा/प्रशिक्षण केंद्रामधील ज्येष्ठतम शिक्षक/निदेशकाची प्रभारी मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक म्हणून संस्थेने नियुक्ती करावी, असे ज्येष्ठतम शिक्षक/निदेशकाने प्रभारी मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक म्हणून काम करण्यास असमर्थता दर्शविल्यास अन्य ज्येष्ठतम विशेष शिक्षक/कला शिक्षकाची नियुक्ती करता येईल. व त्याचे नांव व पत्ता याची नोंदणी योग्य त्या प्राधिकाऱ्याच्या कार्यालयात करणे अनिवार्य राहील.

(तिन) शाळा/ प्रशिक्षण केंद्रातील कार्यरत कोणत्याही कर्मचाऱ्यास शासन/प्रशासनाशी आपल्या कर्तव्याबाबत पत्र व्यवहार करावयाचा झाल्यास मुख्याध्यापक/संस्थेने नियुक्त केलेला प्रशासकीय अधिकारी/संस्था यांच्या मार्फतिने करता येईल.

**(२४) सक्षम प्राधिकाऱ्यास माहिती, अहवाल पुरविणे:-**

(एक) शाळा/प्रशिक्षण केंद्रांना सक्षम प्राधिकारी तसेच विभागास व संबंधीत राज्य/विभागीय माध्यमिक शिक्षण मंडळे व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळे यांना वेळोवेळी आवश्यक असलेली विवरणपत्र व माहिती वक्तशीरपणे पुरवावी लागेल, असे न केल्यास प्रकरणी संबंधातील परिस्थिती लक्षात घेऊन वरील प्राधिकरणाकडून कार्यवाही केली जाऊ शकेल.

(दोन) सक्षम प्राधिकाऱ्यांकडून करण्यात येणाऱ्या चौकशीच्या वेळी, आवश्यक असेल अशी अभिलेख, दस्तऐवज कागदपत्रे इत्यादी शाळा/प्रशिक्षण केंद्र सादर करेल. तसेच आवश्यक असेल अशी इतर माहिती मौखिकरीत्या किंवा दस्तऐवजांच्या स्वरुपात सादर करेल.

## भाग – ६

**(२५) शाळा समितीची रचना:-**

**विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृह (व्यवस्थापन) समिती**

(एक) अपंगांसाठी असलेल्या प्रत्येक विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहामध्ये एक व्यवस्थापन समिती असेल व ती समिती व्यवस्थापनाकरीता शासनाला जबाबदार असेल. सदर समितीची रचना खालीलप्रमाणे असेल.

| | | |
|---|---|---|
| १ | अध्यक्ष | अध्यक्ष |
| २ | मानद सचिव | मानद सचिव |
| ३ | कोषाध्यक्ष | कोषाध्यक्ष |
| ४ | अपंग मुलांच्या पालकांचा प्रतिनिधी | सदस्य |
| ५ | सेवाज्येष्ठता क्रमानुसार दरवर्षी आळीपाळीने शाळा/प्रशिक्षण केंद्राचा/मतिमंद बालगृहातील कायम शिक्षकांमधील एक सदस्य | सदस्य |
| ६ | अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांचा प्रतिनिधी दरवर्षी आळीपाळीने | सदस्य |
| ७ | संस्थेने नामनिर्देशीत केलेले दोन प्रतिनिधी | सदस्य |
| ८ | शाळा/प्रशिक्षण केंद्राचा/मतिमंद बालगृहाचा प्रमुख | सदस्य सचिव |

(दोन) पालक संस्थेच्या सदस्यांपैकी कोणीही तीन व्यक्ती या शाळा समितीचे सभासद असतील.

(तीन) **सदस्य सचिव** – विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहाचा प्रमुख, शाळा समितीचा **पदसिध्द सचिव** असेल व तो समितीच्या बैठकीचे कार्यवृत्त ठेवील.

(चार) व्यवस्थापन समितीची कार्ये पुढीलप्रमाणे असतील

i. विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहाच्या आर्थिक बाजूचे व्यवस्थापन व विनियमन, शाळा/प्रशिक्षण केंद्राचा/मतिमंद बालगृहाच्या निधीचे लेखे ठेवणे आणि गुंतवणूक करणे.

ii. अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे

iii. अध्यापकीय व अध्यापकेत्तर कर्मचाऱ्यांची प्रचलित शासन निर्णयानुसार नियुक्ती करणे

iv. संहितेमध्ये घालून देण्यात येतील अशा शर्तीनुसार किंवा सक्षम प्राधिकाऱ्याकडून यासंबंधात देण्यात येतील अशा निदेशांनुसार शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कायम करणे, वेतन वाढ मंजूर करणे किवां रोखणे, कामकाज सुरळीत होण्याच्या हेतूने वेगवेगळ्या समित्यांचे गठन करणे, कर्मचार्यांच्या कामकाजाचा आढावा घेणे, पदोन्नती देणे अथवा नाकारणे, शिक्षा करणे.

v. कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजेहून अन्य रजा मंजूर करणे, कर्मचाऱ्यांचे गोपनिय अह्वाल लिहिणे.

vi. तंत्रशुध्द रितीने शाळा/प्रशिक्षण केंद्राचा/मतिमंद बालगृहाच्या कार्यक्रमाचा विकास/विस्तार.

vii. अपंग मुलांना प्रवेश देणे केस फाईल ठेवणे, शैक्षणिक आणि आर्थिक पुनर्वसनाबाबत दक्ष असणे आणि त्याबाबतची माहिती ठेवणे.

viii. विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहाचे कामकाज चालविण्यासाठी उपविधी आणि विनियम तयार करणे व कर्मचाऱ्यांच्या सेवा घेणे.

ix. संस्थापन समयलेखाव्दारे/न्यासाच्या घटनेव्दारे नेमून दिली असतील अशी अन्य कर्तव्य.

x. विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहासंबंधीच्या बाबीसंबंधात संस्थापक मंडळ व शासनाला अहवाल देणे.

xi. प्रत्येक विद्यार्थ्याची वैद्यकीय तपासणी करुन घेणे.

xii. विशेष शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृह इमारत, परिसर, स्वच्छतागृह, निवास व्यवस्था धान्य कोठी, स्वयंपाकगृह, भोजनकक्ष पिण्याचे व वापरण्याचे पाणी इत्यादी स्वच्छता राखणे. इतर सर्व कामकाजाचे व्यवस्थापन करणे.

xiii. शालेय शिस्तीचे पालन होईल यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे व उपाय योजना करणे. तसेच कर्मचाऱ्याची गुणवत्ता वाढेल या करिता विशेष आवश्यक उपाययोजना करणे.

xiv. शाळा समितीची बैठक किमान दर तीन महिन्यातून एकदा घेण्यात येईल व त्याचे कार्यवृत्त ठेवण्यात येईल.

## भाग – ७

(२६) **संस्थेत प्रवेश देणे व नावे कमी करणे.**

(एक) कोणत्याही अपंग विद्यार्थ्यांस विशिष्ट जाती किंवा धर्माचा आहे या कारणावरुन प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

(दोन) अतितीव्र अपंगत्व आहे या कारणावरुन कोणत्याही अपंग विद्यार्थ्यांस प्रवेश नाकारण्यात येणार नाही.

(तीन) प्रत्येक विद्यार्थ्यांचे आई, वडील किंवा पालक प्रवेशासाठी मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक यांचेकडे विहीत नमुन्यात अर्ज करतील.

(चार) जो विद्यार्थी संसर्गजन्य/साथीच्या रोगाने पीडीत असल्याचे आढळून येईल त्या कोणत्याही विद्यार्थ्यास संस्थेत प्रवेश देण्यात येणार नाही.

(पाच) संस्था उघडल्यानंतर/शैक्षणिक सत्र सुरु झाल्यानंतर तीस दिवसाच्या कालावधीत नवीन वर्षाकरीता ३१ जुलै पर्यंत संबंधित मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक मान्य विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत प्रवेश देतील. आणि १० ऑगस्ट पर्यंत संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर यांना रिक्त जागांचा अहवाल सादर करतील. जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर हे हयाच प्रवर्गाचा सर्व विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रातील रिक्त जागांचा आढावा घेवून रिक्त जागांवर अंतिम प्रवेश देण्याची कार्यवाही शक्य असल्यास ३१ ऑगस्ट पर्यंत करतील.

(सहा) मान्य संख्येपेक्षा जास्तीचे विद्यार्थी ठेवण्या संदर्भात जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर, अनाथ मतिमंद बालगृहाचे बाबतीत बालकल्याण समिती, आयुक्त, अपंग कल्याण यांच्या मान्यतेने मान्य विद्यार्थी संख्येपेक्षा जास्तीच्या विद्यार्थांना प्रवेश देता येईल.

(सात) परंतु शासन मान्यते शिवाय या जादाच्या प्रवेशित संख्येवर कोणताही जादाचा कर्मचारी अनुज्ञेय राहणार नाही.

(आठ) विद्यार्थ्याचे आजारपण, मृत्यूमुळे दु:खी होणे, पालकांची बदली (विद्यार्थ्यांच्या) मुळच्या शाळेपासून त्याने आपले निवास्थान बदलणे यासारख्या विशिष्ट परिस्थितीत मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक हे ३१ जुलै नंतरही मान्य विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत प्रवेश देतील.

(नऊ) कोणत्याही विद्यार्थ्यास त्याच्या शाळा सोडल्याच्या दाखल्यावर तो ज्या वर्गासाठी अर्हताप्राप्त्

असल्याचे दर्शविण्यात आले असेल त्या वर्गापेक्षा वरच्या वर्गात प्रवेश दिला जाणार नाही.

(दहा) विद्यार्थ्यास प्रवेश देतेवेळी त्याच्या पालकांनी रितसर सक्षम प्राधिकाऱ्याचा जन्म नोंदणीचा दाखला सादर करणे बंधनकारक राहील.

i. एखाद्या विद्यार्थ्याच्या सर्वसाधारण प्रवेश नोंदवहीमध्ये जातीची नोंद घेताना सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय जाती विषयी नोंद घेण्यात येवू नये.

ii. सर्वसाधारण नोंदवहीत जन्मतारीख, जात इ. मध्ये बदल करण्याकरीता संस्थेच्या पटावर नांव असलेल्या विद्यार्थ्याच्या वतीने करण्यात आलेला अर्जच स्विकारण्यात येईल आणि तसा अर्ज कायदेशिरदृष्टया स्विकारण्यात येणारी कागदपत्रे सादर करण्यात आली तरच स्विकारण्यात येईल व त्या प्रमाणे शेऱ्याच्या रकान्यामध्ये उक्त प्राधिकाऱ्याच्या आदेशाचा क्रमांक व दिनांक

नमूद करुन तशी नोंद करण्यात यावी लेखी आदेश हा विद्यार्थी शाळेत असेपर्यंत अभिलेख म्हणून जतन करुन ठेवण्यात यावा.

(अकरा) प्रवेशितास रितसर प्रवेश देण्यात येईपर्यंत त्याचे/तिचे नांव सर्वसाधरण नोंदवहीत नोंदविण्यात येवू नये.

(२७) **शाळा सोडल्याचा दाखला**

(एक) शाळा सोडल्याच्या दाखल्यासाठी करावयाचा प्रत्येक अर्ज आईवडील किंवा पालक लेखी करतील. तथापि सज्ञान झालेला विद्यार्थी (मतिमंद वगळून) स्वत: च अर्ज करु शकेल. व शाळा विना विलंब संबंधितास शाळा सोडल्याचा दाखला देईल. कोणत्याही कारणास्तव दाखला देण्याचे नाकारण्यात येणार नाही.

(दोन) शाळा सोडल्याच्या दाखल्यावर शेऱ्यामध्ये त्याला वरच्या वर्गात घातला, उत्तीर्ण/अनुत्तीर्ण झाला किंवा कसे याबाबतची नोंद घेण्यात यावी.

(२८) **शाळा सोडल्याचा दाखल्याची दुबार प्रत**

(एक) शाळा सोडल्याच्या दाखल्याची दुबार प्रत पालकांनी मागणी केल्यानंतर सबळ कारण दर्शविणारे सक्षम प्राधिकाऱ्यासमोरचे शपथ पत्र सादर केल्यानंतर लाल शाईने चिन्हांकीत **uदुबार प्रतत** अशी नोंद घेऊन दुबार प्रत देण्यात यावी.

(२९) **प्रवेशितांना उपक्रमातून काढून टाकणे**

(एक) खालील कारणास्तव योग्यत्या तितक्या कालावधीपर्यंत विदयार्थी शाळेतून काढून टाकण्यास किंवा अन्य प्रकारची शिक्षा केली जाण्यास पात्र ठरेल, त्याप्रकरणी आयुक्त अपंग कल्याण किंवा जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर हे कार्यवाहीचे निदेश देतील.

(दोन) विदयार्थ्यांना शाळा सोडल्याच्या व अपंगत्वाच्या (४०% जास्त) खोटया किंवा बनावट दाखल्याच्या सहाय्याने किंवा कोणत्याही प्रकारची तोतयागिरी करुन शाळेत/प्रशिक्षण केंद्रात प्रवेश मिळविल्याचे किंवा प्रवेश मिळविण्याचा प्रयत्न केल्याचे आढळून आले असेल अशा प्रकरणी.

(तीन) एखादया विदयार्थ्याला शाळा सोडल्याच्या दाखल्यातील नोंदीमध्ये अनधिकृतपणे फेरबदल केल्याचे आढळून आले असेल अशा प्रकरणी.

(चार) विदयार्थी कोणत्याही सार्वत्रिक परिक्षेचे संबंधात लबाडी किंवा गैरव्यवहार केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले असेल अशा प्रकरणी.

(पाच) विदयार्थी गंभीर गैरवर्तणुकीबद्दल दोषी असल्याचे आढळून येईल अशा प्रकरणी.

(सहा) प्रवेशित विद्यार्थ्याचे ४० % पेक्षा कमी अपंगत्व असल्यास, तसेच १८ वर्षे वयापेक्षा जास्त वय असल्यास. अशा प्रवेशित विद्यार्थ्यासाठी अनुदान देय राहणार नाही.

**(३०) अभ्यासक्रम व शालेय कार्यक्रम**

(एक) शारिरीकदृष्टया अपंग मुलांसाठी असणाऱ्या संस्था, खाली उल्लेखलेली विशेष शिक्षणाची अंगे योग्यरीत्या अंमलात आणण्यासाठी पुरेसा व आवश्यक तेवढा कर्मचारी वर्ग नेमतील.

(दोन) औपचारिक व अनौपचारिक शिक्षण साक्षरता, वाचन, लेखन व अंकगणित व अभ्यासानुवर्ती कार्यक्रम.

(तीन) उपचारासाठी शिक्षण, अधुपणा सुधारण्यासाठी व दुरुस्त करण्यासाठी उपाय योजना आणि मुलांच्या शारिरीक पुनर्वसनासाठी तज्ञांनी विहीत केलेले प्रशिक्षण.

(चार) विशेष जीवन तंत्रविषयक शिक्षण, विशेष साधने व उपकरणे आणि अनुकूलित साधने यांचा वापर व देखभाल करण्यासंबंधीचे प्रशिक्षण.

(पाच) विविध कला आणि हस्तव्यवसाय व उचित व्यवसाय यासंबंधीचे प्रशिक्षण.

(सहा) अपंगत्वासह जीवन जगण्याचे शिक्षण म्हणजेच समाजात वावरण्याच्या दृष्टीने जुळते कसे घ्यावे आणि समाजातील विविध व्यवहार कसे पार पाडावेत याबाबतचे प्रशिक्षण.

(सात) पालकांना सल्ला देणे व मार्गदर्शन करणे.

(आठ) प्रत्येक अपंग विदयार्थ्याला शक्यतोवर मराठी/हिंदी/इंग्रजी माध्यमातून शिक्षण देणे.

(नऊ) शाळा/प्रशिक्षण केंद्र विशेष शिक्षणाच्या विविध अंगामधील विदयार्थ्यांच्या प्रगतीचा नियतकालिक आढावा घेतला जाण्याची व्यवस्था करील.

(दहा) प्रत्येक अपंग विदयार्थ्यांचा व्यक्तीगत अहवाल (Casefile) ठेवण्यात येईल, यामध्ये इंद्रिय ग्रहण क्षमता/ स्नायु/श्रवणशक्ती व वाचा/यथास्थिती, बुध्दीमत्ता इत्यादीबाबींची नोंद ठेवण्यात येईल. (IEP)

(अकरा) प्रगतीचा अहवाल सत्रनिहाय ठेवण्यात येईल आणि तो विदयार्थी/पालक/आई-वडील हयांना पाहण्यासाठी देण्यात येईल. या अहवालामध्ये शैक्षणिक प्रगती, शारिरीक पुनर्वसन, मानसिक विकास व अन्य क्षमतेचा विकास या बाबी नमूद करण्यात येतील.

(बारा) शैक्षणिक सहली शाळांना/कर्मशाळांना विदयार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजित करण्याची परवानगी राहील. तथापी, जिल्हयातंर्गत सहली सोडून अन्य सहली आयोजित करताना समाज कल्याण विभागास पूर्व कल्पना देणे आवश्यक आहे. सहलीतील विदयार्थ्यांच्या सुरक्षिततेची सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत संस्थेवर राहील.

## भाग - ८

(३१) **विदयार्थ्यांचे आरोग्य व शरीरस्वाथ्य**

(एक) अपंग विद्यार्थ्यांचे आरोग्य विषयक सर्व बाबींकडे शाळा/प्रशिक्षण केंद्र व्यवस्थापन व्यवस्थित लक्ष देईल.

(दोन) शाळा/प्रशिक्षण केंद्रातील विदयार्थ्यांची आरोग्य विषयक स्वच्छता.

(तीन) विदयार्थ्यांची बसण्याची व्यवस्था.

(चार) मैदानी खेळ व शरीराच्या विविध हालचालींमध्ये चलनशिलता प्रशिक्षण यासह शारिरीक शिक्षण.

(सहा) रस्ता ओलांडणे, वाहन चालविणे इत्यादी क्रिया करताना सुरक्षिततेला सर्वात अधिक महत्त्व कसे दयावे याबाबतचे शिक्षण.

(सात) पिण्याच्या शुध्द पाण्याची व्यवस्था.

(आठ) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीमध्ये मानकाप्रमाणे शौचालयाची व्यवस्था व अडथळा विरहित (Accessible) शौचालय असणे अनिर्वाय आहे.

(नऊ) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या इमारतीमध्ये अडथळा विरहित वातावरणाच्या सुविधा उपलब्ध असाव्यात.

(दहा) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या आवारात किंवा जवळपास अपायकारक अन्नपदार्थ यांची विक्री होऊ न देणे.

(अकरा) प्रवेशित विद्यार्थ्यांची दर दोन महिन्याने नियमित आरोग्य तपासणी करुन घेण्यात यावी.

## भाग - ९

(३२) निधीचे **अंशदान:-**

(एक) शाळा/प्रशिक्षण केंद्र, संलग्नित वसतिगृह व मतिमंद बालगृहाच्या विकास कार्यासाठी तसेच सक्षमीकरणासाठी ज्याबाबी शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानात समाविष्ट होत नाहीत अशा बाबींवरील खर्चासाठी शासनाच्या निधीवर अवलंबून न राहता लोक सहभागातून, खाजगी कंपन्यांच्या कार्पोरेट सोशल रिस्पॉंसिबीलीटी (CSR) निधी, स्थानिक संस्थेचा ३% निधी अथवा राष्ट्रीय/आंतरराष्ट्रीय निधी इत्यादीतून निधी संकलीत करावा.

(दोन) शाळा/प्रशिक्षण केंद्राचा/मतिमंद बालगृह प्रमुख इमारत निधी, शालेय दिन किंवा महोत्सव निधी किंवा निरोप समारंभ किंवा वाढदिवस इत्यादि सारख्या प्रसंगी उभारावयाच्या अन्य कोणत्याही निधीकरीता विदयार्थ्यांना, त्यांच्या आई-वडिलांना, किंवा पालकांना अंशदान देण्यास बंधन करणार नाही.

(तीन) शाळा/प्रशिक्षण केंद्राला किंवा त्यांच्या व्यवस्थापन संस्थेला विदयार्थ्याकडून किंवा विदयार्थ्यामार्फत केवळ स्वेच्छेने ध्वजदिन, जागतिक अपंग दिन इत्यादी सारख्या कोणत्याही विशिष्ट कारणांसाठी निधी गोळा करता येईल. तथापि, असा निधी गोळा करताना त्यांच्यावर सार्वजनिक टीका होणार नाही याकडे व्यवस्थापनने काळजीपुर्वक लक्ष दयावे. अशा प्रकारे गोळा केलेल्या निधीचा हिशोब देण्यात येईल आणि आवश्यक असेल तर हिशोब निरीक्षणासाठी खुले ठेवण्यात येतील.

(चार) अनुदानित शाळा/प्रशिक्षण केंद्रातील ज्याबाबींवर शासनाकडून वेतन वेतनेत्तर अनुदान देण्यात येते अशासाठी प्रवेशित विद्यार्थ्यांकडून शैक्षणिक शुल्क अथवा अन्य कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारता येणार नाही

(पाच) ज्या अनिवासी शाळा/प्रशिक्षण केंद्राकडे स्वत:चे कमीतकमी ७ आसन क्षमता व आवश्यकते नुसार जास्तीत जास्त आसन क्षमतेचे व राज्य परिवहन अधिकाऱ्याकडे म्हणून नोंदणी असलेले वाहन असेल त्या शाळा/प्रशिक्षण केंद्रासाठी मंजूर वाहन चालक व वाहन परिचराचे एकत्रित वेतन, इंधन व दुरुस्ती खर्च शासनाकडून देय आहे. त्या शाळा/प्रशिक्षण केंद्राने अपंग मुलांना ने-आण करण्यासाठी मोफत सुविधा करुन दयावी.

(सहा) ज्या अनिवासी शाळा/प्रशिक्षण केंद्राकडे स्वत:चे वाहन नसेल अशा शाळा/प्रशिक्षण केंद्रास शासनाच्या खरेदी धोरणाचे अनुपालन करुन परिवहन अधिकाऱ्याकडे स्कूल बस म्हणून नोंदणी असलेले वाहन भाडे तत्वावर घेता येईल त्यावर होणारा खर्च वेतनेत्तर अनुदान मुल्यनिर्धारणासाठी देय राहील.

**भाग – १० (एक)**

(३३) **शाळेची सत्रे**

(एक) शालेय वर्ष दोन सत्रांमध्ये विभागले जाईल. पहिले सत्र जून ते ऑक्टोंबर आणि दुसरे सत्र नोव्हेंबर ते एप्रिल असे राहील. सामान्यत: दिवाळी सणाकरीता योग्य होईल अशा रितीने ऑक्टोंबर/नोव्हेंबर मध्ये अल्प मुदतीची मोठी सुट्टी राहील.

(दोन) शैक्षणिक वर्षामध्ये प्रत्यक्ष शाळेचे कामाचे दिवस २५० हून कमी असणार नाहीत.

(तीन) शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या निर्णयाप्रमाणे शहरी भागाकरीता महानगरपालीका/नगरपालीकेने जाहीर केलेल्या व ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषदेने सामान्य शाळांसाठी जाहीर केलेल्या सुट्टया राहतील.

(चार) शाळा सर्वसाधारणपणे सहा तास प्रत्यक्ष शिकविण्याचे कामकाज चालेल, कर्मचारी किमान आठ तास शाळेमध्ये उपस्थित असतील.

(पाच) कडक उन्हाळयाच्या महिन्यामध्ये शाळेचे तास सकाळी व सहा तासापेक्षा कमी ठेवता येतील मात्र शिकविण्याचे तास दररोज चार तासाहून कमी असू नयेत.

**(३४) दिर्घकालीन सुट्टया अनुज्ञेय असलेले कर्मचारी** -

(एक) शाळांमधील खालील कर्मचाऱ्यांना दिवाळी व उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय राहील.

१.विशेष शिक्षक, २. कला/हस्तकला/शारिरीक शिक्षण निदेशक/संगित शिक्षक, ३. काळजीवाहक, ४. निमवैद्यकिय कर्मचारी, ५. वाहन चालक, ६. वाहन परिचर, ७. वसतिगृह अधिक्षक, ८. स्वयंपाकी, ९. मदतनीस, १०. काळजीवाहक/राखणदार, ११. परिचारीका

(दोन) शाळांमधील खालील कर्मचाऱ्यांना दिवाळी व उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय राहणार नाही.

१.मुख्याध्यापक, २. लेखापाल/वरिष्ठ लिपीक, ३. कनिष्ठ लिपीक, लिपीक-नि-लेखापाल, ४. शिपाई, ५. पहारेकरी, ६. सफाईगार

## भाग - १० (दोन)

(३५) **प्रशिक्षण केंद्राची सत्रे**

(एक) प्रशिक्षण केंद्राची सत्रे ही कुशल व अकुशल व्यवसायाप्रमाणे वेगवेगळी राहतील.

(दोन) कुशल व्यवसाय असणाऱ्या प्रशिक्षण केंद्राची सत्रे ही व्यवसाय शिक्षण व तंत्र शिक्षण संचालनालयाने निर्धारित केल्याप्रमाणे राहतील.

(तीन) कुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्राच्या कामाचे दिवस व सुट्टया व्यवसाय शिक्षण व तंत्र शिक्षण संचालनालयाने निर्धारित केल्याप्रमाणे अथवा औदोगीक प्रशिक्षण संस्थेप्रमाणे राहतील.

(चार) कुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्रातील कामाचे तास हे व्यवसाय शिक्षण आणि तंत्र शिक्षण संचालनालयाने औदयोगिक प्रशिक्षण संस्थेस ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.

(पाच) अकुशल व्यवसाय असणाऱ्या प्रशिक्षण केंद्राची सत्रे ही पहिले सत्र जून ते ऑक्टोंबर आणि दुसरे सत्र नोव्हेंबर ते एप्रिल असे राहतील. सामान्यत: दिवाळी सणाकरीता योग्य होईल अशा रितीने ऑक्टोंबर/नोव्हेंबर मध्ये अल्प मुदतीची मोठी सुट्टी राहील.

(सहा) अकुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्राचे शैक्षणिक वर्षामध्ये कामाचे दिवस हे २५० हून कमी असणार नाहीत.

(सात) अकुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्रास शालेय शिक्षण विभागाने निर्गमित केलेल्या निर्णयाप्रमाणे शहरी भागाकरीता महानगरपालीका/नगरपालीकेने जाहीर केलेल्या व ग्रामीण भागासाठी जिल्हा परिषदेने सामान्य शाळांसाठी जाहीर केलेल्या सुट्टया राहतील.

(आठ) अकुशल व्यवसाय प्रशिक्षण केंद्र सर्वसाधारणपणे सहा तास प्रत्यक्ष शिकविण्याचे कामकाज चालेल, कर्मचारी किमान आठ तास शाळेमध्ये उपस्थित असतील.

(नऊ) कडक उन्हाळयाच्या महिन्यामध्ये प्रशिक्षण केंद्राचे तास सकाळी व सहा तासापेक्षा कमी ठेवता येतील मात्र शिकविण्याचे तास दररोज चार तासाहून कमी असू नयेत.

**(३६) दिर्घकालीन सुट्टया अनुज्ञेय असलेले कर्मचारी -**

(एक) अकुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्रामधील खालील कर्मचाऱ्यांना दिवाळी व उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय राहील.

१.निदेशक, २. कार्यशाळा मदतनीस, ३. वाहन चालक, ४. वाहन परिचर, ५. गृहपाल, ६. स्वयंपाकी, ७. मदतनीस, ८. काळजीवाहक/राखणदार

(दोन) अकुशल व्यवसाय प्रशिक्षण देणाऱ्या प्रशिक्षण केंद्रामधील खालील कर्मचाऱ्यांना दिवाळी व उन्हाळी सुट्टी अनुज्ञेय राहणार नाही.

१.व्यवस्थापकीय अधिक्षक, २. लेखापाल/वरिष्ठ लिपीक, ३. कनिष्ठ लिपीक, लिपीक-नि-लेखापाल/भांडारपाल, ४. शिपाई, ५. पहारेकरी, ६. सफाईगार, ७. पुनर्वसन सामाजिक कार्यकर्ता-नि-सेवायोजन अधिकारी

(तीन) ज्या पुर्णवेळ कर्मचाऱ्यास (कंत्राटी व मानधनावरील कर्मचारी वगळून) दिवाळी व उन्हाळीची सुट्टी अनुज्ञय राहणार नाही अशा कर्मचाऱ्यांना नियमाप्रमाणे अर्जित रजा अनुज्ञेय राहतील.

(चार) ज्या शाळेस/प्रशिक्षण केंद्रास मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाचे स्वतंत्र पद मंजूर नाही अशा ठिकाणी प्रभारी मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक म्हणून जे कर्मचारी कार्यरत आहेत त्यांना दिर्घकालीन सुट्टी अनुज्ञेय राहणार नाही अशा कर्मचाऱ्यांना देखील नियमाप्रमाणे त्या कालावधीतील नियमाप्रमाणे अर्जित रजा अनुज्ञेय राहतील.

(पाच) तसेच दिर्घ सुट्टी अनुज्ञेय असणाऱ्या कर्मचाऱ्यास काही अपरीहार्य कारणास्तव संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याच्या पुर्व परवानगीने ज्या कोणत्याही वर्षातील पुर्ण सुट्टी उपभोगण्यास प्रतिबंध केला असेल त्या वर्षांत त्यांना अर्जित रजा अनुज्ञेय राहील. या रजेचे प्रमाण संपुर्ण सुट्टीच्या कालावधीत न उपभोगल्या सुट्टींचे पुर्ण सुट्टयांच्या दिवसाशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणात वर्षाला तीस दिवस या प्रमाणे अनुज्ञेय असेल मात्र अशी ३०० दिवसांची रजा साठेल तेव्हा रजा अर्जित होण बंद होईल. ही साठलेली अर्जित रजा, रजेच्या नियमाप्रमाणे उपभोग/रजा रोखीकरण करता येईल.

**उदाहरण** - वर्षभरात ६३ दिवसांची संपुर्ण सुट्टी उपभोगण्यास ज्याला प्रतिबंध केला गेला असेल, अशा कर्मचाऱ्याला ३० दिवस अर्जित रजा घेण्याचा हक्क असेल. तसेच संपुर्ण सुट्टयांपैकी २१ दिवस रजा उपभोगण्यास प्रतिबंध केला असेल अशा कर्मचाऱ्याला १० दिवसांची अर्जित रजा मिळण्याचा हक्क असेल आणि त्यापुढे याच प्रमाणात रजा अर्जित होत जाईल.

(सहा) वरील नियमात नमूद असलेल्या दिर्घ कालीन सुटटया (उन्हाळी व दिवाळी) हया मतिमंद बालगृह व संलग्नीत शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय राहणार नाहीत. त्या ऐवजी त्यांना नियमाप्रमाणे अर्जित रजेचा लाभ देण्यात येईल.

**(३७) कर्मचाऱ्यांचा कर्तव्य कालावधी**

(एक) शाळा /प्रशिक्षण केंद्र हे दररोज सकाळी १० वाजता सुरु होतील. शाळेचे अध्यापनाचे कामकाज मधल्या सुट्टीसह दररोज सहा तास चालेल. परंतु शिक्षक, शिक्षकेत्तर व पुर्णवेळ निमवैद्यकीय कर्मचारी (उपचार तज्ञ) हे किमान आठ तास शाळेच्या कामकाजासाठी शाळेतच उपस्थित राहतील.

(दोन) अनिवासी शाळा व प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना सणासुदीच्या व रविवारच्या सुटटया घेता येतील. मात्र निवासी शाळा व प्रशक्षिण केंद्रातील काळजावाहक/राखणदार, मदतनीस, स्वयंपाकी, सफाईगार पहारेकरी यांना या सुट्टया घेता येणार नाहीत. शाळा/प्रशक्षिण केंद्र प्रमुख योग्य ती तरतूद करुन आळीपाळीने या कर्मचाऱ्यांना आठवडयातून एक साप्ताहिक सुट्टी देतील.

(तीन) वसतिगृह अधिक्षक व गृहपाल हे वसतिगृहाच्या आवारातच राहतील व ते चोवीस तास आपल्या कर्तव्यास बांधील असतील. परंतु प्रत्यक्षात किमान आठ तास ते आपल्या कार्यालयात उपस्थित असतील त्यांना सणासुदीच्या व रविवारच्या शाळा विभागातील कर्मचाऱ्याप्रमाणे सुटटया घेता येणार नाहीत. शाळा/प्रशक्षिण केंद्र प्रमुख हे पर्यायी व्यवस्था करुन त्यांना आठवडाची एक दिवस साप्ताहिक सुट्टी देतील. अशी सुटटी शाळा किंवा प्रशिक्षण केंद्रास सुट्टी असेल त्या दिवशी घेता येणार नाही. संस्थेने निवासाची व्यवस्था करूनही जे वसतिगृह अधिक्षक/गृहपाल वसतिगृहाच्या आवारात राहणार नाही त्या वसतिगृह अधिक्षक/गृहपालवर संस्थेस शिस्तभंगाची कारवाही करता येईल.

(चार) शाळा/प्रशिक्षण केंद्राचे मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक हे आपल्या प्रशासनीक जबाबदाऱ्या सांभाळून आठवडयाचे किमान दहा तास विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष शिकविण्याचे कामकाज करतील.

(पाच) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षकेत्तर कर्मचारी वर्गाचे कामाच्या उपस्थितीचे तास, लिपीक वर्गासाठी (कार्यालयीन कर्मचारी) यांचे कामकाज रोज आठ तास चालेल.

(सहा) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या शिक्षकेत्तर निम्मस्तर कर्मचारी (शिपाई, काळजीवाहक, सफाईगार इ.) वर्गांचे कामाच्या उपस्थितीचे तास किमान दररोज नऊ तास चालेल.

(सात) शाळा/प्रशिक्षण केंद्रातील मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी हे शाळा व प्रशिक्षण केंद्राच्या ठिकाणी (शहर/गावामध्ये) निवासास असतील.

(आठ) वरील नियमामध्ये काहीही नमूद केले असले तरी, प्रासंगिक गरजेनुसार आवश्यकता भासल्यास उपस्थितांचे तास व कामकाजाची वेळ वाढविण्याचा अधिकार शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखास असेल.

(नऊ) अपंगांच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र तसेच मतिमंद बालगृह, मनोरंजन केंद्र इत्यादी मधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सुटटयांच्या अथवा रजेच्या कालावधीत देश सोडून बाहेर जायचे झाल्यास त्यासाठी संबंधीताच्या नियुक्तीस प्रशासकीय मान्यता देण्याऱ्या सक्षम प्राधिकाऱ्याची पुर्व परवानगी घ्यावी लागेल. असे न केल्यास संबंधीत कर्मचारी शिस्तभंग विषयक कार्यवाहीस पात्र ठरेल.

(दहा) काहि अपरिहार्य कारणामुळे वसतीगृह अधीक्षक दीर्घ काळ रजेवर गेल्यास अशेवेळी संस्था विशेष शाळा, प्रशिक्षण केंद्र, मतीमंद बालगृह यातील सुयोग्य कर्मचाऱ्यास वस्तीगृह अधीक्षकाचा पदभार देईल. अशा पदभार स्वीकारलेल्या अधीक्षकास वसतिगृह अधीक्षकाची कर्तव्य व जबाबदऱ्या पार पाडाव्या लागतील.

## भाग – ११

### (३८) विदयार्थ्यांसाठी शिस्तीची तत्त्वे

(एक) शिस्तीच्या तत्वाचे योग्य रितीने पालन होत आहे याकडे शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखांनी लक्ष दयावे. नियमितपणा आणि आज्ञाधारकपणा यांचा आग्रह असावा. बोलण्यातील आणि वागण्यातील आदा व सौजन्य तसेच शारिरीक पोशाखाची स्वच्छता या गोष्टी विदयार्थ्यांवर बिंबवाव्यात.

(दोन) विदयार्थ्यांचे केवळ संस्थेतील वर्तणुकीसंबंधीतच नव्हे तर संस्थेबाहेरील यांच्या सर्व साधारण वर्तणुकीबाबतचा सुध्दा संस्थेने प्राधिकारी विदयार्थ्यांना जाब विचारु शकतील. याची जाणीव विदयार्थ्यांना असावी. विदयार्थ्यांना संस्थेबाहेर कोणतेही आक्षेपार्ह वर्तन केल्याचे समजल्यास किंवा आढळून आल्यास ते शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरतील.

(तीन) विदयार्थ्यांना त्यांच्या शाळेमध्ये कोणत्या शर्तीवर प्रवेश दिला जाईल किंवा ठेवून घेतले जाईल हे सांगण्याचा पुर्ण अधिकार व्यवस्थापनास आहे. विदयार्थ्यांचे आई-वडील किंवा पालक व्यवस्थापनास अटी घालू शकणार नाही. मात्र अशा शर्ती संहितेतील तरतूदीशी आणि समूचीत प्राधिकाऱ्यांनी वेळोवेळी काढलेल्या अनुदेशांशी सुसंगत असाव्यात.

(चार) विदयार्थी कोणत्याही राजकीय कार्यामध्ये भाग घेणार नाहीत.

(पाच) कोणताही विदयार्थी वारंवार शिरजोरी करीत असेल किंवा सातत्याने किंवा जाणूनबुजून खोडया करीत असेल किंवा परिक्षेच्या संबंधातील गैरप्रकाराबद्दल दोषी असेल किंवा त्याने गैरशिस्तीचे किंवा गैरवर्तनाने गंभीरकृत्य केले असेल किंवा त्याच्या बरोबरच इतर विदयार्थ्यांवर त्याचा अहितकारक प्रभाव पडत असल्याने शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुख त्या विदयार्थ्यांची कायमची हकालपट्टी करु शकतील किंवा संस्था प्रमुखाने विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीपुरते त्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातून किंवा वसतीगृहातून काढून टाकू शकतील असे करण्याची कारणे लेखी नमुद करावीत. त्या विदयार्थ्यांची हकालपट्टी केल्यानंतर तात्काळ आणि कोणत्याही परिस्थितीत तसे केल्यापासून सात दिवसांच्या आत शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखाने ती बाब त्या विदयार्थ्यांचे नांवे केलेल्या कार्यवाहीच्या कारणांचा संपुर्ण तपशिलासह संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी हयांना कळवावी.

(सहा) वर शिस्तविषयक नियम हे मतिमंद विदयार्थ्यांना लागू पडत नसेल तरी त्याबाबतची जाण देण्याची जबाबदारी ही शिक्षकांवर राहील.

*   *   *

## प्रकरण ४
## पुरेसा कर्मचारी वर्ग ठेवणे
## भाग – १

### (३९) कर्मचारी आकृतीबंध व सेवाभरती

(एक) प्रत्येक अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रामध्ये कर्मचारी वर्ग हा महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग यांच्या शासन निर्णय क्रमांक इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२ मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२ दि. १८ ऑगस्ट् २००४ व दिनांक ३०/०१/२००६ (परिशिष्ट – २) मधील आकृतीबंधाप्रमाणे किंवा या कर्मचारी आकृतीबंधामध्ये शासन वेळोवळी जे बदल करील त्याप्रमाणे अनुज्ञेय राहील.

(दोन) उक्त आकृतीबंधाप्रमाणे अनुज्ञेय होणारी पदे शासनाकडून संबंधित अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्नीत वसतिगृहांना कर्मचारी पदे प्रत्यक्ष मंजूर करतील.

(तीन) प्रत्येक वर्षी अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्नीत वसतिगृहातील प्रवेशितांच्या जुलै, ऑगस्ट, सप्टेंबर महिन्याच्या बायोमॅट्रीक हजेरी प्रमाणे दरमहाची सरासरी काढून त्या सरासरीप्रमाणे ऑक्टोबर महिन्यामध्ये पटनिर्धारण करुन त्याचे आदेश जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर निर्गमित करतील.

(चार) पटनिर्धारणाप्रमाणे निर्धारित केलेली पट संख्येनुसार संबंधित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रा संलग्नीत वसतिगृहांना ज्या कर्मचारी आकृतीबंधानुसार पदे मंजूर करण्यात आलेली आहेत त्या कर्मचारी आकृती बंधाप्रमाणे पदनिश्चिती करतील. सध्या अस्तित्वात असलेल्या कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे मंजूर पदापेक्षा जादा पदे पटनिर्धाराप्रमाणे अनुज्ञेय होत असल्यास ती पदे पट निर्धारण व पद निश्चितीच्या अहवालासह आयुक्तालयास व शासनास कळवतील.

(पाच) शासनाने अथवा आयुक्तालयाने मंजूर विद्यार्थी संख्येपेक्षा पटनिर्धारणामध्ये पट संख्या कमी झाल्यास त्यासंख्येच्या प्रमाणात कमी होणारे पदे व त्यानुसार अतिरीक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांची यादी आयुक्तालयास सादर करतील. पट निर्धारण व पद निश्चितीच्या प्रमाणे संस्थेला आस्थापनेवरील पदांमध्ये कपात करावी लागेल. अशी कपात करताना याबाबत शासनाच्या प्रचलित धोरणाप्रमाणे करावी लागेल. अतिरीक्त होणाऱ्या पदांचे वेतन शासनामार्फत देण्यात येणार नाही. आस्थापनेवरील पदावर कपात न केल्यास अतिरीक्त होणाऱ्या पदावरील कर्मचाऱ्याचे वेतन देण्याची जबाबदारी ही संस्थेची राहील त्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही. याबाबत न्यायालयीन बाबी उद्भवल्यास त्यास सर्वस्वी संस्था जबाबदार राहील.

(सहा) उक्त प्रमाणे मंजूर व पट निर्धारणाप्रमाणे पद निश्चिती केलेल्या व व्यपगत न झालेल्या पदावर कर्मचारी भरती ही शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या नियमानुसार करण्यात येईल. नियमबाहय केलेल्या कर्मचारी भरतीमुळे संबंधित शाळेचे व्यवस्थापन नियमानुसार कारवाईस पात्र राहील या शिवाय सदर पालक संस्थेचे नांव काळया यादीत समाविष्ट करुन सदर पालक संस्थेच्या नावाने शासनाच्या कोणत्याही योजना राबविण्यास कायमचे अपात्र ठरविण्यात येईल.

(सात) वरील आकृतीबंध अंमलात येण्यापूर्वी ज्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राना पुर्वीच्या कर्मचारी आकृतीबंधाप्रमाणे पद मंजूर करण्यात आलेली आहे. अशी पदे नवीन आकृतीबंधाप्रमाणे

अतिरीक्त ठरत असल्यास किंवा व्यपगत होत असल्यास ती पदे कोणत्याही परिस्थितीत संबंधित संस्थेस भरता येणार नाहीत.

(आठ) नवीन आकृतीबंधाप्रमाणे पुर्वीच्या जुन्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रांना नव्याने अनुज्ञेय होणारी पदे शासन मान्यतेशिवाय भरता येणार नाहीत. अशा पदांवर केलेली कर्मचारी भरती बेकायदेशीर राहील व अशा कर्मचाऱ्यांच्या वेतन व भत्त्याची जबाबदारी शासनावर राहणार नसून ती पुर्णत संबंधित पालक संस्थेची असेल.

(नऊ) अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रामध्ये रिक्त झालेल्या पदांवर आयुक्तालय स्तरावरील प्रतिक्षा यादीतील ज्येष्ठतेनुसार कर्मचाऱ्यांचे समायोजन करून त्यांना नियुक्ती देणे संस्थेस बंधनकारक राहील. समायोजनाने नियुक्ती करतांना दिव्यांग कर्मचाऱ्याचा समायोजनमध्ये प्राध्यानाने विचार करण्यात येईल.

(दहा) ज्या संस्थांनी भारतीय पुनर्वास परिषदेने प्रमाणित केलेल्या पुनर्वसन व्यावसायिका व्यतीरिक्त कर्मचाऱ्याची नियुक्ती केलेली असेल असे कर्मचारी व नियोक्ता प्राधिकारी म्हणून संस्थेच्या कार्यकारी मंडळातील प्रत्येक सदस्य वैयक्तीक व सामुहीकरित्या तसेच अशा नियुक्तीस प्रशासकीय मान्यता देणारा सक्षम अधिकारी भारतीय पुनर्वास परिषद अधिनियम १९९२ मधील कलम १३ उपकलम ३ अन्वये एक वर्षे कैद किंवा एक हजार रुपये दंड किंवा दोन्हीही शिक्षेस पात्र राहतील.

(अकरा) प्रतिक्षा यादीवर उमेदवार उपलब्ध नसल्यास ना-हरकत प्रमाणपत्र आयुक्तालयाकडून प्राप्त झाल्यानंतरच उमेदवार भरती करावी. ना हरकत प्रमाणपत्राशिवाय कोणतीही भरती केलेली असल्यास सदरची सेवाभरती बेकायदेशीर समजण्यात येईल. याबाबतची कोणतीही न्यायालयीन अथवा आर्थीक बाबीची सर्वस्वी जबाबदारी शासनावर रहाणार नसून ती संबंधीत संस्थेची राहील.

(बारा) संबंधीत संस्थेने ना हरकत प्रमाणपत्राशिवाय नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यास आयुक्तालय स्तरावर ठेवण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीमध्ये तो संबंधीत पदाची आवश्यक अर्हता व पात्रता धारणकरीत असलातरी त्यास समावेश होण्याचा हक्क रहाणार नाही.

(तेरा) विशेष शिक्षक, कला शिक्षक व भौतिकोपचार तज्ञ, मानसोपचार तज्ञ, व्यवसायोपचार तज्ञ, वाचा उपचार तज्ञ, चलनवलन अवयव निदेशक इत्यादी पदांची संवर्ग निहाय स्वतंत्र प्रतिक्षा यादी आयुक्तालय स्तरावर ठेवण्यात येईल.

(चौदा) भारतीय पुर्नवास अधिनियम १९९२ नुसार जे व्यवसायीक अपंग क्षेत्रात कार्य करु ईच्छित आहेत अशा व्यावसायीकांनी पुर्नवास परिषदेकडे नोंदणी असणे आवश्यक आहे तसेच सदर नोंदणी प्रमाणपत्राचे नुतनीकरण असणे बंधनकारक राहील.

(पंधरा) विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रामध्ये कार्यरत कर्मचाऱ्यांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आयुक्तालय स्तरावरुन प्रशिक्षण घेऊन चाचणी घेण्यात येईल. व सदर चाचणीत कर्मचाऱ्यांची गुणवत्ता आढळून आली नाहीतर अशा कर्मचाऱ्यांवर प्रशासकीय कार्यवाही (वार्षिक वेतनवाढ रोखणे/सेवेतून कमी करणे) करण्यात येईल.

(सोळा) विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रामधील मंजूर पद बरेच दिवस रिक्त ठेवल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व सदर दंडाची रक्कम संस्थेच्या स्वनिधीतून वसूल करण्यात येईल.

(सतरा) मतिमंद बालगृहांना शासनाच्या दिनांक ०८ जून २०१४ च्या शासनाच्या निर्णयाप्रमाणे तसेच शासन यात वेळोवेळी बदल करेल त्याप्रमाणे कर्मचारी आकृतीबंध लागू राहील. तसेच शाळा/प्रशिक्षण केंद्राप्रमाणे पट निर्धारण व कर्मचारी निश्चितीच्या तरतुदी वगळता इतर सेवाभरती प्रक्रीय व नियम लागू राहतील.

(अठरा) ज्या नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विनाअनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व संलग्नित वसतिगृहे भविष्यात शासनाच्या अनुदानाची मागणी करणार आहेत त्यांना नियम ३९ (एक) प्रमाणे कर्मचारी वृंद ठेवणे व सेवा भरती प्रक्रीया व नियमांचे अनुपालन करणे बंधनकारक असेल.

(४०) **शिक्षक संवर्गातील कर्मचारी नियुक्ती**

(एक) संस्थांनी पुढील शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापुर्वी एक वर्ष अगोदर संभाव्य रिक्त होणाऱ्या शिक्षक/निदेशक संवर्ग पदांची यादी आरक्षणाच्या संवर्गाप्रमाणे तयार करुन आयुक्तालयाकडे पाठवावी.

(दोन) आयुक्तालयस्तरावर अतिरिक्त कर्मचाऱ्यांची पद निहाय व आरक्षण निहाय प्रतीक्षा यादी तयार करण्यात येईल. ही यादी आयुक्तालयाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. आयुक्तालयस्तरावर प्रसिध्द केलेल्या यादीतील उमेदवाराची रिक्त पदावर समायोजनाने नियुक्ती करणे संस्थेस बंधनकारक राहील.

(तीन) अतिरीक्त संवर्गाच्या प्रतिक्षा यादीतून कर्मचारी उपलब्ध नसल्यास संबंधित संस्थेने विहित नमुन्यात व आवश्यक त्या कागदपत्रांसह ना-हरकत प्रमाणपत्र मागणीचा प्रस्ताव संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर/उपनगर मार्फत आयुक्तालयास सादर करावा लागेल.

(चार) अतिरीक्त संवर्गाच्या यादीतून अथवा प्रतिक्षा यादीतून उमेदवार उपलब्ध नसल्यास अशा पदाकरीता आयुक्तालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

(पाच) ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर राज्यातील अनुदानित विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्रामधील शिक्षक/निदेशक पदांची भरती शासनाच्या प्रचलित भरतीच्या कार्यपद्धती नुसार भरती प्रक्रीया संस्थेस राबविता येईल.

(सहा) वरील प्रमाणे नियुक्त न केलेल्या शिक्षक/निदेशक कर्मचाऱ्यांना शासनाकडून प्रशासकीय मान्यता, वेतन, समायोजन, भविष्य निर्वाह निधी, निवृत्ती वेतन, चटोपाध्याय वेतनश्रेणी, रजा, वैद्यकीय प्रतीपुर्ती इत्यादी कोणतेही लाभ दिले जाणार नाहीत तसेच अशी सेवाभरती बेकायदेशीर समजण्यात येईल याबाबतची कोणतीही न्यायालयीन अथवा आर्थिक बाबींची जबाबदारी शासनावर राहणार नाही ती संस्थेची राहील.

(सात) सेवाभरती प्रक्रीयेचा अवलंब करुन निवड झालेल्या शिक्षक/निदेशक संवर्गातील कर्मचाऱ्यांस/समायोजित कर्मचाऱ्यास संबंधित संस्थेने तात्काळ रुजू करुन घेणे बंधनकारक

राहील. अशा प्रशासकीय मान्यतेसाठी पात्र शिक्षक/निदेशक पदावरील कर्मचाऱ्यांस संबंधित जिल्हाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुंबई शहर/उपनगर या जिल्हयाकरीता प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, कोकण विभाग (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाप्रमाणे) तो कर्मचारी प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून त्यास एक महिन्याचे आत तपासून प्रशासकीय मान्यता देने बंधनकारक राहील.

(४१) **शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचारी नियुक्ती**

(एक) उक्त कर्मचारी आकृतीबंध व सेवाभरती, नियम (३९) (नऊ) मध्ये नमूद केल्याप्रमाणे शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचारी भरती उमेदवारांच्या उपलब्धतेनुसार व ज्येष्ठतेप्रमाणे प्रतिक्षा यादीतून करण्यात येईल.

(दोन) प्रतिक्षा यादीमध्ये उमेदवार उपलब्ध नसल्यास अशा पदाकरीता आयुक्तालयाकडून ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येईल.

(तीन) ना-हरकत प्रमाणपत्र दिल्यानंतर राज्यातील अनुदानित विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्रामधील रिक्त असलेल्या व ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झालेल्या पदांवर शासनाने विहीत केलेल्या नियमानुसार संस्था स्तरावर पदभरती प्रक्रीया राबविण्यात येईल.

(चार) ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर संबधित संस्थेने ना-हरकत प्रमाणपत्राच्या दिनांकापासून एक वर्षाच्या आत विहित भरती प्रक्रीयेचा अवलंब करुन कर्मचारी भरती करणे संबधित संस्थेवर बंधनकारक राहील. सदर एक वर्षाच्या कालावधीत भरती प्रक्रीया पुर्ण न झाल्यास सदरचे ना-हरकत प्रमाणपत्रा वैधता संपुष्टात येईल व तदनंतर संस्थेस ना-हरकत प्रमाणपत्राकरीता नव्याने प्रस्ताव सादर करणे बंधनकारक राहील.

(पाच) सेवाभरती प्रक्रीयेचा अवलंब करुन निवड झालेल्या शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचाऱ्यांस/समायोजित कर्मचाऱ्यास संबधित संस्थेने तात्काळ रुजू करुन घेणे बंधनकारक राहील. अशा प्रशासकीय मान्यतेसाठी पात्र कर्मचाऱ्यांस संबधित जिल्हाचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद व मुंबई शहर/उपनगर या जिल्हयाकरीता प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, कोकण विभाग (सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर यांचेकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाप्रमाणे) हे तो कर्मचारी प्रत्यक्ष रुजू झाल्याच्या दिनांकापासून प्रशासकीय मान्यता देतील.

(सहा) सेवाभरती प्रक्रीयेचा अवलंब करुन निवड झालेल्या शिक्षकेत्तर संवर्गातील कर्मचाऱ्यांस/समायोजित कर्मचाऱ्यास संबधित संस्थेने रुजू करुन घेण्यास नकार दिला अथवा टाळाटाळ करत असल्याचे निदर्शनास आल्यास किंवा तशी खात्री झाल्यास त्या संस्थेव्दारा चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राचे शासनाकडून देण्यात येणारे वित्तीय सहाय्य/अनुदान स्थगित करण्याची कारवाई आयुक्तालयाकडून विनाविलंब करण्यात येईल.

(सात) सेवाभरती प्रक्रीयेचा अवलंब करुन निवड झालेल्या कर्मचाऱ्यास//समायोजित कर्मचाऱ्यास रुजू करुन घेण्यास संस्थेने विनाकारण विलंब केल्यास किंवा तसे निदर्शनास आल्यास संबंधित कर्मचारी ज्या दिनांकास संबंधित विशेष शाळेत/प्रशिक्षण केंद्रात रुजू होण्यास गेला असता त्या दिनांकापासून ते तो प्रत्यक्ष रुजू झालेल्या दिनांकापर्यंतच्या कालावधीचे संबंधित पदाचे वेतन व भत्ते संस्थेच्या स्वनिधीतून देणे बंधनकारक राहील.

(आठ) विशेष शाळेचे / प्रशिक्षण केंद्राचे कामकाज प्रभावी होण्याच्या हेतूने संस्थेस आवश्यकतेनुसार एका अधिकाऱ्याची नियुक्ती प्रशासकीय अधिकारी म्हणून करता येईल. संस्थेने व शाळा समितीने प्रदान केलेल्या आधिकाराचा वापर करून सदर प्रशासकीय अधिकारी व्यवस्थापन बाबत कामकाज करेल व्यवस्थापनच्या वतिने प्रशासकीय अधिकारी यानी दिलेल्या आदेशाचे पालन कर्मचाऱ्यास करावे लागेल अधिकाऱ्यास वेतन देण्याची जबाबदारी सबंधित संस्थेची राहील. परंतु अशा प्रकारच्या नियुक्तीची माहिती शासनास देने आवश्यक राहील.

(४२) **नियुक्ती करीता पात्रता**

(एक) शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी नियुक्तीसाठी संबंधित पदास शासनाने शा. नि. १८/०८/२००४ च्या परिशिष्टामध्ये नमुद केल्याप्रमाणे शैक्षणिक अर्हता व प्रशिक्षणाची अट राहील. यामध्ये शासन वेळोवेळी बदल करेल ते लागू राहतील. कर्णबधिरांच्या विशेष शाळेमध्ये विशेष शिक्षक नियुक्ती करताना ज्या उमेदवारांची सांकेतिक भाषा (Sign Language) चे मान्यता प्राप्त संस्थेकडून प्रशिक्षण पुर्ण झाले आहे त्या उमेदवारास गुणवत्ता यादीमध्ये अधिक गुण मिळण्यास पात्र राहतील.

(दोन) नियुक्तीसाठी उमेदवाराचे कमाल व किमान वयोमर्यादा तसेच वयोमर्यादेतील शिथिलता ही शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्धारीत केलेल्या धोरणाप्रमाणे राहील.

(तीन) नियुक्तीसाठी सामाजिक आरक्षण व समांतर आरक्षण (अपंग, स्वातंत्र सैनिक, प्रकल्पग्रस्त, महिला, खेलाडू इ.) हे शासनाने वेळोवेळी निर्धारित केलेल्या धोरणाप्रमाणे राहील.

(चार) शिक्षक व शिक्षकेत्तर मधील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करताना ५०% पदे ही अपंग संवर्गातून समांतर पध्दतीने भरण्यास व त्याच शाळा/प्रशिक्षण केंद्रामधील शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्राधान्य देण्यात यावे.

(पाच) कर्णबधिराच्या विशेष शाळेमध्ये विशेष शिक्षक नियुक्त करताना ५०% शिक्षक हे Indian Sign Language अभ्यासक्रम पुर्ण केलेले व इतर ५०% हे Oral u Aoral पध्दतीने संवाद साधणाऱ्या प्रशिक्षित शिक्षकाची नियुक्ती करावी.

(४३) पदोन्नतीने मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदावर नियुक्ती करताना संस्थेतील/विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रातील सेवा ज्येष्ठता, मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालाची प्रती, संस्थेचा ठराव विचारात घेऊन पदोन्नतीने विशेष शिक्षक / निदेशक यांना मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदावर नियुक्ती देण्यात येईल, तसेच प्रथम नियुक्तीच्या वेळी विशेष शिक्षक प्रशिक्षण (डी.एस.ई.एम.आर.) प्राप्त असलेल्या कला शिक्षकास सेवा ज्येष्ठता व मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालास अनुसरून मुख्याध्यापक / व्यवस्थापकीय अधीक्षक

पदी पदोन्नती देण्यात येईल. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

(४४) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाच्या पदोन्नतीसाठी पात्र असलेल्या विशेष शिक्षक/निदेशकांतील ज्येष्ठतेनुसार शिक्षक/निदेशकाने मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदाची पदोन्नती नाकारल्यास संस्थेतील त्याहून कनिष्ठ असलेल्या परंतू ज्येष्ठतेस पात्र विशेष शिक्षक/निदेशकास मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदी पदोन्नती देता येईल. या परिस्थिती मधेही प्रथम नियुक्तीच्या वेळी विशेष शिक्षक प्रशिक्षण प्राप्त असलेल्या कला शिक्षकास सेवा ज्येष्ठता व मागील पाच वर्षाच्या गोपनीय अहवालास अनुसरून मुख्याध्यापक / व्यवस्थापकीय अधीक्षक पदी पदोन्नती देण्यात येईल. आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्या ना-हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता नाही.

(४५) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक हे पद पूर्णवेळ मंजूर नसलेल्या विशेष शाळा / प्रशिक्षण केंद्रात संस्था नियमास अनुसरून सुयोग्य शिक्षकास/निदेशकांस मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदाचा पदभार देईल.

**पदावनती:-**

(४५) ज्या कर्मचाऱ्यास पदोन्नतीची संधी आहे, अशा कर्मचाऱ्यांना पदोन्नती मिळाली व अशा पदोन्नतीच्या पदावर काही अपरीहार्य कारणास्तव त्या पदावर त्याची काम करण्याची इच्छा नसल्यास स्वेच्छेने समाज कल्याण अधिकारी यांचेसमोर पदावनती स्विकारून पूर्वीच्या पदावर काम करण्याचे शपथपत्र देईल व त्यानंतरच अशा कर्मचाऱ्यांची संस्थेस पदावनती करता येईल. पदावनतीमुळे रिक्त झालेल्या पदावर सेवाज्येष्ठतेप्रमाणे व प्रचलित नियमाप्रमाणे पदोन्नती देऊन ते पद भरण्यात येईल. तथापि पदावनतीचे पद संस्थेत रिक्त असले पाहिजे.

(४६) संस्थेतील विशेष शिक्षक/निदेशकामधून मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाच्या पदी पदोन्नती देण्यासाठी पात्र उमेदवार उपलब्ध नसल्यास संस्था संबंधीत सक्षम समाज कल्याण अधिकारी यांच्या पूर्वपरवानगीने शासनाने विहीत केलेल्या सेवा भरतीच्या नियमांचा अवलंब करून मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाचे पद भरण्यात यावे.

(४७) पदोन्नतीने मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाच्या पदी कार्यरत कर्मचाऱ्याने आपल्या पदाचे कर्तव्य करतांना कसूर केल्यास संस्था जिल्हा समाज कल्याण अधिकारी/ सहायक आयुक्त मुंबई शहर आणि उपनगर यांचेकडे तसा अहवाल सादर करेल व जिल्हा समाज कल्याण अधिकारी/ सहायक आयुक्त मुंबई शहर आणि उपनगर यांचेकडे तीन महिन्याचे आत सुनावणी घेऊन सबंधित कर्मचाऱ्याचा मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक पदाचे पदावनतीबाबत व इतर योग्य त्या कारवाई बाबत संस्थेस निर्देश देईल.

(४८) व्यवस्थापनाने शाळेचा प्रमुख म्हणून केलेल्या नियुक्तीमुळे कोणत्याही प्रकारे व्यथित झालेला शिक्षक, अशा नियुक्तीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत आयुक्त अपंग कल्याण आयुक्तालय पुणे यांचाकडे अपील करू शकेल.

## भाग – २

(४९) **विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखाची (मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक) जबाबदारी**

व्यवस्थापन पर्यवेक्षणाच्या व नियंत्रणाच्या अधिन राहून संस्थेचा प्रशासकीय व शैक्षणिक प्रमुख म्हणून काम करणारा प्रमुख पुढील गोष्टीकरीता जबाबदार असेल.

(एक) शाळा/प्रशिक्षण केंद्राचा दर्जा सुधारणे.

(दोन) नेमून दिलेले अध्यापकीय काम पार पाडणे.

(तीन) शैक्षणिक/प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यास व ते पार पाडण्यास सहाय्य करणे.

(चार) विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, संस्थेमध्ये शिस्त ठेवणे.

(पाच) हिशोब ठेवणे.

(सहा) शाळा/प्रशिक्षण केंद्र करीता ग्रंथालय, प्रयोगशाळा आणि तो ज्या शाळेचा/प्रशिक्षण केंद्राचा प्रमुख असले त्याच शाळा/ प्रशिक्षण केंद्र संलग्नीत वसतिगृहावर नियंत्रण ठेवणे.

(सात) संस्थेच्या प्रश्नासंबंधीचा पत्र व्यवहार.

(आठ) अभ्यासक्रम विषयक अभ्यासानुवर्ती कार्यक्रमाचे आयोजन व पर्यवेक्षण आणि अभिलेख ठेवणे.

(नऊ) नियम विनियम आणि विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संहिता यामधील तरतुदी आणि शासनाने दिलेले अन्य आदेश आणि व्यवस्थापनाने वेळोवळी दिलेल्या संस्थेच्या प्रशासनासंबंधीचे आदेश यांचे अनुपालन करणे.

(दहा) परीक्षांवर पर्यवेक्षण करणे व त्या आयोजित करणे तसेच अंतर्गत गुणांकनासंबंधीचे काम आणि नेमून दिल्याप्रमाणे परीक्षेसंबंधीचे अन्य काम करणे.

(अकरा) सहाय्यक शिक्षक अन्य कर्मचारी वर्ग यांच्या कामाचे मूल्यमापन करणे आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके अद्यावत ठेवणे.

(बारा) संस्थेमधील मुलांकरीता वैद्यकीय व निमवैद्यकिय तज्ञ व्यक्तीकडून प्रशिक्षण पुनर्वसन कार्यक्रम यथोचितरित्या राबविला जात आहे याची खात्री करून घेणे.

(तेरा) संस्थेच्या व्यवस्थापनाने/शाळा समितीने वेळोवळी नेमून दिले असेल असे संस्थेचे संघटन विषयक आणि प्रशासनासंबंधीचे अन्य कोणतेही काम पार पाडणे.

(४९) **कर्मचाऱ्यांची कर्तव्य:-**

**(अ) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक यांची शैक्षणिक कर्तव्य:**

(एक) शैक्षणिक बाबी संबंधीची कर्तव्य शाळा प्रमुख/प्रशिक्षण केंद्र प्रमुख तो स्वत: शिकवित असलेल्या तासिकाबाबत शिक्षक म्हणून जी कर्तव्य पार पाडीत असेल, त्याच्या व्यतिरिक्त शासन व शाळा समिती वेळोवळी देईल अशा सुचनांच्या अधिन राहून पुढील कर्तव्यही पार पाडील.

(दोन) त्यांच्या शाळा/प्रशिक्षण केंद्रतील सर्व विद्यार्थ्यांना सक्षम व परिणामकारक शिक्षण तसेच शारिरीक शिक्षणही मिळावे याची सर्वसाधारण जबाबदारी त्याच्यावर राहील.

(तीन) तो शाळा/प्रशिक्षण केंद्रात वेळेवर हजर राहील शाळेच्या नेमून दिलेल्या वेळात उपस्थित राहील आपले संपूर्ण लक्ष शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या कामावर केंद्रीत करील आणि शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या वेळात कोणतेही खाजगी काम करणार नाही.

(चार) शिक्षकांच्या कामावर प्रमाणाचे नियमन व नियंत्रण करण्याची आणि शाळा/प्रशिक्षण केंद्रातील शिक्षणाचा दर्जा चांगला राहील याची काळजी घेण्याची जबाबदारी त्यांच्यावर राहील.

(पाच) नियोजन व मुल्यांकन यासाठी स्थूल मार्गदर्शक तत्वे ठरवून देण्याची जबाबदारी त्याची असेल.

(सहा) शाळा/प्रशिक्षण केंद्र शाळा समितीशी विचार विनमय करून क्रमीक पुस्तके निदेश पुस्तके, व्यवसाय पुस्तिका (Work book) इत्यादी विहीत करील.

(सात) अभिमुखीकरण (Orientation) पाठयक्रम घेवून तो यशस्वीरित्या पूर्ण करील.

(आठ) शाळा/प्रशिक्षण केंद्रातील निवासी/अनिवासी विद्यार्थ्यांच्या सातत्याने शैक्षणिक व सर्वांगिण प्रगतीकडे लक्ष देईल. विद्यार्थ्यांची असमाधानकारक प्रगती सातत्याने दिसून आल्यास शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखास जाब विचारण्यात येईल.

(नऊ) मुलांचे शिक्षण, प्रशिक्षण व कल्याण याविषयी सक्षम प्राधिकारी/व्यवस्थापन ठरवून देईल अशी कोणतीही कर्तव्य विनातक्रार करेल.

**(ब) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक यांची सर्वसाधारण प्रशासन विषयक बाबीसंबंधातील कर्तव्य**

(एक) शाळा/प्रशिक्षण केंद्राचे कामकाज सुरळीतपणे व कार्यक्षमतेने चालावे यासाठी तो शासनाला व व्यवस्थापनाला जबाबदार असेल.

(दोन) शाळा/प्रशिक्षण केंद्रातील उपस्थिती वाढावी यासाठी तो पुढील गोष्टींव्दारे सर्वतोपरी प्रयत्न करील.

(१) विद्यार्थ्यांच्या पालकांना, विद्यार्थ्यांना नियमितपणे शाळा/प्रशिक्षण केंद्रात हजर रहावे यासाठी प्रवृत्त करणे.

(२) अनुपस्थित राहणाऱ्या विद्यार्थ्यांच्या पालकांशी आपल्या सहाय्यकाच्या मदतीने संपर्क साधणे त्यांच्या अनुपस्थितीची किंवा अनियमित उपस्थितीची कारणे जाणून घेणे व त्यांच्या मुलांना नियमितपणे शाळा/प्रशिक्षण केंद्रात येतील या करीता त्यांना प्रवृत्त करणे.

(तीन) विद्यार्थ्यांने किंवा त्याच्या पालकाने अर्ज केल्यावर त्यांना शाळा/प्रशिक्षण केंद्र सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा सर्वसाधारण नोंदवहीतील उतारा देईल.

(चार) विहीत केलेल्या वेळापत्रकाच्या चौकटीनुसार दरवर्षी कामाच्या दिवसाच्या व सुटटयांची संख्या निश्चित करील आणि शाळा/प्रशिक्षण केंद्राचे वेळापत्रक तयार करील.

(पाच) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या सर्व नोंदवहया व अभिलेख योग्यरितीने ठेवण्याची जबाबदारी त्यांच्यावर असेल.

(सहा) तो आपल्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातील मुलांमध्ये स्वच्छतेच्या व नीटनेटकेपणाच्या सवयी लावील आणि त्याच्या वर्तणूकीबाबत व शिस्तीबाबत जबाबदार असेल आणि तसेच त्याला आपल्या सहाय्यकामध्ये काही गैरवर्तणूकीचे किंवा शिस्तभंगाचे प्रसंग घडलेले आढळल्यास त्याबाबत ताबडतोब व्यवस्थापनास व शासनास कळवील.

(सात) तो आपल्या सहाय्यकांच्या कामाचे पर्यवेक्षण, नियंत्रण व समन्वयन करील त्यांच्या कार्यक्षमतेबाबत व शिस्तभंगाचे प्रसंग घडलेले आढळल्यास त्याबाबत ताबडतोब व्यवस्थापनास व शासनास कळवील.

(आठ) आपल्या सहाय्यकांच्या कामाचा रोजनामा ठेवील.

(नऊ) दर आठवडयाला शिक्षकांच्या किमान दोन पाठांना हजर राहून अभिक्षण करील व त्यांचा अभिलेख ठेवील आणि सहाय्यक प्रमुखाने किंवा पर्यवेक्षणाने किंवा दोघांनीही ठेवलेल्या रोजनाम्याची नियतकालीक तपासणी करील.

(दहा) त्याच्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थ्यांमध्ये जातीय सलोखा व सदभावना वाढण्यासाठी प्रयत्न करील आणि कोणत्याही विद्यार्थ्याला त्याच्या जातीच्या व समाजाच्या कारणास्तव कोणतीही भेदभावाची वागणूक दिली जात नाही. याबद्दल खातर जमा करून घेईल.

(अकरा) आपल्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांना नैमित्तीक रजा मंजूर करील.

(बारा) विभागाच्या निदेशानुसार शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या जागेचा वापर कायदेशीर गोष्टीसाठी केला जाईल. याबददल असेल आणि सर्वसाधारणत: व्यवस्थापनाच्या गरजेनुसार आणि विशेष करून विभागाच्या गरजेनुसार विविध परिक्षा सुरळीतपणे आयोजित करण्यासाठी सर्व प्रकारचे सहाय्य देईल.

(तेरा) शाळा/प्रशिक्षण केंद्र समितीच्या बैठकी बोलावण्याची व्यवस्था करील.

(चौदा) शासनाच्या विभागाकडून वेळोवळी मागविण्यात येईल ती सर्व माहिती वेळच्या वेळी पुरवील.

(पंधरा) शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या सर्व प्रकारच्या मालमत्तेची योग्य प्रकारे काळजी घेतली जात आहे. याची खातरजमा करून घेण्याची आणि शाळा/प्रशिक्षण केंद्राची इमारत स्वच्छ व नीटनेटकी ठेवण्याची जबाबदारी त्याची असेल. अशा मालमत्तेचे कोणत्याही प्रकारे नुकसान झाल्यास तो त्याबाबत उचित प्राधिकरणास कळवील.

(सोळा) त्यांच्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्याची सेवापुस्तके अद्यावत ठेवण्याची आणि त्या सेवापुस्तकात ठराविक कालांतराने नोंदी करण्याची जबाबदारी त्याच्यावर असेल.

(सतरा) शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांची सेवाज्येष्ठता सुची तयार करण्यास व ठेवण्यास व्यवस्थापनाला सहाय्य करील.

(अठरा) कर्मचाऱ्यांचे गोपनीय अहवाल ठेवण्याची व त्यातील प्रतिकूल शेरे कर्मचाऱ्याला कळविण्यांची जबाबदारी त्याची असेल.

(एकोणीस) कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतनासंबंधचे कागदपत्र तयार केले जात आहेत व संबंधीत प्राधिकरणाला सादर केले जात आहेत. याबाबत जातीने लक्ष घालील आणि त्याची जबाबदारी स्वीकारील.

(वीस) नियमानुसार आवश्यक असल्यानुसार शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचारी वर्गाची संख्या पुरेशी आहे की नाही. याबाबतीत वस्तुस्थिती शाळा/प्रशिक्षण केंद्र समितीच्या निदर्शनास आणून देईल आणि काही त्रुटी असल्यास शक्य तेवढया लवकर त्या त्रुटी काढून टाकण्यासाठी प्रयत्न करील.

(एकवीस) राज्य शासन व व्यवस्थापन भाग पाडील किंवा निदेश होईल अशी शिक्षणासंबंधीची इतर कर्तव्ये तो पार पाडील आणि अशा सुचनांचे पालन करील.

**(क) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक यांची वित्तीय बाबी संबंधातील कर्तव्ये -**

(एक) कर्मचाऱ्याची वार्षिक वेतनवाढ वैध कारणासाठी रोखून ठेवण्यात आली नसेल, तर गोपनीय अहवालातील शेरे विचारात घेऊन शाळा समितीच्या मान्यतेने उचित तारखेस काढणे.

(दोन) शाळा/प्रशिक्षण केंद्राची मासीक बीले तयार करणे आणि ती योग्यरित्या पडताळून पाहून स्वाक्षरीत करून संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यास या संबंधात त्याने विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी सादर करणे.

(तीन) आपल्या शाळा/प्रशिक्षण केंद्रातील कर्मचाऱ्यांच्या योग्य पुरक मागण्या तयार करणे आणि त्या योग्यरीत्या पडताळून पाहून व स्वाक्षरीत करून संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांना या संबंधात विनिर्दिष्ट केलेल्या तारखेपूर्वी सादर करणे.

(चार) संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडून बीजक किंवा वेतन देयक किंवा पूरक देयक मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यांच्या वेतनामधून वसुली रकमांची तत्परतेने कपात करणे.

(पाच) शाळा/प्रशिक्षण केंद्राचे रोखपुस्तक ठेवणे ते दररोज अद्ययावत ठेवणे आणि त्यावर अधिप्रमाणन करणे.

(सहा) विभागाच्या तसेच लेखापरिक्षा विभागाच्या लेखापरिक्षा विषयक टिप्पण्यांना तत्परतेने उत्तर देणे.

**(५०) इतर कर्मचारी वर्गाची कर्तव्य शाळा विभाग:-**

**(अ) विशेष शिक्षक -**

(एक) शाळेच्या पंचक्रोशितील गावात संबंधीत प्रवर्गाच्या अपंग मुलांचे इतर कर्मचाऱ्यांच्या मदतीने सर्व्हेक्षण करणे व त्यांना शाळा प्रवेशासाठी प्रोत्साहित करणे.

(दोन) शाळेत मुलांना प्रवेश देतेवळी त्यांची प्राथमिक स्तरावरील सर्वांगिण माहिती घेणे व त्याची प्राथमिक तपासण्या करणे.

(तीन) प्रवेशाच्या वेळी पालकांना मार्गदर्शन करून शिक्षणाचे महत्त्व पटवून देणे.

(चार) शाळेच्या वर्गाच्या अभ्यासक्रमानुसार अभ्यासक्रम वेळेवर पूर्ण करणे. दैनंदिन टाचण वही पूर्ण करणे व ती मुख्याध्यापकाकडून तपासून घेणे. मुलांची शैक्षणिक सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, इतर सहकार्याकडून कामे करून घेणे, सहकर्मचारी हजर नसेल तर स्वत: करणे.

(पाच) शाळेच्या कामाव्यतिरिक्त मुख्याध्यापक/शाळा समिती निर्देश देईल त्याप्रमाणे वसतिगृहातील विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी व व्यक्तीमत्व विकास घडविण्यासाठी आळीपाळीने अभ्यासिकेचे विशेष व कला शिक्षकाने कामकाज पाहणे. मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे. विविध शैषणिक साहित्य व साधने तयार करणे.

(सहा) शाळा समितीने ठरवून दिल्याप्रमाणे आवश्यकतेनुसार विशेषशाळा/ प्रशिक्षन केंद्र सलंग्न वसतिगृहचे कामकाजात मदत करणे, कामकाज पाहणे.

(सात) शाळा समिती/ मुख्याध्यापक यांनी ठरवून दिलेले सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक उपक्रमासंबधित कामे करणे. विविध प्रशिक्षण घेऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढवणे.

**(ब) शारिरीक शिक्षण निदेशक** - विद्यार्थ्यांना स्पर्धेत भाग घेणे, मैदानी / बैठे खेळ घेणे, कवायत घेणे विद्यार्थ्यांच्या शारिरीक व मानसिक क्षमतेची वाढ करणे, वसतिगृहातील विद्यार्थ्याचा व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्यासाठी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त मुख्याध्यापक निर्देश देईल त्यावेळेत मुलांचे व्यायाम, कवायत, खेळ व करमणूकीचे अन्य कार्यक्रम घेईल. मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे.

**(क) कला व हस्तकला शिक्षक** - मुलांना कला व हस्तकला कौशल्याचे शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविणे. तसेच शाळेतील सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, करमणूक कार्यक्रम व अन्य उपक्रमाचे कामकाज करेल. वसतिगृहातील विद्यार्थ्याचा व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्यासाठी शाळेच्या वेळेव्यतिरिक्त मुख्याध्यापक निर्देश देईल त्यावेळेत मुलांना विविध कला व हस्तकला कौशल्याचे शिक्षण देईल. विविध शैषणिक साहित्य व साधने तयार करेल, व्यवसायिक पुनर्वसन होण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यास प्रशिक्षण देईल शाळा समिती / मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे.

**(ड) संगीत शिक्षक** - मुलांना संगीत, गायन व वादन कौशल्याचे शिक्षण देऊन त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी संगीत विषय परिक्षांना बसविण्याची तयारी करून घेणे. तसेच शाळेतील सहल, सांस्कृतिक कार्यक्रम, करमणूक कार्यक्रम व अन्य उपक्रमाचे कामकाज करेल. वसतिगृहातील विद्यार्थ्याचा व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्यासाठी शाळेच्या वेळे व्यतिरिक्त मुख्याध्यापक निर्देश देईल त्यावेळेत मुलांना विविध संगीत, गायन व वादन कौशल्याचे शिक्षण देईल. मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे.

**(५१) निम वैद्यकिय कर्मचारी** -

**(ए) चलन वलन निदेशक** -

(एक) अंध शाळेतील विद्यार्थ्यांना गतिशीलतेचे शिक्षण देणे. सफेद काठीचा योग्य वापर करणेविषयी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे.

(दोन) दैनंदिन व्यवहार पार पाडण्यासाठी आवश्यक ते प्रशिक्षण देणे.

(तीन) विद्यार्थ्याच्या वैयक्तिक दैनंदिन गरजा उदा. कपडे घालणे, आंघोळ करणे, जेवण करणे इ. स्वावलंबनाचे शिक्षण देणे.

(चार) अंध विद्यार्थ्याचा व्यक्तीमत्व विकास घडवून आणण्याच्या दृष्टीने मनो-सामाजिक शिक्षण देणे.

(पाच) अंध विद्यार्थ्याचे गॅनेरीझम घालविण्यासाठी त्यांना योग्य ते प्रशिक्षण देणे.

(सहा) मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे.

**(बी) वाचा उपचार तज्ञ** -

(एक) कर्णबधिर शाळेत विद्यार्थ्यांना प्रवेश देतेवळी श्रवणचाचणी घेणे.

(दोन) श्रवण ऱ्हासानुसार उपयुक्त असे वैयक्तिक श्रवणयंत्र उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे.

(तीन) श्रवणयंत्राचा वापर करण्याविषयीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देणे.

(चार) श्रवणयंत्राची निगा राखणे व ते नियमित वापरात येईल याची काळजी घेणे.

(पाच) विशेष शिक्षकांशी समन्वय ठेऊन मुलांच्या भाषा व वाचा विकासासाठी प्रयत्न करणे.
(सहा) मुलांचे नियमित वाचा दुरूस्ती सुधार (Speech Therapy) कार्यक्रम घेणे व प्रगतीची नोंद ठेवणे.
(सात) नियतकालिक (दर सहा महिन्यांनी) श्रवण चाचणी घेऊन श्रवण अभिलेख काढणे.
(आठ) पालक मेळाव्यामध्ये श्रवणयंत्राचा वापर, निगा व कानाची निगा याविषयी मागदर्शन करणे.
(नऊ) मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमाविषयीचे कामकाज करणे.

**(सी) भौतिक उपचार तज्ञ/व्यवसाय उपचार तज्ञ –**

(एक) शाळेच्या विद्यार्थ्यांची शारिरीक तपासणी करून वैद्यकीय सल्ल्याप्रमाणे आवश्यक शरिरोपचार नियमितपणे करणे.
(दोन) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार अपंगत्व कमी करण्यासाठी आवश्यक ती सहाय्यभून साधने व कृत्रिम अवयव उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करणे.
(तीन) सहाय्यभूत साधने व कृत्रिम अवयव वापर करण्याविषयीचे प्रशिक्षण विद्यार्थ्यांना देणे.
(चार) सहाय्यभूत साधने व कृत्रिम अवयव यांची निगा राखणे व ते नियमित वापरात येईल.
(पाच) विशेष शिक्षकांशी समन्वय ठेऊन चलन वलन विकासासाठी प्रयत्न करणे.
(सहा) नियमित वापर पध्दती (थेरपी) घेणे व प्रगतीची नोंद ठेवणे.
(सात) वैद्यकिय तज्ञाशी संपर्क व समन्वय साधून अपंगत्व सुधार शस्त्रक्रिया करून घेणे.
(आठ) पालक मेळाव्यामध्ये कृत्रिम अवयव व साधने यांची निगा याविषयी मार्गदर्शन करणे.
(नऊ) मुलांच्या शारिरीक पुनर्वसनाच्या दृष्टीने विशेष प्रयत्न करणे.
(दहा) मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमा विषयीचे कामकाज करणे.

**(डी)** मानस शास्त्रज्ञ :–

(एक) **वर्तन सुधार कार्यक्रम नियमितपणे राबविणे.**
(दोन) बुद्धिमापन चाचणी करून बुद्धीगुणाक काढणे.
(तीन) विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार प्रोत्साहनाहात्मक कामे करणे.
(चार) विध्यार्थ्या मधील साम्स्यात्मक वर्तन कमी करून अनुकूल वर्तन वाढवण्याबाबत विविध कार्यक्रम आयोजित करणे.
(पाच) पालकांना आणि शिक्षकांना विध्यार्थ्याच्या वर्तन संदर्भात मार्गदर्शन करणे.
(सहा) शाळा समिती/मुख्यध्यापक यांनी ठरवून दिलेले निमवैद्यकीय कामकाज पार पाडणे.

**(ई) वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता/समुपदेशक:–**

(एक) प्रवेश देतेवळी विशेष शिक्षकांशी समन्वय साधून विद्यार्थ्यांची व्यक्तीगत कार्य (Case Studies) करून व्यक्तीगत अहवाल (Case file) तयार करणे.
(दोन) विद्यार्थ्यांच्या पालकांना समुपदेशन करून शिक्षण व पुनर्वसनाचे महत्व पटवून देणे.
(तीन) शाळेच्या उपक्रमाविषयीची माहिती विद्यार्थ्यांचे पालक, सेवाभावी व्यक्ती, संस्था व समाज यांना करून देणे.
(चार) विद्यार्थ्यांच्या वर्तणूकी विषयीच्या अनिष्ठ सवयी दूर करण्याच्या दृष्टीने विद्यार्थ्यांना व त्यांच्या पालकांना समुपदेशन करणे.

(पाच) शासनाच्या विविध विभागाच्या योजनांचा लाभ विद्यार्थ्यांना मिळवून देणे. उदा. रेल्वे-पास, बस-पास, अपंग ओळखपत्र, वैद्यकीय प्रमाणपत्र, शिष्यवृत्ती, कायदेशीर पालकत्व, निरामय आरोग्य विमा इत्यादी.

(सहा) शाळेच्या पंचक्रोशितील विद्यार्थ्यांचे विशेष शिक्षकाच्या सहाय्याने सर्वेक्षण करणे.

(सात) विद्यार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी औद्योगिक वसाहती तसेच अन्य नियुक्तकांशी संपर्क साधणे.

(आठ) विद्यार्थ्यांना कृत्रिम अवयव साधने, श्रवणयंत्रे इत्यादी साधने शासनाच्या तसेच इतर विविध स्वयंसेवी संस्थांच्या मदतीने मिळवून देणे.

(नऊ) अनियमित शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या घरी भेटी देऊन व त्यांच्या पालकांशी संपर्क साधून व त्यांच्या अडीअडचणी विचारात घेऊन त्यांना योग्य ते समुपदेशन करून मुले नियमित शाळेत येतील असे प्रयत्न करणे.

(दहा) शाळा समिती / मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य शैक्षणिक उपक्रमा विषयीचे कामकाज करणे.

**(५२) (ए) लेखापाल (शाळा/प्रशिक्षण विभाग)** -

(एक) शाळेचे वित्तीय अभिलेखे अद्ययावत ठेवणे.

(दोन) शाळेचे रोखपाल म्हणून काम पाहणे.

(तीन) शाळेचे वेतन देयके तयार करणे व ते समाज कल्याण कार्यालयाकडे वेळेत पाठविणे.

(चार) वेतन देयके मंजूर झाल्याप्रमाणे कर्मचाऱ्यांच्या कपातीच्या रक्कमा संबंधीत खाती जमा करणे व त्यांचा हिशोब आणि योग्य तो अभिलेख ठेवणे.

(पाच) कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीचे अभिलेख ठेऊन त्यांना जमा रक्कमेची वार्षिक चिठठी (Slip) देणे.

(सहा) शाळेचे वार्षिक अंदाजपत्रक तयार करणे.

(सात) शाळेची सनदी लेखापालाकडुन वार्षिक लेखा परिक्षण करून घेणे व त्याच्या प्रती वेळेत आवश्यक त्या विभागाकडे सादर करणे.

(आठ) शाळेच्या वेतनेतर खर्चाचा हिशोब व योग्य तो अभिलेख ठेवणे.

(नऊ) मुल्यनिर्धारणासाठी आवश्यक त्या कागदपत्रांसह प्रस्ताव तयार करणे व प्रस्ताव प्रत्यक्ष मुल्यनिर्धारणाच्या वेळी लेखाविषयक सर्व बाबी मुल्यनिर्धारणाच्या वेळी देणे.

(दहा) ज्या शाळेमध्ये लिपीक-नि-लेखापालाचे पद नाही अथवा रिक्त आहे. अशा वेळी या पदाचे देखील सर्व कामकाज पाहणे.

(अकरा) शाळा समिती / मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य कार्यालयीन कामकाज करणे.

**(बी) लिपीक-नि-लेखापाल (शाळा/प्रशिक्षण विभाग) -**

(एक) शाळेतील शैक्षणिक, प्रशासकीय सर्व अभिलेख अद्ययावत ठेवणे.

(दोन) कर्मचाऱ्यांची सेवापुस्तके, वैयक्तिक नस्ती, रजा अभिलेख, गोपनीय अहवाल इत्यादी सर्व लेखे अद्ययावत ठेवणे.

(तीन) विद्यार्थ्यांविषयी अभिलेख व नोंदी अद्ययावत ठेवणे. उदा. शाळा प्रवेश रजिस्टर, शाळा सोडल्याचे दाखले, हजेरीपत्रक, शैक्षणिक साधनांच्या व जडवस्तु संग्रहाच्या नोंदवहया व इतर अनुषंगिक अभिलेखे ठेवणे.

(चार) आवक-जावक रजिस्टर, टंकलेखन, पत्रव्यवहार इत्यादी.

(पाच) ज्या शाळांना लेखापालाचे पद मंजूर नाही अथवा काही कारणामुळे रिक्त आहे अशा वेळी लेखापाल पदाची सर्व कामे करणे.

(सहा) शाळा समिती / मुख्याध्यापकाच्या निर्देशानुसार अन्य कार्यालयीन कामकाज करणे.

**(सी) काळजी वाहक** - शाळा व वसतिगृहातील मुलांची काळजी घेणे, संरक्षण करणे, स्वच्छता राखणे, अंघोळ घालणे, गणवेश घालणे, शाळेत योग्य ठिकाणी बसविण्यात मदत करणे, मुलांच्या गरजा व मदत लक्षात घेणे, त्यांना प्रसाधनगृह, स्वच्छता गृहासाठी ने-आण करण्यासाठी मदत करणे. शाळा व वसतिगृह व परिसर स्वच्छ ठेवणे. पाळी संपल्यानंतर दुसऱ्या पाळीतील कर्मचारी कामावर आल्यानंतर त्या कर्मचाऱ्याकडे सर्व मुलांचा कार्यभार देऊन व तशी डयूटीरजिस्टरमध्ये हजर मुलांच्या संख्येची नोंद घेऊन त्यांच्याकडे कार्यभार सोपवूनच वसतिगृह सोडावे. शाळा समिती/वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापकाने वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

**(डी) सफाईगार** - शाळा व वसतिगृह, स्नानगृह, प्रसाधनगृह, परीसराची रोजच्या रोज स्वच्छता ठेवणे. विद्यार्थ्यांनी केलेल्या अस्वच्छतेची साफ-सफाई करणे. शाळा समिती / मुख्याध्यापक/वसतिगृह अधिक्षक/ यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

**(ई) शिपाई** - मुख्याध्यापक कार्यालय, शाळा कार्यालयाची व शाळाची स्वच्छता करणे. पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे, विद्युत व पाणी पुरवठा व्यवस्थेची देखभाल करणे, कार्यालयीन कामात मुख्याध्यापक व लिपीक वर्गीय कर्मचाऱ्यांना कार्यालयीन कामात मदत करणे, टपाल ने-आण करणे. शाळा समिती / मुख्याध्यापक यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

## (५३) वसतिगृह विभाग:-

### (ए) वसतिगृह अधिक्षक -

(एक) शाळेतील निवासी विद्यार्थ्यांची भोजन, निवास, आरोग्य सुरक्षा विषयीची जबाबदारी वसतिगृह अधिक्षकची राहील.

(दोन) वसतिगृहाचे अभिलेखे अद्ययावत ठेवणे. उदा. वसतिगृह प्रवेश नोंदवही, विद्यार्थी हजेरीपत्रक, धान्यसाठा रजिस्टर, चवरजिस्टर, प्रथमोपचार व्यवस्था व रजिस्टर, आंथरूण-पांघरूण, ताटवाटया, गणवेश, मुलींकरिता मासिक पाळी रजिस्टर, वैद्यकीय तपासणीचे रजिस्टर, विद्यार्थ्यांचे हालचाल रजिस्टर इत्यादी.

(तीन) वसतिगृहातील मुलांना घरी सोडण्याच्या अर्जावर निर्णय घेणे व त्याच्या नोंदी ठेवणे.

(चार) वसतिगृहातील मुलांची दैनंदिन दिनचर्या ठरविणे व त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांकडून कामकाज करून घेणे.

(पाच) आजारी विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेणे व वेळेत योग्य ते औषधोपचार उपलब्ध करून देणे.

(सहा) वसतिगृहातील विद्यार्थ्यांना शिस्तविषयक नियमावली तयार करून देणे व त्यांचे अनुपालन करणे.

(सात) वसतिगृहातील मुलांचा निवास कक्ष, भोजनगृह, स्वयंपाकगृह, अन्नधान्यसाठागृह, स्वच्छतागृहे, स्नानगृहे यामध्ये कर्मचाऱ्यांडून साफसफाई करून घेऊन आरोग्यास पोषक असे वातावरण ठेवणे.

(आठ) वसतिगृहातील विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, गणवेश, आंथरूण-पांघरूण इत्यादींची स्वच्छता उपलब्ध कर्मचाऱ्यांकडून करून घेणे.

(नऊ) विद्यार्थ्यांना शासनाने ठरविलेल्या मानकाप्रमाणे सकस चौरस आहार वेळेत देण्याची व्यवस्था करणे.

(दहा) शाळेच्या वेळेत शाळेकरीता विद्यार्थ्यांना तयार करणे.

(अकरा) शाळे व्यतिरिक्त वेळी व सुट्टीच्या दिवशी मुलांना विविध अभ्यास, कला, हस्तव्यवसाय, शैक्षणिक खेळ, मनोरंजन इत्यादी कार्यक्रमात व्यस्त ठेवणे.

(बारा) मुलांना भोजन देण्यापूर्वी अन्नाची स्वत: चव घेऊन ते मुलांना देण्यास योग्य आहे याची खात्री करून व त्याची चव रजिस्टरमध्ये नोंद करून घेऊन मुलांना भोजन देणे.

(तेरा) वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांचे पालक या नात्याने सर्व ती सुश्रृषा विषयी काळजी व जबाबदारी ही वसतिगृह अधिक्षकची असेल. याकरीता वसतिगृह अधिक्षकचे निवासस्थान वसतिगृह परिसरातच असावे. रात्रीच्या वेळी विद्यार्थ्यांस आकस्मिक अडचणी निर्माण झाल्यास वसतिगृह अधिक्षकची सेवा उपलब्ध व्हावी म्हणून वसतिगृह अधिक्षकाने वसतिगृह परिसरातील निवासस्थानीच मुक्कामी असावे.

(चौदा) वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या दैनंदिन कामाच्या वेळा शाळा प्रमुखाच्या मान्यतेने ठरवून देणे व त्याप्रमाणे अंमलबजावणी करणे तसेच ठरवून दिलेल्या वेळेत कर्मचारी गैरहजर राहीलेल्या

कर्मचाऱ्यांच्या वेळेत पर्यायी कर्मचाऱ्यांची व्यवस्था करून देण्याची जबाबदारी त्याच्यावर राहील.

(पंधरा) वसतिगृहातील प्रवेशितांचे लैंगिक शोषण होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**(बी) स्वयंपाकी:-**

(एक) वसतिगृहाच्या दिनचर्येच्या वेळापत्रकाप्रमाणे वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांना मानकाप्रमाणे दूध, नाश्ता, व चौरस भोजन तयार करून वेळेवर देणे.

(दोन) दूध, नाश्ता व भोजन तयार करण्यासाठी आवश्यक ती पूर्व तयारी करणे.

(तीन) भोजन व भोजन तयार करावयाच्या व वाढण्याच्या भांडयाची नियमित स्वच्छता करणे.

(चार) सहाय्यक स्वयंपाकीच्या व उपलब्ध मदतनीस, काळजीवाहक व मोलकरीण व इतर कर्मचाऱ्यांच्या सहाय्याने मुलांना भोजन वाढणे व त्यांच्या जेवणाच्या ताट-वाटी, ग्लास इत्यादी भांडयाची स्वच्छता करणे. तसेच स्वयंपाक गृह व भोजन कक्ष स्वच्छ ठेवणे.

(पाच) भोजनाच्या वेळी मुलांना स्वच्छ पाणी देण्याची व्यवस्था करणे.

(सहा) धान्यसाठा व भाजीपाला स्वच्छ व ताजा राहील याची काळजी घेणे.

(सात) भोजन तयार करण्यापूर्वी धान्य, कडधान्य, डाळी, भाज्या इत्यादी निवडून स्वच्छ करून घेणे.

(आठ) भोजन तयार करण्यासाठी लागणाऱ्या गॅस, शेगडयांची योग्य ती निगा राखणे.

(नऊ) आजारी विद्यार्थ्यांना डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे विशेष आहार तयार करून देणे.

(दहा) वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापक यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

**(सी) मदतनीस:-**

(एक) वसतिगृहाच्या दिनचर्येच्या वेळापत्रकाप्रमाणे वसतिगृहातील निवासी विद्यार्थ्यांना मानकाप्रमाणे दूध, नाश्ता, व चौरस भोजन तयार करण्याकरीता स्वयंपाकीसोबत काम करणे.

(दोन) दूध, नाश्ता व भोजन तयार करण्यासाठी आवश्यक ती पूर्व तयारी करणे.

(तीन) भोजन व भोजन तयार करावयाच्या व वाढण्याच्या भांडयाची नियमित स्वच्छता करणे.

(चार) मुलांना भोजन वाढणे व त्यांच्या जेवणाच्या ताट-वाटी, ग्लास इत्यादी भांडयाची स्वच्छता करणे तसेच स्वयंपाक गृह व भोजन कक्ष स्वच्छ ठेवणे.

(पाच) भोजनाच्या वेळी मुलांना स्वच्छ पाणी देण्याची व्यवस्था करणे.

(सहा) धान्यसाठा, भाजीपाला स्वच्छ व ताजा राहील याची काळजी घेणे.

(सात) भोजन तयार करण्यापूर्वी धान्य, कडधान्य, भाज्या इत्यादी निवडून स्वच्छ करून घेणे.

(आठ) भोजन तयार करण्यासाठी लागणाऱ्या गॅस, शेगडयांची योग्य ती निगा राखणे.

(नऊ) वसतिगृहातील विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता करणे, त्यांना आंघोळ घालणे, विद्यार्थ्यांचे कपडे, आंथरूण-पांघरूण धुणे, मुलींची वेणी करणे/केस विंचरणे.

(दहा) स्वयंपाकीच्या अनुपस्थितीत स्वयंपाकी या पदाची सर्व कामे करणे व जबाबदारी पार पाडणे.

(अकरा) वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापक यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

**(डी) परिचारीका:-**

(एक) निवासी मतिमंद विद्यार्थ्यांची शारिरीक व आरोग्याची काळजी घेणे.

(दोन) मतिमंद विद्यार्थ्यांना आवश्यकतेनुसार प्रथमोपचाराची औषधे देणे.

(तीन) डॉक्टरांच्या सल्ल्याप्रमाणे विद्यार्थ्यांना औषधे देणे.

(चार) विद्यार्थ्यांची योग्य ती सुश्रृषा करणे.

(पाच) विद्यार्थ्यांचे औषधोपचाराचे व वैद्यकीय तपासणीचे रजिस्टर ठेवणे.

(सहा) विद्यार्थी निरोगी राहावीत म्हणून विद्यार्थ्यांची वैयक्तिक स्वच्छता, निवासस्थानाची स्वच्छता व आंथरूण-पांघरूणाची स्वच्छता उपलब्ध कर्मचाऱ्याकडून करून घेण्याची जबाबदारी परिचारीकेची राहील.

सात) आजारी विद्यार्थ्यांची विशेष काळजी घेऊन योग्य तो औषधोपचार वेळेत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी राहील.

(आठ) केलेल्या कामाची माहिती वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापकांना देणे.

(नऊ) वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापक यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

**(ई) पहारेकरी/राखणदार :-**

(एक) विद्यार्थी, शाळा/वसतिगृह इमारत व परीसराची देखभाल करणे.

(दोन) निवासी विद्यार्थ्यांची संरक्षण विषयक सर्व जबाबदारी घेणे.

(तीन) शाळा, वसतिगृह, वसतिगृहातील मालमत्तेचे चोरी व नुकसान यापासून रक्षण करणे.

(चार) रात्रीच्या वेळी गेट रजिस्टर नोंद वही ठेवणे. वसतिगृहात येणाऱ्या व जाणाऱ्यांची नोंदी ठेवणे.

(पाच) अपरीचीत व्यक्तींना, वसतिगृह व शाळेमध्ये प्रवेश करण्यापासून प्रतिबंध करणे.

(सहा) रात्रीच्या वेळी वसतिगृह व शाळा परिसरात गस्त घालणे व संरक्षण विषयक इशारा देणे.

(सात) रात्रीच्या वेळी मुलांची वैयक्तिक काळजी घेणे.

(आठ) वसतिगृह अधिक्षक/मुख्याध्यापक यांनी वेळोवळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

(५४) **प्रशिक्षण केंद्र:-**

**(ए) निदेशक:-**

(एक) ठरवून दिलेल्या ट्रेडनुसार विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देणे.

(दोन) प्रशिक्षण विषयक टाचण/नोंदी ठेवणे.

(तीन) प्रशिक्षणार्थ्यांची घटक चाचणी, सहामाही परिक्षा व प्रात्यक्षिक परिक्षा घेणे.

(चार) अकुशल व्यवसायाची वार्षिक परिक्षा घेणे व त्याचे निकालपत्र तयार करणे.

(पाच) कुशल व्यवसायासाठी व्यवसाय शिक्षण विभागामार्फत समकक्ष परिक्षामंडळामार्फत घेण्यात येणाऱ्या परिक्षेला विद्यार्थी बसविणे व त्याची पूर्व तयारी करून घेणे.

(सहा) प्रशिक्षणर्थींना रोजगार व स्वयंरोजगाराच्या दृष्टीने प्रशिक्षण व मार्गदर्शन करणे. तसेच प्रशिक्षणार्थींच्या रोजगार, स्वयंरोजगार व पुनर्वसनासाठी विशेष प्रयत्न करणे.

(सात) प्रशिक्षण देत असतांना प्रशिक्षण यंत्रसामग्रीमुळे अथवा साधनांमुळे मुलांना इजा होणार नाही याची काळजी घेणे.

(आठ) प्रशिक्षण केंद्रामध्ये तयार केलेल्या उत्पादनाच्या विक्री व्यवस्थेत सक्रीय सहभाग घेणे.

(नऊ) प्रशिक्षणार्थ्यांच्या पालकांना त्यांच्या प्रगतीचा अहवाल देणे.

(दहा) व्यवस्थापकाच्या सुचनेप्रमाणे कामकाज करणे.

**(बी) प्रशिक्षण केंद्र मदतनीस –**

प्रशिक्षण केंद्र व वसतिगृहातील प्रशिक्षणार्थ्यांची काळजी घेणे, संरक्षण करणे, स्वच्छता राखणे, प्रशिक्षण केंद्रात योग्य ठिकाणी बसविण्यास मदत करणे, प्रशिक्षणार्थ्यांच्या गरजा व मदत लक्षात घेणे. त्यांना प्रसाधनगृह, स्वच्छतागृहासाठी ने-आण करण्यासाठी मदत करणे. प्रशिक्षण केंद्र व वसतिगृह परिसर स्वच्छ ठेवणे. पाळी संपल्यानंतर दुसऱ्या पाळीतील कर्मचारी कामावर आल्यानंतर त्या कर्मचाऱ्याकडे सर्व मुलांचा कार्यभार देऊन व तशी डयूटी रजिस्टरमध्ये हजर प्रशिक्षणार्थ्यांच्या संख्येची नोंद घेऊन त्यांच्याकडे कार्यभार सोपवूनच वसतिगृह सोडावे. प्रशिक्षण केंद्रातील प्रशिक्षण विषयक यंत्र सामग्रीची देखभाल करणे, तसेच उत्पादित मालाची निगा ठेवणे, प्रशिक्षण यंत्रसामग्री व साधनांपासून प्रशिक्षणार्थ्यांना इजा होऊ नये याकरीता प्रशिक्षणार्थ्यांची काळजी घेणे. प्रशिक्षण केंद्रातील उत्पादित विक्रीच्या व्यवस्थेमध्ये सक्रीय सहभाग घेणे. गृहपाल/व्यवस्थापकीय अधिक्षक यांनी वेळोवेळी सांगितलेली कामे विनातक्रार करणे.

टिप:-

(एक) प्रशिक्षण केंद्रातील इतर पदाची कर्तव्ये ही शाळा व संलग्नीत वसतिगृहातील कर्मचाऱ्याप्रमाणेच राहतील.

(दोन) निम्नस्तरीय कर्मचारी काळजीवाहक, स्वयंपाकी, सहाय्यक स्वयंपाकी, मदतनीस, मोलकरीण, वर्ग सहाय्यक इत्यादी पदासाठीची कर्तव्ये नेमून दिलेली आहेत. त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या उपलब्धतता व उपस्थिती विचारात घेऊन ते दुसऱ्या पदनामाच्या कर्मचाऱ्यांकडून कामे करुन घेण्याची जबाबदारी ही गृहपाल/व्यवस्थापकीय अधिक्षक यांची राहील. व त्यांनी नेमून दिलेली कामे या कर्मचा-यांना नाकाराता येणार नाहीत.

(५५) (एक) वरील नमूद केलेल्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांच्या कर्तव्यात त्यांनी कोणत्याही प्रकारची आपली कर्तव्ये पार पाडण्यामध्ये कसूर केल्यास त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

(दोन) विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृहातील प्रवेशित अपंग विद्यार्थी असल्याने कर्मचाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडीत असताना त्यांच्याबरोबर सहानुभूतीचे आणि मातृत्वाचे संबंध ठेवले पाहिजेत. त्यांना मारहाण केल्यास तसेच कोणत्याही प्रकारचे शोषण केल्यास अशा कर्मचाऱ्याविरुध्द फौजदारीस्वरुपाची तसेच शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल.

**सेवेच्या शर्ती, सेवापुस्तके, गोपनिय अहवाल,** मोठया सुट्टीचे वेतन, **कर्तव्ये आणि वर्तणूक संहिता, रजा नियम, कार्यमुक्ती प्रमाणपत्र, शास्ती, निर्वाह भत्ता, निलंबन, चौकशी समिती, सेवा समाप्त करणे, अपिल,** व्दितीय अपिल/पुर्नरीक्षण अधिकारी

**सेवा शर्तीचे नियम लागू करणेः-**

(५६) अपंगांच्या अनुदानित व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त विशेष शाळा, प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक /निदेशक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना या संहितेनुसार केलेल्या सेवाशर्ती लागू राहतील.

(एक) प्रत्येक कर्मचारी नियुक्ती झाल्यापासून तीन महिन्यांच्या आत व्यवस्थापनाने कळविल्याप्रमाणे जिल्हा रुग्णालयातील/वैद्यकीय महाविद्यालय संलग्न रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करून घेईल. अशी नियुक्ती उमेदवार कोणत्याही संसर्गजन्य रोगापासून मुक्त आहे. आणि शाळेतील/प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक/शिक्षकेत्तर/निदेशक/निदेशकेत्तर कर्मचारी म्हणून नियुक्ती केली जाण्यास तो शारिरीकदृष्टया पात्र आहे. हे प्रमाणपत्र मिळण्याच्या शर्तीच्या अधिन असेल. प्रत्येक कर्मचाऱ्याला त्यांच्या नियुक्ती आदेश सोबत देण्यात आलेल्या सेवेच्या अटी व शर्ती नमुद करणाऱ्या विवरण पत्रामध्ये ही अट विनिर्देशपूर्वक समाविष्ट करण्यात येईल तसेच कर्मचारी सेवेत असताना त्याला गम्भीर आजार झाल्याची व्यवस्थापनास खात्री झाल्यास सदर कर्मचाऱ्याची जिल्हा रुग्णालयातील/वैद्यकीय महाविद्यालय संलग्न रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तपासणी करता येईल व तो शारिरीकदृष्टया पात्र आहे हे प्रमाणपत्र मिळाल्यास शिवाय सेवा देवू शकेल. शारिरीकदृष्टया अपात्र झाल्यास जिल्हा समाज कल्याण, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर हे संबंधीत कर्मचाऱ्यांचे स्वेछा सेवानिवृत्तीचे प्रकरण दाखल करून घेईल.

(दोन) शाळा/प्रशिक्षण केंद्र आपल्या सर्व कर्मचाऱ्यांच्या पत्त्याची नोंदवही ठेवील. पत्त्यांमध्ये कोणत्याही प्रकारचा बदल झाल्यास संबंधीत कर्मचारी शाळा/प्रशिक्षण केंद्रास त्याबाबत तात्काळ कळवील.

(तीन) सेवापुस्तक: शाळा/प्रशिक्षण केंद्रातील प्रत्येक कर्मचाऱ्यांच्या नियुक्तीच्या दिनांकापासून तीन महिन्याच्या आत प्रत्येक कर्मचाऱ्यांकरीता विहीत नमुन्यात सेवापुस्तक व रजेचा लेखा दोन प्रतीत उघडण्यात येईल. आणि त्यामध्ये कर्मचाऱ्यांच्या सेवेचा व रजेचा हिशोब ठेवण्यात येईल. दुसरी प्रत संबंधीत कर्मचाऱ्याला देण्यात येईल व वेळोवळी ती अद्यावत ठेवण्यात येईल.

(चार) सेवापुस्तकातील नोंदी विशेषत: जन्मतारीख, वैद्यकीय तपासणी, शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता इत्यादी नोंदीच्या बाबतीत शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुख मूळ अभिलेख्यावरून म्हणजेच जन्मनोंदणी प्रमाणपत्र शाळा सोडल्याचा दाखला, माध्यमिक शाळा प्रमाणपत्र वैद्यकीय तपासणी प्रमाणपत्र पदवी/पदवीक प्रमाणपत्रे इत्यादी वरून व्यक्तीश: पडताळणी करील. पडताळणी केल्यानंतर शाळा प्रमुख संबंधीत रकान्यात ही नोंद मूळ प्रमाणपत्रानुसार केली आहे असा शेरा लिहील व तारीख घालून स्वाक्षरी करील.

(५७) शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखाच्या बाबतीत अशी पडताळणी व्यवस्थापनाचा सचिव करील व तसे केल्याचे नमूद करून सही करील.

(एक) कर्मचारी हे कायम किंवा तात्पुरते असतील कायम नसलेले कर्मचारी एकतर तात्पुरते किंवा परिविक्षाधीन असतील.

(दोन) तात्पुरता कर्मचारी म्हणजे तात्पुरत्या रिक्त पदावर निश्चित कालावधीसाठी नियुक्ती केलेला कर्मचारी होय. तात्पुरत्या कर्मचाऱ्यांना संहितेतील कोणत्याही सेवाशर्ती व नियम लागू राहणार नाहीत.

(तीन) कायम रिक्त पदाच्या बाबतीत, शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची सर्वसाधारणपणे दोन वर्षाहून अधिक किंवा इतक्या कालावधीसाठी परिविक्षाधीन नियुक्ती करावी. परिविक्षाधीन कालावधीतील काम समाधानकारक आढळून आलेल्या व नियुक्ती आदेशातील शर्ती पुर्ण केलेल्या शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवा पुढे नियमित चालू ठेवण्यात येतील. किंवा कामकाज असमाधानकारक आढळून आल्यास एका कँलेन्डर महिन्याची नोटीस देवून परिविक्षाधिन कालावधी संपण्यापूर्वी कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करता येईल.

(चार) वेतनमान: शिक्षक/शिक्षकेत्तर/निदेशक/निदेशकेतर कर्मचाऱ्यांचे वेतनमान शासनाने वेळोवेळी विहीत केल्याप्रमाणे असेल.

**(५८) गोपनीय अहवाल लिहीणे:-**

(एक) गोपनीय अहवाल विहीत केलेल्या संबंधीत नमुन्यात दरवर्षी लिहीण्यात येतील. कर्मचारी आणि शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुख यांच्या संबंधातील प्रतिनिवेदन अधिकारी अनुक्रमे शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुख व मानद सचिव असतील. हे गोपनीय अहवाल ज्या कर्मचाऱ्यांनी जून पासून सुरू होणाऱ्या शैक्षणिक वर्षामध्ये सहा महिने किंवा त्याहून अधिक काळ शाळेत काम केले असेल त्या कर्मचाऱ्यांच्या किंवा शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखांच्या संबंधात लिहीले जातील. जर शिक्षकांचा प्रमुख हा व्यवस्थापनाचा सचिव असेल तर त्याचा गोपनीय अहवाल व्यवस्थापनाचा अध्यक्ष लिहील.

(दोन) कर्मचाऱ्यांच्या आणि शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखांच्या संबंधात अशा तऱ्हेने लिहीलेल्या गोपनीय अहवालांचे पुनर्विलोकन अनुक्रमे व्यवस्थापनाचा मानद सचिव व अध्यक्ष हे करतील.

(तीन) संबंधित प्रवेदन अधिकारी संबंधीत कर्मचाऱ्यांच्या किंवा यथास्थिती शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखांच्या बाबतीत प्रतिकुल शेरे असल्यास त्याला ते दरवर्षी ऑगस्ट महिना संपण्यापूर्वी लेखी कळविण्याची व्यवस्था करतील.

(चार) वरील पोस्ट कलम (तीन) अन्वये कर्मचाऱ्याला कळविण्यात आलेल्या प्रतिकुल शेऱ्याविरुध्द त्याने कोणतेही अभिवेदन केले असेल तर त्यावर शाळा/प्रशिक्षण केंद्र समिती निर्णय घेईल.

(पाच) गोपनीय अभिलेखे लिहीण्यात व ते अद्यावत ठेवण्यात तसेच पोटनियम (तीन) मध्ये विहित केलेल्या कालावधीत संबंधित कर्मचाऱ्याला प्रतिकुल शेरे कळविण्यात कसूर झाली तर संबंधित कर्मचाऱ्याचे अहवालधीन कालावधीतील काम समाधानकारक होते. असा त्याचा अर्थ होईल.

(सहा) शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुख परिविक्षाधीन म्हणून नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांच्या कामाचे परिविक्षाधीन कालावधीतील वस्तुनिष्ठपणे मुल्यमापन करील आणि अशा मुल्यमापनाचा अभिलेख ठेवील.

(५९) मोठया सुट्टीचे वेतन:-

(एक) शासन मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक शाळा किंवा माध्यमिक शाळा हयातील कर्मचाऱ्यांना सुट्टीचे जे नियम लागू केलेले आहेत. तेच सदरहू अपंगांच्या विशेष शाळेतील शिक्षक/ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना लागू राहतील. ज्या अकुशल व्यवसाय कार्यशाळेतील कर्मचाऱ्यांना सुटटी नाकारण्याचा हक्क व्यवस्थापनास राहील. अशा सुटटी नाकारलेल्या कर्मचा-यास अर्जित रजेचा लाभ देण्यात येईल.

(दोन) तद्वतच कर्मशाळेतील निदेशक व निदेशकेतर कर्मचाऱ्यांना औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे सुट्टयांचे नियम हयाबाबतचे नियम लागू राहतील.

**(६०) कर्तव्ये आणि वर्तणूक संहिता:-**

(एक) शाळा प्रमुख सहाय्यक प्रमुख (मुख्याध्यापक व उप मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी इत्यादीची कर्तव्यावरील नियम (४९) ते (५६) मध्ये नमुद करण्यात आली आहेत.

(दोन) सर्व शिक्षक/शिक्षकेतर/निदेशक/निदेशकेतर कर्मचारी पुढील संहितेचे पालन करतील.

(i) शाळा/प्रशिक्षण केंद्राचा कर्मचारी राजकीय कारणावरुन किंवा वैयक्तिक स्वरुपाच्या इतर कोणत्याही कारणावरुन भेदभाव न करता सर्व विदयार्थ्यांना समान वागणूक देईल. तसेच विदयार्थ्यांना अन्य विदयार्थ्यांविरुध्द किंवा अन्य कर्मचाऱ्याविरुध्द किंवा शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रशासन विरुध्द चिथावणी देण्यापासून दूर राहील.

(ii) शिक्षक/निदेशक शैक्षणिक विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य घेत असतांना शाळेच्या/कर्मशाळेच्या सुविधांचा गैरवापर करणार नाही.

(iii) कोणताही कर्मचारी संस्थेच्या किंवा व्यवस्थापनाच्या साधन संपत्तीचा व सुविधांचा वापर आपल्या वैयक्तिक गरजेसाठी किंवा वाणिज्यिक, राजकीय किंवा धार्मिक प्रयोजनासाठी करणार नाही. तसेच संस्थांच्या व्यवस्थापनाची बदनामी होणार नाही. संस्थेच्या उद्दीष्ठाविरुध्द कृती करणार नाही, याची दक्षता घेईल.

(iv) शिक्षक विदयार्थ्यांचे मुल्यमापन करताना नि:क्षपाची राहील आणि विदयार्थ्यांना बुध्दीपरस्पर अधिक गुण आणि कमी गुण देणार नाही. किंवा कोणत्याही कारणासाठी विदयार्थ्यांचे नुकसान करणार नाही.

(v) शिक्षक/निदेशक खाजगी अध्यापन वर्ग चालविणार नाहीत किंवा अशा वर्गात शिकविणार नाहीत किंवा व्यापारी तत्वावर खाजगी शिकविण्या करणार नाहीत.

(vi) शिक्षक/निदेशक खाजगी सुट्टीच्या काळात किंवा रजेच्या काळात आपल्या पत्त्यामध्ये कोणताही बदल झाल्यास तो बदल शाळा/प्रशिक्षण केंद्र प्रमुखाला, व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा यथास्थिती अध्यक्षांना कळविले.

(vii) पूर्णवेळ शिक्षक/निदेशक तो ज्या शाळा/प्रशिक्षण केंद्राचा कर्मचारी आहे त्या शाळा/प्रशिक्षण केंद्राच्या प्राधिकाऱ्याची लेखी पुर्वपरवानगी घेतल्याशिवाय अन्य कोणत्याही शैक्षणिक, सांस्कृतिक किंवा साहित्यिक संस्थेमध्ये पैसे घेवून किंवा इतर कोणताही मोबदला घेवून अर्धवेळ नोकरी स्विकारणार नाही.

(viii) मुले व मुली यांच्याशी तसेच अन्य कर्मचाऱ्यांशी शिक्षक वर्गाचे वर्तन सभ्यतेचे असेल.

**(६१) शाळा/प्रशिक्षण केंद्राचा कर्मचारी:-**

(एक) तो ज्यावेळी ज्या भागात काम करीत असेल त्या भागामध्ये मादक पेये किंवा अंमली औषधीद्रव्ये या संबंधीच्या त्यावेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायदयाचे काटेकोरपणे पालन करील.

(दोन) आपले कर्तव्ये पार पाडीत असतांना कोणतेही मादक पेय पिणार नाही. किंवा मादक पेयाच्या किंवा औषधीद्रव्यांच्या नशेत राहणार नाही. तसेच अशा कोणत्याही पेयाच्या किंवा औषधी द्रव्याच्या सेवनाने कोणत्याही प्रकारे कोणत्याही वेळी आपली कर्तव्ये पार पाडण्यावर परिणाम होणार नाही याची देखील खबरदारी घेईल. कर्तव्य कालावधीत भ्रमनध्वनी (Cellular Phone) चा वापर करता येणार नाही.

(तीन) सार्वजनिक ठिकाणी कोणतही मादक पेये किंवा औषधिकद्रव्य पिण्यापासून दूर राहील.

(चार) अवस्थेत सार्वजनिक ठिकाणी जाणार नाही. संस्थेच्या प्रतिष्ठेस हानी पोहचेल अशी कोणतीही कृती करणार नाही, शाळा समितीने ठरवून दिलेल्या वर्तवणूक नियमांचे काटेकोर पालन करेल.

(पाच) शिक्षक/निदेशक जबाबदारीने अध्यापन कार्य करेल कर्तव्यात कसूर, निष्काळजीपणा मुळ विदयार्थिसंख्या कमी झाल्यास ही बाब वेतन वाढ रोखन्यास ग्राह्य धरता येईल.

(सहा) आपले वर्तन, अनिर्बध होईल अशा रितीने मादक द्रव्यांचे किंवा औषधी द्रव्याचे सेवन कर्तव्यावर असतांना करणार नाही.

**स्पष्टीकरण:-**

या नियमांच्या प्रयोजनासाठी सार्वजनिक ठिकाणी याचा अर्थ ज्या ठिकाणी किंवा ज्या जागेमध्ये पैसे देवून किंवा अन्याय जनसामान्यांना प्रवेश करता येतो किंवा प्रवेश करण्यासाठी परवानगी दिली जाते असे कोणतेही ठिकाण किंवा जागा (वाहने देखील असा आहे)

शाळा/कर्मशाळा आणि तिचे आवार हयांचा सुध्दा सार्वजनिक ठिकाण हयामध्ये समावेश राहील.

पोटनियम-बी मध्ये उल्लेखलेल्या वर्तणूक संहितेतील कोणत्याहील नियमांचे पालन करण्यात केलेली कसूर निष्काळजीपणा किंवा गैरवर्तणूकीचे कृत्य किंवा दोन्ही समजण्यात येईल.

**(६२) अनुपस्थितीची परवानगी मिळविणे:-**

संस्था प्रमुखांची परवानगी घेतल्याशिवाय सामान्यत: कोणताही कर्मचारी आपल्या कामावर अनुपस्थितीत राहणार नाही. परंतु निकडीच्या प्रसंगी जेव्हा त्यास आवश्यक पूर्ण परवानगी घेणे शक्य झाले नसेल तेव्हा तो सात दिवसाच्या आत आपल्या अनुपस्थितीची कारणे कळविल.

**(६३) रजा:-**

(एक) मान्यता प्राप्त पुर्णवेळ कर्मचाऱ्यांना या संहितेत नमूद केलेल्या रजा अनुज्ञेय राहतील, मात्र अर्धवेळ, कंत्राटी, मानद, अंशकालीन कर्मचाऱ्यांना नैमित्तिक रजे व्यतिरीक्त इतर रजा अनुज्ञेय राहणार नाहीत. रजेची मागणी हक्क म्हणून करण्यात येणार नाही. रजा मंजुर करण्याची नाकारण्याचा स्वेच्छा निर्णय किंवा (नैमित्तीक रजेव्यतिरिक्त) इतर रजा रद्द करण्याचा स्वेच्छा निर्णय पुढील प्रमाणे राखून ठेवण्यात आला आहे.

(i) शिक्षक/शिक्षकेतर निदेशक/निदेशकेतर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत (संस्था प्रमुख वगळता) शाळा/ कर्मशाळा समितीकडे आणि

(ii) शाळा / प्रशिक्षण केंद्र प्रमुखांच्या बाबतीत व्यवस्थापनाकडे

(एक) नैमित्तिक रजेच्या व्यतिरिक्त असणाऱ्या रजेसंबंधातील किंवा रजा वाढी संबंधातील किंवा मोठया सुट्टीनंतर रजेवर जाण्यासंबंधातील अर्ज सामान्यत: ज्या तारखेपासून रजेची किंवा रजावाढीची मागणी करावयाची असेल त्या तारखेपुर्वी पुरेशा आगोदर करण्यात येईल. कर्मचाऱ्यांच्या अवाक्याबाहेरील परिस्थितीमुळे आधि अर्ज करणे शक्य नसेल. अशा अपवादात्मक प्रकरणांच्या बाबतीतही अनुपस्थितीच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत रजेसंबंधातील अर्ज केला नाही तर त्यांने सेवा सोडून दिली असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) पुरेसे कारण नसतांना अनुपस्थितीच्या तारखेपासून ७ दिवसाच्या आत रजेसंबंधात अर्ज न करणाऱ्या कायम कर्मचाऱ्यांच्या बाबतीत तो शिस्तभंग असल्याची मानण्यात येईल व उचित चौकशी करण्यात आल्यानंतर तो योग्य त्या शिस्तभंगाविषयक कार्यवहीस्तव पात्र ठरेल.

(तीन) एका शैक्षणिक वर्षात, संस्था प्रमुख त्यांच्या व्यतिरिक्त इतर शिक्षक व शिक्षकेतर निदेशक/निदेशकेतर कर्मचाऱ्यांना आणि व्यवस्थापन संस्था प्रमुखाला १२ दिवस नैमित्तिक रजा मंजूर करु शकेल. मात्र ही नैमित्तीक रजा साधारणपणे एकावेळी सात दिवसाहून जास्त दिवस घेता येणार नाही आणि केवळ अपवादात्मक परिस्थितीत दहा दिवसांपर्यंत वाढवता येईल.

(चार) नैमित्त्तीक रजेस सोडून रजेपुर्वी किंवा रजेनंतर दोन्हीप्रकारे दोन दिवसांहून अधिक सुट्टया घेता येतील. मात्र एकावेळी घेतलेली नैमित्तिक रजा आणि रजेला जोडून घेतलेल्या सुट्टया यांचा कालावधी ७ दिवसांहून अधिक होता कामा नये. केवळ अपवादात्मक प्रकरणात हा कालावधी १० दिवसांपर्यत वाढविता येईल.

(पाच) नैमित्तिक रजेस सोडून रजेपूर्वी किंवा रजेनंतर किंवा दोन्ही प्रकारे घेतलेल्या दोनहून अधिक सुट्टया हया नैमित्तिक सुट्टी समजण्यात येतील. नैमित्तिक रजेच्या दरम्यान येणारे रविवार आणि सुट्टया या नैमित्तिक सुट्टी समजण्यात येवू नयेत.

(सहा) सामान्यत: दिर्घ मुदतीच्या सुटटयांना जोडून अशी सुट्टी सुरु होण्यापुर्वी किंवा त्यानंतर संस्था प्रमुखाच्या पूर्व परवानगीशिवाय नैमित्तीक रजा घेता येणार नाही.

(सात) अनुपस्थितीचा कालावधी हा कामाच्या एक दिवसाच्या अर्धा असेल किंवा त्यापेक्षा कमी असेल तर अर्ध्या दिवसाची नैमित्तिक रजा घेण्यास परवानगी असेल.

(आठ) शनिवार हा कामाचा अर्धा दिवस असेल तर शनिवारची किंवा शाळा/प्रशिक्षण केंद्राने ठरवून दिलेला अन्य कोणताही दिवस हा कामाचा अर्धा दिवस असेल तर त्या दिवसाची अनुपस्थिती ही अर्ध्या दिवसाची नैमित्तीक रजा न समजता पूर्ण दिवसाची नैमित्तिक रजा समजण्यात येईल.

(नऊ) कर्मचाऱ्याला अनुज्ञेय असलेल्या नैमित्तीक रजेमधून खर्ची टाकण्यात न येणाऱ्या खालील प्रकारच्या विशेष नैमित्तीक रजा कर्मचाऱ्याला मंजूर करण्यात येतील व त्या अशा

(I) कुटुंब नियोजन योजनेखाली विशेष नैमित्तीक रजा

| प्रसंग | सवलत |
|---|---|
| ए) पुरुष नसबंदी किंवा स्त्री नसबंदी | कामाच्या सहा दिवसापेक्षा अधिक नसेल इतकी विशेष नैमित्तीक रजा |
| बी)प्रसंगोत्तर नसलेली संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या कर्मचारी स्त्रिया | १४ दिवसांपेक्षा अधिक नसेल इतकी विशेष नैमित्तीक रजा. |

टिप: १) वरील दोन प्रसंगी देण्यात येणारी विशेष नैमित्तीक रजा सामान्य नैमित्तीक रजेला किंवा नियमित रजेला सोडून घेता येईल. मात्र अर्जाला वैद्यकीय प्रमाणपत्राद्वारे पुष्टी देण्यात आलेली असावी.

(II) बाब (I) मधील विशेष नैमित्तीक रजा, तीन किंवा अधिक हयात मुले असलेल्या आणि संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या स्त्री कर्मचाऱ्यांनाही देता येईल.

| | |
|---|---|
| (सी) लूप बसवून घेणाऱ्या कर्मचारी स्त्रीया | वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधिनतेने तो दिवस |
| (डी) ज्यांच्या पत्नीने स्वयांसाठी असेलेली संतती प्रतिबंधक शस्त्रक्रिया (प्रसवोत्तर नसलेली नसबंदी) करुन घेतली असेल तो कर्मचारी | वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधिनतेने सात दिवसापेक्षा अधिक नाही इतकी. |

टिप:

(a) विशेष नैमित्तीक रजा सर्वसाधारण नैमित्तीक रजेवर किंवा नियमित रजेला जोडून घेता येईल मात्र रजेच्या कालावधीत आपल्या पत्नीची काळजी घेण्यासाठी त्या कर्मचाऱ्याची उपस्थिती आवश्यक आहे. अशा अर्थाचे प्रमाणपत्र देवून शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरने अर्जाला पुष्टी दिलेली असावी.

(b) ज्यांच्या पत्नीने प्रसुतीनंतर ताबडतोब नसबंदी शस्त्रक्रिया करुन घेतली असेल त्या कर्मचाऱ्याला प्रत्यक्ष शस्त्रक्रिया करणाऱ्या डॉक्टरचे वैद्यकीय प्रमाणपत्र सादर करण्याच्या अधिनतेने चार दिवसापेक्षा अधिक नसेल इतकी विशेष नैमित्तीक रजा देण्यात येईल.

(III) खाली नमुद करण्यात आलेल्या इतर प्रसंगी द्यावयाची विशेष नैमित्तीक रजा देण्यात येईल.

| प्रसंग | अनुज्ञेय विशेष नैमित्तीक रजा |
|---|---|
| (ए) श्वान दंश उपचार | ३ आठवडयापर्यंत |
| (बी) राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रिडांमध्ये भाग घेणे | टिप (१) (२) च्या अधीन राहून ३० दिवसापर्यंत |
| सी) गिर्यारोहण | टिप ३ व ४ च्या तरतुदीच्या अधिनतेने ३० दिवसा पर्यंत |
| (डी) मोफत रक्तदान | एक दिवस (त्याच दिवशी किंवा रक्तदानाच्या लगतनंतरच्या दिवशी परंतू त्यानंतरच्या इतर कोणत्याही दिवशी नाही). |

टिप:-

(a) खालील बाबतीत राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय क्रीडामध्ये भाग घेण्याऱ्यास विशेष नैमित्तीक रजा मंजूर करण्यात येईल.

(b) राष्ट्रीय किंवा आंतराष्ट्रीय महत्वाच्या क्रिडामध्ये भाग घेण्यासाठी.

(c) खाली नमूद केलेल्या क्रीडामध्ये भाग घेण्यासाठी कर्मचाऱ्याची निवड करण्यात आली असेल त्यावेळी -

i) राष्ट्रीय क्रिडा महासंघ किंवा अखिल भारतीय परिषद किंवा मंडळ यांच्याकडून मान्यता मिळालेला आणि भारत सरकारच्या शिक्षण मंत्रालयाने मान्य केलेला संघ यांनी आयोजित केलेल्या आंतराष्ट्रीय क्रीडा किंवा

ii) आंतराष्ट्रीय आंतर प्रभागीय किंवा आंतर मंडलीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या क्रीडामध्ये भाग घेणाऱ्या कर्मचारी क्रीडाचमुमध्ये राज्याचा प्रभागाच्या किंवा मंडलाच्या तीने योग्यरितीने नामनिर्देशित केलेल्या प्रतिनिधी म्हणून आणि वैयक्तिक नात्याने सहभागी झालेला असेल तर अशा राष्ट्रीय महत्व असणाऱ्या क्रीडा.

(d) जेव्हा एखादया कर्मचाऱ्याची खास शिक्षण किंवा प्रशिक्षण शिबीरात किंवा अखिल भारतीय खास शिक्षण किंवा प्रशिक्षण योजनेत सहभागी होण्यासाठी निवड केली जाते किंवा त्याचे नाव पुरस्कृत केले जाते किंवा त्याची सेवा अशा क्रीडामध्ये पंच म्हणून वापरली जाते त्यावेळी u

(e) जेव्हा एखादया गिर्यारोहन मोहिमेला भारतीय गिर्यारोहण प्रतिष्ठानची मान्यता असते तेव्हा गिर्याराहेणासाठी नैमित्तीक रजा अनुज्ञेय असेल.

(i) जर एखादया कर्मचाऱ्याने राष्ट्रीय किंवा आंतराराष्ट्रीय क्रीडा महोत्सवात आणि गिर्यारोहणातही भाग घेतला असेल तर त्याची एकुण विशेष नैमित्तीक रजा जास्तीत जास्त ३० दिवस इतकीच असेल.

(ii) अपंग कर्मचाऱ्यांना राज्य शासनाने मंजूर केलेल्या विशेष रजा तसेच वेळेतील सवलत इत्यादी जसेच्या तश्या लागू राहतील.

(iii) भारतीय पुनर्वास परिषदेने आयोजित केलेल्या सी.आर.ई. प्रशिक्षण कार्यक्रमास किवां प्रशिक्षण कार्यक्रमास विशेष शिक्षकांनी दीर्घकालीन सुट्याचा कालावधी वगळून उर्वरित कालावधी मध्ये सी.आर.ई. प्रशिक्षण पूर्ण केल्यास प्रशिक्षणाचा कालावधी हा कर्तव्य कालावधी म्हणून ग्राह्य धरण्यात येईल. प्रशिक्षणला जाण्यापूर्वी संबंधितास शाळा समितीची मान्यता घ्यावी लागेल.

(दहा) सेवेच्या प्रत्येक पुर्ण वर्षाला खाजगी कारणासाठी किंवा वैद्यकीय प्रमाणपत्रावर जास्तीत जास्त २० दिवस अर्धवेतनी रजेऐवजी १० दिवस पूर्ण वेतन अर्जित रजा अनुज्ञेय राहील. खाजगी कारणासाठी घेतलेल्या १० दिवसापर्यंतच्या रजेस वैद्यकीय प्रमाणपत्राची आवश्यकता राहणार नाही.

(अकरा) (१) देय अर्धवेतनी रजेच्या कालावधीच्या जास्तीत जास्त निम्म्या कालावधीतील परिवर्तीत रजा. आजाराचे स्वरुप व आजाराची संभाव्य मुदत शक्यतोवर सुस्पष्टपणे नमुद करणाऱ्या नोंदणीकृत वैद्यकीय व्यवसायीकाच्या वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे पुढील शर्तीच्या अधिनतेने मंजूर करता येईल त्या शर्ती अशा ‑

i) जेव्हा परावर्तीत रजा मंजूर केली जाईल तेव्हाच अशा रजेच्या दुप्पट इतकी देय अर्धवेतनी रजा खर्ची टाकण्यात येईल.

ii) रजा मंजूर करण्यास सक्षम असणाऱ्या प्राधिकाऱ्याला असा कर्मचारी अशी रजा समाप्त झाल्यानंतर सेवेत पुन्हा रुजु होईल असा विश्वास ठेवण्यास कारण असल्याशिवाय परावर्तीत रजा मंजुर केली जाणार नाही.

२) रजा मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी स्वेच्छा निर्णयानुसार मुंबईतील सरकारी वैद्यकीय रुग्णालयाचे अधिक्षक किंवा जिल्हा शल्य चिकित्सक किंवा जिल्हा वैद्यकीय अधिकारी किंवा जिल्हा परिषदेचे नगरपरिषदेचे किंवा महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी हयांना अर्जदाराची वैद्यकीयदृष्टया तपासणी करण्याची विनंती करुन त्यांचे दुसरे वैद्यकीय मत मिळवू शकेल. जर प्राधिकाऱ्यांना तसे करण्याची इच्छा असेल तर तो प्राधिकारी ज्या तारखेला पहिले वैद्यकीय मत देण्यात आले होते. त्या तारखेपासून शक्य तितक्या लवकर मिळेल अशा प्रकारे दुसऱ्या वैद्यकीय तपासणीची व्यवस्था करील. प्राधिकारी अर्जदाराने सादर केलेले मूळ वैद्यकीय प्रमाणपत्र त्या अर्जदाराची पुन: तपासणी करणाऱ्या वैद्यकीय अधिकाऱ्याकडे पाठवील.

३) जर अशा फेरतपासणीची आवश्यकता असेल तर व्यवस्थापन ती स्वत:च्या खर्चाने करील आणि अशा फेरतपासणीसाठी कोणताही खर्च केला असल्यास तो अनुदानकरीता अनुज्ञेय धरला जाणार नाही.

४) संपूर्ण सेवावधीमध्ये जास्तीत जास्त १८० दिवस अर्धवेतनी रजा, खंड (१) मधील उपखंड (i) व (ii) मध्ये उल्लेखलेल्या शर्तीच्या अधीन राहून परावर्तीत करण्यास परवानगी दिली जाईल. मात्र अशा रजा, रजामंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याने लोकहिताच्या दृष्टीने उपकारक असल्याचे प्रमाणित केलेल्या मान्यताप्राप्त अभ्यासक्रमासाठी वापरली असली पाहिजे.

(बारा) इतर कोणत्याही प्रकारची रजा नियमानुसार अनुज्ञेय नसेल त्यावेळी किंवा अन्य प्रकारची रजा अनुज्ञेय असेल पण कर्मचाऱ्याने असाधारण रजा मंजूर करण्यासाठी लेखी अर्ज केला असेल अशा विशेष परिस्थितीत कोणत्याही कर्मचाऱ्याला असाधारण रजा मंजूर करता येईल. कायम कर्मचाऱ्या व्यतिरिक्त अन्य कर्मचाऱ्यांच्या बाबतीत असाधारण रजेचा कालवधी कोणत्याही एका वेळी तीन महिन्याहून अधिक होता कामा नये. कायम कर्मचाऱ्याच्या बाबतीत असाधारण रजेचा कालावधी कोणत्याही एका वेळी तीन वर्षाहून अधिक होता कामा नये. रजा मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी रजा न घेता झालेल्या अनुपस्थितीचा कालावधी भुतलक्षी प्रभावाने असाधारण रजेमध्ये परिवर्तीत करुन शकेल.

(तेरा) पोटनियम (पंधरा) मधील तरतुदीच्या अधिन राहून एक वर्षाहून अधिक सेवा केलेल्या महिला कर्मचाऱ्याला प्रसुति रजा मंजूर करण्यात येईल अशी रजा तो सुरु झाल्याचा तारखेपासून जास्तीत जास्त १८० दिवस इतकी मंजूर केली जाईल. तसेच वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासकीय कर्मचाऱ्याचे नियम लागू होतील.

(चौदा) पोट नियम (तेरा) खाली प्रसुति रजा ज्या महिला कर्मचाऱ्याची सेवा रजा सुरु होण्याच्या तारखेला एक वर्षाहून अधिक पण दोन वर्षांहून अधिक कमी इतकी झाली असेल अशा महिला कर्मचाऱ्याला अर्ध वेतनावर मंजूर केली जाईल. अशी रजा सुरु होण्याच्या तारखेस दोन वर्षे किंवा त्याहून अधिक सेवा केलेली असेल अशा महिला कर्मचाऱ्याच्या बाबतीत पूर्ण वेतनी प्रसुति रजा मंजूर केली जाईल. एक वर्षाहून कमी सेवा झालेल्या महिला कर्मचाऱ्याला तितक्याच कालावधीची असाधारण रजा मंजूर केली जाईल.

(पंधरा) प्रसुति रजा रजेच्या हिशोबात खर्ची घालण्यास येणार नाही. जर वैद्यकीय प्रमाणपत्रासह इतर प्रकारची रजा मंजूर करण्याची विनंती करण्यात आली असेल तर प्रसुति रजेला जोडून कोणत्याही प्रकारची रजा मंजूर करण्यात येईल.

(सोळा) दोन किंवा त्यापेक्षा अधिक हयात मुले असणाऱ्या महिला कर्मचाऱ्याला प्रसुति रजा मंजूर केली जाणार नाही.

टिप: या नियमातील रजा गर्भास्त्राव किंवा गर्भपात किंवा वैद्यकीय गर्भसमान अधिनियम १९७१ (१९७१ चा ३४) अनुसार केलेले गर्भसमान या बाबतीत खालील शर्तींना अधिन राहून अनुज्ञेय असेल त्या शर्ती अशा

1) अशी रजा सहा आठवडयातून अधिक असता कामा नये. आणि -----

2) अशा रजेसाठी केलेल्या अर्जासोबत वैद्यकीय प्रमाणपत्र असले पाहिजे.

(सतरा) नैमित्तीक रजेव्यतिरिक्त कोणत्याही प्रकारची रजा इतर कोणत्याही प्रकारची रजेला जोडुन किंवा त्या रजेपाठोपाठ घेता येईल.

(अठरा) कायम नसलेल्या कर्मचा-याला नैमित्तीक व प्रसुती रजे व्यतिरिक्त कोणतीही भरपगारी रजा घेण्याच्या हक्क नसेल, कायम नसलेल्या कर्मचा-याला स्थायी पदावर कायम नात्याने नियुक्त करण्यात येईल. अशा वेळी जर त्याची पूर्वीची अखंड सेवा कायम कर्मचारी म्हणून असती तर रजा त्याला अनुज्ञेय झाली असती. ती रजा मिळण्याचा हक्क असेल. कायम नसलेल्या कर्मचा-याला प्रत्येक पूर्ण वर्षाला २० दिवस या प्रमाणात अर्धवेतनी रजा मंजूर केली जाईल. मात्र रजा मंजूर करण्यास सक्षम असणा-या प्राधिका-याला अशी रजा संपल्यानंतर संबंधित कर्मचारी सेवेत रुजू होईल असा विश्वास ठेवण्यास कारण असले पाहिजे.

(एकोणीस) पूर्णवेतनी रजेवरील कर्मचा-याला रजेवर जाण्याचा लगतपूर्वी मिळणा-या वेतनाइतकी रजावेतन मिळण्याचा हक्क असेल.

(वीस) अर्धवेतनी रजेवरील कर्मचा-याला वरील पोट नियम (एकोणीस) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या रकमेच्या निम्म्या दराने रजावेतन मिळण्याचा हक्क असेल, त्याशिवाय रजा वेतनाच्या रकमेच्या प्रमाणात महागाई भत्ता आणि अनुज्ञेय असल्यास पूर्ण दराने स्थानिक पुरकभत्ता व घरभाडे घेता येईल.

(एकवीस) परावर्तीत रजेवरील कर्मचा-याला (वीस) अनुसार अनुज्ञेय असणा-या वेतनाच्या रक्कमेच्या दुप्पट इतके रजा वेतन मिळण्याच्या हक्क असेल.

(बावीस) क्षयरोग, कर्करोग किंवा कुष्ठरोग पिडीत कर्मचा-याला त्या प्रयोजनासाठी शासकीय कर्मचा-यांना अनुज्ञेय असेल अशी विशेष रजा व भत्ते मिळणेसाठी हक्क असेल.

(तेवीस) असाधारण रजेवरील कर्मचा-याला कोणतेही रजा वेतन घेण्याचा हक्क असणार नाही.

(चोवीस) कायम पूर्णवेळ कर्मचाऱ्यास प्रत्येक सहामाहीस १५ दिवस याप्रमाणे वर्षात दोन सहामाही ३० दिवस अर्जित रजा अनुज्ञेय राहील. (वर्षाच्या सुरुवातीस जानेवारी मध्ये १५ दिवस आगाऊ रजा रजेच्या खात्यामध्ये जमा करण्यात येईल दुसऱ्या सहामाहीत १५ दिवस जुले महिन्यामध्ये जमा करण्यात येईल सेवेचा कालावधी सहा महीन्यापेक्षा कमी असल्यास महिन्याला सव्वादोन दिवस या प्रमाणे रजेची परिगणना करण्यात येईल) कोणत्याही कारणास्तव रजा खाती शिल्लक असलेली रजा कर्मचाऱ्यास घेता येईल. ३०० दिवसापर्यंत रजा साठविता येईल. त्यानंतरची रजा साठविली जाणार नाही.

(पंचवीस) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होणारा कर्मचारी, अर्जित रजेच्या ३०० दिवसांच्या कमाल मर्यादेपर्यंत त्या कर्मचा-याच्या खात्यावर जमेस असलेल्या अर्जित रजेच्या कालावधीच्या रजावेतना इतकी रोख रक्कम मिळण्यास पात्र असेल. त्याला रजा वेतनाच्या रोख रकमेच्या

अतिरिक्त निवृत्ती वेतन आणि मृत्यु नि- सेवा निवृत्ती उपदानाच्या सममूल्य निवृत्ती वेतन मिळण्याचाही हक्क असेल. मात्र त्यासाठी खालील शर्ती असतील त्यांच्या शर्ती अशा -

१) रजा वेतनाची रोख रक्कम ३०० दिवसाच्या कमाल अर्जित रजे इतकी मर्यादित असेल.

२) अशा प्रकारे अनुज्ञेय असलेली रजा वेतना इतकी रोख रक्कम निवृत्तीनंतर देय होईल. आणि त्या एकाच वेळी एका ठोक रक्कम दिली जाईल.

३) ही रोख रक्कम अर्जित रजेसाठी अनुज्ञेय असलेले रजा वेतन आणि त्या रजा वेतनावर निवृत्तीच्या तारखेला अमंलात असलेल्या दरानुसार अनुज्ञेय असलेला महागाई भत्ता यांनी मिळून होणा-या रक्कमेइतकी असेल. कोणताही स्थानिक पुरक भत्ता व घरभाडे भत्ता देय असणार नाही.

४) रजा मंजूर करणारा सक्षम प्राधिकारी आपल्या अधिकारात (स्वाधिकारे) निवृत्तीच्या तारखेला कर्मचा-याच्या खात्यावर जमेस असलेल्या अर्जित रजेच्या रजा वेतनाइतकी रोख रक्कम मंजूर करणेबाबत आदेश देईल.

(सव्वीस) कर्मचारी त्याच्या जमेस असलेल्या अर्जित रजेचा लाभ निवृत्तीपूर्व रजा म्हणून देखील घेवून शकेल. अशा बाबतीत निवृत्तीच्या तारखेला त्याच्या खाती शिल्लक असलेल्या अर्जित रजेच्या रजा वेतन इतकी रोख रक्कम या नियमानुसार त्याला मंजूर करण्यात येइल्.

(सत्तावीस) पूर्ण वेतनी, अर्धवेतनी किंवा अवैतनिक रजेवर असलेला कर्मचारी त्याच्या रजेच्या कालावधीमध्ये कोणतीही पूर्णवेळ सेवा वेतन किंवा परिश्रमिक घेवून किंवा न घेता स्वीकारणार नाही. कर्मचारी संस्थाप्रमुख समिती किंवा यथास्थिती व्यवस्थापन यांची विनिर्देशपुर्वक परवानगी मिळविल्यानंतर अर्धवेळ नोकरी स्वीकारु शकेल.

(अठ्ठावीस) रजेवर असणाऱ्या कर्मचाऱ्यास रजा मंजूर करणाऱ्या प्राधिकाऱ्याच्या परवानगी खेरीज रजेचा कालावधी संपण्यापूर्वी पुन्हा कामावर हजर होण्यास परवानगी असणार नाही.

(एकोणतीस) प्रशासकीयदृष्टया तसे कारणे आवश्यक असेल अशा अपवादात्मक परिस्थितीमध्ये रजा मंजूर करण्यास सक्षम असणारा प्राधिकारी तातडीच्या कामाचे स्वरुप स्पष्ट करुन रजेवर असलेल्या कर्मचाऱ्याला परत कामावर बोलावू शकेल. आणि असे रुजू होणे हे कर्मचा-याचे आवश्यक कर्तव्य असेल. तसे असूनही जर निर्देश दिल्यानुसार कर्मचारी कामावर रुजू होवू शकला नाही तर तो आपल्या असमर्थतेबाबतच्या वास्तविक परिस्थितीबद्यल उक्त प्राधिकाऱ्याची खात्री पटवील.

(तीस) असाधारण रजेवरअसलेल्या कर्मचाऱ्याच्या वेतनवाढीची तारीख अशा रजेच्या कालावधी इतकी पुढे ढकलली जाईल. परंतू वैद्यकीय कारणास्तव असाधारण रजेवर असलेल्या कर्मचा-याची वेतनवाढ पुढे ढकलली जाणार नाही. मात्र जे शिक्षक विधानसभेवर निवडून आले असतील किंवा विधान परिषदेवर निवडून आले असतील किंवा नामनिर्देशित करण्यात आले असतील

त्या शिक्षकांना विधान मंडळाचे सदस्य म्हणून असलेल्या त्यांच्या पदावधीमधील त्यांची असाधारण रजा वेतनावाढीच्या प्रयोजनासाठी हिशेबात घेतली जाण्याचा हक्क असेल.

(एकतीस) एखादा शिक्षक/शिक्षकेतर कर्मचारी कमीत कमी ३ महिने अन्यथा अन्य जास्त दिवस वैद्यकीय रजेवर गेल्यास त्याजागी बदली शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्याची नियुक्ती संस्था व्यवस्थापनास करता येईल. असे वेतन समाज कल्याण अधिकारी यांनी मान्यता दिल्यानंतरच अनुज्ञेय राही. असे करताना पूर्वीच्या कर्मचाऱ्यास व्यवस्थापनाने वैद्यकीय रजा मंजूर केलेले असणे आवश्यक आहे.

**(६४) कार्यमुक्ती प्रमाणपत्रः-**

(एक) जो कर्मचारी रितसर नोटीस देवून सेवा सोडली किंवा ज्या कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्यात येईल त्या (खुद्द प्रमुखा व्यतिरिक्त अन्य) कर्मचाऱ्याला विहीत नमून्यामधील कार्यमुक्ती प्रमाणपत्र देईल. प्रमुखाच्या बाबतीत असे कार्यमुक्ती प्रमाणपत्र व्यवस्थापनाचे अध्यक्ष/ सचिव देतील. आणि प्रमुख स्वत: जर व्यवस्थापन अध्यक्ष, सचिव म्हणजे ज्याला व्यवस्थापक मंडळाने घेतलेले निर्णय अंमलात आणण्याचे अधिकारी असतात असा सचिव, विश्वस्त पत्र व्यवहारकर्ता किंवा अन्य कोणत्याही नावाने ओळखला जाणारा निवृत्ती वेतनाधारी) असेल तर अध्यक्ष असे प्रमाणपत्र देईल. प्रमुख मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अध्यक्ष हे संबंधित कर्मचा-याच्या किंवा यथास्थिती, प्रमुखाच्या कार्यमुक्तीच्या तारखेपासून निदान एक आठवडयाच्या आत कार्यमुक्ती प्रमाणपत्र देतील. कार्यमुक्ती प्रमाणपत्र देण्याचे नाकारण्यात आल्यास त्याची कारणे त्या कर्मचा-याला किंवा प्रमुखाला कार्यमुक्तीच्या तारखेपासून एक आठवडयाच्या आत कळविण्यात येतील. प्रमुखाने व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याने किंवा अध्यक्षाने कार्यमुक्ती प्रमाणपत्र देण्यास नकार दिला असेल त्याबाबतीत कर्मचारी किंवा प्रमुख हा संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्याकडे अपील करु शकेल. आणि तो अधिकारी प्रमुखाने व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिका-याने किंवा अध्यक्षाने नमूद केलेली कारणे विचारात घेतल्यानंतर प्रमुखाला व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा अध्यक्षाला कार्यमुक्ती प्रमाणपत्र देण्याविषयी निर्देश देवू शकेल आणि असा निर्देश मिळाल्यावर प्रमुख व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा अध्यक्ष कार्यमुक्ती प्रमाणपत्र देईल.

(दोन) पूर्वी शाळेत नोकरी करणाऱ्या कोणत्याही कर्मचाऱ्याला त्याने कार्यमुक्ती प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय किंवा पुर्वीच्या व्यवस्थापनाकडे लेखी विनंती करुन सुध्दा कार्यमुक्ती प्रमाणपत्र मिळविण्यास तो असमर्थ आहे असे लेखी दिल्याशिवाय दुस-या एखादया शाळेत नोकरीवर

ठेवले जाणार नाही.दुस-या शाळेतील व्यवस्थापनाने पुर्वीच्या व्यवस्थापनाकडून त्याबाबतची कारणे जाणून घेतल्याशिवाय आणि त्या कर्मचाऱ्याला समाधानकारक कामाबद्दलची व चांगल्या वर्तणुकीबद्दलची माहिती खरी असल्याची त्यांची खात्री पटल्याशिवाय त्या कर्मचाऱ्याला सेवेत राहू दिले जाणार नाही. जर त्याला सेवेत राहू देण्यात आले तर नवीन संस्थेचे व्यवस्थापन संबंधित जिल्हयाचा जिल्हा समाज कल्याण अधिकारी याला पुर्वीच्या व्यवस्थापनाने कार्यमुक्ती प्रमाणपत्र देण्यास नकार दिला असल्याबद्दल कळविले आणि त्या कर्मचाऱ्याचे वेतन काढण्याकरीता त्याची मागील वेतन किती होते. याविषयीचे प्रमाणपत्र त्या अधिकाऱ्याकडून घेईल.

**(६५) सेवेतून काढून टाकणे किंवा सेवा समाप्त करणे:-**

(एक) (१) परिविक्षाधीन असलेल्या कर्मचाऱ्या व्यतिरिक्त इतर तात्पुरत्या कर्मचाऱ्यांच्या सेवा कोणतेही कारण न घेता एक महिन्याची नोटीस देवून किंवा नोटीशीऐवजी एक महिन्याचे वेतन देवून व्यवस्थानाला कोणत्याही वेळी समाप्त करता येतील.

(२) परिविक्षाधीन कर्मचाऱ्यांच्या सेवा व्यवस्थापनाकडून कोणत्याही वेळी समाप्त करण्यात येतील तेव्हा महाराष्ट्र खाजगी शाळांचे कर्मचारी (सेवेच्या शर्ती) विनियम अधिनियम १९७७ यांचे कलम ५ (तीन) यातील तरतूद लागू होतील.

(३) मोठी सुट्टी मिळण्याचा हक्क असलेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्या सुट्टीच्या कालावधीत किंवा त्या सुट्टीच्या कालावधीचा काही भाग अंतर्भूत होईल अशा रितीने किंवा सुट्टीनंतर एक महिन्याच्या आत त्याला नोटीस देण्यात येणार नाही.

(दोन) पोटनियम (३) च्या तरतुदींना अधिन राहून व्यवस्थापनाला पुढील परिस्थितीमध्ये तात्पुरत्या कर्मचाऱ्याची सेवा जर त्यांने दहा वर्षाहून कमी काळ केली असेल तर सहा महिन्याच्या वितलब्धी इतकी (वेतन व भत्ते मिळून) नुकसान भरपाईची रक्कम देवून आणि जर त्यांने दहा वर्षे किंवा त्याहून अधिक काळ सेवा केली असेल तर बारा महिन्यांच्या एकूण वितलब्धी इतकी नुकसान भरपाईची रक्कम देवून समाप्त करता येईल.

विद्यार्थ्यांशी वा विद्यार्थ्यानीशी किंवा कर्मचाऱ्यांशी उध्दटपणे किंवा अनैतिक वर्तन करणे किंवा ज्यामुळे नैतिक अध:पात होईल आणि ज्याबाबत जाहिर चौकशी झाल्यास समाजावर अनिष्ट परिणाम होण्याची शक्यता असेल अशी अन्य कोणतीही कृती करणे.

(तीन) व्यवस्थापनाने कर्मचाऱ्याला त्याची सेवा समाप्त करण्याचे कोणत्या कारणांच्या आधारे प्रस्तावित करण्यात आले आहे. ते नमूद करणारी व तसे करू नये याबाबतची त्याची काही कारणे असल्यास ती वाजवी कालावधीत दाखविण्याची संधी त्याला देणारी नोटीस दिल्याशिवाय व अशी कोणतेही कारणे त्यांनी दाखविली असल्यास ती विचारात घेतल्याशिवाय पोटनियम (दोन) अनुसार त्या कर्मचाऱ्यांची सेवा समाप्त करण्याविषयी कोणतेही आदेश काढण्यात येणार नाहीत. जर कर्मचाऱ्यांने दाखविलेली कारणे विचारात घेतल्यावर त्या कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्याचे आदेश काढण्यात आले तर व्यवस्थापनाला त्या कर्मचाऱ्याला द्यावयाच्या आदेशात आपली कोणतीही कारणे द्यावी लागणार नाहीत.

(चार) एखाद्या मान्यता प्राप्त संस्थेत ३१ माचे १९८१ पूर्वी नियुक्त झालेल्या व ज्याने अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना चालू ठेवण्यास होकार दिलेला आहे. अशा स्थायी कर्मचाऱ्याला जिल्हा शल्य चिकित्सकाने किंवा यथास्थिती शासकीय रुग्णालयाच्या अधिक्षकांने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार तो वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरल्याने सेवेतून मुक्त करावयाचे असेल तर त्याने केलेल्या सेवेच्या प्रत्येक पुर्ण वर्षाकरीता अर्ध्या महिन्याचा पगार (वेतन व भत्ते) या दराने येणारी रक्कम उपदान म्हणून देण्यात येईल. मात्र ही रक्कम त्याच्या तीन महिन्यांच्या पगाराहून (वेतन व भत्ते) उपदान म्हणून देण्यात येईल.

परंतू या पोट नियमानुसार उपदान मिळणाऱ्या कर्मचाऱ्यास उपदानांच्या अतिरीक्त वरील पोटनियम (दोन) अन्वये तरतूद केलेली नुकसान भरपाईची रक्कम मिळण्याचा हक्क असणार नाही.

(पाच) कर्मचारी पुढील एका वा अनेक कारणास्तव शिक्षा होण्यास पात्र ठरेल.

(१) गैरवर्तणूक.

(२) नैतिक अध: पत.

(३) कामाकडे जाणून बुजून व सतत दुर्लक्ष.

(४) अक्षमता.

(५) शाळा समितीने दिलेल्या आदेशाचे पालन न करणे

या नियमांच्या प्रयोजनार्थ

(१) गैरवर्तणूक यात पुढील कृतिचा समावेश होईल.

(i) या नियमाव्दारे किंवा नियमांखाली ठरवून दिलेल्या सेवेच्या अटी व शर्तीचे पालन न करणे

(ii) आचार संहितेचा भंग

(iii) तत्सम स्वरुपाची अन्य कोणतेही कृती

(२) नैतिक अध:पत पोटनियम (दोन) मध्ये उल्लेखलेल्या ८ कृतिचा समावेश ************

(३) कामाकडे जाणूक बुजुन दुर्लक्ष यात पुढील कृतिचा समावेश होतो.

(i) या नियमाव्दारे किंवा नियमानुसार विहीत केलेल्या कोणत्याही कर्तव्याबाबत कसूर करणे.

(ii) पूर्व परवानगी न घेता कामावर सतत गैरहजर राहाणे.

(४) अक्षमता यात पुढील कृतिचा समावेश होतो.

i) वारंवार सूचना देवूनही आणि सुविधांची तरतूद करुनही शैक्षणिक ज्ञान साधण्यात व अद्ययावत ज्ञान मिळवण्यास कसूर करणे

ii) वर्षाकरीता ठरवून दिलेल्या पाठयक्रम नेमून कालावधीत शिकवून पुरा करण्यास अपरिहार्य नसलेल्या अशा कोणत्या कारणास्तव कसूर करणे आणि ц

iii) तत्सम स्वरुपाची अन्य कोणतीही कृति.

**(६६) शास्ती**

या नियमांच्या तरतुदींना बाध न येता कोणताही कर्मचारी नियम ८२ मध्ये विनिर्दिष्ट गैरवर्तणूक नैतिक अध:पत जाणीवपूर्वक व सातत्याने कामाकडे दुर्लक्ष व अक्षमता ठरवा असेल तर तो पुढील शास्तीस पात्र ठरेल.

(एक) ताकीद देणे, खरडपट्टी काढणे किंवा ठपका ठेवणे.

(दोन) एक वर्षापासुन अधिक नाही इतका काळ वेतवाढ राखून धरणे.

(तीन) आदेशांकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा आदेशाचे उल्लघंन केल्यामुळे संस्थेचे काही नुकसान इ. झाले असल्यामुळे ते त्याच्या वेतनातुन किंवा त्याला देय असलेल्या अन्य रक्कमेतुन संपूर्णत: किंवा अशंता: वसुल करणे.

(चार) दर्जा कमी करणे.

(पाच) सेवा समाप्त करणे.

मात्र नियम क्र. ७२ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या किरकोळ स्वरुपाची शास्ती लादण्याच्या निर्णयान व्यथित झालेला कर्मचारी, शिक्षेचा आदेश मिळाल्याच्या तारखेपासुन ४५ दिवसांच्या आत अपिलीय अधिकाऱ्याकडे अपील करु शकेल.

(६७) शास्तीचे पुढीलप्रमाणे किरकोळ व मोठया शास्ती असे वर्गीकरण करण्यात आले आहे.

(एक) किरकोळ शास्ती

(१) खरडपट्टी

(२) ताकीद

(३) ठपका

(४) एक वर्षापेक्षा अधिक नाही एवढा काळ वेतनवाढ रोखुन धरणे.

(५) आदेशाकडे दुर्लक्ष केल्यामुळे किंवा आदेशाचे उल्लंघन केल्ययामुळे संस्थेचे काही आर्थिक नुकसान झाले असल्यास ते त्यांच्या वेतनातून किंवा त्याला देय असलेल्या अन्य रक्कमेतून संपूणर्त: किंवा अंशत: वसूल करणे.

(दोन) मोठया शास्ती

१. दर्जा कमी करणे

२. सेवा समाप्त करणे.

(६८) किरकोळ शास्ती लादण्याची कार्यपध्दती :-

किरकोळ शास्ती या कर्मचाऱ्याकडून होणाऱ्या चुकाबद्दल उदा. नेमून कामे हातावेगळी करण्यात विलंब लावणे, कामाकडे दुर्लक्ष करणे,शिरजोरी करणे. विशिष्ट आदेश न पाळणे आणि इतर तत्सम स्वरुपाची गैरवर्तणूक किंवा गैरवर्तणूक किंवा गैरवर्तणूक करणे या सारख्या चुकांबद्दल लावता येतील. या नियमात लावून दिलेल्या शिक्ष अंतिमरित्या लादण्याची लादण्यापुर्वी संबधित कर्मचाऱ्याने केलेल्या चूकाबद्दल किंवा त्याच्या कृतीबद्दल त्याला शिक्षा का केली जावू नये याबाबत संयुक्तीक व पुरेशी कारणे दोन आठवडयाच्या आत लेखी सादर करण्याची संधी देण्यास येईल. त्याच्यावर शिक्षा लादायची झाल्यास स्वरुप व प्रमाण किती असावे हे त्या कर्मचाऱ्याने काही स्पष्टीकरण दिले असल्यास ते विचारात घेतल्यानंतरच ठरविण्यात येईल.

**(६९) मोठया शास्ती लादण्याची कार्यपध्दती :-**

(एक) जर कर्मचारी एखादया गंभीर स्वरुपाच्या गैरवर्तणूकीबद्दल किंवा गैरवर्तनाबद्ल दावा असल्याचा त्याच्यावर आरोप असले आणि त्याच्यावरील दोष सिध्द झाल्यास त्याचा दर्जा कमी केला जाण्याची किंवा त्याला सेवेतून काढून टाकण्याची शक्यता आहे. असे मानण्यास सबळ कारण असेल तर त्याची चौकशी केली जावी काय आणि त्या कर्मचाऱ्याला निलंबनाखाली ठेवावे काय हे व्यवस्थापन प्रथम ठरविल. त्याला काढून टाकण्याकरीता प्रथम दर्शनी कारण असल्याशिवाय किंवा तो सक्रीय सेवते राहिल्याने अडचण निर्माण होण्याची किंवा प्रकरणाच्या

चौकशीच्या कामात अडथळे येण्याची शक्यता आहे असे मानण्यास पुरेसे कारण असल्याशिवाय निलंबनाचा आदेश दिला जाणार नाही. व्यवस्थापनाने त्या कर्मचाऱ्याला निलंबीत करण्याचे ठरविले तर अस कर्मचारी पोटनियम (पाच) च्या तरतुदीच्या अधिन अशा आदेशाच्या तारखेपासून निलंबीत होईल.

(दोन) कर्मचाऱ्याने निलंबीत असताना आणि चौकशी चालू असताना राजीनामा दिला तर राजीनामा स्वकारण्यात येणार नाही.

(तीन) निलंबनाखाली असेलेला कर्मचारी कोणतीही नोकरी स्वीकारणार नाही.

(चार) निलंबीत कर्मचाऱ्याला निलंबनाच्या कालावधीत संस्था प्रमुखाची पुर्वमान्यता घेतल्याशिवाय मुख्यालय सोडता येणार नाही. जर अशा कर्मचारी हा स्वत:च संस्था प्रमुख असेल तर तो अध्यक्षांची पुर्वमान्यता घेईल.

(पाच) ज्या कर्मचाऱ्याविरुध्द फौजदारी गुन्हयाबद्दल कारवाई करण्यात आली असेल ज्या कर्मचाऱ्याला त्यावेळी अंमलात असलेल्या प्रतिबंधात्मक स्थान बध्दतेविषयीच्या कायदयाने स्थानबध्द करण्यात आलेले असेत किंवा ज्या कर्मचाऱ्याला पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत अठ्ठेचाळीस तासापेक्षा अधिक काळपर्यंत डांबून ठेवण्यात आलेल असेल. किंवा जो कर्मचारी कारावासात असले तोवर निलंबीत असल्योचे मानण्याज येईल आणि त्याच्या वरील कारवाई समाप्त होईपर्यंत किंवा यथास्थितीत येईपर्यंत त्याला त्या कालावधीचे कोणतेही वेतन अन्य प्रकारच्या त्याच्या किंवा यथस्थितीत येईपर्यंत त्याला कालावधीचे कोणतेही वेतन व भत्ते मिळणार नाहीत. त्यास दोषमुक्त करण्यात आले किंवा त्याचा स्थानबध्द कालावधी असमर्थनीय असल्याचा निर्वाळा न्यायालयाने दिला तरच त्याला पूर्ण रक्कम दिली जाईल.

(सहा) फौजदारी कारवाईचा निर्णय लागल्यावर व्यवस्थापन निवाडयाची एक प्रत मिळवील आणि निवाडयात जर आरोपाबाबत दोषसिध्दी झालेली असेल आणि त्याच आरोपाबाबत व्यवस्थापनाने त्या कर्मचाऱ्याविरुध्द चौकशीही सुरु केलेली असेल तर त्याच आरोपाबाबत चौकशी पुढे चालू ठेवण्याची आवश्यकता राहणार नाही. आणि व्यवस्थापन त्या कर्मचाऱ्याची सेवा समाप्त करण्याची कार्यवाही करु शकेल. तथापी कर्मचाऱ्याला खालच्या न्यायालयाच्या दोषसिध्दीच्या निर्णयाविरुध्द वरच्या न्यायालयामध्ये जेवढया काळापर्यंत अपील करण्याचा किंवा पुर्नरीक्षण अर्ज करण्याचा हक्क असेल तेवढा कालावधी संपेपर्यंत व्यवस्थापन तसा कोणताही आदेश काढणार नाही. जर असे अपिल किंवा पुर्नरीक्षण अर्ज करण्यात आला तर वरिष्ठ न्यायालयाकडून दोष सिध्दी अंतिमरित्या कायम होईपर्यंत व्यवस्थापन कोणतीही कार्यवाही करणार नाही जर फौजदारी

खटल्याचा अपिलाचा किंवा पुर्नरीक्षण अर्जाचा निर्णय दोषमुक्त असा झाला तर तो निर्णय विचारात घेवुन व्यवस्थापन चौकशी सुरु करणे किंवा पुढे चालू ठेवणे आवश्यक आहे किंवा नाही. ते ठरविल दोषमुक्ती समर्थनीय असल्याचे व्यवस्थापनाने मान्य केले तर न्यायालयाचा निष्कर्ष आपणांस मान्य असल्याचे प्रमाणित करुन व्यवस्थापन चौकशीचे काम सोडून देईल. जर न्यायालयाचा निर्ष्कष व्यवस्थापनाला मान्य नसेल तर व्यवस्थापन चौकशी पुढे चालू ठेवील. आणि योग्य ती शिक्षा देईल.

**(७०) निर्वाह भत्याचे प्रदान:-**

(एक) (१) निलंबनाखाली असलेल्या कर्मचाऱ्यास तो अर्धवेतनी रजेवर असता तर त्याला काढले असते असे रजा वेतन आणि त्याच्या अतिरिक्त अशा रजा वेतनावरील महागाई भत्ता एवढी रक्कम देय असेल.

(२) जेथे निलंबनाचा कालावधी चार महिन्यापेक्षा जास्त असेल तेथे ज्या प्राधिका-याला निलंबनाचे आदेश दिले आहेत किंवा दिले असल्याचे समजण्यात येते तो प्राधिकारी पहिल्या चार महिन्यानंतरच्या कोणत्याही कालावधीसाठी निर्वाह भत्याची रक्कम खालीलप्रमाणे बदलण्यास सक्षम असेल.

(i) उक्त प्राधिका-यांच्या मते कर्मचा-याशी प्रत्यक्ष संबंध नसेल अशा काही कारणामुळे निलंबनाचा कालवधी लांबला असेल तर त्या कारणाची लेखी नोंद करुन पहिल्या महिन्याच्या कालवधीमध्ये अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्याच्या ५० टक्के इतक्या रक्कमेहून अधिक होणार नाही. इतक्या उचित रकमेने निर्वाह भत्याची रक्कम वाढविता येईल.

(ii) उक्त प्राधिकरणाच्या मते निलंबनाचा कालवधी कर्मचा-याशी प्रत्यक्ष संबंध जोडण्यासारख्या कारणामुळे लांबला असेल तर ती कारणे लेखी नमूद करुन पहिल्या चार महिन्याच्या कालावधीत अनुज्ञेय असलेल्या निर्वाह भत्या ५० टक्क्याहून अधिक नाही. इतक्या उचित रक्कमेने निर्वाह भत्याची रक्कम कमी करता येईल.

(iii) महागाई भत्याचा दर हा उपखंड (१) व (२) अन्वये अनुज्ञेय असलेल्या वाढीव किंवा घटलेल्या निर्वाह भत्याच्या रकमेवर आधारित असेल.

(दोन) कर्मचाऱ्याच्या निलंबनाच्या तारखेस इतर काही पूरक भत्ते मिळत असतील तर ते निलंबनाच्या काळातही निलंबित करणारे प्राधिकारी निर्देश देईल एवढया प्रमाणात व त्या शर्तीच्या आधिन राहून मिळतील.

परंतू, ते भत्ते जो खर्च भागविण्यासाठी दिले जात असतील तो खर्च कर्मचारी अजूनही करीत आहेत त्याबदल उक्त प्राधिकारणाची खात्री पटल्याशिवाय त्या कर्मचा-याला पूरक भत्ता मिळण्याचा हक्क असणार नाही.

आणखी असे की, जेव्हा कर्मचा-याला सक्षम न्यायालयाने दोषी ठरवून कारावासाची शिक्षा ठोठावली असेल तेव्हा त्याला मिळणारा निर्वाह भत्ता अशा दोषसिध्दीच्या तारखेपासून कमी करुन तो दरमहा एक रुपया इतका नाममात्र ठेवला जाईल व त्याची सुटका होईपर्यंत किंवा सक्षम प्राधिकरणा तर्फे त्याला सेवेतून दूर केले जाईपर्यंत किंवा पुर्वीच्या पदावर त्याचे पुन:स्थापन केले जाईपर्यंत त्याला तेवढाच निर्वाह भत्ता मिळत राहील.

आणखी असे की, जर कर्मचा-याला अपिल न्यायालयाने दोषमुक्त केले असेल आणि वरच्या न्यायालयात आणखी अपिल किंवा पुनरीक्षण अर्ज दाखल करण्यात येवून तो प्रलंबित राहिलेला नसेल. तर अपिल न्यायालयाने त्याला दोषमुक्त केल्यापासून ते त्या नियमाखाली चौकशी सुरु करण्यात आलेली असल्यास त्या चौकशीचे काम पुर्ण होईपर्यंत त्या कर्मचा-याला नेहमीच्या दराने निर्वाह भत्ता मिळेल.

आणखी असे की, वरील पोटनियम (एक) व (दोन) च्या कक्षेत येणा-या प्रकरणामध्ये जेव्हा व्यवस्थापन निलंबीत कर्मचा-याला निर्वाह भत्ता व इतर काही पूरक भत्ते असल्यास ते भत्ते देण्याचे नाकारील किंवा देण्यास सुरुवात करण्यात व देत राहण्यास कसूर करील, तेव्हा संबंधीत समाज कल्याण अधिकारी ते भत्ते त्याला देईल आणि शाळेला देय होणा-या वेतनेतर अनुदानातून तेवढी रक्कम वजा करील.

(तीन) जर एखादा कर्मचारी निलंबनाखाली असताना नियत वयोमानाचा झाला तर तो ते वयोमान झाल्यानंतर वय निवृत्त झाल्याचे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुध्द कोणतीही विभागीय किंवा न्यायिक कार्यवाही प्रलंबित असल्यास त्याच्या सेवा निवृत्ती नंतरही ती चालू ठेवण्यात येईल. तो निलंबनाखाली नसता तर त्याला निलंबनाखाली ठेवण्यात आल्याच्या तारखेपासून लगत पूर्वीच्या तारखेपर्यंतच्या त्याच्या अर्हताकारी सेवेच्या आधारे त्याला जेवढे कमाल निवृत्ती वेतन अनुज्ञेय झाले असते त्यापेक्षा अधिक नसेल एवढे तात्पुरते निवृत्ती वेतन त्याला देण्यात येईल. परंतु त्याच्या प्रकरणाचा अंतिम निर्णय लागेपर्यंत त्याला मृत्यू-नि-सेवानिवृत्ती उपदानाची रक्कम देण्यात येणार नाही. जेव्हा एखादा कर्मचा-याला दोषमुक्त करण्यात येईल आणि व्यवस्थापनाकडून त्याच्या विरुध्द नियम ८६ पोटनियम (सहा) नुसार कोणतेही कार्यवाही करण्यात आलेली नसेल तेव्हा त्याचे निलंबन हे पुर्णत: असमर्थनीय असल्याचे मानण्यात आल्यास पोटनियम (पाच) अनुसार आणि ते निलंबन पूर्णत: समर्थनीय असल्याचे मानण्यात आल्यास पोटनियम (सहा) अनुसार त्याच्या प्रकरणाचे नियमन केले जाईल.

(चार) जेव्हा निलंबीत करण्यात आलेल्या कर्मचा-याला त्याच्या पदावर पुन स्थापित करण्यात येईल तेव्हा पुन स्थापनेचा आदेश देण्यात सक्षम असलेला प्राधिकारी पुढील गोष्टी विचारात घेवून त्याबाबत विशिष्ट आदेश देईल.

(१) कर्मचाऱ्याच्या सेवेतील अनुपस्थितीच्या कालावधीकरीता त्याला द्यावयाचे वेतन व भत्ते आणि

(२) उक्त कालावधी हा कर्तव्यार्थ कालावधी म्हणून मानण्यात यावा किंवा कसे.

(पाच) जेव्हा पोटनियम (चार) मध्ये नमूद केलेल्या प्राधिका-याचे असे मत असेल की, कर्मचारी संपूर्णत निर्दोष आहे किंवा निलंबनाच्या बाबतीत ते निलंबन पूर्णपणे असमर्थनीय आहे. तेव्हा त्या कर्मचा-याला तो जर यथास्थिती बडतर्फी झाला नसता, नोकरीवरुन काढून टाकला नसता किंवा निलंबीत झाला नसता तर जे वेतन व भत्ते व निवृत्ती वेतन मिळण्यास पात्र ठरला असता ते पुर्ण वेतन व भत्ते व निवृत्तीवेतन देण्यात येईल. निलंबीत कर्मचाऱ्याच्या पदावर अन्य एखादा कर्मचाऱ्याची नियुक्ती करण्यात आली असल्यास त्या बदली कर्मचाऱ्याच्या वेतन भत्याचा खर्च व्यवस्थापन सोशील आणि असा खर्च शासकीय अनुदानासाठी अनुज्ञेय मानण्यात येणारी नाही.

(सहा) अन्य बाबतीत त्या कर्मचाऱ्याला व्यवस्थापन ठरवील तेवढया प्रमाणात वेतन व भत्ते देण्यात येतील.

परंतू, जेव्हा कर्मचाऱ्याला निलंबनाच्या कालावधीत मंजूर करण्यात आलेल्या तात्पुरत्या निवृत्ती वेतनाची रक्कम ही अंतिमरित्या अनुज्ञेय ठरलेल्या निवृत्ती वेतनाच्या रकमेपेक्षा अधिक होत असेल तेव्हा रकमेमधील ही तफावर त्याला देय झालेल्या निवृत्ती वेतनाच्या रकमेमधून वसूल करण्यात किंवा समायोजित करण्यात येणार नाही.

आणखी असे की, पोटनियम (पाच) किंवा (सहा) अनुसार देण्यात येणारे भत्ते हे असे भत्ते ज्या इतर शर्तीच्या अधिन दिले जातात त्या सर्व शर्तीच्या अधिन असतील.

आणखी असे की, पोटनियम (पाच) च्या कक्षेत येणाऱ्या प्रकरणाच्या बाबतीत कामावरील अनुपस्थितीचा कालावधली हा विशिष्ट प्रयोजनासाठी कर्तव्यार्थ कालावधी म्हणून मानण्यात यावा. असा व्यवस्थापनाने खास करुन आदेश दिल्यावर तो तसा कर्तव्यार्थ मानण्यात येईल.

**(७१) निलंबनाच्या शर्ती:-**

(एक) जेव्हा एखादा कर्मचाऱ्याला निलंबीत करण्याची व्यवस्थापनाची इच्छा असेल तेव्हा संबंधित समाज कल्याण अधिकाऱ्याची पूर्व मान्यता घेऊनच त्याला तसे निलंबीत करण्यात येईल. परंतु गंभीर स्वरूपाचा गुन्हा केल्याची खात्री झाल्यास अशा कर्मचाऱ्यास त्वरित निलंबित करण्याची कार्यवाही संस्थेस करता येईल. मात्र निलंबन केल्यानंतर संबधित कर्मचाऱ्याचे पदास पद मान्यता देणाऱ्या सक्षम अधिकारी यांची कार्योत्तर मंजुरी घेण्यात येईल.

(दोन) निलंबनाचा कालावधी समाज कल्याण अधिकाऱ्याच्या पूर्वपरवानगी शिवाय चार महिन्याहून अधिक होणार नाही.

(तीन) पूर्व मान्यता घेवून कर्मचा-याला निलंबीत करण्यात आले असेल अशा प्रकरणामध्ये त्या कर्मचा-याला फक्त चार महिन्याकरिता बँकेमार्फत निर्वाह भत्ता प्रदान करण्याच्या योजनेनुसार निर्वाह भत्ता दिला जाईल आणि त्यानंतर संबंधित व्यवस्थापन स्वत:च्या निधीतून भत्ता देईल.

(चार) जेव्हा एखादा कर्मचाऱ्याला व्यवस्थापनाने उपरोक्त प्रमाणे संबंधित समाज कल्याण अधिकाऱ्याची पूर्व मान्यता न घेता निलंबीत केले असेल तेव्हा त्या कर्मचाऱ्याला निलंबनाच्या पहिल्या चार महिन्याकरीता देखील आणि त्यानंतर चौकशी पूर्ण होई पर्यंतच्या कालावधीकरीता देखील व्यवस्थापन स्व:त च्या निधीतून निर्वाह भत्याची रक्कम देईल.

(पाच) पोटनियम (तीन)/किंवा (चार) यांच्या तरतुदीचे उल्लंघन केलेली प्रकरणे वगळता एरवी निर्वाह भत्ता अडवून ठेवण्यात येणार नाही.

* * *

## भाग – ४

### (७२) चौकशी समिती

(एक) एखादा कर्मचारी गंभीर स्वरुपाची गैरवर्तणूक किंवा गैरवर्तन केल्याबद्दल दोषी असल्याचे आढळून आले व व्यवस्थापनाने त्याच्या विरुध्द चौकशी करण्याचे ठरविले तर रितसर स्थापन करण्यात आलेल्या चौकशी समितीद्वारे व्यवस्थापन तशी चौकशी करील ज्या प्रकरणात मोठया स्वरुपाची शास्ती होण्याची शक्यता असेल अशाच प्रकरणात ती समिती चौकशी करील. व्यवस्थापनाने या संदर्भांकित प्राधिकृत केलेला व्यवस्थापन मंडळाच्या कार्यकारीणीच्या बहुमताने नियुक्त केलेला चौकशी अधिकारी संबंधित कर्मचाऱ्याला नोंदणीकृत पोच देय डाकेने त्याच्यावरील आरोप कळवील आणि आरोपपत्र त्याला मिळाल्यापासून सात दिवसाच्या आत त्याच्याकडून लेखी खुलासा मागवील.

(दोन) व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिका-याला किंवा यथास्थिती अध्यक्षाला कर्मचा-याने किंवा संस्था प्रमुखाने सादर केलेला खुलासा समाधानकारक नसल्याचे आढळून आले तर तो (अधिकारी किंवा अध्यक्ष) तो खुलासा त्याला मिळाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत व्यवस्थापनापुढे मांडील. नंतर व्यवस्थापन त्या कर्मचा-या विरुध्द चौकशी चालवावयाची की नाही याबाबत पंधरा दिवसाच्या आत निर्णय घेईल. जर चौकशी चालवावयाचा निर्णय घेण्यात आला तर व्यवस्थापन, व्यवस्थापनाच्या अध्यक्षाला व शाळा समितीच्या सभापतीला अनुक्रमे व्यवस्थापनातून एक व शाळा समितीमधून एक अशा दोन सदस्यांची चौकशी समितीवर नेमणूक करण्याचे प्राधिकार देईल आणि अध्यक्ष व सभापती अशा रितीने नामनिर्देशीत केलेल्या सदस्यांची नावे व्यवस्थापनाच्या निर्णयापासून पंधरा दिवसांच्या आत चौकशी अधिका-याला कळवील. चौकशी समितीचा तिसरा सदस्य हा संबंधित कर्मचा-याचे कोणत्याही खजगी शाळेच्या व्यवस्थापनातील सदस्यांमधून किंवा कर्मचा-यामधून नामनिर्देशीत केलेली व्यक्ती असेल. पोटनियम (एक) मध्ये उल्लेखिलेल्या संस्था प्रमुखांच्या विरुध्द चौकशी चालवायची असे ठरविले असेल तेव्हा चौकशी समितीमधे तीन सदस्य असतील व त्यापैकी एक व्यवस्थापनाचा अध्यक्ष असेल व दुसरे दोन सदस्य हे शाळा समितीचे व संस्था प्रमुखांचे प्रत्येकी एक या प्रमाणे नामनिर्देशीत केलेले सदस्य असतील.

(तीन) व्यवस्थापनाने व शाळा समिती पोटनियम (दोन) नुसार नामनिर्देशीत केलेल्या सदस्यांची नावे व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी नोंदणीकृत पोच देय डाकेने पोटनियम (एक) मध्ये उल्लेखलेल्या कर्मचा-याला किंवा यथास्थिती प्रमुखाला कळवील आणि प्रस्तावित चौकशी

समितीवर त्याच्यावतीने एका व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याचा निदेश देईल. पोटनियम (एक) मध्ये उल्लेखलेल्या प्रमुखाच्या विरुध्द चौकशी करायची असेल त्याबाबत व्यवस्थापनाचा अध्यक्ष शाळा समितीने नामनिर्देशित केलेल्या सदस्यांचे नाव प्रमुखाला कळविल आणि प्रस्तावित समितीवर त्याच्या वतीने एका व्यक्तीचे नामनिर्देशन करण्याचा निदेश देईल. कर्मचारी किंवा यथास्थिती प्रमुख त्याच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या व्यक्तीचे नाव त्या व्यक्तीच्या लेखी संमतीसह व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा यथास्थिती अध्यक्षाला त्यांच्याकडून तसे करण्याबाबतचा निदेश त्याला मिळाल्यापासून पंधरा दिवसांच्या आत त्यांच्याकडे पाठवील.

(चार) कर्मचाऱ्यांचे किंवा यथास्थिती प्रमुखाने आपण नामनिर्देशित केलेल्या व्यक्तीचे नाव कळविले तर व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याला किंवा यथास्थिती अध्यक्षाला ते नाव कळविणारे पत्रे मिळाल्याच्या तारखेपासुन तीन सदस्यांची चौकशी समिती स्थापन झाल्याचे मानण्यात येईल. जर कर्मचा-याने किंवा अशा प्रमुखाने आपल्या निर्देशीत व्यक्तीचे नाव ठराविक मुदतीत कळविण्यात कसूर केली तर ठराविक मुदत संपल्यानंतर पोटनियम (दोन) अन्वये तरतूद केल्याप्रमाणे फक्त दोन सदस्यांची चौकशी समिती स्थापन झाल्याचे मानण्यात येईल.

(पाच) चौकशी समितीचा आमंत्रक पुढीलप्रमाणे असेल-

(१) कोणत्याही कर्मचाऱ्याच्या बाबतीत शाळा समितीने नामनिर्देशित केलेला सदस्य आणि

(२) पोटनियम (१) मध्ये निर्देशिलेल्या प्रमुखाच्या बाबतीत व्यवस्थापनाचा अध्यक्ष असा आमंत्रक चौकशी समितीच्या कामकाजास प्रारंभ करील आणि चौकशी संबंधिचा संबंध अभिलेख ठेवील.

(सहा) चौकशी समितीच्या बैठकी शाळेच्या जागेतच शाळेच्या नेहमीच्या वेळात किंवा कर्मचाऱ्यांची संमती असेल तर शाळा सुटल्यानंतर लगेच किंवा मोठया सुट्टीत घेतल्या जातील.

**(७३) चौकशी संबंधीची कार्यपध्दती:-**

(एक) व्यवस्थापन विनिर्दिष्ट दोषारोपांचा समावेश असणारे दोषारोप पत्र तयार करील आणि ते दोषारोपांच्या विवरणपत्रासह आणि कर्मचाऱ्यांच्या किंवा यथास्थिती प्रमुखांच्या स्पष्टीकरणासह चौकशी समितीच्या आमंत्रकाला सादर करील आणि त्यांच्या प्रति संबंधित कर्मचाऱ्याकडे देखील किंवा प्रमुखाकडे देखील ज्या तारखेला चौकशी समिती स्थापन झाली असल्याचे मानण्यात आले असेल त्या तारखेपासून सात दिवसांच्या आत नोंदणीकृत पोच देय डाकेने पाठवील.

(दोन) (ए) कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिती प्रमुख दोषारोप पत्राच्या आणि दोषारोपांच्या विवरणपत्राच्या प्रती मिळाल्यापासून दहा दिवसांच्या आत पुढीलप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

(एक) जर असा कर्मचारी किंवा यथास्थिती प्रमुख दोषारोपपत्राला कोणेतेही लेखी स्पष्टीकरण देवू इच्छित असेल तर तो ते स्पष्टीकरण चौकशी समितीच्या आमंत्रकाला व्यक्तीश: सादर करील किंवा नोंदणीकृत पोच देय डाकेने पाठवून देईल.

(दोन) व्यवस्थापनाला आणि कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिती प्रमुखाला कोणत्याही साक्षीदाराची तपासणी करण्याची इच्छा असेल तर तो अशा त-हेने ज्या साक्षीदाराची तपासणी करुन इच्छित असेल त्यांची नावे चौकशी समितीच्या आमंत्रकाला लेखी कळवील आणि

(तीन) व्यवस्थापनाला पुराव्या रुपाने कोणेतेही कागदपत्र चौकशी समितीपुढे ठेवण्याची इच्छा असेल तर ते व्यवस्थापन अशा सर्व कागदपत्राच्या सत्य प्रती कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिती प्रमुखाला कळवील. व्यवस्थापन ज्यावर विसंबून आहे, ती कागदपत्रे म्हणजे शाळेची नोंदवही किंवा अभिलेख असेल तर शाळा कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिती प्रमुखाला अशा नोंदवहीतून किंवा अभिलेखातून संबंध उतारे काढण्यास परवानगी देईल. कर्मचारी किंवा यथास्थिती प्रमुख पुराव्याबाबत जी कागदपत्रे तो सादर करणार असेल त्या सर्व कागदपत्रांच्या सत्य प्रती व्यवस्थापनाला देईल.

(बी) खंड (ए) मध्ये विनिर्दिष्ट केलेला १० दिवसांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर तीन दिवसांच्या आत चौकशी समिती चौकशीचे कामकाज चालू करण्यासाठी बैठक घेईल आणि व्यवस्थापनाला आणि कर्मचाऱ्याला किंवा यथास्थिती प्रमुखाला कोणताही पुरावा सादर करावयाचा असेल किंवा साक्षीदारांची तपासणी करावयाची असेल तर त्यासाठी हजर होण्यासंबंधी नोंदणीकृत पोच देय डाकेने १० दिवसांची नोटीस देईल.

(सी) आपला बचाव करण्यासाठी कर्मचाऱ्याला सर्व प्रकारे वाजवी संधी देण्यात आली आहे याची खात्री चौकशी समिती करुन घेईल.

(डी) (एक) व्यवस्थापनाला पुरावा सादर करण्याचा आणि कर्मचाऱ्याच्या वतीने तपासणी केली गेलेल्या साक्षीदाराची उलट तपासणी करण्याचा हक्क असेल.

(दोन) कर्मचाऱ्याला आपली बाजू व्यक्तीश: मांडण्याचा आणि पुष्टी दाखल पुरावा सादर करण्याचा हक्क असेल. तसेच त्याला व्यवस्थापनाच्या वतीने तपासणी केली गेलेल्या साक्षीदारांची उलट तपासणी करण्याचाही हक्क असेल.

(तीन) दोन्ही पक्षांनी कळविलेल्या सर्व साक्षीदारांची उलट तपासणी करण्याची पुरेशी संधी देण्यात येईल.

(ई) चौकशी समितीची सर्व कार्यवाही अभिलिखीत करण्यात येईल आणि ती खरी असल्याचे द्योतक म्हणून दोन्ही पक्षकार साक्षीदारांच्या निवेदनाबरोबरच त्या कार्यवाहीवरही पुष्टीदेखाल स्वाक्षरी

करतील. दोन्हीपैकी एखाद्या पक्षकाराने अशी पुष्टी देण्यास नकार दिल्यास आमंत्रक त्या नकाराची नोंद अभिलिखित करील.

(एफ) सामान्यपणे चौकशी समितीच्या पहिल्या बैठकीची तारीख आणि कर्मचाऱ्याला निलंबित केल्याची तारीख यापैकी जी तारीख अगोदरची असेल त्या तारखेपासून १२० दिवसांच्या आत चौकशी पूर्ण करण्यात येईल. मात्र चौकशी समितीने चौकशी अधिन राहून असणाऱ्या प्रकरणाच्या विशेष परिस्थितीत संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्याच्या पूर्वमान्यतेने चौकशी पूर्ण करण्याचा कालावधी वाढविलेला नसावा. जर अशी चौकशी १२० दिवसांच्या कालावधीत किंवा कालावधी वाढवला असल्यास अशा वाढीव कालावधीत पूर्ण झाला नाही तर तो कर्मचारी निलंबनाधिन असल्याचे बंद होईल आणि तो पुन्हा सेवेत रुजू झाला असल्याचे मानण्यात येईल. असे झाल्यामुळे चौकशी पुढे चालू ठेवण्यास बाधा येणार नाही.

(तीन) व्यवस्थापन आणि कर्मचारी किंवा यथास्थिती प्रमुख हे त्यांच्या कोणत्याही नामनिर्देशित व्यक्ती आणि साक्षीदार असल्यास ते चौकशीच्या वेळी उपस्थित राहतात हे पहावयास जबाबदार असतील. तथापि विवादातील दोहोपैकी एखादा पक्षकार किंवा चौकशी समितीचा किंवा चौकशी समितीचा कोणताही सदस्य कोणत्याही सबळ कारणावरुन अनुपस्थित असल्याबद्दल चौकशी समितीचे समाधान झाले तर चौकशी समिती आपली ती विशिष्ट बैठक स्थगित करील. जर अशा पक्षकार किंवा सदस्य उक्त स्थगित बैठकीस उपस्थित राहू शकला नाही तर संबंधित व्यक्तीच्या अनुपस्थितीतही अशी बैठक पार पाडण्यात येईल.

(चार) चौकशी समितीचा आमंत्रक कार्यवाहीचा सारांक्ष आणि कोणेतेही साक्षीदार असल्यास त्यांच्या निवेदनाच्या प्रती कर्मचा-यांकडे किंवा यथास्थिती प्रमुखाकडे वरील कार्यवाही पूर्ण झाल्यापासून चार दिवसांच्या आत नोंदणीकृत पोच देय ढाकेने पाठवील आणि त्यावर त्याला कोणेतेही स्पष्टीकरण द्यावयाचे असल्यास ते देवू करण्यासाठी सात दिवसांची मुदत राहील.

(पाच) कर्मचारी किंवा यथास्थिती प्रमुख कार्यवाहीचा सारांश इत्यादी मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या कालावधीत आपले आणखी स्पष्टीकरण एकतर व्यक्तीश: किंवा नोंदणीकृत पोच देय डाकेने चौकशी समितीच्या आमंत्रकाकडे सादर करील.

(सहा) असे आणखी स्पष्टीकरण मिळाल्यानंतर किंवा पुर्वेप्ती कालावधीत कोणेतेही स्पष्टीकरण देवू करण्यात आले नाही तर आणखी स्पष्टीकरण मिळण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेनंतर दहा दिवसांच्या आत चौकशी समिती चौकशी पूर्ण करील व त्या कर्मचा-याच्या विरुध्दच्या आरोपाबाबतचे निष्कर्ष आणि या निष्कर्षावर आधारलेला समितीचा निर्णय व त्या कर्मचा-याच्या किंवा यथास्थिती प्रमुखाच्या विरुध्द करावयाच्या विनिर्दिष्ट कार्यवाहीसाठी व्यवस्थापनाला

कळविल. तसेच समिती आपल्या निर्णयाची एक प्रत कर्मचा-यांकडे किंवा यथास्थिती प्रमुखाकडे नोंदणीकृत पोच देय डाकेने पाठवील. निष्कर्षाची व निर्णयाची एक प्रत संबंधित विभागाच्या जिल्हा समाज कल्याण अधिकाऱ्यांकडेही पृष्ठांकित करण्यात येईल. ही प्रत नोंदणीकृत पोच देय डाकेने पाठविता येईल. त्यानंतर व्यवस्थापन चौकशी समितीचा निर्णय कार्यान्वीत करील व ते चौकशी समितीचा निर्णय नोंदणीकृत पोच देय डाकेने मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत आवश्यक ते आदेश काढील. तसेच व्यवस्थापन आपल्या आदेशाची एक प्रत जिल्हा समाज कल्याण अधिकारी किंवा आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना यथास्थिती पृष्ठाकिंत करील.

**(७४) सेवा समाप्त करणे इत्यादी बाबतचा अधिकार:-**

व्यवस्थापन चौकशी समितीचा दर्जा कमी करणे किंवा सेवा समाप्त करणे याबाबतचा निर्णय अंमलात आणण्याचा अधिकार व्यवस्थापन मंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून यथास्थित अध्यक्षाकडून अन्य कोणत्याही दुय्यम प्राधिकाऱ्याकडे सुपूर्द करणार नाही.

(७५) **अपिल व अपिलीय अधिकारी**

(एक) अपंगांकरीता स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या विशेष निवासी/अनिवासी, अनुदानित/विनाअनुदानित शाळा/प्रशिक्षण केंद्रांमधील शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या प्रशासकिय मान्यता, सेवासमाप्ती, बडतर्फी, निलंबन, पदावन्नत्ती, पदोन्नत्ती, वेतनवाढ रोखणे, इत्यादी बाबीं संदर्भात उद्भवणाऱ्या प्रश्नांच्या अनुषंगाने संबंधित व्यथीत कर्मचाऱ्यास सदर आदेश प्राप्तीच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत संबंधित जिल्हयाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे/मुंबई शहर व उपनगर जिल्हयाकरीता प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण मुंबई यांचेकडे अपिलाव्दारे दाद मागता येईल.

(दोन) सदर अपिल अर्जावर अपिलार्थी यथोचितरीत्या स्वत:ची स्वाक्षरी करुन ते तीन प्रतिमध्ये अपिलीय अधिकाऱ्याकडे समक्ष अथवा रजिस्टर पोस्टाने सादर करेल.

(तीन) उक्त नियम (७५) (एक) मधील तरतूदीनुसार मुदतबाहय प्राप्त झालेल्या अपिलाची संबंधित अपिलीय अधिकारी दखल घेणार नाही. तथापि मुदतबाहयरीत्या प्राप्त झालेल्या अपिलाची सदर अपिलीय अधिकारी दखल घेऊ शकेल परंतु अपिल दाखल करण्यास झालेला विलंब अपिलार्थीने सबळ कारण व पुराव्यानिशी सिध्द करणे आवश्यक राहील.

(चार) प्रत्येक अपिलावर अपिलार्थीने आवश्यक न्यायालयीन शुल्क अपिलीय अधिकाऱ्याने ठरविल्याप्रमाणे भरणे बंधनकारक राहील व ते विनापरतावा असेल.

(७६) व्दितीय अपिल/पुर्नरीक्षण अधिकारी

(एक) अपिलीय अधिकाऱ्याचा निर्णय प्राप्त झाल्यानंतर निर्णय मान्य नसलेल्या, वादी अथवा प्रतिवादीस अपिलीय अधिकाऱ्याच्या निर्णया विरुध्द एक महिन्याच्या आत पुर्नरीक्षण अधिकाऱ्याकडे यथास्थिती आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पंधरा दिवसाच्या आत तीन प्रतित व्दितीय अपिल दाखल करता येईल. मुदती नंतर प्राप्त झालेले कालबाहय अपिल दाखल करुन घेण्याचे अथवा फेटाळण्याचे अधिकार पुर्नरीक्षण अधिकाऱ्यांचे राहतील.

(दोन) पुर्नरीक्षण अधिकारी व्दितीय अपिल प्राप्त झाल्यानंतर अर्ध न्यायिक पध्दतीने अपिलावर कार्यवाही करुन निर्णय अपिल कर्त्यास कळवितील.

(तीन) पुर्नरीक्षण अधिकाऱ्याचा निर्णय अंतिम व कायम राहील.

## प्रकरण ५

## सहाय्यक अनुदान

## भाग १

**(७७) सहाय्यक अनुदान व त्यासाठी पात्रता**

(एक) महाराष्ट्र राज्यातील विशेष शिक्षणाबाबत निर्णय घेण्यासाठी शासन निधीतून दर वर्षाला दिल्या जाणाऱ्या पैशाचे सनियंत्रण आयुक्तालयाच्या नियंत्रणाखाली व त्या नियमामध्ये वेळोवेळी ठरवून दिलेल्या शर्तीनुसार केले जाईल.

(दोन) अपंग व्यक्ती अधिनियम २०१६ अन्वये नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त अपंग कल्याण आयुक्तालयाकडून मिळालेल्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृह सहाय्यक अनुदान तत्वावर मान्यता मिळालेल्या असतील तरच त्या अनुदान मिळण्यास पात्र असतील. असे असले तरी अशा संस्थांना अपंग कल्याण आयुक्तालयाकडून मिळणारे अनुदान निधीच्या उपलब्धतेनुसार आणि वेळोवेळी ठरवून दिलेल्या अनुज्ञेय बाबींवरील मंजूर खर्चावर शासनाने वेळोवेळी विहित केलेल्या दराने दिले जाईल.

(तीन) विना अनुदान तत्वावर मान्यता मिळालेल्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहांना जो पर्यंत शासनाकडून अनुदान तत्वावर मान्यता मिळणार नाही तो पर्यंत त्या शासनाकडून कोणतेही सहाय्यक अनुदान देय राहणार नाही.

(चार) सहाय्यक अनुदान तत्वावर मान्यता मिळालेल्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृह केवळ अशी मान्यता चालू असे पर्यंत/ नोंदणी प्रमाणपत्र असे पर्यंत अनुदान मिळण्यास पात्र असतील.

(पाच) अपंग कल्याण आयुक्तालयाकडून वेळोवेळी ठरवून दिलेल्या मान्य बाबींवर वेतनेत्तर अनुदानाचे मुल्यनिर्धारण प्रतिवर्षी जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण,

मुंबई शहर/उपनगर कार्यालयामार्फत करण्यात येईत मूल्यनिर्धारणाअंती निर्धारित केलेली वेतनेत्तर अनुदानाची रक्कम (वेतनत्तर, इमारत भाडे व परिपोषण) शासनाकडून त्या-त्या वर्षी प्रत्यक्ष प्राप्त निधीच्या उपलब्धतेनुसार संस्थांना वितरीत करण्यात येईल.

(सहा) सहाय्यक अनुदान (वेतन वगळून) संस्थेच्या खात्यावर अनुदानाची रक्कम वितरीत करण्यात येईल.

(सात) विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहाने खर्चाचे सनदी लेखापालाकडून प्रतिवर्षी ३१ जुलै पुर्वी लेखापरिक्षण अहवाल तयार करुन घ्यावा व मुल्यनिर्धारणासाठी लेखापरिक्षण अहवालासह प्रस्ताव संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर कार्यालयास ३१ ऑगस्ट पुर्वी सादर करावा. मुल्यनिर्धारणाचा अहवाल सादर झाल्यानंतर जानेवारी अखेर संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर यांनी मुल्यनिर्धारणाचे कामकाज पुर्ण करून आपल्या जिल्हयातील विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृह निहाय मुल्यनिर्धारणाप्रमाणे वेतनेत्तर अनुदानाच्या देय रकमा बाब निहाय (वेतनत्तर, इमारत भाडे व परिपोषण) मुल्यनिर्धारण अहवालासह आयुक्तालयास सादर कराव्यात आयुक्तालयाकडून अहवालाची पडताळणी करुन देय असणाऱ्या वेतनेत्तर अनुदाच्या रक्कमा निधीच्या उपलब्धतेनुसार संस्थेच्या खात्यात जमा करण्यात येईल.

(आठ) मागील वर्षाच्या मुल्यनिर्धारण रक्कमेच्या कमाल ६०% (साठ टक्के) अथवा निधीच्या उपलब्धतेप्रमाणे तदर्थ स्वरुपात शैक्षणिक वर्षाच्या प्रथम सत्रात आयुक्तालयामार्फत संस्थेच्या वेतनेत्तर खाती RTGS प्रणालीव्दारे अदा करण्यात येईल व मुल्यनिर्धारण झाल्यानंतर उर्वरित रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार उक्त प्रमाणे अदा करण्यात येईल.

(नऊ) संस्थांनी उक्त कालावधीत सनदी लेखापालाच्या लेखापरिक्षण अहवालासह मुल्यनिर्धारणाचा प्रस्ताव संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर कार्यालयास वेळेत सादर न केल्यास ३१ जुलै नंतर अहवाल सादर करेपर्यंत प्रतिमहिना मुल्यनिर्धारण रकमेच्या पाच टक्के रक्कम दंड म्हणून वसूल करण्यात येईल. संबंधित आर्थिक वर्ष संपल्यानंतर लेखापरिक्षण अहवाल मुल्यनिर्धारण प्रस्ताव सादर करणाऱ्या संस्थांना त्या वर्षाचे वेतनेत्तर अनुदान दिले जाणार नाही.

(दहा) ज्या संस्थांना केंद्र शासनाकडून सहाय्यक अनुदान योजनेतून ज्या बाबींवर अनुदान मिळते त्या बाबींवर राज्य शासनाकडून अनुदान मिळणार नाही. अशा बाबींवर संबंधित संस्थेने राज्य शासनाकडून अनुदान घेतल्याचे निदर्शनास आल्यास सदरची रक्कम वसूल पात्र असेल आणि

सदरची संस्था काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल. याशिवाय सदर संस्थेचे विश्वस्त मंडळ वैयक्तिक व सामुहीकरीत्या दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

(अकरा) अनुदान मंजूर करणे वा नाकारणे हा शासनाचा विशेष अधिकार असल्याने एखादया किंवा अनेक विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राकरीता अपंग कल्याण आयुक्तालयाने अथवा शासन आदेशाने संबंधित अधिकारीतेकडून शासनाकडे अनुदान मंजूरीसाठी शिफारस केली म्हणजे सदर विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र सहाय्यक अनुदानाकरीता पात्र ठरले असे संबोधता येणार नाही.

**भाग २**

**(७८) वेतन**

(एक) अनुदान तत्वावर मान्यता असलेल्या नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त व वैद्यता कालावधीतील विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व मतिमंद बालगृहातील मान्यता प्राप्त पुर्णवेळ, अर्धवेळ, अंशकालीन आणि मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांचे समाज सेवार्थ या संगणकीय प्रणालीप्रमाणे दरमहा १००% (शंभर टक्के) अदा करण्यात येईल. सोबतचे (परिशिष्ट ४) पहावे. सदर परिशिष्टातील शासन निर्णयात वेळोवेळी झालेले बदल या सदरी लागू राहतील.

(दोन) कर्मचाऱ्यांस सध्या स्थितीतील देय असलेल्या वेतनश्रेणी प्रमाणे (सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेण्या) वेतन अदा केले जाईल. वेतन श्रेण्यांचा शासन निर्णय (परिशिष्ट ५) जोडला आहे.

(तीन) शिक्षक (मुख्याध्यापक, विशेष शिक्षक, कला शिक्षक) या प्रत्यक्ष विद्याविषयक काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना चटोपाध्याय आयोगाच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू राहतील हया (परिशिष्ट ६) जोडलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील यामध्ये वेळोवेळी शासन सुधारणा करेल त्या सुधारणा लागू राहतील.

(चार) शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगति योजनेच्या वेतनश्रेणीचा लाभ (परिशिष्ट ७) जोडलेल्या शासन निर्णयाप्रमाणे राहतील यामध्ये वेळोवेळी शासन सुधारणा करेल त्या सुधारणा लागू राहतील.

(पाच) कर्मचाऱ्यांच्या वेतनश्रेणीमध्ये बदल झाल्यास विहित पध्दतीने त्यांची वेतननिश्चिती करुन आयुक्तालयातील वेतन व वेतननिश्चिती पथकाकडून पडताळणी करुन घ्यावी लागेल.

## भाग ३
## वेतनेत्तर अनुदान
## आकस्मिक/संकिर्ण खर्च

(७९) अनुदानतत्वावर मान्यता असलेल्या नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त व वैधता कालावधीतील विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्रातील मान्यता प्राप्त पुर्णवेळ, अर्धवेळ, अंशकालीन आणि मानधन तत्वावरील कर्मचाऱ्यांच्या एकुण त्या u त्या वर्षात प्रत्यक्ष अदा केलेल्या वेतनाच्या (Gross Salary) ८ % (आठ टक्के) राहील अथवा शासन वेळोवेळी निर्धारित करेल त्या दराने अनुज्ञेय राहील.

(एक) उक्त आकस्मिक / संकीर्ण खर्च हा एकूण ८% (आठ टक्के) च्या मर्यादेत प्रत्येक शैक्षणिक बाबींवर ७०% (सत्तर टक्के) व अशैक्षणिक बाबींवर ३०% (तीस टक्के) खर्च समप्रमाणात करणे अनिवार्य राहील. शैक्षणिक व अशैक्षणिक बाबींकरीता सोबतचे (परिशिष्ट ८) पहावे.

(दोन) न्यायालयीन बाबींवर केलेला प्रवास खर्च, वकिला फी, न्यायालयाची फी, न्यायालयीन प्रकरणासाठीचा स्टेशनरी व झेरॉक्सचा खर्च व न्यायालयाने विशिष्ट प्रकरणी दंड आकारल्यास दंडाची रक्कम अनुज्ञेय राहणार नाही.

## इमारत भाडे

(८०) **विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व/किंवा संलग्न वसतिगृहाच्या इमारतीची रचना**

(एक) अनिवासी विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राकरीता किमान ४० चौ. फूट प्रति विदयार्थी असणे आवश्यक आहे. त्यामध्ये विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राचे कार्यालय, वर्ग खोल्या, स्नानगृहे, शौचालय, अभ्यागत व कर्मचारी कक्ष, सभागृह, इत्यादी बाबी अंतर्भूत राहतील. परंतु, कमाल मर्यादेपेक्षा जास्तीच्या जागेकरीता इमारतीचे भाडे अनुज्ञेय राहणार नाही.

(दोन) निवासी विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र/संलग्न वसतिगृहाची इमारत किमान ६० चौ. फूट व कमाल १०० चौ. फूट प्रति विदयार्थी असणे आवश्यक आहे. यात विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राचे कार्यालय, वर्ग खोल्या, स्नानगृहे, शौचालय, अभ्यागत व कर्मचारी कक्ष, सभागृह, भोजनगृह, निवासगृह इत्यादी बाबी अंतर्भूत राहतील. परंतु, कमाल मर्यादेपेक्षा जास्तीच्या जागेकरीता इमारतीचे भाडे अनुज्ञेय राहणार नाही.

(तीन) वरील मान्य क्षेत्रफळाच्या इमारतीचे भाडे कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रमाणीत केलेल्या भाडे प्रमाणपत्रा प्रमाणे प्रत्यक्षात अदा केलेल्या इमारत भाडयाच्या ७५ टक्के या पैकी जे कमी असले ते किंवा शासन वेळोवेळी जे दर निश्चित करेल त्या दराने व मान्य विदयार्थी/प्रशिक्षणार्थीच्या प्रमाणात संस्थेस अनुज्ञेय राहील.

सोबतचे (परिशिष्ट ९) पहावे.

(चार) विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व/किंवा संलग्न वसतिगृहाची इमारत संस्थेच्या स्वमालकीची तसेच विनामुल्य वापरण्यास मिळालेली असल्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रमाणित केलेल्या मुल्यांकनाच्या ७.५ टक्के (साडेसात टक्के) इमारत देखभाल/दुरुस्ती खर्च अनुदान अनुज्ञेय राहील. तथापि सदर इमारती करीता संस्थेने जो प्रत्यक्ष खर्च केलेला आहे

तो किंवा मुल्यांकनाच्या ७.५ टक्के (साडेसात टक्के) या पैकी जी रक्कम कमी असेल ती रक्कम मुल्य निर्धारणामध्ये व मान्य विदयार्थी/प्रशिक्षणार्थींच्या प्रमाणात संस्थेस देय राहील.

(पाच) परंतु सदर दुरुस्ती/देखभालीचा खर्च संबंधित असल्यास कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी प्रमाणित केलेला असणे बंधनकारक राहील.

(सहा) ज्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व/किंवा संलग्न वसतिगृहाची इमारत समुचित शासनाच्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, समुचित शासनाच्या अंगिकृत उपक्रम अथवा महामंडळाच्या निधीतून किंवा लोकप्रतिनिधीच्या निधीतून बांधण्यात आलेली असल्यास अशा इमारतींना उक्त नियम (चार) व (पाच) मधील तरतूदी लागू राहतील.

(सात) ज्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व/किंवा संलग्न वसतिगृहाची इमारत संबंधित पालक संस्थेच्या कार्यकारी मंडळातील विश्वस्तांच्या मालकी हक्क वहीवाटीची असेल व ती इमारत संबंधित पदाधिकाऱ्याने सदरच्या विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व/किंवा संलग्न वसतिगृहाकरीता संबंधित संस्थेस भाडेतत्वावर दिलेली असेल अशा इमारतींना देखिल उक्त नियम (तीन) मधील तरतूदी लागू राहतील.

(आठ) वरील नियम (एक), (चार) व (पाच) मध्ये नमूद केलेल्या इमारतींचे ग्रामपंचायत, नगरपालिका, महानगरपालिका, प्राधिकरण, छावणी इ स्थानिक स्वराज्य संस्थांचे मालमत्ता कर हे वेतनेत्तर अनुदानातून देय राहतील.

**(८१) परिपोषण**

(एक) निवासी शाळा/प्रशिक्षण केंद्रातील मान्य अनुदानित विद्यार्थी संख्येसाठी अंध, कर्णबधिर व अस्थिव्यंग निवासी विद्यार्थ्यांना दरमहा रु. ९००/- प्रति विद्यार्थी या दराने व मतिमंद व आत्मकेंद्रीता निवासी विद्यार्थ्यांना रु. ९९०/- या दराने परिपोषण अनुदान देण्यात येईल. मतिमंद बालगृहातील प्रवेशितांना दरमहा रु. २०००/- प्रति लाभार्थी या दराने परिपोषण अनुदान अनुज्ञेय राहील. हे दर शासन वेळोवेळी बदल करेल ते लागू राहतील. परिपोषण अनुदानाची परिगणना हजेरीप्रमाणे करण्यात येईल.

(दोन) वेतनेत्तर अनुदानाचे (आकस्मिक/संकिर्ण खर्च, इमारत भाडे/इमारत दुरुस्ती खर्च व परिपोषण) मुल्यनिर्धारण सोबतच्या (परिशिष्ट - ८) प्रमाणे

## प्रकरण ६ संकीर्ण

### भाग १

**(८२) उपक्रमाचे अभिलेख, नोंदवह्या जतन करणे, अद्यावत ठेवणे व तपासणी**

(एक) कायम स्वरुपी विना अनुदानित, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्पांमध्ये ठेवण्यात येणारे नोंदवह्या व अभिलेख (परिशिष्ट - १०) मध्ये दर्शविल्याप्रमाणे ठेवणे हे सदर उपक्रमाचे मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक यांचेवर बंधनकारक राहील.

(दोन) सदरचे अभिलेख तपासणी अधिकाऱ्यांस अथवा वरीष्ठ कार्यालयास मागणी केल्याप्रमाणे पडताळणीसाठी उपलब्ध करून देईल.

(तीन) मागणी केलेले अभिलेख पडताळणीसाठी उपलब्ध करून न दिल्यास संबंधित मुख्याध्यापक/ व्यवस्थापकीय अधिक्षक हे या संहितेतील शास्तीच्या नियमानुसार कारवाईस पात्र राहतील.

(चार) सदरचे अभिलेख व उपक्रम हे कोणत्याही वेळी निरिक्षण अधिकाऱ्यास पडताळणी व तपासणीसाठी खुले राहतील.

### भाग २

**(८३) उपक्रमांचे हस्तांतर व स्थलांतर**

(एक) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्यता प्राप्त व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त अपंगांच्या कायम स्वरुपी विना अनुदानित, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृहांचे हस्तांतर व स्थलांतर संस्थेस करावयाचे असल्यास (परिशिष्ट ॥ ११) मधील शासन निर्णय दिनांक १६.०९.२०१७ अथवा शासन यामध्ये वेळोवेळी सुधारणा करेल त्याप्रमाणे करण्यात येईल.

(दोन) सक्षम प्राधिकाऱ्याच्या मान्यतेशिवाय संस्थेने वरील उपक्रम हस्तांतर व स्थलांतर केल्यास संबधित संस्थेस त्या त्या उपक्रमाकरिता दिलेले नोंदणी प्रमाणपत्र रद्द करण्यात येईल व शासनाकडून देण्यात येणारे अनुदान तात्काळ बंद करण्यात येईल.

### भाग ३

**(८४) प्रशासक नियुक्ती**

(एक) स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या शासन मान्यता प्राप्त व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त कायम स्वरुपी विना अनुदानित, विना अनुदानित, अनुदानित विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृहावर (परिशिष्ट - १२) मधील शासन निर्णय दिनांक ०९ मार्च २००४ मध्ये दिलेल्या तरतुदींप्रमाणे तसेच यामध्ये वेळोवेळी सुधारणा करेल त्याप्रमाणे प्रशासक नियुक्त करण्यात येईल.

## भाग ४

### (८५) भविष्य निर्वाह निधी

(एक) शासन मान्यता प्राप्त नियमित वेतनश्रेणीतील पुर्णवेळ कर्मचाऱ्यांची नियुक्ती १ नोव्हेंबर २००५ पुर्वीची असल्यास त्यांना सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधीची योजना लागू राहील व ०१ नोव्हेंबर २००५ नंतर मान्य पदावर नवीन नियुक्ती असल्यास अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजना लागू राहील. योजनेचे वर्गणीदार होणे अंतरीम परताव व ना-परतावा रक्कमा काढणे सेवानिवृत्ती नंतर अंतिम रक्कम काढून घेणे याबाबतची कार्यपध्दती (परिशिष्ट १३) प्रमाणे राहील यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करतील ते लागू राहतील.

## भाग ५

### (८६) रजा प्रवास सवलत व स्वग्राम सवलत

(एक) विशेष शाळा व प्रशिण केंद्र संलग्न वसतिगृह मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांना रजा प्रवास व स्वग्राम सवलत योजनेचा लाभ शासन निर्णय (परिशिष्ट - १४) जोडला आहे. त्याप्रमाणे अनुज्ञेय राहील यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करतील ते लागू राहतील.

## भाग ६

### (८७) वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती

(एक) विशेष शाळा संलग्न वसतिगृह मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांना वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजनेचा लाभ शासन निर्णय (परिशिष्ट १५) जोडला आहे. त्याप्रमाणे अनुज्ञेय राहील यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करतील ते लागू राहतील.

## भाग ७

### (८८) अनुकंपा तत्वावर नियुक्ती

(एक) विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती योजनेचा शासन निर्णय (परिशिष्ट १६) जोडला आहे. त्याप्रमाणे अनुज्ञेय राहील यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करतील ते लागू राहतील.

## भाग ८

### (८९) वाचक भत्ता

(एक) विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्रातील अंधत्व असलेल्या शिक्षक कर्मचाऱ्यांना (मुख्याध्यापक, विशेष शिक्षक, कला शिक्षक, निदेशक,) वाचक भत्ता शासन निर्णय (परिशिष्ट ८ २) तील अनुज्ञेय राहील यामध्ये शासन वेळोवेळी जे बदल करतील ते लागू राहतील.

## भाग ९

### (९०) शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बदल्या/सेवा वर्ग

(एक) शासन मान्य मंजूर रिक्त पदावर संस्था रुजू करून घेण्यास तयार असल्यास व शिक्षक आणि शिक्षकेत्तर संवर्गातील मान्यता प्राप्त कर्मचाऱ्यांची बदलीसाठी विनंती असल्यास संबंधित कर्मचाऱ्यांचा बदली विनंती अर्ज संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर, उपनगर यांच्या मार्फत आयुक्तालयास सादर करतील. आयुक्तालय स्तरावर विनंती अर्जा प्रमाणे यादी ठेवली जाईल व त्याप्रमाणे संबंधित कर्मचाऱ्यास रुजू करून घेण्यास तयार असलेल्या संस्थे द्वारा संचालित अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह व बालगृहामध्ये रिक्त जागा उपलब्ध असल्यास त्याठिकाणी आयुक्तालय स्तरावरुन बदलीचे आदेश निर्गमित केले जातील. अशा बदली झालेल्या कर्मचाऱ्यास कार्यमुक्त करणे व रुजू करुन घेणे दोन्ही संबंधित संस्थेस बंधनकारक राहील. बदलीचे आदेश निर्गमित करतांना दिव्यांग कर्मचाऱ्यास विशेष प्राधान्य दिल्या जाईल तसेच आवश्यक शैषणिक अहर्ता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्याची समकक्ष व समान वेतन श्रेणीतील पदावर विनंती बदली प्राधान्याने करण्यात येईल. या मधेही अपंग कर्मचाऱ्यास विशेष प्राधान्य देण्यात येईल.

(दोन) विनंत्या बदल्याचे आदेश प्रतिवर्षी मे महिन्यामध्ये ३१ मे पुर्वी निगर्मित केले जातील.

(तीन) विनंत्या बदल्या असल्यामुळे बदली भत्ता, वाहतुक भत्ता, प्रवास खर्च व रुजू कालावधी अनुज्ञेय राहणार नाही.

(चार) एकाच संस्थेच्या एकापेक्षा जास्त विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र संलग्न वसतिगृह असल्यास बदल करण्याचे अधिकार हे संबंधित संस्थेच्या व्यवस्थापनास राहतील. अशा बदल्या शासकिय कर्मचाऱ्यांचे कर्तव्य व बदल्यांचे विनियमन अधिनियम २००५ मधील तरतुदींप्रमाणे करण्यात यावे. बदली आदेश निर्गमित करण्यापुर्वी संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/उपनगर यांनि लेखी परवानगी द्यावी.

(पाच) बदली झालेल्या कर्मचाऱ्यांस वेतन व भत्ते त्यांच्या मागील संस्थेतील कार्यमुक्ती प्रमाणपत्रा प्रमाणे मागील वेतना एवढे राहील तसेच मागील मान्यता प्राप्त सेवा कालावधी सर्व प्रयोजनासाठी सेवा कालावधी समजण्यात येईल मात्र विनंती बदलीच्या बाबतीत सेवाजेष्ठतेचा लाभ मिळणार नाही.

(सहा) एकाच पालक संस्थेच्या एकापेक्षा अधिक शाळा/प्रशिक्षण केंद्र असतील, अशा शाळा प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक, निदेशक/शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचे अधिकार व्यवस्थापनास राहतील. मात्र विशेष शिक्षक कर्मचाऱ्यांची बदली त्याच प्रवर्गाच्या शाळेत/कर्मशाळेत करता येईल,

(सात) आवश्यकता व उपयोगिता लक्षात घेऊन विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र मधिल कोणत्याही कर्मचाऱ्यांची सेवा आयुक्तालयच्या मान्यतेने अपंगाच्या विविध उपक्रमासाठी वर्ग करता येईल. मात्र सदर कर्मचाऱ्यांस वेतन व भत्ते मुळ आस्थापना देईल.

(आठ) बदलीमुळे व्यथित झालेला कर्मचारी आयुक्त अपंग कल्याण यांचेकडे अपिल करू शकेल.

## भाग १०

### (९१) अतिरिक्त संवर्ग कक्ष

(एक) वित्त विभागाचा शासन निर्णय, दि. १०/०९/२००१ अन्वये आयुक्तालय स्तरावर राज्यस्तरीय अतिरीक्त संवर्ग कक्ष सामाजिक न्याय विभागाचा शा.नि. दि. २५/१०/२०१२ अन्वये स्थापन करण्यात येईल उक्त शासन निर्णयातील शासन निर्देशानुसार अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृहातील मान्यता प्राप्त शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची संवर्ग निहाय व ज्येष्ठता निहाय प्रतिक्षा यादी तयार करुन सदर यादीवरील कर्मचाऱ्यांचे रिक्त पदांवर समायोजन करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. सोबतचे परिशिष्ट पहावे.

(दोन) नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे अथवा शासन मान्यता रद्द केल्यामुळे बंद झालेल्या अनुदानित शाळा/प्रशिक्षण केंद्र व संलग्नीत वसतिगृहातील कर्मचाऱ्यांची नोकरी संपुष्टात आल्याच्या तारखेप्रमाणे अपंग कल्याण आयुक्तालय स्तरावर पदांच्या संवर्गा प्रमाणे प्रतिक्षा यादी मा. न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे तयार करण्यात येईल. जसजशी अनुदानित विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्र व संलग्नीत वसतिगृह आणि मतिमंद बालगृहात रिक्त पदे होतील तसतसे या पदावर प्रतिक्षा यादीवरील कर्मचाऱ्यांचे समायोजन करण्याची प्रक्रिया राबविण्यात येईल. शाळा/प्रशिक्षण केंद्र बंद पडल्याच्या तारखेपासून ते समायोजनाने प्रत्यक्ष कामावर हजर होण्याच्या कालावधीतील वेतन अनुज्ञेय राहणार नाही. सदरचा कालावधी हा अभावित सेवा म्हणून गणला जाईल. या कालावधीतील सेवा शासन निर्णय दिनांक २७.०१.२००४ मधील शासन निर्देशानुसार नियमित करण्यात येतील.

(तीन) कर्मचाऱ्यांच्या चुकांमुळे शाळा / केंद्र बंद पडल्यास समायोजनाचा हक्क राहणार नाही.

(चार) मंजूर रिक्त पदाकरिता आवश्यक शैषणिक अहर्ता धारण करणाऱ्या अतिरिक्त कर्मचाऱ्यांचे समायोजन समान वेतन श्रेणी असलेल्या समकक्ष पदावर करण्यात येईल.

## भाग ११

### (९२) स्पर्धा, शिबीरे इतर प्रशिक्षण विषयक उपक्रम

(एक) समाज कल्याण विभागाची मान्यता असणाऱ्या संस्थामार्फत अपंग विद्यार्थी/प्रशिक्षणार्थीसाठी घेण्यात येणाऱ्या शैक्षणिक/व्यक्तीमत्व विकास शिबीरे तसेच पुनर्वसन शिबीरे आयोजित करण्यात येतात, अशा शिबीरांमध्ये सहभाग घेण्यास संस्थांना परवानगी असेल. परंतु संयोजक संस्थेने त्यासाठी प्रथम संबंधित जिल्हा समाज कल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर यांची पुर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे.

(दोन) पुणे येथील बाल कल्याण संस्थेमार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांना अशा पुर्व परवानगीची आवश्यकता नाही.

(तीन) विशेष शिक्षकांना उपचारक, तंत्रज्ञ व प्रशिक्षित समाजसेवक यांना भारतीय पुनर्वास परिषदेकडे नोंदणी करणे बंधनकारक राहील. विशेष शिक्षकांना नोंदणी केल्यानंतर भारतीय पुनर्वास

परिषदेकडे वेळेवेळी प्रमाणपत्राचे नुतनीकरण करणे आवश्यक आहे त्यानुसार भारतीय पुनर्वास परिषदेने आयोजित केल्याला सी.आर.ई. प्रशिक्षणास उपस्थित राहावे लागेल. उपचारक, तंत्रज्ञ व प्रशिक्षित समाजसेवक यांना आयुक्त अपंग कल्याण पुणे यांनी नामनिर्देशित केल्यास अपंग व्यक्तीचा राष्ट्रीय संस्थांनी आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रम, चर्चासत्र, कार्यशाळा यांना उपस्थित राहावे लागेल.

(चार) प्रतिवर्षी जिल्हा समाज कल्याण अधिकारी/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/उपनगर मार्फत गायन, वादन, न्रृत्य, चित्रकला, हस्तकला, खेळ, शैक्षणिक साहीत्य इ. स्पर्धा, शिबीरे आयोजित करण्यात येतील जिल्हा स्तरावर प्रथम येणाऱ्या स्पर्धकाची राज्यस्तरीय स्पर्धा आयुक्त अपंग कल्याण पुणे हे आयोजित करतील त्यासाठी अपंगाचे कल्याण करिता राखून ठेवण्यात आलेला ३% निधि वापरता येईल.

## भाग – १२

### (९३) **राजीनामा**

(एक) नियमित कर्मचारी ९० दिवसांची नोटीस दिल्यानंतर सेवामुक्त होवू शकेल. आणि तात्पुरत्या कर्मचारी ३० दिवसांची नोटीस दिल्यानंतर सेवामुक्त होवू शकेल. तथापी, कर्मचा-यांस नोटीस देण्याऐवजी तीन महिन्याचा किंवा यथास्थिती एक महिन्याच्या वेतनाची रक्कम (भत्ते वगळून) दिल्यानंतर कर्मचा-याला सेवामुक्त होण्यास व्यवस्थापन परवानगी देवू शकेल. नोटीशीऐवजी द्यावयाची रक्कम नोटीशीचा कालावधी जितक्या कालावधीने कमी असेल तितक्या कालावधीच्या वेतनाइतकी मर्यादित असेल.

(दोन) जर कोणत्याही व्यवस्थापनाने पोट नियम (७६) (एक) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे योग्य नोटीस न देता किंवा नोटीस देण्या ऐवजी द्यावयाची वेतनाची रक्कम न देता अगोदरच एखाद्या कर्मचा-याला सेवामुक्त होण्याची परवानगी दिली असेल तर नोटीशीऐवजी द्यावयाच्या वेतनाची तेवढया प्रमाणातील रक्कम संबंधित शाळेला देय असलेल्या अनुदानातून वजा करण्यात येईल.

(तीन) मोठी सुट्टी मिळण्यास पात्र असणारा कर्मचारी मोठया सुट्टीच्या काळात किंवा मोठ्ठया सुट्टीच्या काही भागाचा समावेश होईल अशा काळात राजीनाम्याची नोटीस देणार नाही. राजीनाम्याची नोटीस वर्षाचे पहिले सत्र सुरु झाल्यानंतर एक महिन्याच्या आत देण्यात येणार नाही.

## भाग १३

### (९४) सेवानिवृत्ती व सेवानिवृत्ती वेतन

(एक) कायम स्वरुपी विना अनुदानित, विना अनुदानित, अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा व प्रशिक्षण केंद्र, संलग्न वसतिगृह, मतिमंद बालगृह, शिघ्र निदान व शिघ्र उपचार केंद्र, पुनर्वसन प्रकल्पांतील वर्ग ८ ३ पेक्षा कमी नाही अशा कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय वर्षे ५८ राहील व चतुर्थ श्रेणीतील कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीचे वय वर्षे ६० राहील.

(दोन) अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा, प्रशिक्षण केंद्र व संलग्न वसतिगृहातील नियमित वेतन श्रेणीतील पुर्ण वेळ कर्मचाऱ्यांना स्वेच्छा सेवानिवृत्ती व नियत वयोमानानुसार सेवानिवृत्ती वेतन ८ नि- उपदान ची योजना (परिशिष्ट ३) मधील शासन निर्णयाप्रमाणे राहील. शासन यामध्ये वेळोवेळी बदल करेल त्याप्रमाणे लागू राहील.

## भाग १४

### (९५) सेवाखंड क्षमापीत करणे

(एक) अपंगांच्या विशेष शाळा, प्रशिक्षण केंद्र व संलग्न वसतिगृहातील कर्मचाऱ्यांचे सेवा कालावधीतील सेवाखंड हे शासन निर्णय दिनांक १ फेब्रुवारी १९८४ च्या शासन निर्णयात नमूद केल्याप्रमाणे क्षमापीत करण्यात येतील. यासाठी संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी हे सक्षम प्राधिकारी असतील. सेवानिवृत्ती वेतन ठरवताना अर्हता प्राप्त सेवाकाळाची गणना करण्यासाठी सेवा ग्राहय धराण्यासाठी सेवाखंड क्षमापित करण्यात येईल. सेवाखंड क्षमापन हे वेतनवाढ चटोपाध्याय आयोगाची त्रिस्तरीय वेतनश्रेणी, कालबध्द अथवा अश्वासित प्रगति योजनेसाठी ग्राहय धरला जाणार नाही.

## भाग १५

### (९६) सेवा ज्येष्ठता सुची:-

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अनुज्ञाप्ती असलेल्या आणि मान्यताप्राप्त अनुदानित शाळा/प्रशिक्षण केंद्रातील शिक्षक/शिक्षकेत्तर, निदेशक आणि निदेशकेतर कर्मचा-यांची सेवा ज्येष्ठता सूची संवर्गनिहाय अद्यावत ठेवणे बंधनकारक आहे. सेवा ज्येष्ठते संदर्भातील तत्वे परिशिष्ट १७ मध्ये देण्यात आली आहेत.

| | |
|---|---|
| परिशिष्ट 1 | नोंदणी प्रमाणपत्र घेण्यासाठीचा अर्ज |
| परिशिष्ट 2 | शासन निर्णय क्रमांक इडीडी-2003/प्र.क्र.340/भाग-3/सुधार-2 दि. 18 ऑगस्ट 2004 व दिनांक 30/01/2006 |
| परिशिष्ट 3 | सेवानिवृत्ती वेतन - नि- उपदान |
| परिशिष्ट 4 | समाज सेवार्थ या संगणकीय प्रणालीव्दारे वेतन अदा करणे |
| परिशिष्ट 5 | सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीचा शासन निर्णय |
| परिशिष्ट 6 | चटोपाध्याय आयोगाच्या त्रिस्तरीय वेतनश्रेणी |
| परिशिष्ट 7 | कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगति योजनेच्या वेतनश्रेणी |
| परिशिष्ट 8 | अनुदान निर्धारण तक्ता |
| परिशिष्ट 9 | इमारतीचे भाडे |
| परिशिष्ट 10 | नोंद वहया व अभिलेखाचे जतन |
| परिशिष्ट 11 | हस्तांतर व स्थलांतर |
| परिशिष्ट 12 | प्रशासक नियुक्त |
| परिशिष्ट 13 | भनिनि अंतिम रक्कम काढून घेणे बाबतची कार्यपध्दती |
| परिशिष्ट 14 | रजा प्रवास व स्वग्राम सवलत योजना |
| परिशिष्ट 15 | वैद्यकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना |
| परिशिष्ट 16 | अनुकंपा तत्वावर नियुक्ती योजना |

## परिशिष्ट १

अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हया कायद्यातील कलम ५१ नुसार अपंग क्षेत्रात कार्य करीत असलेल्या/ कार्य करू इच्छिणाऱ्या स्वयंसेवी संस्थांनी अपंग क्षेत्रात काम करण्यासाठी अनुज्ञाप्ती प्राप्त करून घ्यावयासाठी करावयाचा अर्ज.

---

सुचना : **दिनांक ०७ फेब्रुवारी १९९६ नंतर अपंग क्षेत्रात कार्य करू इच्छिणाऱ्या नवीन स्वयंसेवी संस्थांनी भरावयाचे रकाने अ. क्र. १ ते ६, ९ ते १२, १४ ते १९, २२, २३, २५, ३२, ३३, ४८, ४९, ५४, ५७.**

प्रति,
**सक्षम प्राधिकारी, तथा**
**आयुक्त,**
अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य,
३, चर्च रोड,
पुणे ४११ ००१.

विषय : अपंग क्षेत्रात काम करण्यास अनुज्ञाप्ती मिळण्याबाबत.

संदर्भ : १. केंद्रीय कायदा अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५.
२. अपंग शाळा संहिता.

व्दारा : जिल्हा समाज कल्याण अधिकारी, ..............जिल्हा परिषद, ..................

महोदय,

वरील विषयाबाबत संदर्भिय कायद्यान्वये अर्ज करण्यात येतो की, आमची .................................................. ................................................................................................ ही संस्था अपंग शिक्षण व पुनर्वसन क्षेत्रात.............................................................................. हा उपक्रम दिनांक ........................पासून राबवित आहे/राबवू इच्छित आहे. संदर्भिय केंद्रीय कायद्यानुसार आमच्या संस्थेस अनुज्ञाप्ती मिळणेबाबत अर्ज सादर करण्यात येत असून त्या अनुषंगाने खालील बाबी नमूद करण्यात येत आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ | संस्थेचे पूर्ण नांव<br>पत्ता<br><br>दूरध्वनी क्रमांक | |
| २ | संस्थेची स्थापना दिनांक | |
| ३ | संस्थेचा कार्यक्षेत्र | |
| ४ | संस्था खालील कायद्यांतर्गत नोंदणीकृत असल्याबाबतचे क्रमांक व दिनांक नमूद करावेत व सोबत सांक्षाकिंत प्रती जोडाव्यात. | |
| | अ) संस्था सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट १८६० | |
| | ब) सार्वजनिक विश्‍वस्त अधिनियम १९५० | |
| ५ | संस्थेची घटना, नियमावली, उद्देश आणि कार्यकारी मंडळाची सूची संबंधित सहाय्यक धर्मादाय आयुक्त हयांनी प्रमाणित केलेली आहे काय? | होय/नाही |
| ६ | संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या/येणाऱ्या उपक्रमाचा प्रकार व ठिकाण | अ) शाळा/कर्मशाळा<br><br>ब) अंध/ मुकबधिर/ अस्थिव्यंग/ मतिमंद<br><br>क) निवासी/अनिवासी<br><br>ड) गांव तालुका जिल्हा |
| ७ | संस्थेमार्फत चालविण्यात येत असलेल्या शाळा/कर्मशाळेस मान्यता दिल्याबाबतचे आदेश क्रमांक व दिनांक नमूद करावेत. | विना अनुदानित आदेश क्रमांक व दिनांक<br>अनुदानित आदेश क्रमांक व दिनांक<br>(सोबत साक्षांकित प्रती जोडाव्यात) |
| ८ | मंजूर प्रवेशित एकूण संख्या | निवासी ..............अनिवासी...................एकूण |
| ९ | प्रवेशितांची यादी, वैद्यकिय प्रमाणपत्र, ऑडीओग्राफस् व अपंगत्वाचे फोटो इ. च्या प्रती सोबत जोडाव्यात. | |
| १० | शाळा/कर्मशाळेतील प्रवेशितांसाठी संबंधित प्रवर्गानुसार अस्थिव्यंग चिकित्सक/मानसोपचार तज्ञ/ कान, नाक व घसा तज्ञ/ नेत्र चिकित्सक इ. च्या सुविधा शाळा/कर्मशाळेपासून किती अंतरावर व कोणत्या गावी उपलब्ध आहेत. | |

| | | |
|---|---|---|
| ११ | शाळा/ कर्मशाळेसाठी उपलब्ध असलेल्या इमारतीचा प्रकार | स्वत:ची/ भाडयाची/ दान पत्राव्दारे/ शासनाकडून बक्षीस मिळालेली. इमारत भाडयाची असल्यास संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हयांनी प्रमाणित केलेल्या भाडे प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत जोडावी. तसेच इमारतीचे बांधकाम स्टॅण्डर्ड स्पेशिफिकेशन प्रमाणे केले असल्यांबाबतचे संबंधित कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग हयांनी प्रमाणीत केलेल्या प्रमाणपत्राची सांक्षाकिंत प्रत जोडावी. |
| १२ | इमारतीचा तपशील नकाशात खालीलप्रमाणे दर्शवावा. | |
| | अ) एकूण जमीनीचे क्षेत्रफळ<br>ब) इमारतीचे एकूण क्षेत्रफळ<br>क) खोल्यांची संख्या व खोलीनिहाय क्षेत्रफळ | |
| १३ | खोल्या कोणकोणत्या कारणासाठी वापरल्या जातात त्याचा खोली निहाय तपशील द्यावा. | |
| १४ | इमारतीमध्ये १० प्रवेशितांसाठी एक प्रसाधन गृह आणि एक स्नानगृह इ. ची सुविधा उपलब्ध आहे काय? | प्रसाधन गृह............<br>स्नानगृह................<br>कमोड टाईप प्रसाधन गृह................ |
| १५ | प्रवेशिर्थीना आवश्यक असणारी जागा :<br>अ) शाळा निवासी असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यासाठी १०० चौ.फु. जागा (निवासासाठी) व शाळेसाठी ४० चौ.फु. प्रत्येकी उपलब्ध असावी.<br>ब) शाळा अनिवासी असल्यास प्रत्येक विद्यार्थ्यासाठी ४० चौ.फु. जागा उपलब्ध असावी. | |
| १६ | इमारतीमध्ये व इमारतीच्या परिसरात वीज, पाणी पुरवठयाची पुरेशी व्यवस्था केली आहे काय त्याचा तपशील द्यावा. | |
| १७ | इमारतीमध्ये पुरेसा प्रकाश व वायु विजनासाठी खोलीनिहाय खिडक्या, दारे किती आहेत, तसेच खोल्यानिहाय पंखे किती बसविण्यात आले आहेत त्याचा तपशील द्यावा. | |
| १८ | पिण्याच्या पाण्याची सोय | नळ/ हातपंप/ विहीर |
| १९ | पाणी साठविण्याची साधने त्यांचा तपशील द्यावा. | |
| २० | प्रवेशितांना वर्गात बसण्यासाठी कोणती साधने उपलब्ध करून देण्यात आली आहेत, (उदा. बेंचेस, बस्कर इ.) उल्लेख करून त्यांची एकूण संख्या द्यावी. | |

| | | |
|---|---|---|
| २१ | इमारत व परिसराची स्वच्छता कशाप्रकारे केली जाते हयाबाबतचा सविस्तर तपशील देण्यात यावा. | |
| २२ | शाळा/कर्मशाळेतील प्रवेशितांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी पुरेशी क्रीडांगण उपलब्ध आहे काय? असल्यास त्याचे क्षेत्रफळ किती? | |
| २३ | प्रवेशितनिहाय स्वतंत्र केस फाईल्स ठेवल्या आहेत काय? त्यामध्ये प्रवेशित व्यक्तिमत्व विकासासाठीचे प्रयत्न/ भौतिकोपचार/मानसोपचार/शस्त्रक्रिया/शैक्षणिक विकास इ. च्या नोंदी वेळोवेळी घेण्यात येतात काय? | |
| २४ | प्रवेशितांच्या खेळांसाठी कोणती साधने उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत त्यांचा संख्येसह तपशील देण्यात यावा. | |
| २५ | संस्थेच्या परिसरात झाडे, बाग–बगीचा इ. सुविधा कशाप्रकारे उपलब्ध आहेत त्यांचा सविस्तर तपशिल देण्यात यावा. | |
| २६ | अपंग प्रवर्गनिहाय संस्थेने कोणत्या प्रकारची मनोरंजनाची साधने उपक्रम करून दिलेली आहेत? त्यांचा तपशील देण्यात यावा. | |
| २७ | संस्थेने प्रथमोपचाराची सुविधा कशाप्रकारे उपलब्ध करून दिलेली आहे. | |
| २८ | संस्थेने मानद वैद्यकिय अधिकारी हयाची नियुक्ती कोणत्या शर्तीवर केली आहे. | |
| २९ | अपंगत्वामुळे निर्माण झालेल्या विविध प्रकारच्या अडचणी सोडविण्याच्या दृष्टिकोनातून प्रवेशितांवर कोणत्या प्रकारचे शारिरीक उपचार/शस्त्रक्रिया करण्यात आली त्याचा वर्षनिहाय स्वयंस्पष्ट स्वतंत्र तपशील देण्यात यावा आणि ते सक्षम वैद्यकिय अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले असावे. त्याचप्रमाणे अ. क्र. २९ मध्ये नमूद केल्याप्रमाणे वैद्यकिय उपचाराचा व भौतिक चिकित्सेचा किती प्रवेशितांना लाभ झाला हयाबाबतचा तपशील संवर्गनिहाय तज्ञ डॉक्टरोनी प्रमाणित केलेला असावा. | |
| ३० | संस्थेने प्रवर्गनिहाय किती प्रवेशितांना भौतिकोपचार साधने एकूण किती उपलब्ध करून दिलेली आहेत, त्याबाबतचा प्रवेशितनिहाय तपशील देण्यात यावा. | |
| ३१ | संस्थेने प्रवेशितांना उपलब्ध करून दिलेली संवर्गनिहाय विविध प्रकारची साधने सुस्थितीत आणि वापरात आहेत काय? | |
| ३२ | विशेषत: अंध व अस्थिव्यंग असलेल्या अपंगांसाठी/प्रवशितांसाठी/विशेष शाळा/कर्मशाळेच्या प्रवेशव्दारावर ब्रेल लिपीतील खूण/रॅम्प इ. व्यवस्था कशा प्रकारे केली आहे. तसेच इमारतीच्या आतील दरवाज्यामधून तीन चाकी सायकल सहजरीत्या वापरता येईल हया दृष्टीने कशाप्रकारे केली आहे. तव्दतच प्रसाधन गृहाकडे जाण्यासाठी व प्रसाधन व स्नानगृहात विशेषत: अस्थिव्यंग व अंध, बहुविकलांग प्रवेशितांसाठी कोणत्या प्रकारची विशेष सुविधा उपलब्ध केलेली आहे. त्याबाबतचा सविस्तर तपशील देण्यात यावा. | |

| | | |
|---|---|---|
| ३३ | शाळा/कर्मशाळा अनिवासी असल्यास विद्यार्थ्यांना शाळेत ने आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करण्यात आली आहे काय? | |
| ३४ | विद्यार्थ्यांना गणवेश, वहया, पाठयपुस्तके व इतर आवश्यक शैक्षणिक सुविधा पुरविण्यात येतात काय त्याचा विद्यार्थीनिहाय संख्येसह तपशील देण्यात यावा. | |
| ३५ | अंध प्रवर्गाकरिता चालविण्यात येत असलेल्या विशेष शाळा/कर्मशाळांमध्ये खालील नमूद केलेल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत काय?<br>१) ब्रेल लिपीतील मराठी, हिंदी आणि इंग्रजी कमीक पुस्तके किती विद्यार्थ्यांना विषय निहाय उपलब्ध करून दिली आहेत.<br>२) स्नेलन तक्ता (डोळयांची तपासणी करण्यांसाठी)<br>३) ब्रेल साहित्याच्या संबंधित चौकट स्लाईड्स, स्लेट, टेलर फ्रेम इ.<br>४) उठावदार टपींग रबर शिट, पुशार्पित इ.<br>५) गतीशील काठी आणि अंधांसाठी घडी काठया.<br>६) प्लॅस्टीक आवरणाचे व चकाकणारे मोठे आरसे, दंडगोलाकृती मोठे आरसे, छोटे आरसे, आयताकृती आरसे.<br>७) ब्रेल दर्शक वाचन व लेखन स्टॅण्ड.<br>८) स्पर्श व अध्ययन (दृक) साहित्य.<br>९) डोळे व त्यांचे कार्य स्वरूप तंत्र नमुने.<br>१०) ब्रेल लिपी टेपरेकॉर्डर व आवश्यक त्या शैक्षणिक अथवा अन्य बाबींच्या ज्ञानार्जनासाठी पुरेशा कॅसेट्स.<br>११) थर्मोफार्म यंत्र.<br>१२) वार्तालाप पुस्तके (बोलणारी)<br>१३) दृष्टीदोष व कमतरतेवर आधारित स्थिर चित्रपटटया तक्ते.<br>१४) ब्रेल घडयाळ.<br>१५) प्रत्येक पाठास अनुसरून हाताळण्यासाठी विविध मॉडेल्स.<br>१६) विशिष्ट स्वरूपाचे कीडा साहित्य.<br>१७) कवायतीसाठी मैदानावर विशिष्ठ अंतरावर स्पर्शाने जाणीव होणाऱ्या ठराविक जागेवर फरशी अथवा अन्य प्रकारची रचना.<br>१८) शैक्षणिक अथवा अन्य प्रकारचे ब्रेल लिपीतील वाङ:मय.<br>१९) वसतिगृहामधून वर्गामध्ये/ शाळेत जाण्यासाठी प्रवेशव्दारावर विद्युत तथा बॅटरी सांकेतीक ध्वनी फित आणि इतर अत्याधुनिक इलेक्ट्रॉनीक उपकरणे.<br>२०) बोलणारा संगणक इ. | |
| ३६ | अस्थिव्यंग प्रवर्गाकरिता चालविण्यात येत असलेल्या विशेष शाळा/कर्मशाळामध्ये खालील नमूद केलेल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत काय?<br>१) शरीराच्या वरील व खालील भागावरील विकलांगतेवर आधारित नमूने, तक्ते, स्थिर चित्रे व पट्टया.<br>२) भौतिक तपासणी तत्वावर आधारित स्थिरचिट्टया.<br>३) कृत्रिम अवयव व सहाय्यक साधने, कुबडया, स्प्लींट्स.<br>४) प्रोस्थेटीक उपकरणे, चाकाची खुर्ची, समायोजित फर्निचर, | |

| | | |
|---|---|---|
| | हातातील/बाहुमधील कडे, माठी पेन्सील, होल्डर, बुकस्टॅण्ड आणि पाने उलटवणारी यंत्रे.<br>५) भौतिक व व्यवसायोपचाराची आवश्यक साधने.<br>६) प्रवेशापासून अत्यल्प कालावधीत शारिरीक व्यंग कमी करण्यासांठी आवश्यक ती शस्त्रक्रिया व व्यायाम व संबंधितबाबींचा विस्ताराने तारीखवार प्रगती नोंद देण्यात यावी.<br>७) अस्थिव्यंगासंबधित संस्थेत रोग आणि संशोधनावर आधारीत स्थिरचित्रपट्टया.<br>८) अस्थिव्यंग चिकित्सक हयांचे योग्य त्या शारिरीक पुनर्वसनानंतर लवकरात लवकर संस्थेने लाभार्थ्यास मुक्त करणे. | |
| ३७ | मुकबधिर प्रवर्गाकरिता चालविण्यात येत असलेल्या विशेष शाळांमध्ये खालील नमूद केलेल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत काय?<br>१) आवाजातील भेद ओळखण्यासाठी खेळणी (आवाज भेदक खेळणी)<br>२) सामुहिक श्रवणयंत्रे.<br>३) वेयक्तीक श्रवणयंत्रे.<br>४) श्रवणमीटर सर्व सहाय्यक साधनासह.<br>५) वाचा प्रशिक्षण सर्व सहाय्यकभुत साधनासह.<br>६) तक्ते स्थिपट्टया/ सांकेतीक भाषवर.<br>७) अक्षर लिपीबाबत नियमावली.<br>८) वाचा व श्रवण तंत्रांचे नमुने.<br>९) वाचा व श्रवण दोषाचे कमतरेवर आधारित स्थिरपट्टया व तक्ते.<br>१०) आखील भारतीय श्रवण वाचा व श्रवण केंद्र, म्हैसूर व अलि यावर जंग नॅशनल इन्स्टीटयुट फॉर हिआरंग हॅण्डीकॅप्ड, मुंबई मध्ये उपलब्ध असलेली वाचा दुरूस्ती स्वाध्याय.<br>११) स्पीच ट्रेनर (आधुनिक फ्रिक्वेन्सी दर्शविणारे).<br>१२) साउंड प्रुफ रूम.<br>१३) वर्गातील भिंती शक्यतो गुळगुळीत नसाव्यात, खडबडीत असाव्यात.<br>१४) वाचा उपचारासाठी आवश्यक त्या व्यायामाची साधने.<br>१५) स्पीच रूममध्ये आरसा व प्रकाश झोताची सुविधा.<br>१६) प्रत्येक सहा महिन्याचे श्रवणालेख काढणे.<br>१७) श्रवण --हासानुसार योग्य क्षमतेचे प्रत्येक लाभार्थ्यास वैयक्तीक श्रवणसहाय्य यंत्र.<br>१८) इंग्रजी किंवा इतर प्रादेशिक भाषेतील वाचा संधी ठिकाण, प्रयत्नावर आधारित तक्ते किंवा चित्रपट्टया. | |
| ३८ | मतिमंद प्रवर्गाकरिता चालविण्यात येत असलेल्या विशेष शाळां/कर्मशाळामध्ये खालील नमूद केलेल्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत काय?<br>१) तपासणीसाठी मानसिक चाचण्या.<br>२) मेंदुची प्रतिकृती.<br>३) मेंदुच्या उजव्या व डाव्या अर्धगोलाचे कार्य मानसिक दुर्बलतेसंबंधि प्रश्नावर स्थिरचिट्टया व तक्ते. | |

| | | |
|---|---|---|
| | ४) मानसिकदृष्टया दुर्बलतेवर आधारीत (मंद ते तीव्र) बौध्दीक कार्यात्मतेवर आधारीत समायोजित वागणुकीवर स्थिरचित्रपट्टया.<br>५) मानसिक दुर्बल विद्यार्थ्यासाठी विविध प्रकारचे खेळ.<br>६) वेगवेगळया प्रकारचे बुध्दयांक काढण्याचा तक्ता.<br>७) प्रगतीदर्शक तक्ते.<br>८) लाभार्थ्यांना सहज आकलन होईल असे आकर्षिक शैक्षणिक साहित्य यामध्ये हरीतफिरीत कागदी अथवा प्लॅस्टीक मॉडेल्स आणि योग्य चित्र व शब्दपट्टया.<br>९) मोठया आकाराचा आरसा.<br>१०) मनोरंजनार्थ विशिष्ट प्रकारचे करमणूक साहित्य तसेच विशिष्ट प्रकारचे क्रीडा साहित्य.<br>११) शैक्षणिक तथा व्यवसायाभिमुख मोठया आकाराचे शब्द चित्रपट्ट्यासह संचित्र तक्ते. | |
| ३९ | निवासी प्रवेशितांना अंथरूण, पांघरूण इ. सुविधा पुरविण्यात आलेबाबतचा संख्येसह तपशील देण्यात यावा. (सोबत स्वतंत्र माहिती सादर करावी) | |
| ४० | निवासी विद्यार्थ्यांना पुरविण्यात आलेल्या ताट, वाटी, पेला इ. भांडी हयांचा सविस्तर तपशील एकूण संख्येसह देण्यात यावा. | |
| ४१ | निवासी प्रवेशितांना तेल, साबण, कपडे धुण्यासाठी साबण, सोडा इ. बाबी पुरविण्यात आल्याचा प्रवेशित निहाय तपशील. | |
| ४२ | निवासी प्रवेशितांना देण्यात येत असलेल्या सकाळचा नश्ता शासनाने विहीत केलेल्या आहार प्रमाणानुसार देण्यात येत असलेले भोजन हयाचा तपशील तसेच मिष्ठान्न महिन्यातून किती वेळा देण्यात येते हयाचा तपशील देण्यात यावा. | |
| ४३ | भांडी व स्वयंपाकगृहाची स्वच्छता ठेवण्यात येते काय? | |
| ४४ | भोजन तयार करण्यासाठी उपलब्ध असलेल्या भांडयांचा तपशील संख्येसह देण्यात यावा. | |

४५. सध्या संस्थेच्या सेवेत अनुज्ञेय व मान्यताप्राप्त असलेल्या कर्मचारी वर्गाची माहिती खालील तक्त्यात देण्यात यावी.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | वि.सक.अ. हयांचेकडून मान्यता मिळाल्याचा आदेश क्रमांक व दिनांक | जात | जन्मतारीख | शैक्षणिक अर्हता | विशेष शिक्षक म्हणून प्राप्त करण्यात आलेल्या शैक्षणिक अर्हतेस आर.सी.आय.ची मान्यता आहे काय? | स्थायी/ अस्थायी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | | | | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ४६ | केंद्र शासनाच्या आर.सी.आय. अॅक्ट च्या अधिनियमातील नियम क्र. २ (एन) नुसार अपंगांच्या पुनर्वसनासंदर्भातील व्यवसायिक खालीलप्रमाणे विहीत अर्हताप्राप्त करण्यात आले आहेत काय? आणि त्या अनुषंगाने अपंगांच्या शाळा/कर्मशाळांमध्ये अपंगांचे खऱ्या अर्थाने पुनर्वसन करावयाचे झाल्यास खालीलप्रमाणे व्यवसायीकांची नियुक्ती करण्यात आली आहे.<br>१) श्रवणशास्त्र तज्ञ आणि वाचा उपचार तज्ञ (Audiologists & Speech Therapist)<br>२) वैद्यकिय मानसशास्त्रज्ञ (Clinical Psychologist)<br>३) श्रवण सहाय्य यंत्र आणि इअर मोल्ड तांत्रिक (Hearing Aid & Ear Mould Technicians)<br>४) विशेष शिक्षक (Special Teacher)<br>५) व्यवसाय मार्गदर्शक, अपंगांसबंधि सेवायोजन अधिकारी व नियुक्तक अधिकारी (Vocational Counselor's- Employment Officers & Placement Officers dealing with Handicapped)<br>६) बहुउद्देशिय पुनर्वसन उपचारतज्ञ व तंत्रज्ञ (Multi Purpose Rehabilitation Therapists] Technicians)<br>७) केंद शासनाने आर.सी.आय. हयांच्या सल्ल्यानुसार वेळोवेळी प्रसिध्द करील असे व्यवसायिक. | |
| ४७ | प्रशिक्षित शिक्षकांनी त्यांचे विशेष शिक्षक म्हणून प्राप्त केलेले प्रशिक्षण हे आर. सी. आय. ची मान्यता असलेल्या मान्यताप्राप्त संस्थेतून पूर्ण केले आहे काय? आणि खालील तक्त्यात माहिती देण्यात यावी. (असल्यास सोबत प्रत जोडावी) | |

| अ.क्र. | शिक्षकांचे नांव | शैक्षणिक अर्हता | विशेष प्रशिक्षण अर्हता | कोणत्या प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षण पुर्ण केले आहे? | सदरहू प्रशिक्षण केंद्रास आर.सी.आय. ची मान्यता आहे काय? असल्यास मान्यता आदेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ४८ | कर्मशाळेमध्ये कोणत्या व्यवसायाचे प्रशिक्षण दिले जाते? | अ) कुशल व्यवसाय<br>ब) कमी कुशलता असलेले व्यवसाय |
| ४९ | कुशल व्यवसाय प्रशिक्षण वर्गास (ट्रेड्सना) व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाची मान्यता आहे काय? (असल्यास सोबत प्रत जोडावी) | |
| ५० | कमी कुशल व कुशल असणाऱ्या व्यवासायातील प्रशिक्षणार्थ्यांना किती विद्यावेतन देण्यात येते. | |
| ५१ | वरील व्यवसाय प्रशिक्षासाठी कोणती यंत्रसामग्री व प्रशिक्षण साधने उपलब्ध आहेत त्यांचा संख्येसह तपशील द्यावा. | |

५१ वरील व्यवसाय (ट्रेड्स)शिकविण्यासाठी नियुक्त केलेल्या निदेशकांची शिक्षण–प्रशिक्षण अर्हता शासन निर्णय दि. १० ऑगस्ट १९९० आणि १ ऑक्टोबर १९९२ प्रमाणे आहे काय? त्याबाबतची माहिती खालील तक्त्यात द्यावी.

| अ. क्र. | निदेशकाचे नांव | शैक्षणिक अर्हता | प्रशिक्षण अर्हता | | प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेस मान्यता असलेल्या तंत्र विभाचे नांव (प्राधिकाऱ्याचे नांव) | जन्मतारीख | जात | जि.स.क.अ. हयांनी मान्यता दिल्याचा आदेश क्र. व दि. | सध्याची वेतनश्रेणी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रशिक्षण व्यवसाय | प्रशिक्षण घेतलेल्या संस्थेचे नांव | | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | | | | | | | | | |

५२ निदेशका व्यतिरिक्त इतर कर्मचाऱ्यांची माहिती:

| अ.क. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | शैक्षणिक अर्हता | जात | जन्मतारीख | नियुक्ती दिनांक | स्थायी/ अस्थायी | जि.स.क.अ. हयांनी मान्यता दिल्याचा आदेश क्र. व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| १ | | | | | | | | |

५३ कर्मशाळेतून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थ्यांच्या पुनर्वसनाची वर्षनिहाय माहिती खालील तक्त्यात द्यावी.

| अ.क. | प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थीचे नांव | प्रशिक्षण व्यवसाय | प्रशिक्षण पूर्ण केल्याचे वर्ष | सध्या काय करतात | मासिक प्राप्ती रू. |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | | | | | |

| | | |
|---|---|---|
| ५४ | मागील दोन वर्षाचे संस्थेचे सनदी लेखापाल हयांनी प्रमाणित केलेले लेखा विवरण पत्र जोडले आहे काय? | |
| ५५ | गतवर्षी केंद्र/ राज्य/ स्थानिक स्वराज्य संस्थाकडून मिळालेल्या अनुदानाचा तपशील | |
| ५६ | पुढील वर्षाचे आवर्ती व अनावर्ती खर्चाचे अंदाजपत्रक जोडले आहे काय? | |
| ५७ | संस्थेची आर्थिक स्थिती बळकट असल्याबाबत बँक बॅलन्स सर्टिफिकेट जोडले आहे काय? | |

वर नमूद केलेल्या सर्व मुद्यांबाबत कागदपत्रांच्या सांक्षांकित सत्य प्रती सोबत जोडलेल्या आहेत.

आम्ही असे प्रमाणित करून देतो की, केंद्र शासनाचा अपंग व्यक्ती (समान संधी, हक्कांचे संरक्षण आणि संपूर्ण सहभाग) अधिनियम १९९५ हा कायदा आम्ही वाचलेला आहे. त्या कायद्यातील सर्व नियम, अटी व शर्ती आम्ही वाचलेल्या असून ते आम्हास मान्य आहेत आणि ते आमच्यावर बंधनकारक राहतील हयाची आम्हांस जाणीव आहे.

तरी आमच्या संस्थेस अपंग क्षेत्रात काम करण्यासाठी अनुज्ञप्ती मिळावी ही विनंती.

आपला विश्वासू

ठिकाण :

दिनांक :

संस्था प्रमुख हयांची सही व शिक्का

२



# परिशिष्ट- 2

*स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृह यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पदांचा आढावा व आकृत्तीबंध निश्चित करणेबाबत.*

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य,क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
**शासन निर्णय क्रमांक** :- इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :- १८ ऑगस्ट, २००४.

**वाचा :-** १) शासन अ.शा.पत्र क्र.इडीडी-१०९५/६०५१/प्र.क्र.२४५/सुधार-२, दि. २७/८/१९९७.
२) शासन निर्णय वित्त विभाग क्र.असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तीय सुधारणा, दिनांक १०/९/२००१
३) शासन निर्णय,सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.इडीडी-२००२/प्र.क्र.२३१/सुधार-२, दि.२६ सप्टेंबर,२००३, १७ ऑक्टोंबर, २००३ व दि.२७ जानेवारी,२००४
४) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/कर्मचारीवृंद प्रस्ताव/प्र-७-वैसाका/२००३-०४/११४१,दि.२७/८/२००३ व क्र.अकआ/संस्था /पदसंख्या /२००४-०५/१२७८, दि.१३/५/२००४
५) शासन पत्र , सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२, दिनांक १५ जुलै, २००४
६) शासन पृष्ठांकण, वित्त विभाग क्र.पदनि-१००४/प्र.क्र.६/२००४/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २/८/२००४

**शासन निर्णय :-** शासकीय/अशासकीय कार्यालय/संस्था यामध्ये अस्तित्वात असलेल्या सर्व (योजनेतर किंवा योजनांतर्गत) पदांचा आढावा घेण्यासंदर्भात शासन निर्णय वित्त विभाग दिनांक १० सप्टेंबर,२००१ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. त्यानुसार अपंग कल्याण आयुक्तालय अंतर्गत स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहातील प्रवर्गनिहाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदांचा आढावा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे स्तरावर अपंगांच्या कर्मचारी संघटना व संस्था चालक आणि या क्षेत्रातील तज्ञ व्यक्तींची बैठक आयोजित करुन घेण्यात आला. सदर आढाव्याचे शासनस्तरावर तपासणी करण्यात आली. त्यानंतर वित्त विभागाच्या सहमतीने प्रथम प्रस्ताव सयुक्त सचिव समितीच्या दिनांक ३ जुलै,२००४ रोजी झालेल्या बैठकीत आढावा घेऊन प्रस्ताव मा.मुख्यसचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तर सचिव समितीच्या दिनांक १७/७/२००४ रोजी झालेल्या बैठकीत ठेवण्यात आला होता. या बैठकीमध्ये सोबत जोडलेल्या विवरण पत्रातील प्रवर्गनिहाय शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या पदास मंजूरी देण्यात आलेली आहे.

२. शासनाने अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांकरीता यापूर्वी वेळोवेळी संहिता/शासन निर्णयान्वये निश्चित केलेले कर्मचारी आकृत्तीबंध रद्द करण्यात येत आहे. आता वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या मंजूरीस अनुसरुन राज्यातील स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृह यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सोबतच्या विवरणपत्र "अ" मध्ये दर्शविलेल्या आकृत्तीबंधास शासन मंजूरी देत आहे. सदर विवरणपत्रात दर्शविण्यात आलेली पदेच संबंधित अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा अनुज्ञेय

कृ.मा.प.

राहातील. तसेच सदर आकृत्तीबंधातील पदांची शैक्षणिक अर्हता विवरणपत्र "ब" नुसार हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून लागू राहील.

३. वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेला शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी वर्गाचा आकृत्तीबंध हा जुन्या व नव्याने अनुदान तत्वावर आणलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यांना लागू राहील. सध्या जुन्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यांना मंजूर करण्यात आलेली कर्मचारी वर्गाची पदे ही सोबतच्या आकृत्तीबंधाप्रमाणे तपासावी व सदर आकृत्तीबंधाप्रमाणे जादा/अतिरिक्त ठरलेली पदे त्यावरील कर्मचा-यांच्या सेवानिवृत्तीमुळे वा अन्य कोणत्याही कारणांमुळे रिक्त झाल्यास ती पदे भरण्यात येऊ नयेत. तसेच ज्या जुन्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यांना आकृत्तीबंधानुसार मंजूर करावयाच्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीवर्गाचा एकत्रित प्रस्ताव शासनास सादर करण्यात यावा.

४. वरीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या व सोबतच्या आकृत्तीबंधानुसार सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात नव्याने अनुदान तत्वावर आणण्यात आलेल्या ११३ अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यांना तातडीने संबंधित समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद यांनी आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी निश्चित केलेल्या/करण्यात येणा-या विद्यार्थी संख्ये प्रमाणे व पद मंजूरी प्रमाणे या पदावर नियमानुसार संस्थेने नियुक्त केलेल्या कर्मचा-यास मान्यता द्यावी व अशी पद मान्यता देतांना संबंधित कर्मचा-यांची मुळ नियुक्ती दिनांकास असलेली वयोमर्यादा विचारात घ्यावी. सदर कार्यवाहीचा अहवाल आदेशाच्या प्रतीसह शासनास व आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांना सादर करावा.

५. नव्याने अनुदान तत्वावर आणलेल्या ११३ अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यामधील कर्मचा-यांच्या मंजूर पदावर होणारा खर्च सन २००४-२००५ या आर्थिक वर्षात संबंधीत लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागवावा व तो संबंधित लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांका पासून अंमलात येतील.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या मान्यतेने व त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.८१८/०४/व्यय-१४ व क्र.५२५/०४/विसु-१, दिनांक ११/८/२००४ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वैअपारकर

**( वै.अ.पारकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

प्रति,

१) मा.राज्यपालांचे सचिव
२) मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
४) मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा.मुख्य सचिव
६) मा.अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग

१२५

७) सर्व विभागीय आयुक्त
८) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१३) सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
१४) सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१५) सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
१६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपून
१७) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१८) विभागातील सर्व कार्यासने
१९) निवड नस्ती- सुधार-

**शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र.इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२, दि. १८ ऑगस्ट,२००४ चे सोबतचे विवरणपत्र - "अ"**

**अशासकीय अपंगांच्या विशष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृहे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा आकृत्तीबंध**

| अ.क्र. | पदनांम | वेतनश्रेणी | विद्यार्थी संख्या | अनुज्ञेय पदे | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| | | | **अपंगांच्या विशेष शाळा विभाग** | | |
| १ | मुख्याध्यापक | ५५००-९००० | ५० ते १०० पेक्षा कमी | १ (कनिष्ठ स्तर) | ५० पेक्षा कमी विद्यार्थी संख्येच्या शाळेतील वरिष्ठ विशेष शिक्षक हे मुख्याध्यापक म्हणून काम पहातील. परंतू त्यांना वेतनश्रेणी अनुज्ञेय राहणार नाही. |
| | | ६५००-१०५०० | १०० किंवा त्यापेक्षा जास्त | (वरिष्ठ स्तर) | |
| २ | विशेष शिक्षक | ४५००-७००० | अंध - १०<br>मुकबधीर - ८<br>मतिमंद/सेरेब्रेलपालसी- ८<br>अस्थिव्यंग - २५ | १<br>१<br>१<br>१ | |
| ३ | शारिरीक शिक्षण निदेशक /कला,हस्त व्यवसाय शिक्षक | ४५००-७००० | हस्तकला शिक्षक अथवा शारीरिक शिक्षक निदेशक ५० विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी (२५ : १)<br>१०० विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी (२५ : १) | २<br>४ | |
| ४ | संगीत शिक्षक | ४५००-७००० | स्वतंत्र पद अनुज्ञेय नाही. तथापि शाळेने आवश्यकते प्रमाणे कला शिक्षकामधून १ संगीत शिक्षकाची नियुक्ती करावी. | -- | |
| ५ | निम वैद्यकीय कर्मचारी | ५५००-९००० | प्रत्येक प्रवर्गातील शाळेसाठी - १<br>(अ) अंध-चलन अवयव निदेशक<br>(ब) मुकबधीर - स्पीच थॅरापिस्ट (५० : १) - १०० विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी<br>(क) मतिमंद - मानस शास्त्रज्ञ अथवा व्यवसाय उपचार तज्ञ अथवा भौतिकोपचार तज्ञ<br>(ड) स्पास्टीक - फिजिओ थॅरापिस्ट अथवा व्यवसायोपचार तज्ञ<br>(इ) अस्थिव्यंग - फिजिओ थॅरापिस्ट अथवा व्यवसायोपचार तज्ञ | <br>१<br><br>२<br><br>१<br><br>१<br> | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | काळजी वाहक | २५५०-३२०० | अंध,मुकबधीर व अस्थिव्यंग - ५०<br>मतिमंद अथवा सेरेब्रेल पालसी - २५ | १<br>१ | सदर पद दरमहा रु.२०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरिता व ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० मध्ये भरण्यात यावे |
| ७ | सफाईगार | २५५०-३२०० | प्रत्येक शाळेसाठी १ | १ | सदर पद क्रंत्राटी पध्दतीने भरण्यात यावे व मुळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५० टक्के एवढे एकत्रीत वेतन देय राहील. |
| ८ | ग्रंथपाल | रु.१००/- दरमहा विशेष वेतन | शाळेतील वरिष्ठ शिक्षकांकडे कार्यभार सोपविणे. | -- | |
| ९ | मानद वैद्य. अधिकारी | रु.२५००/- द.म. एकत्रित वेतन | मानद वैद्य.अधि./ अस्थि शल्य चिकित्सक / इ.एन.टी. / नेत्र तज्ञ / मनोविकार तज्ञ यापैकी संस्थेचे स्वरुप पाहून. | १ | |
| | | | **अपंग शाळा कार्यालय विभाग** | | |
| १ | लेखापाल | ४०००-६००० | १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या शाळेसाठी | १ | |
| २ | कनिष्ठ लिपीक नि - लेखापाल | ३०५०-४५९० | लिपीक-नि-लेखापाल ५० ते १०० पर्यंत विद्यार्थी असलेल्या शाळेसाठी | १ | |
| ३ | शिपाई | २५५०-३२०० | प्रत्येक शाळेसाठी | १ | |
| | | | **निवासी अपंग शाळा वसतीगृह विभाग** | | |
| १ | अधिक्षक | ३०५०-४५९० | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | |
| २ | स्वयंपाकी | २६१०-४००० | प्रत्येक वसतीगृहासाठी | २ | |
| ३ | राखणदार/ काळजी वाहक | २५५०-३२०० | अंध, मुकबधीर, अस्थिव्यंग-२५<br>मतिमंद अथवा सेरेब्रेल पालसी -१५ | १<br>१ | सदर पद दरमहा रु.२०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरिता व ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० मध्ये भरण्यात यावे |
| ४ | मदतनीस | २५५०-३२०० | ५० विद्यार्थ्यांसाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यास व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. |
| ५ | पहारेकरी | २५५०-३२०० | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावे व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ६ | सफाईगार | २५५०-३२०० | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यात यावे व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. |
| ७ | परिचारिका | ४०००-६००० | मतिमंद शाळेसाठी | १ | |
| ८ | वाचक | दरमहा रु.२००/- | अंध शाळेसाठी - १० | १ | |
| | | | **कर्मशाळा विभाग** | | |
| १ | व्यव.अधिक्षक | ५५००-९००० | प्रत्येक कर्मशाळेसाठी | १ | |
| २ | निदेशक (अ,ब,क वर्ग) | ४०००-६००० | अस्थिव्यंग - २५ विद्यार्थ्यांसाठी<br>अंध - २५ विद्यार्थ्यांसाठी<br>मुके व बहिरे - २५ विद्यार्थ्यांसाठी<br>मतिमंद - २५ विद्यार्थ्यांसाठी | १<br>२<br>२<br>२ | |
| ३ | लेखापाल | ४०००-६००० | १०० अथवा १०० पेक्षा जास्त विद्यार्थ्यांच्या कार्यशाळेसाठी | १ | |
| ४ | लिपीक-नि-लेखापाल | ३०५०-४५९० | ५० अथवा १०० पेक्षा कमी असलेल्या कार्यशाळेसाठी लिपीक | १ | |
| ५ | कार्यशाळा मदतनीस | २५५०-३२०० | अंध,मुकबधीर,अस्थिव्यंग - ५०<br>मतिमंद / सेरेब्रेल पालसी- २५ | १<br>१ | |
| ६ | पुनर्वसन सामाजिक कार्यकर्ता-नि-से.योजन अधिकारी | ४५०/- एकत्रित वेतन दरमहा | प्रत्येक कर्मशाळेसाठी | १ | |
| | | | **निवासी कर्मशाळा वसतीगृह विभाग** | | |
| १ | गृहपाल | ३०५०-४५९० | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | |
| २ | स्वयंपाकी | २६१०-४००० | प्रत्येक वसतीगृहासाठी | २ | |
| ३ | राखणदार / काळजी वाहक | २५५०-३२०० | अंध, कर्णबधीर व अस्थिव्यंग - २५<br>मतिमंद / सेरेब्रेल पालसी - १५ | १<br>१ | सदर पद दरमहा रु.२०००/- प्रमाणे प्रथम ३ वर्षाकरिता व ३ वर्षानंतर नियमित वेतनश्रेणी रु.२५५०-३२०० मध्ये भरण्यात यावे |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ४ | मदतनीस | २५५०-३२०० | ५० विद्यार्थ्यांसाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यास व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. |
| ५ | सफाईगार | २५५०-३२०० संस्थेमार्फत वेतन | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यास व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. (या पदाचा खर्च संस्थेने स्वत:च सोसावयाचा आहे.) |
| ६ | पहारेकरी (रात्रपाळी) | २५५०-३२०० संस्थेमार्फत वेतन | प्रत्येक वसतीगृहासाठी | १ | सदर पद कंत्राटी पध्दतीने भरण्यास व मूळ वेतन अधिक देय महागाई भत्ता याच्या ५०% एवढे एकत्रित वेतन मंजूर करावे. (या पदाचा खर्च संस्थेने स्वत:च सोसावयाचा आहे.) |

वैअपारकर

( वै. अ. पारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

## विवरणपत्र "ब"

नव्याने निश्चित करण्यात आलेल्या आकृत्तीबंधातील पदांची शैक्षणिक अर्हता

(शासन निर्णय क्र.इडीडी-२००३/प्र.क्र.३४०/भाग-३/सुधार-२, दिनांक १८ ऑगस्ट, २००४)

| क्र. | पदनाम | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|
| १ | मुख्याध्यापक-कनिष्ठस्तर | पदवीधर व संबंधित प्रवर्गातील प्रशिक्षित आणि आर.सी.आय. नोंदणीकृत विशेष शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेप्रमाणे पदोन्नतीने, नियमित वेतनश्रेणीतील विशेष शिक्षकांमधून नियुक्ती असल्यास नियमित वेतनश्रेणी प्रमाणे. सरळ सेवेने नियुक्ती करावयाचे असल्यास संबंधित प्रवर्गाच्या विशेष शिक्षणामधील बी.एड. व पाच वर्षाचा शिक्षक म्हणून शिकविण्याचा अनुभव. |
| २ | मुख्याध्यापक-वरिष्ठस्तर | पदवीधर व संबंधित प्रवर्गातील प्रशिक्षित आणि आर.सी.आय. नोंदणीकृत विशेष शिक्षकांमधून सेवाजेष्ठतेप्रमाणे पदोन्नतीने, नियमित वेतनश्रेणीतील विशेष शिक्षकांमधून नियुक्ती असल्यास नियमित वेतनश्रेणी प्रमाणे. सरळ सेवेने नियुक्ती करावयाचे असल्यास संबंधित प्रवर्गाच्या विशेष शिक्षणामधील बी.एड. व पाच वर्षाचा शिक्षक म्हणून शिकविण्याचा अनुभव. |
| ३ | विशेष शिक्षक | माध्यमिक अथवा उच्चमाध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र धारक व संबंधित प्रवर्गातील प्रशिक्षित व आर.सी.आय. नोंदणीप्रमाणपत्र धारक. अस्थिव्यंगाकरीता डी.एड. तथापि पाचवी पासून पुढील वर्ग असल्यास शिक्षण विभागाच्या शाळा संहितेप्रमाणे शैक्षणिक अर्हता राहील. |
| ४ | शारिरीक शिक्षण निदेशक/ कला, हस्त व्यवसाय शिक्षक | माध्यमिक अथवा उच्च माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र व हस्तव्यवसाय, कला, संगीत, शारिरीक शिक्षण, नृत्य इत्यादी कला विषयक मान्यताप्राप्त संगीत कला महाविद्यालयाची पदवी अथवा पदवीका (किमान दोन वर्ष) अथवा आय.टी.आय. अथवा तंत्रशिक्षण विभागाचे किमान एक वर्ष कालावधीचे प्रमाणपत्र, बी.पी.एड, दृष्टीहिनांकरीता व्यवसाय शिक्षकांसाठी डेहरादून येथील राष्ट्रीय संस्था तसेच राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कर्मशाळेमधील एक वर्षाचे प्रमाणपत्र. सेवांतर्गत इतर कलेचे प्रशिक्षण घेणे आवश्यक. |
| ५ | संगीत शिक्षक | मान्यताप्राप्त संगीत विद्यालय/महाविद्यालयाचे प्रमाणपत्र धारक (गांधर्व सारखे महाविद्यालय) |
| ६ | निम वैद्यकीय अधिकारी | **चलन अवयव निदेशक**-पदवीधर व मान्यताप्राप्त संस्थेची मोबिलीटी मधील प्रमाणपत्र पदवी अथवा पदवीका व आर.सी.आय. नोंदणीकृत.<br>**स्पीच थेरापिष्ट-** मान्यताप्राप्त संस्थेची स्पीच ऑडिओलाजी मधील पदवी अथवा पदवीका व आर.सी.आय. नोंदणीकृत<br>**मानस शास्त्रज्ञ-** क्लिनिकल सॉयकॉलॉजिमधील पदव्युत्तर पदवी व आर.सी.आय. नोंदणीकृत.<br>**फिजीओ थेरापिस्ट** - मान्यताप्राप्त संस्थेची अथवा विद्यापिठाची अथवा संस्थेची फिजीओ थेरपीमधील पदवी.<br>संस्थेला आवश्यकता वाटल्यास तासीका तत्वावर जादा दोन निम वैद्यकीय अधिकारी कर्मचा-यांची नियुक्ती करता येईल व त्यावरील खर्च वेतनेतर अनुदानासाठी अनुज्ञेय धरण्यात येईल. |
| ७ | काळजीवाहक | इयत्ता ४ थी उतीर्ण |
| ८ | सफाईगार | इयत्ता ४ थी उत्तीर्ण |
| ९ | मानद वैद्यकीय अधिकारी | संबंधित वैद्यकीय क्षेत्रातील पदवी अथवा पदव्युत्तर पदवी. यापैकी कोणताही एक तज्ञाची नियुक्ती संस्था त्यांच्या आवश्यकतेप्रमाणे करेल. |
| १० | लेखापाल | वाणिज्य पदवीधर, टंकलेखन इंग्रजी ४० व मराठी ३० शब्द प्रतिमिनिट व एम.एस.सी.आय.टी.चे प्रमाणपत्र आवश्यक अथवा लिपिक-नि-लेखापाल यामधून पदोन्नतीने |
| ११ | कनिष्ठ लिपिक-नि-लेखापाल | माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र, टंकलेखन इंग्रजी ४० व मराठी ३० शब्द प्रतिमिनिट व एम.एस.सी.आय.टी.चे प्रमाणपत्र आवश्यक. |
| १२ | शिपाई | ४ थी उत्तीर्ण |

| | | |
|---|---|---|
| १३ | अधिक्षक | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र धारक व संबंधित प्रवर्गाचे शिक्षण प्रशिक्षण उत्तीर्ण व प्रथमोपचाराचे ज्ञान आवश्यक. |
| १४ | स्वयंपाकी | इयत्ता ४ थी उत्तीर्ण |
| १५ | मदतनीस | इयत्ता ४ थी उत्तीर्ण |
| १६ | पहारेकरी | इयत्ता ४ थी उत्तीर्ण |
| १७ | परिचारिका | ए.एन.एम. व तीन वर्षांचा अनुभव. |
| १८ | वाचक | माध्यमिक शालांत परिक्षा उत्तीर्ण. अस्थिव्यंग अपंग अथवा सेवानिवृत्त शिक्षक |
| १९ | व्यवस्थापकिय अधिक्षक | शासनाच्या तांत्रिक प्रशिक्षणामधील पदविका व दोन वर्षांचा पूर्वानुभव अथवा प्रमाणपत्र व या क्षेत्रातील किमान दोन वर्षांचा पूर्वानुभव अथवा पदवीधर अथवा अपंगांच्या प्रवर्गासाठी प्रशिक्षित व तीन वर्षाचा अनुभव अथवा निदेशकामधून जेष्टतेप्रमाणे पदोन्नतीने. |
| २० | निदेशक | संबंधित व्यवसायाचे प्रशिक्षणातील पदवी अथवा पदविका अथवा शालांत परिक्षा प्रमाणपत्र धारक आय.टी.आय. अथवा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण विभागाचे प्रमाणपत्र.<br>अंध प्रवर्गाकरिता हस्तकलेच्या वस्तू, खडू बनविणे, केनिंग इत्यादी व्यवसायातील मान्यताप्राप्त अपंगांच्या कार्यशाहेतील प्रशिक्षण प्रमाणपत्र. |
| २१ | कार्यशाळा मदतनीस | इयत्ता ४ थी उत्तीर्ण |
| २२ | पुनर्वसन सामाजिक कार्यकर्ता-नि-सेवायोजन अधिकारी | संबंधित मान्यताप्राप्त विद्यापिठाची समाजकार्य यामधील पदव्युत्तर पदवी अथवा होकेशनल कॉन्सिलर मधील मान्यताप्राप्त संस्थेची पदवी व आर.सी.आय.नोंदणीकृत. |
| २३ | गृहपाल | उच्च माध्यमिक शालांत परिक्षा प्रमाणपत्र धारक व संबंधित प्रवर्गाचे शिक्षक प्रशिक्षण प्रमाणपत्र धारक व प्रथोमचाराचे ज्ञान आवश्यक. |

वैअपारकर

**( वै. अ. पारकर )**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

# परिशिष्ट - 2

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा व संलग्न वसतिगृह यामधील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी पदांचा आढावा व आकृतीबंध निश्चित करणेबाबत

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक:— इडीडी—२००३/प्र. क्र.३४०/भाग—३/सुधार—२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.
दिनांक :— ३० जानेवारी, २००६

वाचा:—

१) शासन निर्णय, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी—२००३/प्र. क्र.३४०/भाग ३/सुधार—२, दिनांक १८ ऑगस्ट, २००४

२) शासन निर्णय, समाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी—२००५/प्र. क्र.१४२/भाग २/सुधार—२, दिनांक १८ ऑगस्ट, २००५

३) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.अकआ/वाई/पदनिर्मिती/न्या.प्र./प्र—४मति/२००५—०६/९७५, दिनांक २७/६/२००५ व क्र. १५०९ दिनांक २५/८/२००५.

४) वित्त विभागाचे अ.शा.पत्र क्र.संकीर्ण—१०.०५/प्र. क्र.१७/अर्थोपाय, दिनांक १७/१/२००६.

प्रस्तावना:— स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पदांचा आढावा घेवुन शासन निर्णय दि.१८ ऑगष्ट २००४ अन्वये कर्मचारी वर्गाचा आकृतीबंध निश्चित करण्यात आलेला आहे. त्यामध्ये वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात आलेला नाही. सदर आकृतीबंधापूर्वी अपंगांच्या विशेष शाळा संहिता १९८५ मध्ये विहित करण्यात आलेल्या कर्मचारी आकृतीबंधमध्ये वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात आला होता. त्यानंतर सुधारित अपंगांच्या विशेष शाळा संहिता १९९७ मध्ये प्रसिध्द करण्यात आली त्यामध्ये विहित करण्यात आलेल्या आकृतिबंधात फक्त वाहन चालक पदांचा समावेश करण्यात आला तथापि अपंग व्यक्ती अधिनियम १९९५ मधील तरतूदीनूसार अपंग विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्यासाठी वाहतूकीची व्यवस्था उपलब्ध करुन देण्याची तरतूद करण्यात आलेली आहे. सदर अधिनियमातील तरतूद विचारात घेवुन मा.उच्च न्यायालय,मुंबई यांनी याचिका क्र. ७८७९/२००४ वर दिलेल्या नियकालात कर्मचारी वर्गाच्या आकृतीबंधात वाहन चालक व वाहन परिचर या पदांचा समावेश करण्यात यावा असे निर्देश दिले आहे तसेच केंद्र शासनामार्फत अपंगांच्या संस्थांना अनुदान दिले जाते अशा संस्थांमध्ये वाहन चालक व वाहन परिचर हे कंत्राटी पध्दतीवर नियुक्त केले जातात. त्यावर होणाऱ्या खर्चासाठी केंद्र शासनामार्फत अनुदान दिले जाते. या सर्व बाबी विचारात घेऊन शासनाने शासन निर्णय दि.१८ ऑगष्ट २००४ अन्वये विवित केलेल्या आकृतीबंधात, ज्या संस्थाकडे अनिवासी अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांसाठी स्वतःचे वाहन आहेत, अशा संस्थांना वाहन चालक व वाहन परिचर पद मंजूर करता यावे, यासाठी सदर दोन्ही पदांचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :— स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या मान्यता व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व संलग्न वसतिगृहे यामधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पदांचा शासन निर्णय दि. १८ ऑगष्ट २००४ अन्वये आकृतीबंध निश्चित केलेला आहे. सदर शासन निर्णय सोबतच्या विविरण पत्र अ मधील शाळा विभागातील अनु क्र.९ नंतर खालील पदांचा समावेश करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | पदनाम | वेतनश्रेणी | विद्यार्थी संख्या | अनुज्ञेय पद | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १० | वाहन चालक | कंत्राटी पध्दतीने दरमहा रु ३,०००/– एकत्रित वेतन | प्रत्येक शाळा/ कर्मशाळेस एक | १ | स्वत:चे १६ आसनांचे वाहन असलेल्या फक्त अनिवासी शाळा/कर्मशाळांसाठी |
| ११ | वाहन परिचर | कंत्राटी पध्दतीने दरमहा रु २,०००/– एकत्रित वेतन | प्रत्येक शाळा/ कर्मशाळेस एक | १ | स्वत:चे १६ आसनांचे वाहन असलेल्या फक्त अनिवासी शाळा/कर्मशाळांसाठी |

२. या पदांवर होणारा खर्च सन २००५–२००६ या आर्थिक वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यासाठी सदर बाब नागपूर येथे संपन्न झालेल्या विधानमंडळ अधिवेशनात लाक्षणिक पुरक मागणीव्दारे विधान मंडळाच्या निदर्शनास आणण्यात आलेला आहे. त्याबाबत महाराष्ट्र (तृतीय पुरवणी) विनियोजन अधिनियम, २००५ (सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. २१) म्हणून महाराष्ट्र शासन राजपत्र असाधरण, भाग–चार, दिनांक २७/१२/२००५ यामध्ये प्रसिध्द करण्यात आलेला आहे. तेव्हा यावर होणारा खर्च चालू आर्थिक वर्षात संबंधीत लेखाशीर्षाखाली मंजूर असलेल्या तरतूदीतून भागवावा व तो संबंधित लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्या विभागाच्या अनौ. सदर्भ क्र. ३४/०६/व्यय–१४, दिनांक २७/१/२००६ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ज. ना. राठोड)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा. राज्यपालांचे सचिव
२) मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
३) मा. उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
४) मा. मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव (सर्व)
५) मा. मुख्य सचिव
६) मा. अतिरिक्त मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव सर्व मंत्रालयीन विभाग
७) मा. सर्व विभागीय आयुक्त
८) संचालक, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
९) आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०) सर्व जिल्हाधिकारी
११) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
१२) सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
१३) सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१४) सर्व समाज कल्याण अधिकारी, गट– अ, जिल्हा परिषद
१५) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र–१/२, मुंबई/नागपूर
१६) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१७) निवड नस्ती – सुधार – २

# परिशिष्ट-3

अनुदान प्राप्त मान्य अपंगाच्या विशेष शाळा व अपंग बालक वसतिगृहे यामध्ये पुर्णवेळ काम करणा-या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांकरिता सेवा निवृत्ती वेतन योजना...

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
शासन निर्णय क्रमांक -डडीडी-१०८१/१७३२७/सोस-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ३२
दिनांक:- १ फेब्रुवारी, १९८४

पाहा :- १) शासन निर्णय समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, क्रमांक-डडीडी-१०८०/८०१७७१/नोटस]/१३५२२/का-१०, दिनांक १ जुलै, १९८१ व त्यासोबतचे शुध्दीपत्रक दि. १-२-८४

२) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. पोएच-२८१-पेन्शन डी-७, दिनांक १७ ऑगस्ट, १९८१

शासन निर्णय:- अनुदानप्राप्त मान्य अपंगांच्या विशेष शाळांतील तसेच मान्य अपंग बालक वसतिगृहातील पुर्णवेळ काम करणारे मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना सेवानिवृत्ती वेतन योजना, सेवा उपदान योजना आणि सेवानिवृत्तीचे इतर फायदे, लागू करण्याचा प्रश्न शासनाच्या विचाराधीन होता. या प्रश्नांचा सांगोपांग विचार करुन शासनाने असे ठरविले आहे की, राज्यातील संचालक, समाजकल्याण विभाग यांनी मान्यता प्रदान केलेल्या व अनुदान प्राप्त मान्य अपंगांच्या विशेष शाळा आणि अपंग बालकांसाठीची वसतिगृहे, यामध्ये पूर्ण वेळ काम करणारे जे मान्य शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी दिनांक ३१-३-१९८१ रोजी वा त्यानंतर सेवानिवृत्त झाले आहेत अथवा होतील अशा कर्मचा-यांस राज्य शासकीय कर्मचा-यांप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्तीवेतन] नियमावली, १९८२ मध्ये अंतर्भूत असलेली सेवा-निवृत्ती [illegible] योजना व त्या नियमावलीतील नियम-११६ प्रमाणे अनुज्ञेय असलेली [illegible] निवृत्ती [illegible] योजना १९६४ या योजना लागू करण्यात याव्यात [illegible] निवृत्तीवेतन व उपदान यांचे फायदे देण्यात यावेत.

२. [illegible] हेतुपूर्तीसाठी:-

(अ) "मान्य अपंगाच्या विशेष शाळा" यामध्ये स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या अपंग बालकांसाठीच्या मान्य विशेष शाळा व संचालक,

...२.../-

समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान तत्त्वावर मान्यता प्रदान केलेली शाळा समाविष्ट आहे. तसेच वरील प्रमाणे "मान्य अपंग बालकांसाठी वसतिगृहे" यामध्ये स्वयंसेवी संस्थांनी चालविलेल्या अपंग बालकांसाठीची वसतिगृहे ज्यांना संचालक, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी अनुदान तत्त्वावर मान्यता प्रदान केलेली आहे. अशी अपंग बालकांसाठीची वसतिगृहे समाविष्ट आहेत.

[ब] निवृत्ती वेतनार्ह वेतनाच्या हेतूपूर्तीसाठी, वेतन व त्यामध्ये समाविष्ट असलेले वेतन म्हणजे:-

१] विहीत केलेल्या वेतन श्रेणीतील वेतन.

२] वेतनश्रेणी सुधारित केल्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी मंजूर केलेले वैयक्तिक वेतन.

हे वेतन महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तीवेतन) नियमावली १९८२ मधील नियम ६० अन्वये वेतन या शब्दाची जी व्याख्या केली आहे, त्यास पर्याय म्हणून असेल.

टिप्पणी १ : जर शाळेतील एखादा शिक्षक अथवा शिक्षकेतर कर्मचारी त्याच्या सेवाकालात गेल्या दहा महिन्यापासून बिनपगारी अथवा अर्धपगारी रजेवर असल्याने कामावर गैरहजर असेल तर, त्याचे वेतन तो जर त्या रजेच्या पहिल्या महिन्याच्या सेवा कालात प्रत्यक्ष कामावर हजर असता तर जे वेतन घेत असता ते वेतन धरण्यात यावे. मात्र सेवेमधील कर्मचारी जर रजेवर गेला नसता तर ज्या स्थानापन्न हंगामी उच्च पदावर नेमणूकीस पात्र झाला असता व त्याप्रमाणे तसे प्रमाणपत्र त्यास दिले गेले असते तर त्यास त्या स्थानापन्न व हंगामी उच्च पदाच्या वेतनाचा लाभ घेता येईल.

[क] "शिक्षक म्हणजे मान्य व अनुदान प्राप्त अपंगाच्या विशेष शाळेतील/अपंग बालक वसतिगृहातील पूर्णवेळ काम करणारा मान्य शिक्षक यामध्ये पूर्णवेळ काम करणारा विशेष शिक्षक, सह शिक्षक [पूर्णवेळ काम करणारा] मान्य व्यवसाय शिक्षक [पूर्ण] वेळ काम करणारा मान्य संगीत शिक्षक तसेच मुख्याध्यापक/अधिक्षक/प्राचार्य मुख्याध्यापिका/अधिक्षिका-प्राचार्या यांचाही समावेश असेल.

[ड] शिक्षकेतर सेवकवर्गामध्ये अपंगाच्या विशेष शाळेत/अपंग बालक वसतिगृहात पूर्णवेळ काम करणारे मान्य कार्यालयीन कर्मचारी, वसतिगृहातील कर्मचारी, काळजीवाहक, वाहनचालक, शिपाई इत्यादी मान्य कर्मचारीवर्ग इत्यादी यांचा अंतर्भाव असेल, तसेच निरनिराळ्या प्रकारच्या अपंगांच्या विशेष शाळेत/अपंग बालक वसतिगृहात शासनाने मान्य केलेला पूर्णवेळ काम करणारा विशेष सेवा प्रदान करणारा सेवकवर्ग उदा. परिचारिका, व्यवसायोपचारक, शारीरोपचारक, वाचा उपचारक तत्सम सेवक वर्ग यांचाही अंतर्भाव असेल.

....३.../

[२] "प्रशिक्षणानंतर सेवा" म्हणजे शिक्षकाने व्यावसायिक अर्हता [डी. एड्. बी. एड. विशिष्ट प्रकारचे अपंगांसाठी शिक्षण प्रशिक्षण प्रमाणपत्र, पदविका, पदवी किंवा शासनमान्य इतर तत्सम अर्हता] म्हणून समाजकल्याण विभागाने मान्य केलेली अपंगांच्या विशेष शाळांतील शिक्षकांकरीता विहित केलेली प्रशिक्षण अर्हता धारण केल्यानंतरची सेवा, तसेच व्यवसाय शिक्षक, संगीत शिक्षक आदिसाठी शासनाने मान्य केलेली / समाजकल्याण विभागाने, मान्य केलेली प्रशिक्षण अर्हता धारण केल्यानंतरची सेवा.

[१] मान्य व अनुदानप्राप्त अपंगांच्या विशेष शाळेतील जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी दिनांक ३० मार्च १९८१ पर्यंत सेवेत होते आणि जे कर्मचारी ३१ मार्च १९८१ पूर्वी वयाच्या ५८ वर्षांची मर्यादा पूर्ण करीत होते परंतु केवळ सक्षम अधिकाऱ्यांच्या [संचालक, समाजकल्याण विभाग] पूर्व सहमतीने दिनांक ३१ मार्च १९८१ नंतरही सेवेत राहिले अशा अंशदायी भविष्य निर्वाह निधीच्या सवलतींना पात्र असणाऱ्या सर्वमान्य कर्मचाऱ्यांना अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजना किंवा ही पेन्शन स्विकारण्याचा विकल्प देण्यात येत आहे. जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी दिनांक ३१ मार्च १९८१ रोजी किंवा त्यानंतर सेवा निवृत्त झाले असतील, तसेच ज्यांना या आदेशातील तरतुदी लागू होईल अशा सर्व कर्मचाऱ्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आत आपला विकल्प द्यावा. एकदा विकल्प भरुन दिल्यानंतर त्यात पुन्हा बदल करता येणार नाही. हा विकल्प विहित प्रपत्रामध्ये [परिशिष्ट-"अ"] लेखी भरुन द्यावा व तो संचालक, समाजकल्याण विभाग महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे पाठविण्यात यावा. जे कर्मचारी असा विकल्प विहित मुदतीत भरुन देणार नाहीत त्यांचे बाबतीत ज्या सवलती ३१ मार्च १९८१ पर्यंत मिळत होत्या त्याच सवलतींचा लाभ चालू ठेवण्यात त्यांची संमती आहे असे गृहीत धरण्यात येईल. ज्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा ३१ मार्च १९८१ प्रत्यक्ष या आदेशाच्या दिनांकापर्यंत [दोन्ही दिवस धरुन] कालावधीत विकल्प भरुन देण्यापूर्वी मृत्यु झाला असेल किंवा जे कर्मचारी या नियमान्वये विकल्प भरुन देण्यास पात्र होते पण विहित मुदतीत विकल्प भरुन न देताच मृत्यु पावले असतील अशा सर्व कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना त्या दोन्ही योजना [अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजना किंवा सेवानिवृत्ती वेतन योजना] पैकी जी अधिक लाभदायक असेल त्या योजनेचा लाभ देण्यात यावा. सेवानिवृत्ती वेतन मंजूर करणाऱ्या अधिकाऱ्याने दोन्ही अनुज्ञेय पर्याय म्हणजे सध्याची अंशदायी भविष्य निर्वाह निधीची योजना व महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्ती] नियमावली १९८२ मधील निवृत्तिवेतन योजनेपडताळून पाहून व

कृ. मा. प.

योजे केल्यानंतर विद्यमान अंशदायी भविष्य निर्वाह निधीच्या योजनेपेक्षा इतर निर्वाह वेतनाचे ठराविक प्रमाण लक्षात घेऊन त्याप्रमाणे निवृत्ती वेतनाचे कागदपत्र तयार करावेत.

[२] शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी ही निवृत्ती वेतन योजना स्वीकारतील त्यांना त्यांच्या पूर्वीच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये त्यांचे स्वतःचे अंशदान करण्यास यापुढेही मुभा राहील. सेवानिवृत्ती नंतर त्यांना त्यांच्या खाती जमा झालेली भविष्य निर्वाह निधीतील ही रक्कम व त्यावरील व्याज देण्यात यावे.

[३] वर विहित केलेल्या मुदतीत जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सेवा निवृत्तीवेतन योजनेचा विकल्प भरून देतील त्यांच्या अंशदायी भविष्य निर्वाह निधीमध्ये संबंधीत विशेष शाळा व्यवस्थापकांनी त्यांचा भाग म्हणून जमा केलेले अंशदान व त्यावरील व्याज मिळून झालेली जी काही रक्कम असेल तर ती रक्कम संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून प्रथम पडताळून घेऊन व ती बरोबर असल्याबाबतचे त्याचे प्रमाणपत्र मिळविण्यात आल्यानंतरच शासनाकडे खालील लेखाशीर्षाखाली जमा करावी.

"०७८, निवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्ती लाभ यासंबंधातील अंशदाने व वसुलीच्या रकमा."

[४] शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी ३१ मार्च १९८... नंतर सेवेत भरती होतील ते आपोआपच या नव्या सेवा निवृत्ती वेतन योजनेखाली येतील. अशा कर्मचाऱ्यांना अंशदायी भविष्य निर्वाह निधी योजनेचा विकल्प देता येणार नाही.

(५) या आदेशान्वये प्रयोजनार्थ सेवा निवृत्तीचे वय ५८ धरण्यात येईल (चतुर्थश्रेणी कर्मचारी सेवकांसाठी सेवा निवृत्तीचे वय ६० धरण्यात येईल).

[६] ज्या शिक्षकांची प्रशिक्षणोत्तर अखंड सेवा २ वर्षापेक्षा जास्त झाली असेल व ज्या शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची २ वर्षापेक्षा जास्त अखंड सेवा झाली असेल, त्यांची सेवा निवृत्ती वेतन योजनेसाठी स्थायीपदावर कायम नियुक्ती समजण्यात येईल.

(७) या योजनेनुसार सेवा निवृत्ती वेतन ठरवितांना अर्हता प्राप्त सेवाकालाची गणती करण्यासाठी पूर्वीची तदर्थ, हंगामी, स्थानापन्न अथवा कायम, त्याप्रमाणे एक किंवा त्यापेक्षा जास्त, मान्य व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळांतील/अपंग बालक वसतिगृहातील सेवा विचारात घेतली जाईल. खाली निर्देशित केलेल्या कारणास्तव कर्मचाऱ्यांच्या सेवाकालात एकूण

[illegible] नसलेले सेवाखंड व अशा सर्व सेवाखंडाचा एकूण काळ २ वर्षापेक्षा जास्त नसेल व प्रत्येक सेवाखंडाचा काळ सर्वसामान्यपणे १२ महिन्यापेक्षा जास्त नसेल तर अशा सेवाखंडापूर्वीची सेवा निवृत्तिवेतनासाठी हिशेबात घेण्यासाठी त्यांच्या सेवेत खंड झाला असे धरण्यात येऊ नये.

[अ] मान्य व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळांतील अपंग बालक वसतिगृहातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा त्यांच्या राजीनाम्यामुळे सेवेत खंड झाला असेल व जर तो खंड एका मान्य व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळेतून/अपंग बालकांच्या वसतिगृहातून दुस-या अशाच प्रकारच्या अनुदान प्राप्त विशेष शाळेत/वसतिगृहात सेवा प्रवेश असेल व तो खंड इतर अन्य सेवा धारणेमुळे झालेला नसेल तर, त्यापैकी जे सेवाखंड क्षमापित करण्यात येतील, त्यातील [illegible] पेक्षा जास्त सेवाखंड राजीनामा कारणास्तव झालेले नसावेत.

[ब] जर सेवाखंड कर्मचा-यांच्या आटोक्याबाहेरील कारणामुळे व त्याची काहीही चूक नसताना आला असेल तरच तो सेवाखंड क्षमापित करण्यात यावा. तथापि पूर्ण चौकशी अंती केलेल्या शिस्तभंगाच्या कारणामुळे जर कर्मचा-यांच्या सेवेत खंड पडला असेल तर, अशा खंड क्षमापित करण्यात येऊ नये, आणि अशा कर्मचा-यांची शिस्तभंग झालेल्या तारखेपूर्वी केलेली सर्व सेवा, निवृत्तीवेतनासाठी ग्राह्य धरण्यात येऊ नये.

[४] अन्यथा याबाबत उपबंधीत केलेले नसेल तर या योजनेखालील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना महाराष्ट्र नागरी सेवा [निवृत्ती वेतन] नियमावली, १९८२ मधील सर्वसाधारण उपबंधानुसार मिळणा-या सेवानिवृत्तीच्या सवलती लागू होतील.

५. या योजनेनुसार निवृत्ती वेतन व उपदान वगैरेस जे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी पात्र ठरतील, त्यांची निवृत्ती वेतन कागदपत्रे संबंधित मान्य व अनुदान-प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा-अपंग बालक वसतिगृहे, इत्यांनी त्यासंबंधीत. शिक्षकांचे किंवा शिक्षकेतर कर्मचा-यांचे त्या त्या शाळेत ठेवलेल्या नोंदी व सेवापुस्तके पाहून तयार करावीत. सेवापुस्तकातील नोंदी शाळांच्या Ex व्यवस्थापकांनी ठेवावयाच्या असतात व त्यांनीच त्या साक्षांकित करावयाच्या आहेत. या नोंदी निरीक्षक अधिका-याने दरवर्षी तपासाव्यात व त्याप्रमाणे तपासण्यात आल्याचे प्रमाणपत्र देऊन त्याची नोंद सेवापुस्तकामध्ये घ्यावी. संबंधित विशेष शाळेच्या चालकांनी निवृत्ती वेतन कागदपत्रे तयार करून आपल्या शिफारशीसह ती कागदपत्रे संचालक, समाजकल्याण विभाग [illegible] मंजुरीसाठी पाठवावीत व संचालक, समाजकल्याण विभाग यांनी निवृत्तीवेतन व उपदान यास मंजुरी देऊन ती निवृत्ती वेतन कागदपत्रे संबंधित

....६/-

महालेखापाल, मुंबई/नागपूर यांचेकडे पाठवाव्यात. अशा रितीने मंजूर झालेले निवृत्तीवेतन व उपदान हे शासकीय कोषागारातून दिले जावे. महालेखापाल, मुंबई/नागपूर [illegible] यांच्या पडताळून माहितीवरुन निवृत्तीवेतन व उपदान प्रदान करण्याचे आदेश काढले जातील व निवृत्ती वेतन व उपदानास पात्र व्यक्ती ज्या ठिकाणाहून आपणास ही देय रक्कम हवी आहे असे निर्देशित करतील त्या ठिकाणच्या कोषागार अधिकाऱ्यांनाही रक्कम त्यास देण्यास आदेश देतील व त्याप्रमाणे संचालक, समाजकल्याण विभाग यांनाही कळवतील.

५. यावरचा होणारा खर्च-"२८८-सामाजिक सुरक्षा आणि कल्याण-

डी-समाजकल्याण,

एस-अपंगांचे शिक्षण व कल्याण,

मागणी क्रमांक-१६३-अपंगांचे स्वयंसेवी संस्थांना अनुदान" या प्रधान शीर्षाखाली व संबंधित उप शिर्षाखाली टाकण्यात यावा व तो चालू/संबंधित वित्तीय वर्षाच्या शिर्षाखाली या योजनेकरता केलेल्या तरतुदीनुसार भागविण्यात यावा.

६. शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या योजनेखाली मिळणारे सेवा निवृत्ती वेतन आणि उपदान महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियमावली १९८२ मधील तरतुदीनुसार विनियमित केले जाईल आणि हे सेवा निवृत्तीवेतन आणि/अथवा उपदान सेवा निवृत्ती वेतन मंजूर करणाऱ्या सक्षम अधिकाऱ्याकडून प्राधिकृत करणे, काढणे व भरणा करणे वगैरे गोष्टी करण्यात येतील.

७. हे आदेश शिक्षण विभाग व वित्त विभागाच्या संमतीने वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. सीआर-१२७२/८३, व्यय-११, दिनांक ५/१/१९८४ अन्वये काढण्यात आले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सही/-

(मो. सा. सिद्दी[illegible])

उप सचिव.

प्रति,

संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाजकल्याण अधिकारी (वर्ग-१),
महालेखापाल, महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर,
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई/निवासी लेखा परीक्षाअधिकारी, मुंबई,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी/ संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई,
वित्त विभाग,
उपमुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, मुंबई/पुणे/नागपूर/औरंगाबाद.

शी/१ दुरुस्ती विशेष परिशिष्ट नुसार तरतूदी प्रमाणे

MTNkZmU0MWEwZmRlZmU1YXwwLjM= https://doc-0k-18-docsviewer.googleusercontent.com/viewer/secu

4

983

सामाजिक न्याय व विशेष [illegible]
खालील मान्यता [illegible]
शाळा, कर्मशाळा व [illegible]
शिक्षक व शिक्षकेतर [illegible]
समाजसेवार्थ प्रणाली [illegible]

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय, क्र.सकआ २०१२/प्र.क्र. ६०/[illegible]
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दि. १८ ऑक्टोबर, २०१२

वाचा :-

शासन आदेश, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सकआ २०१२/प्र.क्र. ६०/[illegible] दि. १३/९/२०१२, दि. ४/१०/२०१२ व दि. ४/१०/२०१२.

प्रस्तावना :-

राज्यातील शासकीय कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते यांची देयके सेवार्थ या नवीन वेतन प्रणाली[illegible] करण्यात येत आहे. तसेच राज्यातील खाजगी अनुदानित, प्राथमिक, माध्यमिक व उच्च [illegible] परिषदा व महानगरपालिका आणि नगरपालिकांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे [illegible] नवीन वेतन प्रणालीव्दारे अदा करण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. [illegible] अधिपत्याखालील सर्व मान्यता प्राप्त अनुदानित संस्थांमधील कर्मचाऱ्यांची वेतन देयके [illegible] (आवश्यक त्या दुरुस्त्या करुन) करण्याचा धोरणात्मक निर्णय शासनाने घेतला आहे. [illegible] व विशेष सहाय्य विभागाच्या नियंत्रणाखालील मान्यता व अनुदान प्राप्त विमुक्त जाती व भटक्या [illegible] जाती व ऊसतोड कामगारांच्या मुलांसाठी चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा तसेच [illegible] कर्मशाळा आणि समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन व भत्ते [illegible] मा.मुख्यसचिव यांच्याकडे वेळोवेळी आयोजित करण्यात आलेल्या बैठकांमध्ये [illegible] विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेले आदेश विचारात घेऊन या विभागासाठी सुधारीत केलेल्या [illegible] नवीन वेतन प्रणालीव्दारे वेतन व भत्ते अदा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्यातील मान्यताप्राप्त व अनुदान प्राप्त विमुक्त जाती व भटक्या जमाती, [illegible] कामगारांच्या मुलांसाठी स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणाऱ्या आश्रमशाळा [illegible] कर्मशाळा आणि समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर [illegible] "समाजसेवार्थ " या संगणकीय प्रणालीव्दारे अदा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. [illegible] तत्वावर (pilot basis) राज्यातील मुंबई व उपनगर, ठाणे, पुणे व लातूर या चार जिल्ह्यातील शिक्षक [illegible] कर्मचाऱ्यांची वेतन देयके प्रायोगिक तत्वावर "समाजसेवार्थ " या संगणक प्रणालीमार्फत [illegible] माहे नोव्हेंबर २०१२ मध्ये देय असलेले वेतन व भत्ते यांची देयके काढण्यात [illegible] निर्णयाव्दारे देण्यात येत आहेत.

रोटे/स्व-१८७५[ ५००-१०-१२ ]-१
SEVARTHA\Sewa System

- १०

4/12/2012 9:20 PM

२. **"समाजसेवार्थ"** या संगणकीय प्रणालीमध्ये आश्रमशाळा, अपंगांच्या विशेष शाळा व समाजकार्य महाविद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची आवश्यक सर्व माहिती भरण्याचे (Data entry) काम पूर्ण करुन घेण्याची जबाबदारी खालीलप्रमाणे सोपविण्यात येत आहे.

| अ.क्र. | शाळेचा प्रकार | वेतन देयकांकरीता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरण्यासाठी (Data entry) प्राथमिक जबाबदार आणि प्रमाणित करुन माहिती सादर करणारा अधिकारी | कार्यालयातील सर्व शाळांचे वेतन देयकाकरिता लागणारी आवश्यक ती सर्व माहिती भरुन घेण्यासाठी आणि ती अचूक आहे हे प्रमाणित करण्यासाठी जबाबदार अधिकारी | या संपूर्ण कामकाजावर पर्यवेक्षक / नियंत्रक आणि प्रमाणपत्रावर प्रतिस्वाक्षरी करणारा अधिकारी |
|---|---|---|---|---|
| १ | विजाभज, आश्रमशाळा व वसतीगृह विभाग | संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक / प्रभारी मुख्याध्यापक | समाज कल्याण अधिकारी (वर्ग २) / समाज कल्याण निरिक्षक | सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण |
| २ | अनुसूचित जातींच्या आश्रमशाळा | संबंधित आश्रमशाळांचे मुख्याध्यापक / प्रभारी मुख्याध्यापक | समाज कल्याण निरिक्षक | सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद |
| ३ | अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा | संबंधित विशेष शाळांचे मुख्याध्यापक / प्रभारी मुख्याध्यापक / ज्येष्ठतम विशेष शिक्षक/ प्राचार्य / प्रभारी प्राचार्य | वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता / सहायक सल्लागार | सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद / सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर व उपनगर |
| ४ | समाजकार्य महाविद्यालय | संबंधित समाज कार्य महाविद्यालयाचे प्राचार्य / प्रभारी प्राचार्य | समाज कल्याण अधिकारी (वर्ग २) / समाज कल्याण निरिक्षक | सर्व सहायक आयुक्त समाज कल्याण |

आश्रम शाळा / अपंगांच्या शाळा व समाज कार्य महाविद्यालयातील मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी संबंधित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची सर्व आवश्यक ती माहिती "समाजसेवार्थ" मध्ये भरावी व तसे प्रमाणपत्र सादर करुन माहिती संबंधित सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण / जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांच्या कार्यालयाकडे सादर करावे. तद्नंतर वरील रकाना क्र. ४ मधील जबाबदार अधिकाऱ्याने त्याची पडताळणी करुन तसे प्रमाणपत्र द्यावे व त्यावर रकाना क्र. ५ मधील अधिकाऱ्याने भरलेली माहिती तपासून प्रमाणपत्रावर प्रतिस्वाक्षरी करावी.

३. **"समाजसेवार्थ"** प्रणालीमध्ये भरलेली माहिती ही अंतिम राहील. त्यामध्ये पुन्हा बदल करता येणार नाही. माहितीमध्ये बदल करावयाचा झाल्यास तसा समर्थनात्मक प्रस्ताव शासनास सादर करावा. आवश्यकतेप्रमाणे तसे बदल शासनस्तरावरुन केले जातील.

एच-१८७५ -१३

D:\SEVARTHA\Sevart System.docx

९४



४. "समाजसेवार्थ" प्रणालीमध्ये [illegible] महाविद्यालयांचे मुख्याध्यापक / प्राचार्य [illegible] कर्मचाऱ्यांच्या [illegible] [illegible] [illegible] जमा करावी [illegible] कार्यालयीन [illegible]

५. [illegible] सदर प्रणालीमध्ये [illegible] संबंधित आश्रमशाळेचे / महाविद्यालयाचे मुख्याध्यापक / प्राचार्य [illegible] [illegible]

६. "समाजसेवार्थ" या संगणकीय प्रणालीमध्ये माहिती भरल्यानंतर [illegible] आश्रमशाळांची / अपंगांच्या शाळांची / महाविद्यालयांची [illegible] भरून घेण्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांनी संबंधित शाळेच्या मुख्याध्यापक / प्राचार्यांकडून [illegible] शिक्क्यानिशी प्राप्त होणाऱ्या माहितीची [illegible] उपलब्ध असलेल्या [illegible] पडताळणी [illegible] कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद / सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण यांच्याकडे सादर करावे. सदर [illegible] त्याची पडताळणी करण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दिनांक २७ ऑक्टोबर, २०१४ पर्यंत पूर्ण [illegible] यावी. उपरोक्त क्र. २ येथील परिच्छेदामधील तक्त्यात क्र. ४ या रकान्यात दर्शविलेल्या अधिकाऱ्यांनी [illegible] होणारे प्रमाणपत्र मुद्रित करून घ्यावे व त्यावर स्वाक्षरी करून कार्यालयीन शिक्का उमटवून [illegible] रकाना क्र. ५ [illegible] अधिकाऱ्याकडे सादर करावे. रकाना क्र. ५ मधील अधिकाऱ्यांनी त्याची एक प्रत स्वतःकडे ठेऊन दुसरी [illegible] संचालनालय / आयुक्तालयाकडे पाठवावी. संचालनालय / आयुक्तालय यांनी त्याची एक प्रत स्वतःकडे ठेवून दुसरी प्रत शासनास सादर करावी.

७. संच मान्यता व वैयक्तिक मान्यता प्रदान करण्याचे प्राधिकृत करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना [illegible] करण्यात आलेल्या [illegible] या प्रणालीमध्ये प्रवेश करून संबंधित शाळांची माहिती [illegible] लागावी. अशाप्रकारे माहिती मान्य केल्याशिवाय संबंधित शाळांना / महाविद्यालयांना पुढील कार्यवाही [illegible] नाही, याची नोंद घ्यावी.

८. "समाजसेवार्थ" या प्रणालीमध्ये माहिती भरणे, सदर प्रणाली हाताळणे आणि [illegible] करणे इत्यादी बाबत प्रशिक्षण [illegible] मास्टर ट्रेनर्सची निवड आयुक्त, समाज कल्याण / आयुक्त, [illegible] / संचालक, विजाभज संचालनालय, पुणे यांनी करावी. सदर मास्टर ट्रेनर्सना प्रथम टप्प्यात मेसर्स [illegible] सर्विसेस यांच्या कर्मचाऱ्यांकडून सर्वसमावेशक प्रशिक्षण देण्यात येईल. मास्टर ट्रेनर्सनी पुढे त्यांच्या [illegible] शाळांमधील संबंधित कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्याची कार्यवाही करावी. [illegible] आयुक्त, समाज कल्याण / आयुक्त, [illegible] / संचालक, विजाभज संचालनालय, पुणे यांनी तयार [illegible] कोणत्याही परिस्थितीत मास्टर [illegible] दिनांक [illegible] २०१४ पर्यंत पूर्ण करणे आवश्यक [illegible] जबाबदारी संबंधित संचालक / आयुक्त यांची राहील.

एच-१८०५ -२



९८

९. माहे ऑक्टोबर, २०१२ चे देय असलेले वेतन नोव्हेंबर, २०१२ मध्ये अदा करण्याकरिता ते "समाजसेवार्थ" प्रणालीवर वेतन देयकाबरोबर सध्याच्या प्रचलित कार्यप्रणाली प्रमाणे देयके संबंधित कोषागार कार्यालयाकडे सादर करावीत. मात्र सध्याच्या कार्यपध्दतीनुसार तयार केलेले वेतन समाजसेवार्थ प्रणालीवर सादर केल्याशिवाय संबंधित कोषागार कार्यालयाकडून स्वीकारले जाणार नाही.

१०. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक सं.क्र.२२०/१२/कोषा.-५, दि.१८/१०/२०१२ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने.

(कि.पां.वडते)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा.मंत्री (सा.न्याय) यांचे खाजगी सचिव
मा.राज्यमंत्री (सा.न्याय) यांचे खाजगी सचिव
मा.मुख्यसचिव यांचे स्विय सहायक
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई
सचिव माहिती व तंत्रज्ञान, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय
आयुक्त, समाज कल्याण, पुणे
आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण, पुणे
संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
सहसंचालक, सुधारणा, लेखा व कोषागारे, मुंबई
सर्व अध्यक्ष, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
उपायुक्त तथा सदस्य, जात प्रमाणपत्र पडताळणी समिती
सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण
सर्व सहायक आयुक्त, समाज कल्याण
सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी / अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
निवडनस्ती आस्था-२

एच-१८७५ -२अ
D:\SEVARTHA\Sevart System.docx

## परिशिष्ट - अ

### प्रमाणपत्र

मी ------------------------------------------------------------ (नांव) ----------------------------------- -------(पदनाम), याव्दारे प्रमाणित करतो / करते की, माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या बँक खात्यात जमा करण्यात येणार असल्याने आजपासून यापुढे ज्या दिवशी अशा प्रकारे माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या बँक खात्यात जमा करण्यात येईल त्या दिवशी ते मला प्राप्त झाले असे समजण्यात येईल. याबाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत अथवा आक्षेप राहणार नाही. माझे मासिक वेतन तसेच इतर भत्ते यांचे प्रदान मला इलेक्ट्रॉनिक पध्दतीने थेट माझ्या खाली नमूद केलेल्या बँक खात्यात जमा करण्यात यावे.

बँकेचे नांव :-

शाखेचे नांव व पत्ता :-

बचत खाते क्रमांक :-

एमआयसीआर कोड :-

आयएफएससी कोड :-

स्वाक्षरी/-

दिनांक :- (कर्मचाऱ्यांचे नांव)

(पदनाम)

कार्यालयाचा पत्ता

एच-१८७५[ ५००-१०-१२ ]-३

D:\SEVARTHA\Sevart System.docx

## परिशिष्ठ- ब
## प्रमाणपत्र

दिनांक :

संस्थेचे नांव व पूर्ण पत्ता:-

मुख्याध्यापक / प्राचार्य यांचे नांव:-

प्रमाणित करण्यात येते की, माझ्या ---------------------------------- संस्थेतील सर्व शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून शासन निर्णय क्र. सकआ-२०१२/प्र.क्र. ६०/आस्था-२ दिनांक -------------------- सोबतच्या परिशिष्ट 'अ' मध्ये नेमून दिलेले बँकखात्या संबंधीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन ते संग्रही ठेवण्यात आले आहे.

-------

एच-१८७५ -३अ.

D:\SEVARTHA\Sevart System..docx

परिशिष्ट - ५



स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या
अपंगाच्या विशेष शाळा व संलग्न वसतिगृह आणि
कार्यशाळा व संलग्न वसतिगृहे यातील पूर्ण वेळ
शिक्षक/शिक्षकेतर कर्मचा-यांना सहाव्या वेतन
आयोगानुसार सुधारित वेतनश्रेणी.

## सहावा वेतन आयोग

शासन निर्णय - क्र.इडीडी-२००९ / प्र.क्र.२३८ / सुधार- २ /
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ३२ दिनांक ४.१२.२००९

**१) सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चीत करतांना खालीलप्रमाणे करावी .**

दिनांक ४.१२.२००९ च्या शासन निर्णयनुसार हमीपत्रे व विहित नमुन्यामध्ये सर्व संबंधीतांनाकडून विकल्प घेण्यात यावेत. या संदर्भात अन्य तरतुदी या मुळ वित्त विभागाच्या शासन निर्णय दि २२.४.०९ व २९.४.०९ प्रमाणे लागू राहतील.

अ) विद्यमान वेतनश्रेणी - पाचव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतनश्रेणी
ब) दिनांक १.१.२००६ रोजी असणारे विद्यमान वेतनश्रेणीतील मुळ वेतन
क) ५० टक्के महागाई वेतन
ड) दिनांक १.१.२००६ रोजी असलेला महागाई भत्ता (२१ टक्के प्रमाणे अनुज्ञेय)
दिनांक १.१.२००६ रोजीच्या वेतनावर घेण्यात यावा.
इ) या सर्वांची एकुण बेरीज ही त्या कर्मचा-यांची विद्यमान वेतनश्रेणीतील दिनांक १.१.२००६ रोजीची वित्तलब्धी होईल. मुळ वेतनावर त्या कर्मचा-यांची सहाव्या वेतन आयोगामधील विद्यमान वेतनश्रेणीसाठी जी वेतनश्रेणी सुधारीत वेतन बँडमध्ये असेल त्याप्रमाणे वेतन निश्चिती करावी व त्यासाठी ग्रेड वेतन घ्यावे

२) प्रत्येक कर्मचा-याला सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे प्रत्येक जुलै महिन्यात वेतनवाढ अनुज्ञेय असल्यामुळे पहिली वेतनवाढही जुलै २००६ ला अनुज्ञेय राहील. तथापी ज्यांची वेतनवाढ २ जोनवारी २००६ ते ३० जुन २००६ या दरम्यान असेल. त्यांनी जर नियमित वेतनवाढ दिनांकवर वेतन निश्चितीचा विकल्प दिल्यास त्यांची वेतनवाढ पुढील वर्षाच्या १/७/०७ रोजी देय होईल अन्यथा ज्यांची वेतनवाढ १ जोनवारी २००६ रोजी असेल त्यांनी १ जानेवारी २००६ रोजी विद्यमान वेतन श्रेणीतील वेतनवाढ देवून सुधारित येतनश्रेणीतील वेतन निश्चिती करण्यात यावी व पुढील वेतनवाढ १ जुलै रोजी करण्यात यावी, जे कर्मचारी विद्यमान वेतनश्रेणीतील कमाल वेतन १ जोनवारी २००६ रोजी एक वर्ष किंवा त्याहून अधिक कालावधी पर्यत घेत आहेत. त्यांच्या बाबतीत सुधारित वेतन संरचनेत १ जोनवारी २००६ रोजी पुढील वेतनवाढ देय होईल व तदनंतर वित्त विभाग अधिसूचना दिनांक २२/४/२००९ मधील परिच्छेद क्रञ १० मधील तरतुदी लागू राहतील.

३) वेतनवाढ ही १/७/२००६ चे वेतन+ग्रेड वेतन यावर प्रत्येक जुलै महिन्यात ३ टक्के प्रमाणे परिगणित करावी (व ती रक्कम १० च्या पटीत घ्यावी)

४) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रञ वेपूर(१२०९/प्रक्र, ६९/सेवा(९, दिनांक २९.४.२००९ अन्वये प्रारंभिक वेतन निश्चितीची कार्यपध्दती अवलंबविण्यात यावी. तसेच या परिपत्रकामध्ये नमूद केल्या प्रमाणे थकबाकी अदा करण्यात यावी.

५) वेतन निश्चितीमुळे कमी जास्त केली असल्यास ती वसूल करण्यास हरकत नसल्याबाबतचे संबंधीत कर्मचा-याकडून हमीपत्र घेण्यात यावे.

६) शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांना दिनांक १.४.२००९ पासून अनुज्ञेय असलेल्या फरकाची रक्कम रोखीने अदा करावी.

७) दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.३.२००९ पर्यंतची फरकाची रक्कम दर वर्षी २० टक्केप्रमाणे पुढील पाच वर्षात त्यांच्या भनिनि खात्यात जमा करावी.

८) दिनांक १.१.२००६ ते दिनांक ३१.३.२००९ पर्यंतची फरकाची रकमेतून शासन निर्णय, वित्त विभाग दिनांक ६.१०.२००८ अन्वये दिलेल्या वेतन अग्रीमाची रक्कम रुपये १०,०००/- अथवा मूळ वेतनाच्या दुप्पट यापैकी जी जास्त असेल ती रक्कम, व्यवसाय कर, दि. १.१.२००६ ते ३१.३.२००९ या कालावधीत अतिप्रदान झालेले शासकीय येणे, शासकीय निवास स्थानात राहत असलेल्या सेवाकर व शुल्क फी वसूल करुन जी रक्कम शिल्लक राहील. त्याचे ५ हप्ते (२० टक्के) करुन प्रत्येक वर्षी सन २००९ पासून दरवर्षी जून महिन्यात कर्मचा-यांच्या भनिनि खात्यात जमा करावी.

९) ज्यांना कालबध्द पदोन्नती/आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणार असेल त्यांची वेतन निश्चिती दोन वेळा करण्यात यावी.

अ) पहिली वेतन निश्चिती सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे करावीत.

ब) दुसरी वेतन निश्चिती कालबध्द पदोन्नतीचा लाभ दिनांक १.१.२००९ पासून देण्यात येणार असल्यामुळे दुसरी वेतन निश्चिती सहाव्या वेतन आयोगाच्या निश्चित केलेल्या वेतनावर अनुज्ञेय राहील.

१०) सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चित करण्यासाठी शासन परिपत्रक वित्त विभाग, क्र. वेपूर-१२०९/प्रक्र. ६९/सेवा-९, मंत्रालय, मुंबई ३२ दिनांक २९ एप्रिल २००९ चे सहपत्र जोडपत्रामध्ये वेतन निश्चिती करावयाची आहे. समाज कल्याण अधिकारी जि. प. यांनी व संबंधित कर्मचा-याचे हमीपत्राव्दारे प्राप्त अनुदान खर्च करावयाचे आहे. आणि यथावकाश सदर दोन्ही वेतन निश्चितीची पडताळणी या आयुक्तालयाकडून करुन घ्यावयाची आहे.

**समाज कल्याण अधिकारी गट अ, जिल्हा परिषद व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर/ उपनगर यांनी सर्व मुद्दे सर्व संबंधित शाळांचे निदर्शनास आणून द्यावेत.**

२५३

**मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेषशाळा व कर्मशाळेमधील शिक्षकेतर कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती योजनेची वेतननिश्चिती कशी करावी या बाबतचे मुददे खालीलप्रमाणे आहे**

म.रा.सामा-न्याय व विशेष सहाय्य विभाग शा.नि.इडीडी २००९/प्रक्र ३५६ सुधार २ मंत्रालय विस्तार मुंबई ३२ दि. १३ ऑगष्ट ०९ नूसार

(१) दि.१.१०.१९९४ ते ३१.७.२००१ पर्यंत कालबध्द पदोन्नती योजना व दि. १.०८.२००१ पासून सेवाअंतर्गत प्रगती योजना शासनाने लागू केली आहे
(२) वर नमूद योजनेकरिता ज्या कर्मचा-यांची दि. १.१०.१९९४ व त्यापुढे ज्या दिनांकास सलग सेवा १२ वर्ष होईल त्या दिनांकास सदर योजनेचा लाभ त्यांना देण्यात यावा.
(३) ज्या दिनांकास १२ वर्ष पूर्ण होईल त्या दिनांकास विद्यमान वेतन श्रेणीतील मुळ वेतन त्यामध्ये विद्यमान वेतनश्रेणीतील एक काल्पनिक वेतन अधिक करुन येणारे वेतन ते मंजूर झालेल्या वरिष्ठ पदाच्या वेतनश्रेणीमध्ये निश्चित करण्यात यावे.
सदरची वेतन निश्चिती करतांना मुळ वेतन श्रेणीमधील दक्षता रोध मंजूर झाल्याची खात्री करावी.

(२) शासन निर्णय दि. १३.८.२००९ नूसार मिळणा-या आश्वाशित प्रगती योजनेनुसार मंजूर केलेल्या वेतनश्रेणीनूसार वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.९.६.२००९ व ३१.८.२००९ नूसार खालीलप्रमाणे वेतन निश्चिती करावी.

(१) से.आ.प्र. योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या पदाचा वेतन बँड आणि ग्रेड वेतन
(२) योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी वेतन बँड मधील वेतन
(३) योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीचे मूळ वेतन अधिक ग्रेड वेतन
(४) योजनेचा लाभ मिळण्याचा दिनांक
(५) पदोन्नतीच्या पदाचा (वरिष्ठ वेतनश्रेणी) वेतन बँड आणि ग्रेड वेतन
(६) वेतनवाढीची रक्कम ३ टक्के प्रमाणे (पुढील दहाच्या पटींतील रक्ककम)
(७) विकल्पाच्या दिनांकापासुन वेतन निश्चिती
(अ) अनुज्ञेय वेतन बँड
(ब) योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीचे वेतन बँड मधील वेतन + वेतन वाढीची रक्ककम मिळून होणारे वेतन
(क) अनुज्ञेय ग्रेड वेतन (योजनेचा लाभ मिळाल्याचे ग्रेड वेतन मधून योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीचे वजा करुन येणा-या रक्कमेस दोन ने भागून येणारी रक्कम ती योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या ग्रेड वेतन + ते योजनेचा लाभ मिळल्याचे ग्रेड वेतन होय
(ड) मुळ वेतन ( ब + क)
(८) पूढील वेतनवाढीचा दिनांक १ जूलै राहील
(३) वित्त विभागाच्या शासन निर्णय दि.३१.०८.२००९ नूसार योजनेच्या लाभास जे ग्रेड वेतन आहे ते दि.१.१.२००६ पासून ते ३१.०८.२००९ पर्यंत काल्पनिक रित्या पूर्ण ग्रेड वेतन मंजूर करुन त्याप्रमाणे वेतनवाढी काढण्यात याव्यात. त्याचा लाभ १.९.२००९ पासून देण्यात यावा मात्र या सुधारणेच्या परिणाम स्वरुप दि.१.१.२००६ ते ३१.८.२००९ या दरम्यानच्या कालावधीतील थकबाकी अनुज्ञेय असणार नाही.

२२

(४) पदोन्नतीची संधी उपलब्ध नसलेल्या अथवा एकाकी पदावरील कर्मचा-यास दि १.१.२००६ रोजी अथवा त्यानंतर योजनेचा लाभ मिळाल्यानंतरचे वेतन विद्यमान वेतन् बँडमधील वेतन व ग्रेड वेतनावर ३ टक्के वेतनवाढ देवुन (हि रक्कम दहाच्या पटीत नसल्यास ती दहाच्या पटीत घेवून) विद्यमान वेतन बँडमध्ये निश्चित करण्यात यावे. त्याच्या विद्यमान वेतन बँडमध्ये योजनेच्या लाभा नंतरही बदल होणार नाही त्याशिवाय कर्मचा-यास त्याच्या पदाचे विद्यमान ग्रेड वेतन+ खालील मंजूर केल्याप्रमाणे समूचित ग्रेड वेतन मजूर करण्यात यावे.

| मुळ पदाचे ग्रेड वेतन रुपये | मुळ पदाचे ग्रेड वेतना व्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन रुपये |
|---|---|
| २००० पर्यंत | २०० |
| २००० पेक्षा जास्त व ४००० पेक्षा कमी | ३०० |
| ४००० पेक्षा जास्त व ५००० पेक्षा कमी | ४०० |
| ५००० पेक्षा जास्त | ५०० |

५) पदोन्नतीच्या संधी नसलेल्या अथवा एकाकी पदावरील कर्मचा-यास योजनेचा लाभ मिळाल्यानंतरची वेतननिश्चिती खालीलप्रमाणे करावी.

१) से.आ.प्र.योजनेचा लाभ मिळण्यापूर्वीच्या पदाचा वेतन बँड आणि ग्रेड वेतन
२) योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी वेतन बँडमधील वेतन
३) योजनेचा लाभ मिळण्यापूर्वी मुळ वेतन + ग्रेड वेतन
४) योजनेचा लाभ मिळाल्याचा दिनांक
५) (अ) योजनेच्या लाभानंतर अनुज्ञेय वेतन बँड
   (ब) योजनेच्या लाभानंतर अनुज्ञेय ग्रेड वेतन + मुळ पदाच्या ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन
६) वेतनवाढीची रक्कम ३ टक्के प्रमाणे (पुढील दहाच्या पटीतील रक्कम)
७) वेतन निश्चितीच्या विकल्पाचा दिनांक
८) विकल्पानुसार वेतन निश्चिती
   (अ) वेतन बँडमधील वेतन + वेतनवाढीची रक्कम ३ टक्के प्रमाणे
   (ब) निश्चित केलेले वेतन + मुळ पदाच्या ग्रेड वेतनाव्यतिरिक्त अनुज्ञेय ग्रेड वेतन
९) पुढील वेतनवाढीचा दिनांक १ जूलै

**विषयः-** मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेषशाळा व कर्मशाळेमधील शिक्षकेतर कर्मचा-यांना कालबध्द पदोन्नती आश्वाशित प्रगती योजना लागू करण्याबाबतच्या वेतन निश्चिती बाबत.

शिक्षकेत्तर कर्मचा-यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल. ज्या कर्मचा-यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचा-यांना शासन निर्णय दि. १३ ऑगष्ट २००९ च्या परिशिष्ट अ मध्ये तसेच सेवाअंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेसाठी परिशिष्ट ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात येईल. या योजनेची इतर प्रमुख वैशिष्टे व अंमलबजावणीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे आहे.

१) दि.१.१०.१९९४ ते ३१.७.२००१ पर्यंत कालबध्द पदोन्नती योजना व १.८.२००१ पासुन पुढे सेवाअंतर्गत आश्वाशित प्रगती योजना अंमलात येईल. वेतनश्रेणीचा तपशील शासन निर्णय दि.१३.८.२००९ मधील परिशिष्ट अ. ब. मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२) या योजनेतर्गत वरिष्ठ वेतनश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपध्दती जेष्ठता पात्रता तसेच विहित केली असल्यास शैक्षणिक अर्हता, विभागीय परिक्षा इ.बाबींची पुर्तता या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या शा.नि.नुसार करणे आवश्यक आहे.

३) सरळसेवेने प्रविष्ठ झालेल्या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचा-यांच्या बाबतीत संपुर्ण सेवा कालावधीत **फक्त एकदाच या योजनेतर्गत वरिष्ठ श्रेणी अनुज्ञेय असेल.**

४) ज्या कर्मचा-यांना दोनपेक्षा जास्त पदोन्नती मिळाल्या असेल **अशा कर्मचा-यांना या योजनेचा लाभ मिळणार नाही.**

५) शिपाई /काळजीवाहक / राखणदार / स्वयंपाकी इ.निम्न श्रेणी कर्मचा-यांना वरिष्ठश्रेणी दिली तरी त्यांच्या **सेवानिवृतीचे वय वर्ष ६० हेच असेल.**

६) कर्मचा-यास विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेतील वरिष्ठ वेतनश्रेणी नंतर कर्मचा-यास **मुळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.**

७) नियमित पदोन्नतीस अपात्र असलेल्या कर्मचा-यास या योजनेचा लाभ मिळणार नाही तसचे नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचा-यास या योजनेचा लाभ मिळणार नाही तसे **बंधपत्र संबंधीत कर्मचा-योडून लिहून घेण्यात यावे.**

८) १२ वर्षाच्या सेवेची गणना करताना फक्त संबंधीत मान्यताप्राप्त अनुदानीत शाळेतील पदावरील नियमीत सेवा ग्राहय धरता येईल. अन्य पदावरील सेवा या प्रयोजनासाठी ग्राहय धरता येणार नाही तसेच या योजनेसाठी पदधारकाची संबंधीत पदावरील १२ वर्षाची मियमित सेवा होणे आवश्यक आहे. **सेवेत खंड पडल्यास या योजनेचा लाभ मिळणार नाही.**

९) सदर योजना दि.१.१०.१९९४ पासुन अंमजात आली असल्यास (एकाच पदावरील १२ वर्षे नियमित सेवा झालेल्यांना दि.१.१०.१९९४ किंवा त्यानंतर १२ वर्षाची सेवा झाल्याचा जो दिनांक त्या दिनांकास वरिष्ठ वेतनश्रेणी देणे अभिप्रि त आहे. त्याप्रमाणे वेतन निश्चिती करुन काल्पनिक वेतनवाढी देवुन त्याचा प्रत्यक्ष लाभ दि.१.१.२००९ पासून अनुज्ञेय राहील.**त्यापूर्वीची कोणतीही थकबाकी अनुज्ञेय नाही.**

१०) सदरहु शिक्षकेतर कर्मचा-यांचा सेवा कालावधी हा संबंधीत अशासकीय अपंगांची विशेष शाळेस /कर्मशाळेस अनुदान तत्वावर आणलेल्या दिनांकापासून वा त्यानंतरच्या प्रशासकीय मान्यता दिलेल्या दिनांकापासून वा त्यानंतर प्रशासकीय मान्यता दिलेल्या दिनांकापासून वा सेवेत कायम झालेल्या दिनांकापासून **१२ वर्षाचा कालावधी गणण्यात यावा.**

११) वरिष्ठ वेतनश्रेणी वेतननिश्चिती करताना ती नियमित पदोन्नती नंतरच्या वेतन निश्चितीप्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियमातील नियम ११ (१) अनुसार करावयाची आहे. तथापी वरिष्ठ वेतनश्रेणीत **अशी वेतननिश्चिती नंतर नियमित पदोन्नतीचे वेळी वेतन निश्चितीचा याच नियमातर्गत पुन्हा फायदा देय होणर नाही.**

१२) सदर योजनेची अमलबजावणी करताना एकवाक्यता राहवी म्हणून विभागीय पदोन्नती बैठका घेण्यात याव्या. नियमित १२ वर्षाची सेवा पूर्ण करणा-या कर्मचा-यांच्या अ‍ालकडील ५ वर्षाच्या गोपनीय अहवालाच्या आधारे वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ १२ वर्षाची नियमित सेवा झाल्यानंतरच देण्यात यावा. वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूरी आदेश व वेतननिश्चिती समाजकल्याण अधिकारी गट अ जि.प./विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी मुंबई शहर / उपनगर यांनी करावी व वेतन निश्चितीची पडताळणी आयुक्त अपंग कल्याण म.रा.पुणे यांच्याकडून करून घेण्यात यावी.

१३) निम्नश्रेणी ( चतुर्थश्रेणी ) कर्मचारी ज्या पदावर कार्यरत असेल त्या पदाच्या लगतच्या वरिष्ठ पदोन्नतीचे पदाची वेतनश्रेणी संबंधीतांना देय होईल. एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर पदोन्नतीस पात्र असणा-यास मिळणारी पदोन्नती निम्नश्रेणी ( चतुर्थश्रेणी ) वर्गातील पदाच्या पदोन्नती साखळीतील समजता येणार नाही कारण ती विशिष्ठ अर्हता धारण करण्यापूरतीच मर्यादीत आहे.

१४) मुळ वेतनश्रेणीत असलेला दक्षतारोध पार केल्याशिवाय वरिष्ठ वेतनश्रेणी देता येणार नाही.

१५) वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती पदोन्नतीप्रमाणे (अधिक जबाबदाराचे पद नसूनही) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ (१) प्रमाणे करावयाची असल्याने कर्मचा-यास शासन निर्णय वित्त विभाग क्र.पीएवाय १०८२ /सीआर-११०० (१) एसइआर- ३ दिनांक ३ नोव्हेंबर १९८४ अनुसार वेतननिश्चितीसाठी विकल्प त्या आदेशातील इतर अटी व शर्तीच्या अधिन राहून अनुज्ञेय राहील.

१६) वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या कर्मचारी निसमित पदोन्नतीस अपात्र ठरल्यावर मुळ पदावर पदावनत झाल्यानंतर मुळ पदाच्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ १२ नुसार वेतननिश्चिती केली जाईल. तदनंतर ज्या वेळी नियमित पदोन्नी मिळेल त्यावेळी पदोन्नीच्या पदाच्या वेतनश्रेणीत नवयाने वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ (१) अनुसार होईल. त्यासाठी वरिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधी किंवा वेतन याचा विचार करता येणार नाही त्यामुळे अशा प्रकरणात पुर्वीच्या वरिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधी पदोन्नतीच्या पुढील वेतनवाढीसाठी गणला जाणार नाही.

## परिशिष्ट अ

### स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगासाठी चालविण्यात येणाऱ्या विशेष शाळेतील शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची विद्यमान आणि सुधारीत वेतनश्रेणी

### ६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम (५ व्या वेतन आयोगानुसार) | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १ | अ) प्राचार्य / अधिक्षक / मुख्याध्यापक | ६५०० – २०० – १०५०० (मुळ / वरिष्ठश्रेणी) | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४४०० |
| | ब) ७५ च्या वरील विद्यार्थीगट संबंधीत प्रवर्गातील अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त संस्थेतून प्रशिक्षीत पदवीधर. प्राचार्य / अधिक्षक | ७५०० – २५० – १२००० (निवडश्रेणी) | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४८०० |
| | क) ५० किंवा त्याच्या आतील विद्यार्थी गट. प्राचार्य / अधिक्षक / मुख्याध्यापक | ५००० – १५० – ८००० मुळश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४२०० |
| | | ५५०० – १७५ – ९००० वरीष्ठश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| | ड) पदवीधर नसलेले प्रशिक्षीत. प्राचार्य / अधिक्षक / मुख्याध्यापक | ६५०० – २०० – १०५०० निवडश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४४०० |
| | इ) वरीलप्रमाणे पदवीधर अप्रशिक्षीत. प्राचार्य / अधिक्षक / मुख्याध्यापक | ४५०० – १२५ – ७००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २८०० |

# परिशिष्ट अ



## ६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| २ | प्राचार्य /अधिक्षक १०० पेक्षा जास्त मान्य संख्या निवासी शाळा किंवा २०० पेक्षा जास्त संमत विद्यार्थी संख्या असलेली अनिवासी शाळा (सन १९९७ नवीन शाळा संहितेप्रमाणे मंजुर केलेल्या पदाकरीता) संबंधीत प्रवर्गातील अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त संस्थेतील प्रशिक्षीत पदवीधर | ६५०० – २०० – १०५०० मुळ/वरीष्ठश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४४०० |
| | | ७५०० – २५० – १२००० (निवडश्रेणी) | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४८०० |
| ३ | उपप्राचार्य / अधिक्षक अपंग वसतीगृह मुलांची संख्या ७५ किंवा दिवस शाळा मुलांची संख्या १०० किंवा त्याहुन जास्त असेल अशा वसतीगृह आणि शाळांसाठी लागू संबंधीत प्रवर्गातील अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षीत पदवीधर | ५५०० – १७५ – ९००० मुळश्रेणी विशेष भत्ता रू. २०० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४४०० |
| | | ६५०० – २०० – १०५०० विशेष भत्ता रू. २०० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४५०० |
| | | ७५०० – २५० – १२००० विशेष भत्ता रू. २०० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४९०० |

परिशिष्ट अ



६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| ४ | अ) विशेष शिक्षक संबंधीत प्रवर्गाच्या अपंगांना शिकविण्यासाठी मान्यता प्राप्त प्रशिक्षण संस्थेतून प्रशिक्षीत पदवीधर (१९७३ च्या कर्मचारी रचना पध्दतीनुसार विशेष शिक्षकांच्या एकुण अनुशेष पदसंख्येच्या २५ टक्के एवढया संख्येएवढे मर्यादित) | ५५०० — १७५ — ९००० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४३०० |
| | | ६५०० — २०० — १०५०० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४४०० |
| | | ७५०० — २५० — १२००० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४८०० |
| | ब) प्रशिक्षीत पदवीधर विशेष शिक्षक | ४५०० — १२५ — ७००० | पी बी — १ | ५२०० — २०२०० | २८०० |
| | | ५५०० — १७५ — ९००० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४३०० |
| | क) प्रशिक्षीत माध्यमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक | ४५०० — १२५ — ७००० | पी बी — १ | ५२०० — २०२०० | २८०० |
| | | ५५०० — १७५ — ९००० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४३०० |
| | | ६५०० — २०० — १०५०० | पी बी — २ | ९३०० — ३४८०० | ४४०० |
| | ड) अप्रशिक्षीत माध्यमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक | ३२०० — ८५ — ४९०० | पी बी — १ | ५२०० — २०२०० | २००० |
| | इ) प्रशिक्षीत/अप्रशिक्षीत माध्यमिक शाळा प्रमाणपत्रधारक (एस. एस. सी.) विशेष शिक्षक | ३०५० — ७५ — ३९५० — ८० — ४५९० | पी बी — १ | ५२०० — २०२०० | १९०० |

६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| ५ | हस्तव्यवसाय/कलाशिक्षक, व्यवसाय शिक्षक, शारिरीक शिक्षण निदेशक, गायन शिक्षक, अवयव चलनशीलता निर्देशक | ४५०० – १२५ – ७००० मुळश्रेणी | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २८०० |
| | एस. एस. सी. (म.शा.प्र.) मान्यता प्राप्त संस्थेचे हस्तकलाव्यवसायातील २ | ५५०० – १७५ – ९००० वरीष्ठश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| | प्रमाणपत्रे किंवा शारिरीक शिक्षण प्रमाणपत्र धारक (सी.पी.एड.) किंवा यथास्थिती शारिरीक शिक्षण पदवीधर (बी.पी.एड), संगीत विशारद (मॅट्रीक/एस.एस.सी.) शिवाय ललीत कलामधील पदविका प्रमाणपत्र धारक (चित्रकला/रंगचित्रकला) चलनशीलता (मोबिलीटी/नृत्य/गृह विज्ञान इ.) | ६५०० – २०० – १०५०० निवडश्रेणी | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४४०० |
| ६ | अ) भौतिक उपचार तज्ञ मान्यता प्राप्त संस्थेची भौतिकोपचाराची पदवीका किंवा पदवी | ५५०० – १७५ – ९००० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| | ब) व्यवसायोपचार तज्ञ मान्यता प्राप्त संस्थेची व्यवसायोपचार शास्त्रातील पदवीका किंवा पदवी | ५५०० – १७५ – ९००० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| | क) वाचाउपचार तज्ञ मान्यता प्राप्त संस्थेची वाचाउपचार शास्त्रातील पदवीका किंवा पदवी | ५५०० – १७५ – ९००० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| | ड) प्रशिक्षीत समाजसेवक मान्यता प्राप्त संस्थेची समाज कार्यातील पदवीका किंवा पदवी | ५५०० – १७५ – ९००० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |

# परिशिष्ट अ



## ६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| ७ | परिचारीका | ४००० – १०० – ६००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २४०० |
| ८ | लेखापाल (५० किंवा अधिकच्या युनिटसाठी) बी. कॉम किंवा लेखाशास्त्राची पदवीका / लेखाशास्त्र आणि लेखाकार्य यातील दोन वर्षाचा अनुभव असलेल्या इतर विषयांचा पदवीधर | ४००० – १०० – ६००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २४०० |
| ९ | वरिष्ठ लिपीक विद्यार्थी संख्या ७५ पेक्षा अधिक असलेल्या संस्थेसाठी कनिष्ठ लिपीकामधून बढती घेवून | ४००० – १०० – ६००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २४०० |
| १० | लिपीक / टंकलेखक (माध्यमिक शाळा प्रमाणपत्र धारक / एस.एस.सी. पास) आणि टंकलेखनातील प्रमाणपत्र | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| ११ | वाहन चालक प्राथमिक इयत्ता ४ थी आणि वाहन चालविण्याचा परवाना | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| १२ | चपरासी ४ थी उत्तीर्ण | २५५० – ५५ – २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |
| १३ | शाळा परिचर / राखणदार / पहारेकरी / माळी / मोलकरीण / सहआचारी / काळजीवाहक साक्षर | २५५० – ५५ – २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |

परिशिष्ट अ

६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १४ | स्फाईगार साक्षर | २५५० – ५५ – २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |
| १५ | वसतिगृह अधिक्षक/ पर्यवेक्षक /अधिक्षीका माध्यमिक शाळा प्रमाणपत्र धारक आणि प्रथमोपचाराचे ज्ञान | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| १६ | आचारी | २६१० – ६० – २९१० – ६५ – ३३०० – ७० – ४००० | १ एस | ४४४० – ७४४० | १६०० |

## परिशिष्ट ब

## स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगासाठी चालविण्यात येणाऱ्या विशेष कर्मशाळेतील निदेशक आणि इतर कर्मचाऱ्यांची विद्यमान आणि सुधारीत वेतनश्रेणी

(५० निवासी आणि ७५ अनिवासी पर्यंत प्रशिक्षणार्थी असलेल्या कर्मशाळांसाठी विहीत वेतनश्रेण्या)
६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम (५ व्या वेतन आयोगानुसार) | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १ | कर्मशाळा व्यवस्थापकीय अधिक्षक शासनाच्या तांत्रिक प्रशिक्षणामधील पदविका आणि ३ वर्षाचा पुर्वानुभव अथवा पदविधर आणि अपंगांच्या प्रवर्गातील प्रशिक्षीत आणि ३ वर्षाचा अनुभव | ५५०० – १७५ – ९००० | पी बी – २ | ९३०० – ३४८०० | ४३०० |
| २ | लेखापाल (वाणिज्य शाखेतील पदवी किंवा लेखाशास्त्रातील पदवीका किंवा लेखाशास्त्र आणि लेखाकार्य यामधील २ वर्ष अनुभवासह इतर पदवीधर) | ४००० – १०० – ६००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २४०० |
| ३ | लिपीक/टंकलेखक (शालांत परिक्षा उत्तीर्ण आणि टंकलेखनातील प्रमाणपत्र) | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| ४ | शिपाई (४ थी उत्तीर्ण) | २५५० – ५५ – २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |

## ६ वा वेतन आयोग

| अ. क्र. | पदनाम (५ व्या वेतन आयोगानुसार) | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेनतश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| ५ | मदतनीस (४ थी उत्तीर्ण) | २५५०–५५– २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |
| ६ | अ) निदेशक ('अ' वर्ग) (संबंधीत व्यवसायातील राज्याच्या तंत्रशिक्षण विभागाकडून मान्यताप्राप्त पदवीका) | ४५०० – १२५ – ७००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २८०० |
| | ब) निदेशक ('ब' वर्ग) (राज्याच्या तंत्रशिक्षण विभागाकडून संबंधीत व्यवसायातील प्रमाणपत्र) | ४००० – १०० – ६००० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २४०० |
| | क) निदेशक ('क' वर्ग) (शालांत परिक्षा प्रमाणपत्रधारक आणि हस्तव्यवसायातील प्रशिक्षीत प्रमाणपत्र किमान १ वर्षाचा शासन मान्य अभ्यासक्रम राज्याच्या तंत्रशिक्षण विभागाकडून संबंधीत व्यवसायातील प्रमाणपत्र) | ३२०० – ८५ – ४९०० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | २००० |
| ७ | भांडारपाल (ज्या कर्मशाळेतील उत्पादित वस्तुंची विक्री दिड लाखापेक्षा अधिक असेल त्याच कर्मशाळेसाठी माध्यमिक शालांत प्रमाणपत्रधारक) | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| ८ | वाहनचालक (अपंग मुलांची ने–आण करण्यासाठी संस्थेचे वाहन असल्यास) | ३०५० – ७५ – ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| ९ | वाहन परिचर (अपंग मुलांची ने–आण करण्यासाठी संस्थेचे वाहन असल्यास) | २५५० – ५५ – २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |

## परिशिष्ट क

**कर्मशाळा** :– समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग, शासन निर्णय क्रमांक इडीडी १०९६/प्र.क्र. ४८७/सुधार – २, दिनांक २२ ऑक्टोबर १९९७ अन्वये **शैक्षणिक अर्हता शिथील असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी वेतनश्रेण्या**

**(५० निवासी आणि ७५ अनिवासी पर्यंत प्रशिक्षणार्थी असलेल्या कर्मशाळांसाठी विहीत वेतनश्रेण्या)**

**६ वा वेतन आयोग**

| अ. क्र. | पदनाम (५ व्या वेतन आयोगानुसार) | विद्यमान वेतनश्रेणी | सुधारीत वेतनश्रेणी | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | वेतन बॅन्ड क्र. | वेतन बॅन्ड | ग्रेड वेतन |
| १ | कर्मशळा व्यवस्थापकीय अधिक्षक<br>अ) बी. ए. आणि तंत्रशिक्षण विभागाचे हातमाग आणि यंत्रमाग प्रमाणपत्र (सी.टी.आय.)<br>ब) एस. एस. सी., टायपिंग, बी. ए. (एस.एन.सी.टी.)<br>क) इन्टर स्कॉनरशिप फ्रॉम अमेरिकन फौंऊडेशन स्पेशलाईझेशन इन रिटॅबिलीटेशन ट्रेनिंग (शॉटटर्म)<br>ड) एम. ए. सोशलसायन्स – इन्टेन्सिव्ह कोर्स ऑन स्ट्रेस मॅनेजमेंट कंडक्टेड वाय. एन. आय. व्ही. एच.<br>इ) १० वी पास, वास्तुशास्त्र दोन वर्षे<br>फ) बी. ए. | ५०००– १५० – ८००० | पी बी – १ | ९३०० – ३४८०० | ४२०० |
| २ | निदेशक / सिनिअर सुपरवाझर/ ज्युनिअर सुपरवाझर ('क' वर्ग)<br>अ) निदेशक (किमान एस.एस.सी.) | ३०५०–७५– ३९५० – ८० – ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |
| | ब) निदेशक (संबंधीत व्यवसायातील किमान आठ वर्षाचा अनुभव/सेवा) | २७५०–७०–३८०० – ७५ – ४४०० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १८०० |
| ३ | लिपीक – टंकलेखक (एस. एस. सी. नापास | २७५०–७०–३८०० –७५– ४४०० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १८०० |
| ४ | मदतनीस (४ थी पेक्षा कमी इयत्ता उत्तीर्ण किंवा अशिक्षीत) | २५५०–५५– २६६० – ६० – ३२०० | १ एस | ४४४० – ७४४० | १३०० |
| ५ | भांडारपाल (१० वी नापास) | २७५०–७०– ३८००–७५–४४०० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १८०० |
| ६ | वाहनचालक (३ री, वाहन चालविण्याचा परवाना आवश्यक) | ३०५०–७५– ३९५०–८०– ४५९० | पी बी – १ | ५२०० – २०२०० | १९०० |

# परिशिष्ट - ६

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगाच्या विशेष शाळातील शिक्षकांना केंद्र शासनाने नेमलेल्या प्रा. चट्टोपाध्याय आयोगाच्या शिफारशी प्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी लागू करणेबाबत....

महाराष्ट्र शासन

समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग

शा. नि. क्रमांक: एसआरव्ही-१०८९/४८६७७/के. नं. ६६५/ सुधार -२

मंत्रालय विस्तारभवन, मुंबई-४०००३२

दिनांक: ५ जून, १९९२

वाचा :- १) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्र. इडीडी-१०८९/५३५१९/के. नं. ४०५/सुधार-२, दिनांक १. ११. १९८९

२) संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. अपंग/९०-९१/का. २८/१७४५, दि. १८. १०. १९९०.

निर्णय:- शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग क्रमांक इडीडी-१०८९/५३५१९/के. नं. ४०५/सुधार-२, दि. १. ११. १९८९ अन्वये स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगाच्या विशेष शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना चौथ्या वेतन आयोगाच्या शिफारशीप्रमाणे सुधारित वेतनश्रेणी लागू केल्या आहेत. केंद्र शासनाने प्रा. डी. पी. चट्टोपाध्याय यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या शिक्षणासाठी राष्ट्रीय आयोगाने केलेल्या शिफारसीनुसार शिक्षकांना वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी लागू करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. त्यास अनुसरून शासन आता अपंगाच्या विशेष शाळातील शिक्षकांना विवरणपत्र "अ" येथे दर्शविल्या प्रमाणे त्रिस्तरीय वेतनश्रेणी मंजूर करण्यास मान्यता देत आहे.

२. याबाबत असाही खुलासा करण्यात येत आहे की, अपंगाच्या सर्व शाळा हया प्राथमिक शाळा असूनही विशेष बाब म्हणून त्यांना सुरुवातीस वरिष्ठ श्रेणी दिली गेली असल्याने काही पदांना आता फक्त वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीच मंजूर करण्यात येत आहे. सुधारित त्रीस्तरीय वेतनश्रेणीमध्ये वेतन निश्चिती करण्याबाबतचे नियम यासोबत जोडलेल्या परिशिष्टाप्रमाणे राहतील.

३. या संदर्भात संचालक, महिला बाल व अपंग विकास यांनी वरीलप्रमाणे सुधारित वेतनश्रेण्या लागू करताना संबंधित कर्मचारी त्या पदासाठी अर्हताप्राप्त आहे की नाही याची खात्री करून घ्यावी.

४. या आदेशावर होणारा खर्च "२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण-०२-समाजकल्याण-१०१-अपंग व्यक्तिंचे कल्याण (७) अनुदान..."

र्षिक योजनांतर्गत योजना [ १०] शारिरीदृष्ट्या अपंगांचे
रण्यासाठी स्वयंसेवी संस्थांना वित्तीय सहाय्य [ २२३५-०२५-५]"
शिर्षाखाली खर्ची घालण्यात येऊन तो उपलब्ध तरतुदीतून भागवावा.

हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौ. क्र. पृ. क्र. ८४/९२/व्यय-११, दिनांक - १५/ ५/ १९९२ ला अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ म. मो. कांबळे ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति सचिव
, महाराष्ट्र शासन
, महिला बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे [ १० जादा प्रतीसह]
भागीय समाजकल्याण अधिकारी
जिल्हा समाज महिला बाल व अपंग विकास अधिकारी
पाल-१ [ लेखा. व अनुज्ञेयता], मुंबई
पाल-१ [ लेखा परीक्षा ], मुंबई
पाल-२ [ लेखा व अनुज्ञेयता], नागपूर
पाल-२ [ लेखा परीक्षा ] नागपूर
न व लेखाधिकारी, मुंबई
तो लेखाधिकारी, मुंबई
न विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
विभाग [ व्यय-११], मंत्रालय, मुंबई
प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
वायोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
लिक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई
[ त्यांना विनंती करण्यात येते की त्यांनी उपरोक्त शासन निर्णयास व्यापक प्रसिध्दी द्यावी. ]
धकारी [ अर्थसंकल्प/नियोजन ], समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा
न विभाग, मंत्रालय, मुंबई
नस्ती, सुधार-२ - २.

-६३९२

(23)

- परिशिष्ट -

प्राथमिक शिक्षकांना व मुख्याध्यापकांना द्विस्तरीय/त्रिस्तरीय वेतनश्रेणी —

राज्यातील अपंगांसाठी चालविण्यात येणा-या सर्व अनुदानित अशासकीय खाजगी, प्राथमिक विशेष शाळांमधील शिक्षकांना दिनांक १ जानेवारी १९८६ पासून केंद्र शासनाच्या धर्तीवर त्रिस्तरीय वेतनरचना मंजूर करण्याच्या निर्णयानुसार विविध संवर्गात मूळ श्रेणी, वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणी संबंधित प्रपत्रात दर्शविल्यानुसार राहील. यापुढे माध्यमिक शाळेतील मुख्याध्यापकांचा एकच प्रवर्ग राहील व त्यांना १२ वर्षाच्या त्या पदावरील अर्हताकारी सेवेनंतर वरिष्ठ श्रेणी मिळेल.

१. वरिष्ठ श्रेणीत पात्र होण्यासाठी उमेदवाराला खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक आहे:-

(अ) प्रशिक्षण अहितह १२ वर्षांची अर्हताकारी सेवा.

(ब) या कामासाठी नियुक्त केलेल्या समितीला उमेदवाराचे कामकाज समाधानकारक वाटणे.

(क) त्याने/तिने विभागाने विहित केलेले किमान तीन आठवड्याचे सेवांतर्गत प्रशिक्षण पूर्ण करणे.

वरील (क) येथील अट दक्षता रोध पार करण्यास आवश्यक राहील.

२. निवडश्रेणी त्या त्या संस्थेतील व संवर्गातील वरिष्ठ श्रेणीतील पदांना सेवा ज्येष्ठतेनुसार अनुज्ञेय होईल. ह्या श्रेणीस पात्र होण्यास उमेदवारास खालील अटींची पूर्तता करणे आवश्यक राहील:-

(अ) त्याने/तिने वरिष्ठ श्रेणीत १२ वर्षांची अर्हताकारी सेवा पूर्ण केली असली पाहिजे.

(ब) शासन विहित करील असे सेवांतर्गत प्रशिक्षण त्याने/तिने पूर्ण केले असले पाहिजे.

(क) (१) प्राथमिक शिक्षकांसाठी--प्रशिक्षित पदवीधराची अर्हता मिळविली असली पाहिजे.

(२) प्राथमिक शाळेतील मुख्याध्यापकांसाठी---पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षकांची अर्हता प्राप्त केली असली पाहिजे.

(३) माध्यमिक शाळेतील प्रशिक्षित—अपदवीधर शिक्षकांसाठी पदवी व पदवीधर शिक्षकांसाठी पदव्युत्तर प्रशिक्षित शिक्षकांची अर्हता प्राप्त केलेली असली पाहिजे.

३. वरिष्ठ श्रेणी व निवड श्रेणीसाठी तसेच दक्षता रोध पार करण्यासाठी पात्र होण्याकरिता संबंधित शिक्षकाने/मुख्याध्यापकाने त्यांच्यासाठी आयोजित केलेल्या सेवांतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमात सहभागी होऊन तो पूर्ण करणे आवश्यक आहे. तथापि जर विशिष्ट परिस्थितीत सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित करणे शक्य झाले नाही. तर शासन ही अट अशा शिक्षकांच्या व मुख्याध्यापकांच्या बाबतीत काही विशिष्ट काळासाठी शिथिल करू शकेल.

४. प्राथमिक शाळेतील शिक्षक व प्रशिक्षित शिक्षकांना वरिष्ठ [illegible] १२ वर्षांच्या अर्हताकारी सेवेनंतर, [illegible]

केलेली शैक्षणिक अर्हता प्राप्त करण्याचे अटीवर अनुज्ञेय आहे. याबाबत स्पष्ट करण्यात येते की, ज्या शिक्षकांची सलग सेवा १८ वर्षे वा त्यापेक्षा जास्त झाली असेल अशा शिक्षकांना पुढील उच्चश्रेणीसाठी म्हणजेच निवड श्रेणीसाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता मिळविण्यापासून सूट मिळू शकेल. तथापि, ज्यांनी १८ वर्षे, पूर्ण एवढी सेवा केली नसेल अशा शिक्षकांना त्यांनी विहित शैक्षणिक अर्हता प्राप्त केल्याशिवाय त्यांचा पुढील श्रेणीसाठी विचार करता येणार नाही.

५. १२ वर्षांच्या प्रशिक्षित अर्हतेसह झालेल्या सलग सेवेनंतर मूळ वेतनश्रेणीतून पुढील वरिष्ठ श्रेणीमध्ये/निवड श्रेणीमध्ये वेतन निश्चित करण्यात येईल. अशावेळी, त्या शिक्षकांच्या दर्जामध्ये [Status] व जबाबदाऱ्यांमध्ये फरक होत नसल्याने मूळ वेतनाएवढ्या रकमेचा वरिष्ठ श्रेणीत टप्पा असेल तर वेतन त्या टप्प्यावर निश्चित करण्यात यावे व असा टप्पा नसेल तर वरिष्ठ/निवडश्रेणीतील नजिकच्या खालील टप्प्यावर वेतन निश्चित करुन त्या टप्प्याची रक्कम मूळ वेतनश्रेणीतील वेतनापेक्षा जेवढ्यां रकमेने कमी असेल तेवढी रक्कम त्या कर्मचाऱ्यास वैयक्तिक वेतन म्हणून समजण्यात यावे व असे वैयक्तिक वेतन पुढील वार्षिक वेतनवाढीत सामावून घेण्यात यावे.

## नियम शिथिल करण्याचा अधिकार

कोणत्याही विशिष्ट प्रकरणात या नियमांच्या सर्व किंवा कोणत्याही तरतुदी लागू केल्यामुळे अकारण हाल होतील अशी शासनाची खात्री झाल्यास अशा कर्मचाऱ्याचे प्रकरण न्याय्य व रास्त पद्धतीने हाताळण्यासाठी शासनास आवश्यक वाटेल अशा मर्यादेच्या व अशा शर्तींच्या अधीन राहून तो नियम लागू करणे किंवा त्या नियमानुसार आवश्यक म्हणून ठरविलेल्या बाबी शिथिल करण्याबाबत असा आदेश शासन काढू शकेल.

## निर्वचन

या नियमांच्या कोणत्याही तरतुदींच्या निर्वचनासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, तो महाराष्ट्र शासनाच्या समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभागाकडे निर्दिष्ट करण्यात येईल आणि त्या विभागाचा त्यावरील निर्णय अंतिम राहील.

२२७३९१

प्रपत्र-१

अपंगांच्या विशेष शाळांतील शिक्षकांना वद्यापाध्याय आयोगाप्रमाणे द्यावयाच्या समकक्ष वेतनश्रेण्या दर्शविणारे प्रपत्र

| अ. क्र. | पदनाम | शैक्षणिक पात्रता | चौथ्या वेतन आयोगाची मान्य समकक्ष वेतनश्रेणी | वद्यापाध्याय आयोगा प्रमाणे प्रस्तावित सुधारित वेतनश्रेण्या | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १. | प्राचार्य/मुख्याध्यापक | प्रशिक्षित पदवीधर | १६४०-२९०० | १६४०-२९००+ २०० रुपये विशेष वेतन दि. १.९.८८ पासून | अपंगांची विशेष शाळा म्हणून प्राथमिक शाळेचा अभ्यासक्रम असूनही प्रथमानुसार वरिष्ठश्रेणी दिली आहे. त्यामुळे आता त्रिस्तरीय वेतनश्रेणी प्रस्तावित केली नाही. |
| २. | मुख्याध्यापक | एस. एस. सी. प्रशिक्षित | १३५०-२२०० | १३५०-२२०० <br> १४००-२६०० वरिष्ठश्रेणी <br> १६४०-२९०० निवडश्रेणी | " |
| ३. | विशेष शिक्षक | १] प्रशिक्षित पदवीधर | १२००-२२०० [१९७३ च्या कर्मचारी रचना पद्धतीनुसार विशेष शिक्षकांच्या पदसंख्येच्या २५% पदांना मर्यादित] | १४००-२६०० <br> १६४०-२९०० वरिष्ठश्रेणी <br> २०००-३५०० निवड श्रेणी | |
| | | २] अप्रशिक्षित पदवीधर | १३५०-२२०० | १३५०-२२०० | प्रथम वरिष्ठश्रेणी दिल्याने फक्त निवडश्रेणी प्रस्तावित केली. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| --- | --- | --- | --- | --- | --- |
| ३. [illegible] शिक्षक | | ३) पदवीधर अप्रशिक्षित | १२००-२०४० | १२००-२०४० | अप्रशिक्षित [illegible] काम [illegible] निवृत्त [illegible] वेतनाचे [illegible] मान्यता [illegible] देण्याची वरिष्ठ वेतनश्रेणी घोडे अयोग्य [illegible] आहे. तो पदवीधर असून अनुभवी शिक्षक म्हणून काम [illegible] शिकवण्याचे काम देता येतील. |
| | | ४) एस. एस. सी. प्रशिक्षित | १२००-२०४० | १२००-२०४०<br>१४००-२६०० वरिष्ठश्रेणी<br>१६४०-२९०० निवडश्रेणी | काही नाही. |
| | | ५) एस. एस. सी. अप्रशिक्षित | ९७५-१६६० | ९७५-१६६० | अप्रशिक्षित असल्यामुळे एक वेतनश्रेणी मान्य करण्यात येत आहे. |
| | | ६) प्रशिक्षित/अप्रशिक्षित प्राथमिक शाळा प्रमाणपत्र धारक (पी. एस. सी.) | ९५०-१५०० | ९५०-१५०० | योग्य अर्हता नसल्यामुळे एकच वेतनश्रेणी मान्य करण्यात येत आहे. |

| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
|---|---|---|---|---|---|
| ४. | हस्तव्यवसाय/कला शिक्षक/व्यवसाय शिक्षण शारिरीक शिक्षण निदेशक. गायन शिक्षक [अथवा] ज्ञान शिक्षता प्रशिक्षित निदेशक | एस. एस. सी. [मा. शा. प्र.] मान्यता प्राप्त संस्थेचे हस्तव्यवसायातील दोन प्रमाणपत्रे किंवा शारिरीक शिक्षण प्रमाणपत्रधारक [सी. पी. एड.] किंवा यथास्थिती. शारिरीक शिक्षण पदवीधारक [बी. पी. एड.] संगीत विशारद, मॅट्रिक, एस. सी. शिवाय | १२००-२०४० | १२००-२०४०<br>१४००-२६००<br>१६४०-२९०० | म[illegible] T प्राथमिक [illegible] बी. टी. सी. [illegible] वेतनश्रेणी [illegible] केली आहे. |

| १ | २ |
|---|---|

परिशिष्ट - ७

राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबद्ध पदोन्नती योजना लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
**शासन निर्णय क्रमांक** : इडीडी-२००५/प्र. क्र.३५६/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १३ ऑगस्ट , २००९

**वाचा** :- १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९५/प्र.क्र.१/९५/१२ दिनांक ८ जून, १९९५
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्र. एसआरव्ही १०९५/प्र.क्र. ३३/९५/१२ दिनांक १-१२-१९९५ व दिनांक २०-३-१९९७
३) शासन निर्णय, वित्त विभाग क्र. वेतन ११९९/प्र.क्र. २/९९/सेवा-३ दि. २०-७-२००१
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२६९५/५५०/माशि-२, दि. ३०/४/१९९८
५) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, क्र. एसएसएन-२६९८/(१५७) माशि-२, दि. २२/७/१९९८

**प्रस्तावना :-** राज्यातील अपंग मुलामुलींना शिक्षण व त्यांचे पुनर्वसनासाठी प्रशिक्षण देण्याकरिता शासनामार्फत अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा चालविल्या जात आहेत. त्याचप्रमाणे राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फतही अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा चालविल्या जात आहेत. त्यामध्ये स्वयंसेवी संस्थाचा मोठ्या प्रमाणात सहभाग आहे. या स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळा तसेच सर्वसाधारण शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांप्रमाणे काही योजना/सवलती देण्यात आलेल्या आहेत. परंतु काही योजना/सवलती अद्याप लागू केलेल्या नाहीत. यासाठी अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या संघटना/ लोकप्रतिनिधी, इत्यादीकडून त्या लागू करण्याबाबत मोठ्या प्रमाणात शासनाकडे मागणी होत होती. त्याचप्रमाणे न्यायालयीन प्रकरणेही दाखल करण्यात आली होती. त्यामध्ये शासनाने धोरणात्मक निर्णय घ्यावा असे आदेश मा. उच्च न्यायालयाकडून प्राप्त झालेले आहेत. या सर्व बाबी विचारात घेऊन राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कालबाह्य पदोन्नती योजना लागू करण्याबाबतची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-** राज्यातील अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत किंवा उपलब्ध असल्यास पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना (गट-क व गट-ड) मधील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ पदाची वेतनश्रेणी देण्याबाबतचे आदेश वरील वाचा येथील शासन निर्णयाद्वारे निर्गमित करण्यात आलेले आहेत. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या सर्वसाधारण शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/१०/१९९४ पासून लागू

करण्यात आलेली आहेत. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या सर्वसाधारण शाळेतील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना दिनांक १/१०/१९९४ पासून लागू करण्यात आलेली आहेत. त्याच धर्तीवर कालबाह्य पदोन्नती योजना राज्यातील अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही लागू करण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

२. या योजनेचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांच्या पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्यात येईल. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना या निर्णयासोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये तसेच सेवाअंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेसाठी परिशिष्ट-ब मध्ये दर्शविल्याप्रमाणे वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात येईल. या योजनेची इतर प्रमुख वैशिष्ट्ये व अंमलबजावणीची कार्यपद्धती खालीलप्रमाणे आहे.

१) दिनांक १/१०/१९९४ ते दि. ३१/७/२००१ पर्यंत कालबद्ध पदोन्नती योजना व दि. १/८/२००१ पासून पुढे सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना अंमलात येईल. वेतनश्रेणीचा तपशील परिशिष्ट-अ व व ब मध्ये दर्शविण्यात आला आहे.

२) या योजनेंतर्गत वरिष्ठश्रेणी मिळण्यासाठी पदोन्नतीसाठी विहित कार्यपद्धती, ज्येष्ठता, पात्रता तसेच विहित केली असल्यास अर्हता, विभागीय परीक्षा इत्यादी बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

३) सरळसेवेने प्रतिष्ठा झालेल्या या अथवा पदोन्नतीने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत संपूर्ण सेवा कालावधीत एकदाच या योजनेंतर्गत वरिष्ठ श्रेणी अनुज्ञेय असेल.

४) ज्या कर्मचाऱ्यांना दोनपेक्षा जास्त पदोन्नत्या मिळाल्या आहेत अशा कर्मचाऱ्यांना या योजनेत वरिष्ठश्रेणी मिळणार नाही.

५) शिपाई, काळजीवाहक/राखणदार/स्वयंपाकी इत्यादी निम्नश्रेणी कर्मचाऱ्यांना रू. २५५०-३२००/२६१०-४००० ही वरिष्ठश्रेणी दिली तरी त्याचे सेवानिवृत्तीने वय ६० वर्षे हेच असेल. मात्र कनिष्ठ लिपीक पदावर ज्यांना नियमित पदोन्नती मिळाली असेल त्यांना सेवा निवृत्तीचे वय ५८ वर्षे राहील.

६) या पदोन्नतीमुळें जबाबदारी आणि कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नती प्रमाणे वेतन निश्चितीत लाभ देता येईल. मात्र वेतननिश्चितीत मिळालेला हा लाभ त्याचे वेतन श्रेणीत कार्यात्मक (Functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

७) कर्मचाऱ्यांस विशेष वेतन मिळत असेल तर या योजनेखालील पदोन्नतीनंतर कर्मचाऱ्यांस मूळ वेतनश्रेणीतील विशेष वेतन अनुज्ञेय राहणार नाही.

८) या योजनेंतर्गत पदोन्नती मिळाली तरी कर्मचाऱ्यांचे नाव कनिष्ठ ( मूळ) संवर्गाच्या ज्येष्ठता सूचीत पूर्ववत राहील व सेवाप्रवेश नियमातील तरतुदीनुसार उपलब्ध रिक्ततेत योग्यवेळी नियमित पदोन्नतीसाठी (Functional

Paranotion) त्याचा विचार करण्यात येईल. नियमित पदोन्नतीस अपात्र असलेल्या कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही.

९) नियमित पदोन्नती नाकारलेल्या कर्मचाऱ्यांस या योजनेचा लाभ मिळणार नाही. तसे बंधपत्र संबंधित कर्मचाऱ्यांकडून लिहून घेण्यात येईल.

३. प्रस्तावनेतील अनु क्र. २ मधील शासन निर्णयान्वये शासकीय सेवकांबाबत करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक माहितीबाबतचे परिशिष्ट-क या शासन निर्णयासोबत योग्य फेरफार करून जोडण्यात आले आहे.

४. आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना कळविण्यात येते की, हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावेत व त्यानुसार वेतन निश्चित करण्यात यावी या सुधारित वेतन निश्चितीमुळे कोणतीही थकबाकी अनुज्ञेय होणार नाही.

५. या योजनेसाठी येणारा खर्च शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतन देयकावरील खर्च ज्या लेखाशिर्षाखाली करण्यात येतो त्या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. हे आदेश वित विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ३२६/०९/ सेवा-३ दिनांक १०/८/२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्र.२००९०८१३१९३२५०००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय)यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालय
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई/सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती का. सुधार-२

शासन निर्णय क्रमांक इडीडी २००५/ प्र. क्र. ३५६ / सुधार-२
दिनांक १३ ऑगस्ट, २००९ सोबतचे परिशिष्ट

## कालबद्ध पदोन्नती योजनेतील वेतनश्रेणीचा तपशील

### परिशिष्ट- अ

| अ. क्र. | पदनाम | विद्यमान वेतनश्रेणी | कालबाह्य/वरिष्ठ वेतनश्रेणी |
|---|---|---|---|
| १ | निम वैद्यकीय कर्मचारी | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |
| २ | भौतिक उपचार तज्ज्ञ / व्यावसाय उपचार तज्ज्ञ/फिजिओ थेरोपीस्ट | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |
| ३ | वाचा उपचार तज्ज्ञ (स्पीच थेरेपीस्ट/ प्रशिक्षित समाजसेवक/चलन अवयव निर्देशक/मानस शास्त्रज्ञ | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |
| ४ | व्यवस्थापकीय अधिक्षक | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |
| ५ | निर्देशक- (अ वर्ग) | ४५००-१२५-७००० | ५०००-१५०-८००० |
| ६ | लेखापाल | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| ७ | वरिष्ठलिपिका | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| ८ | परिचारिका | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| ९ | निर्देशक(ब- वर्ग) | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| १० | निर्देशक (क- वर्ग) | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ४०००-१००-६००० |
| ११ | कनिष्ठ लिपिक नि लेखापाल | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| १२ | अधिक्षक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| १३ | गृहपाल/वसतिगृह अधिक्षक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| १४ | लिपिका-टंकलेखक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |

| | | | |
|---|---|---|---|
| १५ | भांडारपाल | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| १६ | वाहन चालक | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| १७ | स्वयंसेवी (आचारी) | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | २६५०-६५-३३००-७०-४००० |
| १८ | काळजीवाहक/राखणदार (पूर्णवेळ व नियमित वेतनश्रेणीतील कर्मचारी) | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३०० -७०-४००० |
| १९ | शिपाई/चपराशी | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| २० | कार्यशाळा मदतनीस | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| २१ | मदतनीस (पूर्णवेळ व नियमित वेतनश्रेणीतील कर्मचारी) | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| २२ | सफाईगार (पूर्णवेळ व नियमित वेतनश्रेणीतील कर्मचारी) | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| | वाहन परिचर | २५५०-५५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

शासन निर्णय क्रमांक इडीडी २००५/ प्र. क्र. ३५६ / सुधार-२
दिनांक १३ ऑगस्ट, २००९ सोबतचे परिशिष्ट

## सेवा अंतर्गत आश्वाशित प्रगती योजनेतील वेतनश्रेणीचा तपशील

### परिशिष्ट- ब

| अ. क्र. | विद्यमान सुधारीत वेतनश्रेणी | अनुज्ञेय सुधारीत वेतनश्रेणी |
|---|---|---|
| १ | २५५०-७५-२६६०-६०-३२०० | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० |
| २ | २६१०-६०-२९१०-६५-३३००-७०-४००० | २६५०-६५-३३००-७०-४००० |
| ३ | २६५०-६५-३३००-७०-४००० | २७५०-७०-३८००-७५-४४०० |
| ४ | २७५०-७०-३८००-७५-४४०० | ३०५०-७५-३९५०-८०-४५९० |
| ५ | ३०५०-७०-३९५०-८०-४५९० | ३२००-८५-४९०० |
| ६ | ३२००-८५-४९०० | ४०००-१००-६००० |
| ७ | ४०००-१००-६००० | ४५००-१२५-७००० |
| ८ | ४५००-१२५-७००० | ५०००-१५०-८००० |
| ९ | ५५००-१५०-८००० | ५५००-१७५-९००० |
| १० | ५५००-१७५-९००० | ६५००-२००-१०५०० |

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

**शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्रमांक : इडीडी २००५/ प्र. क्र. ३५६ / सुधार–२, दिनांक १३ ऑगस्ट, २००९ ला जोडलेले स्पष्टीकरणात्मक माहिती दर्शविणारे परिशिष्ट**

परिशिष्ट– क

१) शासन निर्णयावरील परिच्छेद २ मध्ये उल्लेख केलेली १२ वर्षांच्या सेवेची गणना करताना फक्त संबंधित मान्यताप्राप्त अनुदानित शाळेतील पदावरील नियमित सेवा ग्राह्य धरता येईल. अन्य पदावरील सेवा या प्रयोजनासाठी ग्राह्य धरता येणार नाही.

२) या आदेशाच्या प्रयोजनासाठी पदधारकाची संबंधित पदावरील १२ वर्षांची नियमित सेवा होणे आवश्यक आहे.

३) सदर योजना १–१०–१९९४ पासून अंमलात आली असल्याने एकाच पदावरील १२ वर्षे नियमित सेवा झालेल्यांना दिनांक १–१०–१९९४ किंवा त्यानंतर १२ वर्षांची सेवा झाल्याचा जो दिनांक असेल त्या दिनांकास वरिष्ठ श्रेणी देणे अभिप्रेत आहे. त्याचप्रमाणे वेतन निश्चिती करून काल्पनिक वेतन वाढ देऊन त्याचा प्रत्यक्ष लाभ हा दिनांक १/१/२००९ पासून अनुज्ञेय राहील.

४) सदरहू शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवाकालावधी हा संबंधित अशासकीय अपंगांची विशेष शाळेस/कर्मशाळेस अनुदान तत्वावर आणलेल्या दिनांकापासून वा त्यानंतरच्या प्रशासकीय मान्यता दिलेल्या दिनांकापासून वा सेवेत कायम झालेल्या दिनांकापासून १२ वर्षांचा कालावधी गणण्यात यावा.

५) वरिष्ठ वेतनश्रेणीत वेतननिश्चिती करताना ती नियमित पदोन्नती नंतरच्या वेतन निश्चितीप्रमाणे महाराष्ट्र नगरी सेवा (वेतन) नियमातील नियम ११ (१) अनुसार करावयाची आहे. तथापि, वरिष्ठ वेतनश्रेणीत अशा वेतननिश्चितीनंतर पदोन्नतीचे वेळी वेतन निश्चितीचा याच नियमांतर्गत पुन्हा फायदा देय होणार नाही.

६) सदर योजनेची अंमलबजावणी करताना एकवाक्यता रहावी म्हणून दरवर्षी सप्टेंबर महिन्यात विभागीय पदोन्नती समितीच्या बैठका घेण्यात येतात. त्याच धर्तीवर सप्टेंबर महिन्यात एप्रिल ते पुढील मार्च पर्यंतच्या कालावधीत नियमित १२ वर्षांची सेवा पूर्ण करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या अलीकडील (Latest) ५ वर्षांच्या गोपनीय अहवालाच्या आधारे वरिष्ठ वेतनश्रेणी देण्याकरीता विचार व्हावा. मात्र प्रत्यक्षात वरिष्ठ वेतनश्रेणी लाभ १२ वर्षांची नियमित सेवा झाल्यानंतरच देण्यात यावा.

७) कर्मचाऱ्यांना १२ वर्षांच्या नियमित वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ संपूर्ण सेवेत एक वेळा अनुज्ञेय असेल.

८) निम्नश्रेणी (चतुर्थ श्रेणी) कर्मचारी ज्या पदावर कार्यरत असेल त्या पदाच्या लगतच्या वरिष्ठ पदोन्नतीचे पदाची वेतनश्रेणी संबंधितांना देय होईल. एस.एस.सी. परिक्षा उत्तीर्ण झाल्यावर पदोन्नतीस पात्र पदावर मिळणारी पदोन्नती (निम्नश्रेणी चतुर्थ श्रेणी) वर्गातील पदाच्या पदोन्नती साखळीतील समजता येणार नाही. कारण तो विशिष्ट अर्हता धारण करणाऱ्यापुरतीच मर्यादित आहे.

९) पूर्वी धारण केलेल्या मूळ पदाची श्रेणीवाढ झाल्यावर कर्मचाऱ्यांस मूळ पदावरील १२ वर्षांच्या नियमित सेवेनंतर या शासन निर्णयातील इतर अटी व शर्तीनुसार वरिष्ठ वेतनश्रेणी अनुज्ञेय होईल. वेतनश्रेणी तीच असून केवळ पदनाम बदलले असेल किंवा त्याच वेतनश्रेणीतील अन्य पदात रूपांतर/समाविष्ट केले असल्यास किंवा निव्वळ वेतनश्रेणीत सुधारणा झाली असल्यास मूळ पदावरील १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय होईल.

१०) मूळ वेतनश्रेणीत असलेला दक्षतारोध पार केल्याशिवाय वरिष्ठ वेतनश्रेणी देता येणार नाही.

११) वरिष्ठ वेतनश्रेणीतील वेतननिश्चिती पदोन्नतीप्रमाणे (अधिक जबाबदारीचे पद नसूनही) महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम ११ (एक) प्रमाणे करावयाची असल्याने कर्मचाऱ्यास शासन निर्णय वित्त विभाग क्र. पीएवाय १०८२/सी आर -११०० (एक) / एसईआर-३ दिनांक ६ नोव्हेंबर १९८४ अनुसार वेतननिश्चितीसाठी विकल्प त्या आदेशातील इतर अटी व शर्तीच्या अधीन राहून अनुज्ञेय राहील.

१२) वरिष्ठ वेतनश्रेणी दिलेल्या कर्मचारी नियमित पदोन्नतीस अपात्र ठरल्यावर मूळ पदावर पदावनत झाल्यानंतर मूळ पदाच्या वेतनश्रेणीत महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ च्या नियम १२ अनुसार वेतननिश्चिती केली जाईल. तदनंतर ज्यावेळी नियमित पदोन्नती मिळेल त्यावेळी पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत नव्याने वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) अनुसार होईल. त्यासाठी वरिष्ठ वेतनश्रेणीतील कालावधी किंवा वेतन याचा विचार करता येणार नाही. त्यामुळे अशा प्रकरणात पूर्वीच्या वरिष्ठ श्रेणीतील कालावधी पदोन्नतीच्या पुढील वेतनवाढीसाठी गणता येणार नाही.

१३) शासन निर्णयाच्या परिच्छेद २ (२) मध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अंर्हता परिक्षा किंवा विभागीय परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अर्हता परिक्षा किंवा विभागीय परिक्षा विहित संधीत/ मुदतीत उत्तीर्ण न झाल्यामुळे ज्येष्ठता गमावली असेल अशा कर्मचाऱ्यांस त्यांनी सुधारित ज्येष्ठता निश्चित करून त्या ज्येष्ठता सूचीवरील त्याच्या कनिष्ठास जर कालबद्ध पदोन्नती म्हणून वरची वेतनश्रेणी मिळत असेल तर अन्यथा पात्र ठरत असल्यास त्या कनिष्ठास दिलेल्या तारखेपासून वरची वेतनश्रेणी देण्यात यावी.

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

## (परिशिष्ट - 8)

## अनुदान निर्धारण तक्ता

(सन - 20 - 20 च्या खर्चावर सन - 20 - 20 चे मुल्यनिर्धारण)

विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राचे नांव -

अनुदानित मान्यता प्राप्त विशेष शाळा/प्रशिक्षण केंद्राचा नोंदणी क्रमांक - वैधता कालावधी -

अनुदानित मान्य विद्यार्थी संख्या - निवासी - + अनिवासी - = एकुण -

| अ क्र | तपशील | लेखा परिक्षा विवरणपत्रा मध्ये नमूद केलेला खर्च | अनुज्ञेय खर्च | अनुज्ञेय नसलेला खर्च | सहाय्यक अनुदान टक्केवारी | मान्य सहाय्यक अनुदान | अनुज्ञेय नसलेल्या खर्चाची कारणे (रकाना क्र 5) |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| (अ) | 1. भाडे तत्वावरील इमारत भाडे | | | | ७५ % | | |
| | 2. इमारत स्वमालकीची अथवा विनामुल्ये भाडे तत्वावर असल्यास | | | | ७.५ % | | |
| एकुण - अ | | | | | | | |
| | (ब) वसतिगृह परिरक्षण / परिपोषण | | | | | | |
| 1. | अन्नधान्य | | | | | | |
| 2. | इंधन | | | | | | |
| 3. | दूध, अंडी, मटण, व भाजीपाला, स्वीट | | | | | | |
| एकुण - ब | | | | | | | |
| 4. | अनुज्ञेय परिपोषण खर्च = वार्षिक सरासरी दरमहा उपस्थिती X 12 महिने X दर = एकुण रुपये | | | | | | |
| 5. | सहाय्यक अनुदानासाठी क्रमांक ब अथवा क्र 4 पैकी कमी असेल ती रक्कम | | | | | | |
| | (क) वेतनेतर बाबी (आठ टक्के) पर्यंत | | | | | | |
| | 1) शैक्षणिक बाबी – 70 टक्के (वेतनेतर अनुदान 8 टक्केच्या मर्यादेत) | | | | | | |
| 1. | वह्या व पुस्तके | | | | | | |
| 2. | खेळ, करमणूक | | | | | | |
| 3. | शैक्षणिक सहल | | | | | | |
| 4. | सहाय्य साधने व उपकरणे खरेदी व दुरुस्ती | | | | | | |
| 5. | वैयक्तिक स्वच्छतेच्या बाबी (तेल, साबण, दंतमंजन इ.) | | | | | | |
| 6. | वैद्यकीय देखभाल व उपचार | | | | | | |
| 7. | गणवेश | | | | | | |
| 8. | शालेय स्टेशनरी | | | | | | |
| 9. | परिक्षा शुल्क, टयुशन फि, वाचक व लेखनीक भत्ता विद्यार्थ्यांकरीता | | | | | | |
| 10. | अंथरुण-पांघरुण | | | | | | |
| 11. | केशकर्तन | | | | | | |
| | एकुण (क-1) | | | | | | |
| | 2) अशैक्षणिक बाबी 30 टक्के (वेतनेतर अनुदान 8 टक्केच्या मर्यादेत) | | | | | | |
| 12. | छपाई व लेखन सामुग्री | | | | | | |
| 13. | टेलिफोन | | | | | | |
| 14. | पाणीपट्टी | | | | | | |
| 15. | कर | | | | | | |
| 16. | विमा | | | | | | |
| 17. | टपाल तिकीटे | | | | | | |
| 18. | प्रवास | | | | | | |
| 19. | जाहिरात | | | | | | |
| 20. | मध्यान्ह भोजन | | | | | | |
| 21. | दुरुस्ती खर्च (इमारत दुरुस्ती वगळून) | | | | | | |
| 22. | कार्यालयीन साधन सामुग्री संगणक, टेबल, खुर्ची इ. खरेदी व दुरुस्ती | | | | | | |
| 23. | संकीर्ण | | | | | | |
| | एकुण (क-2) | | | | | | |
| | एकुण (क-1 + क-2) | | | | | | |

| क – 3 मान्य 8 % वेतनेत्तर खर्च (क1 व क2 प्रमाणे) | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| सन 20 -20 या वर्षात समाज सेवार्थ प्रणाली द्वारे अदा केलेले एकुण वेतन खर्च | वेतन खर्चाच्या 8 % वेतनेत्तर अनुदानासाठी अनुज्ञेय रक्कम | 8 % अनुज्ञेय रकमेचे वर्गीकरण | | प्रत्यक्षात 8% वेतनेत्तर बाबींवर झालेला खर्च | | मुल्य निर्धारणासाठी मान्य खर्च रकाना क्रमांक 3,4 अथवा 5, 6 पैकी कमी असेल ती रक्कम | | |
| | | 70 % शैक्षणिक खर्चासाठी | 30 % अशैक्षणिक खर्चासाठी | 70 % शैक्षणिक खर्चासाठी | 30 % अशैक्षणिक खर्चासाठी | 70 % शैक्षणिक खर्चासाठी | 30 % अशैक्षणिक खर्चासाठी | एकुण रकाना क्रमांक 7+8 |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| | | | | | | | | |

| अ.क्र | तपशील | अनुदानाच्या बाब निहाय एकुण देय अनुदानाची रक्कम | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | इमारत भाडे अथवा इमारत देखभाल खर्च | परिपोषण खर्च | 8% वेतनेत्तर | एकुण |
| 1 | मुल्यनिर्धारणाप्रमाणे देय अनुदानाची रक्कम | | | | |
| 2 | मागील वर्षाची प्रलंबित देय अथवा वसुली | | | | |
| 3 | एकुण देय रक्कम 1+2 | | | | |
| 4 | वजा सन 20 -20 या वर्षात 60% प्रमाणे दिलेली अग्रीम रक्कम | | | | |
| 5 | रहावयाची शिल्लक रक्कम अथवा वसुलीची रक्कम | | | | |

स्वाक्षरी

मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षक

दिनांक -

जिल्हा समाज कल्याण अधिकारी

राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना ७५% इमारत भाडे मंजूर करणेबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक : इडीडी-२००५/प्र. क्र.३५६/सुधार-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- १९ मे, २००९

वाचा :- १) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग,
क्र. व्हीजेडब्ल्यू-१०९०/प्र. क्र. २२/प्रस्ताव-२/मावक-६, दि. ८/१०/१९९१
२) शासन निर्णय समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग,
क्र. इडीडी-१०९९/प्र.क्रं. १५४/सुधार-२, दि. ११/९/२०००

शासन निर्णय:- राज्यातील मान्यता व अनुदानप्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना पूर्वी १००% प्रमाणे इमारत भाडे देण्यात येत होते. परंतु दि. ११/९/२००० च्या शासन निर्णयानुसार कर्मचाऱ्यांना ५ वा वेतन आयोग लागू करताना अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना अनुदान तत्वावर आणल्यानंतर प्रथम ५ वर्षांकरीता १००% व त्यानंतरच्या कालावधीकरीता ५०% इमारत भाडे अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. त्यामध्ये वाढ करण्याची मागणी मोठ्या प्रमाणात करण्यात येत होती. वि.जा.भ.ज. व अनुसूचित जमातीच्या अशासकीय आश्रमशाळांना प्रमाणित भाड्याच्या ७५% एवढे इमारत भाडे वरील वाचा येथील दि. ८/१०/१९९१ च्या शासन निर्णयान्वये अनुज्ञेय करण्यात आलेले आहे. या सर्व बाबी विचारात घेऊन ज्याप्रमाणे वि. जा. भ. ज. व अनुसूचित जमातीच्या अशासकीय आश्रमशाळांना इमारत भाडे अनुज्ञेय करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे समान धोरणानुसार अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना सार्वजनिक बांधकाम विभागाने प्रमाणित केलेल्या भाड्याच्या ७५% एवढे इमारत भाडे मंजूर करण्यास शासन या शासन निर्णयान्वये मंजूरी देण्यात येत आहे.

२. सदर इमारत भाडे या शासन निर्णयाच्या दिनांकापासून लागू होईल.

३. यासाठी येणारा खर्च 'मागणी क्रमांक : एन-३, २२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२- समाजकल्याण, १०१ -अपंग व्यक्तींचे कल्याण' या मुख्य लेखाशिर्षाखाली मंजूर असलेल्या अनुदानातून भागवावा.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. २१/०९/ व्यय-१४ दिनांक २४.२.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

५. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेब साईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०५१११७१५२५००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय)यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालय
सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता) / (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग (व्यय-१४), मंत्रालय, मुंबई
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती का. सुधार-२

# (परिशिष्ट - 10)

## नोंदवह्या व अभिलेखाचे जतन

| वर्गीकरण व कालावधी | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | अ - कायम | ब - 30 वर्षे | क 1-10 वर्षे | क 2 - 5 वर्षे | 18 महिने |
| 1 | सर्व साधारण प्रवेश नोंदवही | रोख पुस्तक | वसतिगृहासाठी आहार नोंदवही, | वैद्यकीय उपचार औषधे लेखा नोंदवही | इयत्तांच्या वार्षिक परीक्षांच्या उत्तरपत्रिका विद्यार्थ्यांना परत न द्यावयाच्या |
| 2 | फर्निचर, ग्रंथालय, साधनसामग्री, विशेष उपकरणे इत्यादींची जडवस्तु संग्रह नोंदवही | कर्मचाऱ्यांचा वेतनपट, पावतीपट व वेतन निश्चिती विवरणपत्र | गणवेश व अंथरुण पांघरुण नोंदवही | जमा व खर्च आणि सत्र फीचा स्वतंत्र हिशेब दर्शविणारी खातेवही | शिक्षक व इतर कर्मचारी यांच्या नैमित्तिक रजांचे अर्ज |
| 3 | आदेश व परिपत्रके याची स्थायी आदेश नस्ती | तपासणी अहवाल – लेखापरीक्षा पत्रांसह | हस्त व्यवसायासाठी लागणारा कच्चा माल नोंदवही | आवक व जावक नोंदवही आणि मुद्रांक लेखा | |
| 4 | भविष्य निर्वाह निधी लेखा नोंदवही राष्ट्रीय निवृत्तीवेतन योजना नोंदवही | सांख्यिकी विवरणे | हस्त व्यवसायासाठी तयार माल नोंदवही | | |
| 5 | मुख्याध्यापकाची रोजवही | कार्यमुक्ती प्रमाणपत्रे – कर्मचाऱ्यांच्या सेवापुस्तकांसोबत ठेवावयाची व त्यानुसार जतन करावयाची. | शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी इतर शाळांमधून आलेली शाळा सोडल्याची प्रमाणपत्रे | | |
| 6 | शासकीय अनुदानातून खरेदी केलेली साधन सामग्री/वस्तू यांची स्वतंत्र जडवस्तूसंग्रह नोंदवही | | विद्यार्थी व कर्मचारी यांची उपस्थिती नोंदवही | | |
| 7 | इमारत व मत्ता नोंदवही – विवक्षित शासकीय अनुदाने | | फी पावती पुस्तके | | |
| 8 | सेवापुस्तके | | आकस्मिक खर्च नोंदवही, खातेवही, बिले व प्रमाणके | | |
| 9 | शाळा सोडून जाणाऱ्या विद्यार्थ्यांना दिलेल्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रांच्या स्थळ प्रती | | फी वसुली नोंदवही | | |
| 10 | | | इमारत भाडे नोंदवही | | |
| 11 | | | महत्वाचा संकीर्ण पत्रव्यवहार | | |
| 12 | | | मोफत शिष्यवृत्ती यांसाठी आलेले अर्ज आणि विविध सवलतीच्या बिलांच्या कार्यालय प्रती | | |
| 13 | | | प्रवेशितांच्या केसफाईल्स, वैयक्तीक प्रगति दर्शक व पुनर्वसना विषयी माहिती | | |

२२४

# परिशिष्ट - ११

स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणा-या बंद पडलेल्या /मान्यता रद्द केलेल्या/संस्थेने बंद केलेल्या /नोंदणी प्रमाणपत्र रदद केलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांचे अन्य स्वयंसेवी संस्थेस हस्तांतरण / स्थलांतरण करण्याबाबतची कार्यपध्दती.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक: ईडीडी-२०१७/प्र.क्र.६/अ.क.१
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई - ४०००३२.
दिनांक: १६ सप्टेंबर, २०१७.

वाचा:-१) शासन निर्णय सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग क्रमांक इडीडी-२००१/प्र.क्र.५०२/सुधार २ दि. १९.०७.२००३ व समक्रमांकीत पुरकपत्र दि.४ डिसेंबर, २०१३.

२) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शासन निर्णय क्रमांक ईडीडी-२०१३/ प्र.क्र.३५०/अ.क.१ दि.२४ जानेवारी, २०१४.

३) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६.

प्रस्तावना:-

राज्यात स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा चालविल्या जात आहेत. अशा शाळा/कर्मशाळांना दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अन्वये अपंग क्षेत्रात कार्य करण्यासाठी सक्षम अधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र घेणे बंधनकारक आहे. अशा नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणा-या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांना सामाजिक न्याय विभागामार्फत शासन मान्यता देवून अनुदान देण्यात येते. अशा प्रकारे स्वयंसेवी संस्थांमार्फत चालविण्यात येणा-या शासन मान्य अनुदानित/विनाअनुदानित व कायमस्वरुपी विनाअनुदान तत्वावर नोंदणी प्रमाणपत्र दिलेल्या अपंगांच्या विशेष शाळा व कार्यशाळा कार्यरत आहेत.

राज्यात स्वंयसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या मान्यता व अनुदान प्राप्त असलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे अथवा संबंधीत संस्था शासन मान्यता व अनुदान प्राप्त असलेल्या अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा बंद करु इच्छित असते व अन्य काही कारणास्तव बंद पडल्या असतील किंवा भविष्यात बंद पडतील अशा अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा, मूळ संस्थे ऐवजी सक्षम व शासनाच्या सर्व अटी आणि शर्ती मान्य असणा-या संस्थाना हस्तातंरीत व आवश्यकतेप्रमाणे स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्याचा निर्णय शासनाने दिनांक ४ डिसेंबर, २००३ व २४ जानेवारी, २०१४ च्या शासन निर्णयान्वये घेतला होता. परंतु, ज्या शाळा/कर्मशाळा नोंदणी प्रमाणपत्र रद्द केल्यामुळे बंद पडलेल्या आहेत किंवा स्वत: हूंन संस्थेने अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळा बंद केल्या आहेत. अथवा अन्य कोणत्याही कारणामुळे शाळांची शासन मान्यता अथवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द केलेल्या आहेत अशा अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा अन्य संस्थांना हस्तातंरीत / स्थलांतरीत करण्यास मान्यता देण्याबाबत पारदर्शक धोरण ठरविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

राज्यात स्वंयसेवी संस्थांमार्फत चालविल्या जाणा-या शासन मान्यता व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त असलेल्या अनुदानित व विनाअनुदानित अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा शासनाने वेळोवेळी लागू केलेल्या विहीत अटीची पुर्तता न केल्यामुळे मान्यता काढून घेतलेल्या अथवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द केलेल्या किंवा काही कारणास्तव बंद पडलेल्या किंवा एखादी स्वंयसेवी संस्था स्वेच्छेने चालवित नसल्याने बंद करण्यात आलेल्या अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा या अन्य स्वयंसेवी संस्थेमार्फत सुरु करण्यासाठी किंवा त्याचे हस्तातंरण / स्थलातंरण करण्यासंबंधीचे शासनाने (दिनांक ४ डिसेंबर, २००३ व दिनांक २४ जानेवारी, २०१४ रोजी) यापूर्वी निर्गमित केलेले या विषया संबंधातील शासन निर्णय अधिक्रमित करुन हस्तातंरण / स्थलांतरणाबाबत खालील प्रमाणे निश्चित केलेल्या कार्यपध्दतीस या शासन निर्णयामुळे मान्यता देण्यात येत आहे.

**(१) शासन मान्यताप्राप्त अनुदानित /विना अनुदानीत बंद पडलेल्या अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळा अन्य संस्थेस हस्तातंर करण्याची कार्यपध्दती:-**

(१) केवळ बंद पडलेल्या अनुदानित तसेच विना अनुदानित अपंगाच्या विशेष शाळा /कर्मशाळांचे हस्तांतरण शासनाच्या अटी व शर्ती पूर्ण करण्या-या व सक्षम असणा-या संस्थाना केले जाईल.

(२) अस्थिव्यंग विद्यार्थ्यांच्या उपस्थिती अभावी बंद पडलेल्या अस्थिव्यंग शाळांचे हस्तांतरण व स्थलांतरण अस्थिव्यंग प्रवर्गाऐवजी आवश्यकता तपासून बहुविकलांग, सेरेब्रल पाल्सी किंवा आवश्यकतेनुसार इतर प्रवर्गासाठीची शाळा/ कर्मशाळा असा प्रवर्ग बदलून हस्तांतरीत करण्याचा अधिकार शासनास राहील. त्यानुसार आवश्यक पद मान्यता देण्याची कार्यवाही नियमानुसार शासन स्तरावरुन करण्यात येईल. प्रवर्ग बदलामुळे नव्याने अनुज्ञेय पदावर प्राधान्याने अतिरिक्त कर्मचा-यांचे समायोजन करण्यात येईल. प्रतिक्षा यादीवर उमेदवार उपलब्ध नसल्यास विहित मार्गाने आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेऊन पात्र कर्मचा-यांची नियुक्ती करण्याचे अधिकार संस्थेस राहतील.

(३) व्यवस्थापनाच्या चुकीमुळे जी अपंगांची शाळा/कर्मशाळा बंद पडली आहे अथवा मान्यता रद्द झालेली आहे, अथवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द झालेले आहे, अशा अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा त्याच संस्थेस हस्तांतरित करण्यात येणार नाहीत. सदर विद्यार्थी लगतच्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळेत वर्ग करण्यात येतील व त्या संस्थेचा समावेश काळ्या यादीत (Black List) करण्यात येईल.

(४) बंद किंवा मान्यता रद्द केलेल्या अथवा नोंदणी प्रमाणपत्र रद्द केलेल्या अनुदानित अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळांची ठिकाणासहीत नावाची यादी त्या भागातील प्रसिध्द दैनिक वर्तमानपत्रात तसेच विभागाच्या संकेत स्थळावर आयुक्तालयामार्फत प्रसिध्द करण्यात येईल.

(५) राज्यातील नोंदणीकृत इच्छुक स्वयंसेवी संस्था जाहिरातीस अनुसरुन विहीत नमून्यात संबंधीत जिल्हयाचे समाजकल्याण अधिकारी, सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ मुंबई उपनगर यांच्याकडे अर्ज करु शकेल.

(६) इच्छुक स्वयंसेवी संस्थेकडे संस्था नोंदणी अधिनियम, १८६० सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अंतर्गत धर्मादाय आयुक्तांकडे संस्थेचे नोंदणी केलेले नोंदणी प्रमाणपत्र असावे. धर्मादाय आयुक्ताकडे केलेल्या नोंदणीमध्ये अपंगांसाठी विशेष शाळा/कर्मशाळा चालविणे

अथवा अपंगांकरीता शैक्षणिक व व्यवसाय प्रशिक्षण उपक्रम राबविणे असा स्पष्टपणे उद्देश असावा.

(७) संस्थेने नोंदणी प्रमाणपत्रे, संस्थेच्या घटनेची प्रत धर्मादाय आयुक्ताने प्रमाणित केलेली वैध कार्यकारिणीची यादी (परिशिष्ट-१) सक्षम प्राधिका-याकडून साक्षांकित करुन अर्जासोबत जोडावी.

(८) अर्ज करतांना इच्छुक संस्थेच्या बँक खात्यामध्ये प्रस्ताव सादर करण्याचे दिनांकास किमान रुपये ३,००,०००/- (अक्षरी रुपये तीन लक्ष) जमा असणे आवश्यक आहे. यासाठी संबंधित बँकेचे प्रमाणपत्र अर्जासोबत जोडावे.

(९) संस्थेने लगतच्या तीन वर्षातील लेखा परीक्षणच्या अहवालाची प्रत अर्जासोबत जोडावी.

(१०) ज्या ठिकाणी संस्था अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळा सुरु करणार आहे त्या ठिकाणी संस्थेच्या मालकीची स्वत:ची इमारत असावी. सदर इमारतीस नियमानुसार इमारत भाडे अनुज्ञेय राहिल, इमारत नंसल्यास तोपर्यंत सर्व सुविधायुक्त मानकाप्रमाणे भाडयाची इमारत उपलब्ध असणे संदर्भात संस्थेस भाडे करारनामा प्रत जोडावी लागेल. इमारत उपलब्ध असल्याबाबत संस्थेने सादर केलेले दस्तऐवज तपासून त्याठिकाणी शाळा/कर्मशाळा चालविणे योग्य आहे किंवा कसे याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे स्वयंस्पष्ट अभिप्राय देतील.

(११) जिल्हा समाज कल्याण अधिकारी/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/ मुंबई उपनगर यांनी संस्थेच्या सुरु असलेल्या उपक्रमातील गैरप्रकाराबाबत इतर विभागाने संस्थेविरुध्द यापूर्वी केलेल्या कार्यवाहीबाबतची माहिती द्यावी. संस्थेने निधीचा अपहार केल्याच्या तक्रारी प्राप्त असल्यास त्याची माहिती द्यावी. तसेच धर्मादाय आयुक्त यांच्याकडे न्यायप्रविष्ठ असलेल्या वादाची सद्य:स्थिती नमूद करणे आवश्यक राहिल. जर तशी माहिती संस्था देत नसल्यास राज्य समिती स्वत:हून अशी माहिती काढेल व त्या त्या विषयाचे स्वरुप बघून संस्थेची शिफारस करतांना या मुद्याचाही समावेश अहवालात करेल.

(१२) संस्थेने यापूर्वी शासनाविरुध्द मा. उच्च न्यायालयात रिट याचिका दाखल होती किंवा कसे असल्यास ती प्रलंबित आहे काय याबाबतची माहिती द्यावी.

(१३) संस्थेने अर्ज करतांना आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या नावाने रु.१०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार) ऐवढी रकम चलनाव्दारे भरणे आवश्यक आहे. सदरची रक्कम ना परतावा असेल. सदर चलनाची पावती प्रस्तावासोबत जोडणे बंधनकारक राहिल.

(१४) विशेष शाळेचे/कर्मशाळेचे हस्तांतरण नवीन संस्थेकडे करण्यात आल्यानंतर सदर शाळेतील सर्व मान्यता प्राप्त व कार्यरत शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे व विद्यार्थ्यांचे समायोजन सदर शाळेत करण्यात येईल. जर शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचारी भरती, सरळसेवा भरती नियमास अनुसरुन झाली नसल्यास, गैर मार्गाने झाली असल्यास, त्यांच्याकडे पात्रता नसल्यास अथवा मागासवर्गीय आरक्षणाप्रमाणे भरती केलेली नसल्यास तर त्या कर्मचा-यांना सामावून घेतले जाणार नाही. केवळ पात्र कर्मचा-यांना सेवेत समावून घेणे बंधनकारक राहील.

**(२) शासन मान्यताप्राप्त अनुदानित /विना अनुदानीत बंद पडलेल्या अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांचे हस्तांतरण करण्यासाठी प्रशासकीय स्तरावरुन करावयाची कार्यवाही :-**

(१) शासनाच्या निर्देशाप्रमाणे शाळा/कार्यशाळा हस्तांतरणाची जाहिरात आयुक्तालयामार्फत वर्तमानपत्रामधून तसेच संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात येईल व इच्छुक संस्थांचे अर्ज मागविण्यात येतील.

(२) इच्छुक संस्थेने हस्तांतर स्थलांतरणाबाबत अर्ज आवश्यक त्या कागदपत्रासह संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर / मुंबई उपनगर यांच्याकडे ३ प्रतीत सादर करावा.

(३) प्राप्त झालेला प्रस्ताव संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद /सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/मुंबई उपनगर नियमाप्रमाणे छाननी व पडताळणी करुन स्वयंस्पष्ट अभिप्रायासह आयुक्तालयास सादर करतील.

(४) जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण मुंबई शहर/मुंबई उपनगर यांचेमार्फत तपासणी होवून प्राप्त झालेले अहवाल आणि संस्थेचे प्रस्ताव शासनाकडे शिफारस करण्यासाठी गठीत केलेल्या राज्यस्तरीय समिती समोर ठेवण्यात येतील.

**"राज्यस्तरीय समिती"**

| | | |
|---|---|---|
| १ | आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | अध्यक्ष |
| २ | उपायुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | उपाध्यक्ष |
| ३ | संबंधीत विभागाचे प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग | सदस्य |
| ४ | सहाय्यक आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य सचिव |
| ५ | संबंधीत प्रवर्गाचे निरीक्षक अपंग संस्था गटब -, आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य |

वरील प्रमाणे गठीत केलेली राज्यस्तरीय समिती जिल्हा समाज कल्याण, अधिकारी, जिल्हा परीषद/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावाची प्रचलित नियमाच्या आधारे छाननी करुन पात्र प्रस्ताव स्वयंस्पष्ट शिफारसीसह शासनाकडे सादर करतील.

**(३) सर्व साधारण निर्देशः-**

१. हस्तांतरणांचे आदेश पारित झाल्यानंतर संबंधीत संस्थेस दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अन्वये सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे बंधनकारक राहील. त्यासाठी विहीत नमुन्यात आवश्यक त्या कागदपत्रांसह नोंदणी प्रमाणपत्रासाठीचा अर्ज जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, अथवा सहायक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर यांच्याकडे तीस दिवसाच्या आत संस्थेने सादर करावा.

२. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/ सहायक आयुक्त, समाजकल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर हे सदरचा अर्ज छाननी व तपासणी करुन आपल्या स्वयंस्पष्ट अभिप्रायासह सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडे सादर करतील.

३. जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/ सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर यांच्याकडून प्राप्त झालेल्या नोंदणी प्रमाणपत्राबाबत सक्षम प्राधिकारी तथा आयुक्त, अपंग कल्याण, पुणे हे तद्अनुषंगीक कार्यवाही करतील.

४. बंद पडलेल्या अथवा मान्यता रद्द केलेल्या अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळेस जेवढी मान्य विद्यार्थी संख्या होती व जेवढे वर्ग होते तेवढे वर्ग सुरु करण्यात यावे. हस्तांतरीत झाल्यानंतर मान्य संख्येप्रमाणे प्रवेश परिपूर्ण करुन एकाच वेळी सर्व वर्ग/व्यवसाय प्रशिक्षण वर्ग सुरु करणे आवश्यक राहील. हस्तांतरणाच्या अनुषंगाने कोणत्याही नवीन पदास अथवा विद्यार्थी संख्येस वाढ दिली जाणार नाही. संस्थेने विना परवानगी नियुक्त केलेल्या कर्मचा-यांच्या नियुक्त्या अवैध समजण्यात येतील.

५. हस्तांतरीत झालेल्या अपंगाच्या विशेषशाळा/कर्मशाळामध्ये जुन्या बंद पडलेल्या शाळेतील/कर्मशाळेतील शिक्षक/ कर्मचा-यांना समायोजनाने नियुक्तीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर एकवीस दिवसांच्या आत कर्तव्यावर रुजू होणे बंधनकारक राहील. जे शिक्षक/कर्मचारी रुजू होणार नाहीत त्यांना आयुक्तालयाकडून एक संधी देण्यात येईल व संधी देवूनही ते सात दिवसांचे आत रुजू न झाल्यास त्यांना सेवेची आवश्यकता नाही असे समजून त्यांची सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच त्यांचे नांव प्रतिक्षा यादीतून कायमचे काढून टाकण्यात येईल.

६. अनुदानित बंद पडलेली अथवा मान्यता रद्द केलेल्या अपंगांच्या विशेष शाळा / कर्मशाळा हस्तांतरित झाल्यानंतर नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झाल्यापासून अशा अपंगांच्या अनुदानित शाळा / कर्मशाळांना निधीच्या उपलब्धते प्रमाणे नियमानुसार वेतन व वेतनेत्तर अनुदान देण्यात येईल.

७. शासनाने हस्तांतरणाचे आदेश पारीत केल्यानंतर संस्थेने नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेऊन तीन महिन्याचे आत अपंगांची विशेष शाळा/कर्मशाळा सुरु न केल्यास हस्तांतरणाचे आदेश रद्द करण्याबाबत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडून उचित कार्यवाही करण्यात येईल. याबाबतीत संस्थेची कोणतीही सबब ऐकून घेतली जाणार नाही.

८. राज्यात अपंगांसाठी विशेष शाळेऐवजी Early Intervention Program राबविण्याची आवश्यकता असल्याने व सद्यःस्थितीत राज्यामध्ये अपंगासाठी Early Intervention Program राबविणा-या संस्थांची संख्या नगण्य असल्याने सध्या ज्या संस्था अपंगांसाठी विशेष शाळा चालवित आहेत अशा अनुदानित शाळांनी Early Intervention Program व मतिमंद आणि कर्णबधीरांसाठी पाच वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांकरीता डे केअर सेंटर, पालक मार्गदर्शन व सल्ला केंद्रासह राबविणेबाबत त्यांना निर्देश देण्यात येत आहेत. तेव्हा हस्तांतरीत केलेल्या शाळांनी शाळा चालविण्याबरोबरच उपलब्ध अनुदान / शिक्षकांना घेवून Early Intervention Program व मतिमंद आणि कर्णबधीरांसाठी पाच वर्षांच्या खालील विद्यार्थ्यांकरीता डे केअर सेंटर, पालक मार्गदर्शन व सल्ला केंद्रासह सुरू करणे बंधनकारक राहिल. त्यासाठी कोणताही जादाचा निधी व कर्मचारी वर्ग दिला जाणार नाही.

९. हस्तांतरीत केलेल्या शाळेमध्ये नवीन प्रवेश देतांना किमान ५० टक्के अतितीव्र अस्थिव्यंगत्व असणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे बंधनकारक राहिल. सौम्य अपंगत्व असणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांना हस्तांतरण झालेल्या शाळेत प्रवेश देण्याऐवजी सर्व समावेशीत शिक्षणासाठी त्यांना प्रोत्साहीत करण्यात यावे.

१०. हस्तांतरण झालेल्या मतिमंदांच्या शाळेमध्ये ३० पेक्षा कमी बुध्यांक असणाऱ्या अतितीव्र मतिमंद विद्यार्थ्यांना प्रवेश प्राधान्याने देण्यात यावा.

११. शासन/ आयुक्तालयाच्या मान्यतेशिवाय अनुदानित अपंगांची विशेष शाळा/कर्मशाळा हस्तांतर /स्थलांतरण केल्यास ते अवैध ठरविण्यात येईल व त्यामुळे उदभवणा-या विविध समस्यांची जबाबदारी शासनावर राहणार नाही. परस्पर हस्तांतरीत/ स्थलांतरीत विशेष शाळा/कर्मशाळाची मान्यता आपोआप रद्द समजण्यात येईल. तथापि, सद्या कार्यरत असलेल्या अपंगाच्या अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळा सद्याच्या संस्थाना अन्य संस्थेकडे त्यांच्या परस्पर संमतीने हस्तांतरित / स्थलांतरीत करता येणार नाहीत. एखाद्या संस्थेस अपंगांची विशेष शाळा/कर्मशाळा चालविणे शक्य होत नसेल तर सदर संस्था त्यांच्याकडील उपक्रम शासनास हस्तांतरण करतील व त्यानंतर शासन या शासन निर्णयातील तरतुदीनुसार त्यावर कार्यवाही करील. कोणत्याही परिस्थितीत अपंगाची अनुदानित विशेष शाळा/कर्मशाळेचे परस्पर हस्तांतरण/ स्थलांतरण केल्यास त्यास शासनाकडून मान्यता देण्यात येणार नाही व असे हस्तांतरण/स्थलांतरण कायदेशीरदृष्टया अवैध असल्याचे मानण्यात येईल. तद्नंतर सदर शाळा / कर्मशाळा व त्यातील कर्मचा-यांचे कोणतेही दायित्व शासनावर राहणार नाही.

१२. शासनाच्या सामाजिक न्याय विभाग किंवा आदिवासी विकास किंवा शिक्षण विभागाने यापूर्वी अर्जदार संस्थेची एखाद्या शाळेची मान्यता रद्द केली असल्यास अथवा मान्यता काढून घेतली असल्यास किंवा काही कारणास्तव बंद पडलेली असल्यास पुन्हा अन्य संस्थेची अपंगांची विशेष शाळा / कर्मशाळा अशा अर्जदार संस्थेकडे हस्तांतरण करण्याबाबतचा निर्णय घेण्याचे अधिकार शासनास राहतील.

**४. शासन मान्यताप्राप्त व नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त अनुदानित/विनाअनुदानित / कायमस्वरुपी विना अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा अन्य ठिकाणी स्थलातंर करण्याची कार्यपध्दती:-**

**(१) स्थलांतरणाची कारणे**

अ) अपंगांची अनुदानित / विना अनुदानित / कायमस्वरुपी विना अनुदानित अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळा ज्या तिकाणी कार्यन्वीत आहे अशा तिकाणी सिंचन प्रकल्प अथवा इतर सार्वजनिक उपक्रम सुरु होणार असतील अथवा सदर जागेचे अधिग्रहण करणे आवश्यक असेल किंवा पूर, भुकंप इत्यादी सारख्या नैसर्गिक आपत्तीचा धोका असल्यास किंवा संस्थेने सर्व सोई सुविधांयुक्त इमारतीचे बांधकाम पूर्ण केल्यास,

आ) सद्या ज्या ठिकाणी अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळा कार्यरत आहे त्या सोबतची अनेक गावे दुसरीकडे वसाहतीसाठी गेल्यामुळे किंवा इतर कारणामुळे अपंगाची विशेष शाळा/ कर्मशाळातील विदयार्थी संख्या कमी झाल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांची मान्य संख्या ५० टक्के पेक्षा कमी असल्यास,

इ) ज्या ठिकाणी अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळा असेल त्या ठिकाणी मुलभूत सोयी सुविधाबाबत गंभीर समस्या असल्यास किंवा जातीय तणाव गटबाजीचा संघर्ष मोठया प्रमाणात वाढणे इ.

सारख्या सार्वजनिक अशांततेच्या घटना वारंवार घडल्यामुळे अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळेची विद्यमान जागा असुरक्षित असल्यास.

(२) संस्थेस अपंगाची विशेष शाळा/कर्मशाळा चालू असलेल्या ठिकाणी विज, पाणी व इमारत, मैदान किंवा अन्य स्थानिक अपु-या सोयींमुळे किंवा स्थानिक प्रासंगिक कारणामुळे अथवा संस्थेने अपंगाच्या विशेष शाळेसाठी/कर्मशाळेसाठी स्वत:च्या मालकीची सर्व सोयी सुविधा इमारत बांधली असल्यामुळे एखाद्या शाळेचे/ कर्मशाळेचे स्थलांतर करणे आवश्यक असल्यास तसा वस्तुस्थितीचा अहवाल प्राप्त करुन घेवून, आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी आवश्यकता तपासून प्रस्ताव शासनास सादर करावा.

(३) संस्थेने अपंगांच्या विशेष शाळा / कार्यशाळेसाठी प्रशस्त व सर्व सुविधायुक्त ठिकाणी जागा उपलब्ध करुन घेवून सर्व सोयी-सुविधा युक्त व शैक्षणिक वातावरणास सुयोग्य अशी इमारत बांधकाम करावयाचे ठरविल्यास इमारतीच्या नकाशासह व इमारतीमध्ये असलेल्या सोयी-सुविधासह व इमारतीचे बांधकाम पूर्ण होणार त्यांच्या कालावधीसह स्थलांतरणाच्या परवानगीचा प्रस्ताव जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद/सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, मुंबई शहर/मुंबई उपनगर यांच्यामार्फत आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांच्याकडे सादर करावा. तत्वत: परवानगी मिळाल्यानंतर २ वर्षांच्या आत इमारत बांधकाम पूर्ण करुन पुर्णत्वाच्या दाखल्यासह व समाज कल्याण अधिका-याच्या स्थळ पाहणी अहवालासह मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांच्यामार्फत प्रस्ताव आयुक्तालयास सादर करावा. इमारत पूर्ण झाल्यानंतर आयुक्त, अपंग कल्याण, पुणे हे अंतिम मान्यता देतील.

(४) शासनाच्या/आयुक्तालयाच्या मान्यतेशिवाय अनुदानित/विना अनुदानित व कायम विना अनुदानित अपंगांची विशेष शाळा/कर्मशाळा स्थलांतर केल्यास ते अवैध ठरविण्यात येईल व त्यामुळे उदभवणा-या विविध समस्याची जबाबदारी शासनावर राहणार नाही. परस्पर स्थंलातरीत विशेष शाळा/कर्मशाळांची मान्यता/नोंदणी प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल. कोणत्याही परिस्थितीत अपंगाच्या विशेष शाळा/कर्मशाळेचे परस्पर स्थलांतरण केल्यास त्यास शासनाकडून/ आयुक्तालयाकडून मान्यता देण्यात येणार नाही व असे स्थलांतरण कायदेशीरदृष्टया अवैध असल्याचे मानण्यात येईल. तद्नंतर सदर शाळा/कर्मशाळा व त्यातील कर्मचा-यांचे कोणतेही दायित्व शासनावर राहणार नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक २०१७०९१६१५२३५६५८२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Dinesh
Ramchandra Dingle

(दि. रा. डिंगळे)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.

२) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
३) मा.मंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे खाजगी सचिव
४) मा.विरोधी पक्षनेता, विधान सभा, विधानभवन, मुंबई
५) मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद, विधानभवन, मुंबई
६) मा.राज्यमंत्री, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग यांचे खाजगी सचिव
७) सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्यक विभाग
८) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे
९) आयुक्त, समाज कल्याण, पुणे
१०) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
११) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग
१२) सर्व सहाय्यक आयुक्त, अपंग कल्याण/समाज कल्याण विभाग
१३) सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
१४) निवड नस्ती (अपंग कल्याण-१)

******

परिशिष्ट - १२

GR file

**स्वयंसेवी संस्थामार्फत चालविण्यात येणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व्यवस्थापनेसाठी प्रशासक नेमणेबाबत.**

## महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग
शासन निर्णय क्रमांक:- इडीडी-२००४/प्र.क्र.३/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक:- १ मार्च, २००४

वाचा:- १) अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा संहिता १९९७
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. अकआ/प्रशासक वि/ अपंग संस्था/ प्र-७/२००३-०४/२२१३, दिनांक १६/१०/२००३

**प्रस्तावना :-** अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ नुसार अनुज्ञप्ती प्राप्त असणाऱ्या स्वयंसेवी संस्थांमार्फत अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा सुरु करण्यात आलेल्या आहेत. अशा शाळांचे कामकाज अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांकरिता सुधारित शाळा/कार्यशाळा संहिता १९९७ प्रमाणे चालविले जात आहे. परंतु अशा विशेष शाळा/कार्यशाळा चालविणाऱ्या पंजीकृत संस्थेच्या व्यवस्थापनामध्ये मतभेद व वाद निर्माण होतात. त्यामुळे त्यांचे व्यवस्थापनाकडे दुर्लक्ष होते. परिणामी शाळांमधील मान्यतेचे प्रस्ताव पाठविणे, कर्मचाऱ्यांचे वेतन देयके सादर करणे, त्यांना शासकी लागू करणे, विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यामध्ये अडचणी निर्माण होणे इत्यादी बाबी मध्ये अडचणी उद्भवतात. अशावेळी संबंधित संस्थेच्या व्यवस्थापना विरुध्द कोणती कारवाई करावी, याबाबत अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा १९९७ मध्ये तरतूद नाही.

२. अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळांमधील विद्यार्थ्यांना निकषाप्रमाणे संस्था सर्व सोई सुविधा उपलब्ध करुन देत नसल्यास अशा संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र रद्द करणे अथवा त्यांचे नुतनिकरण न करणे या बाबतत अपंग व्यक्ती (समान संधी हक्कांचे संरक्षण व संपूर्ण सहभाग) अधिनियम, १९९५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात येते. परंतु अशी कार्यवाही केल्याने मुख्यत: अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळेतील विद्यार्थ्यांचा शैक्षणिक व कर्मचाऱ्यांच्या सेवेचा प्रश्न न सुटता तो अधिक तीव्र व गुंतागुंतीचा होतो. तेव्हा अशा अडचणी उद्भवू नये याकरिता संबंधित स्वयंसेवी संस्थांच्या व्यवस्थापनामधील मंडळामध्ये मतभेदामुळे गैरव्यवस्था निर्माण झाल्यास त्याचा विपरित परिणाम अपंग विद्यार्थी व कर्मचाऱ्यावर होत असल्याने स्वयंसेवी संस्थेच्या व्यवस्थापनातील वाद/मतभेद तसेच अपंग विद्यार्थ्यांस सोई सुविधा पुरविण्यास व्यवस्थापन सक्षम असल्याची खात्री होईपर्यंत अशा संस्थेचे व्यवस्थापन ताब्यात घेऊन त्या शाळेवर शासनामार्फत प्रशासक नियुक्त करण्याची तरतूद असणे

पृ.मा.प.

अनिवार्य आहे. परंतु अशी तरतूद अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा संहिता १९९७ मध्ये करण्यात [illegible] [illegible] सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

<u>शासन निर्णय</u> :- अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळा संहिता १९९७ मधील प्रकरण - दोन, शालेय व्यवस्थापनाचे स्वरुप भाग-१, नियम क्र.४३-अ मध्ये संस्थेचे शालेय व्यवस्थापन ताब्यात घेण्याचा हक्क राखून ठेवणे या शिर्षाखाली शाळा/कार्यशाळामध्ये गैरव्यवस्थापन, स्वयंसेवी संस्थेमधील मंडळीतील मतभेदामुळे शाळा/कार्यशाळेचे गैरव्यवस्थापन निर्माण झाल्यास किंवा व्यवस्थापन शासनाच्या आदेशाचे उल्लंघन करीत असल्याने शाळा/कार्यशाळेचे दैनंदिन कामकाज चालविणे कठीण होत असल्यास किंवा शाळा/कार्यशाळेकडे दुर्लक्ष होत असल्यास अशा शाळा/कार्यशाळा चालविणाऱ्या संस्थेचे व्यवस्थापन, नियंत्रण व प्रशासन ताब्यात घेण्याचा व अशा शाळा/कार्यशाळेवर कामकाजात सुधारणा होईपर्यंत आणि व्यवस्थापनातील मतभेद संपेपर्यंत प्रशासक नियुक्त करण्याचा अधिकार शासनास राहील. हे अधिकार महाराष्ट्र शैक्षणिक संस्था (व्यवस्थापन) अधिनियम,१९७६ (१९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१३) मधील तरतुदीप्रमाणे राहील, असा शासनाने निर्णय घेतला आहे.

वरील प्रमाणे एखाद्या स्वयंसेवी संस्थामार्फत चालविल्या जाणाऱ्या अपंगांच्या विशेष शाळा/कार्यशाळा व्यवस्थापनामध्ये अडचणी निर्माण झाल्यास तेथे प्रशासक नेमण्याबाबतचा प्रस्ताव आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांनी योग्य त्या समर्थनासह शासनास सादर करावा.तसेच हा शासन निर्णय सर्व संबंधित स्वयंसेवी संस्थांच्या निदर्शनास आणावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वि. धारकर
(वि. अ. धारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

# परिशिष्ट - १४

राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त
अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व
कर्मशाळामधील कायम शिक्षक व शिक्षकेतर
कर्मचाऱ्यांना ४ वर्षातून एकदा महाराष्ट्रात
कोठेही जाण्यासाठी रजा प्रवास सवलत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक इडीडी-२००५/प्र. क्र.३५६/सुधार-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ११ मे, २००९

वाचा :- १) शासन निर्णय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. रप्रस -१११४/१८४/सेवा-५, दिनांक २८/३/१९९५
२) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. एसएसएन- २६९५/४५१/माशि-२, दिनांक २५/४/१९९७
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. संकीर्ण- १०९७/१८९७ /शिकाना-२/९८/माशि-२, दिनांक १/१/१९९८

शासन निर्णय :- शासन निर्णय, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई क्र. रप्रस- १११४/१८४/सेवा-५, दिनांक २८/३/१९९५ नुसार राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना '४ वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठी रजा प्रवास सवलत' ही योजना मंजूर केलेली आहे. सदर रजा प्रवास सवलत शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील मान्यता प्राप्त खाजगी अनुदानित शाळातील कायम शिक्षक व शिक्षकतेर कर्मचाऱ्यांना मंजूर करण्यात आलेली असून, त्याच धर्तीवर राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळामधील कायम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ४ वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठी रजा प्रवास सवलत मंजूर करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

२. वरील योजनेनुसार शासन राज्यातील मान्यता व अनुदान प्राप्त अशासकीय अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळामधील कायम शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ४ वर्षातून एकदा महाराष्ट्रात कोठेही जाण्यासाठी रजा प्रवास सवलत योजनेस या शासन निर्णयान्वये मंजूरी देत आहे. राज्यात कोठेही जाण्याची ही प्रवास सवलत असलयाने या रजा प्रवास सवलतीखाली करावयाच्या प्रवासासाठी किमान व कमाल अंतराची मर्यादा राहणार नाही. परंतु या सवलतींचे ठिकाण घोषित करण्याची पूर्व अट राहील व मुख्यालय ते घोषित ठिकाण यासाठी प्रवासखर्च जवळच्या मार्गाने व प्रत्यक्ष तिकीट भाड्याच्या आधारावर अनुज्ञेय राहील. सदर योजनेची कार्यवाही पुढीलप्रमाणे अवलंबिण्यात यावी.

अ) कर्मचाऱ्यांना प्रवास करण्याचे ठिकाण मुख्याध्यापक/ व्यवस्थापकीय अधिक्षकाकडे लेखी अर्ज करून घोषित करणे व प्रत्यक्षात प्रवास सुरू करण्यापूर्वी त्यांची पूर्व परवानगी घेणे आवश्यक राहील.

ब) संपूर्ण प्रवास खर्च कर्मचाऱ्याने प्रथम करावा, त्यासाठी प्रवास अग्रिम मंजूर करण्यात येणार नाही. ही रजा प्रवास सवलत महाराष्ट्र राज्याच्या भौगोलिक सीमेच्या आत अनुज्ञेय राहील.
क) सवलतीचा लाभ घेतल्यानंतर संबंधित कर्मचाऱ्यांने या शासन निर्णयासोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रवास भत्ता देयक संबंधित मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाकडे सादर करावे.

ड) जेथे पती/पत्नी दोघेही शाळेमध्ये अथवा शासकीय, निमशासकीय किंवा शासन अंगिकृत विभागात सेवेत असतील तर सदर सवलतीचा लाभ कोणत्याही एकाच कार्यालयाकडून घ्यावा लागेल. देयकासोबत संबंधित कार्यालय प्रमुखाकडून तसा दाखला प्राप्त करून घेऊन जोडणे आवश्यक राहील.

इ) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकांनी रजा प्रवास सवलतीची नोंद कर्मचाऱ्यांच्या मूळ सेवा पुस्तकात घेऊन अशी नोंद घेतल्याचे देयकावर लिहिणे आवश्यक आहे.

फ) मुख्याध्यापक/व्यवस्थापकीय अधिक्षकाकडून संपूर्ण वर्षामध्ये फक्त दोन वेळेस म्हणजे दिपावली व उन्हाळी सुट्टी नंतर एक महिन्याच्या आत अशी देयके संबंधित समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद,/ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर/ मुंबई उपनगर या कार्यालयाकडे सादर करण्यात यावीत.

ग) अशी देयके प्राप्त झाल्यानंतर संबंधित कार्यालयामार्फत त्याची तपासणी होऊन किमान दोन महिन्याच्या आत ते पारित करण्यात येईल.

म) पारित केलेल्या देयकाची रकम धनादेशाद्वारे संबंधित कर्मचाऱ्यांच्या वैयक्तिक खात्यावर जमा होईल.

३. 'रजा प्रवास सवलत' योजनेमध्ये शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्याने केलेल्या संपूर्ण प्रवास खर्चाची रक्कम वेतनेतर अनुदानातून धरता ती वेतन अनुदानात धरण्यात येईल.

**४. या योजनेसाठी येणारा खर्च 'मागणी क्रमांक : एन-३, २२३५- सामाजिक सुरक्षा व कल्याण, ०२, समाजकल्याण, १०१-अपंग व्यक्तींचे कल्याण'** या मुख्य लेखाशिर्षाखाली मंजूर करण्यात येणाऱ्या अनुदानातून खर्ची टाकण्यात यावा.

५. हे आदेश विनाविलंब अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांपर्यंत पोहचतील व योजनेची योग्यरितीने अंमलबजावणी होईल, या दृष्टीने आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी तात्काळ उपाययोजना करावी.

६. सदर आदेश शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील. तसेच या रजा प्रवास सवलतीच्या गत वर्षाची सुरूवात सन २००१ पासून झाली आहे असे समजण्यात येऊन ही गत वर्ष २००९-२०१२, २०१३-२०१६ अशी असतील.

७. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र. ५४/०९ /सेवा-५, दिनांक २४.२.२००९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

८. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २००९०५१११६४४३४००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय)यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालय
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, (सेवा-५) मंत्रालय, मुंबई/ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती का. सुधार-२

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी-२००५/ प्र.क्र. ३५६/ सुधार-२, दिनांक ११ जुलै, २००९ चे सहपत्र

१) कर्मचाऱ्यांचे संपूर्ण नाव, हुद्दा व मूळ वेतन:-
२) प्रवासाचे ठिकाण-मुख्याध्यापक/ व्यवस्थापकीय अधिक्षकाकडे लेखी घोषित केलेल्या अर्जाची प्रत यासोबत ठेवावी.
३) सदर प्रवासाला मुख्याध्यापक/ व्यवस्थापकीय अधिक्षकाची पूर्व परवानगी घेतलेली असल्यास मान्य टिपणीची/आदेशाची प्रत यासोबत ठेवावी.
४) जेथे पती/पत्नी दोघेही शाळेत/शासकीय/निमशासकीय/शासन अंगीकृत सेवेत असतील तर सदर सवलतीचा लाभ एकाच कार्यालयाकडून घेतल्याचे प्रमाणपत्र संबंधित कार्यालयाकडून मिळवून जोडावे. ५) कुटुंबासहित जाण्यायेण्याचा प्रवास असल्यास कुटुंबातील व्यक्तींची नावे वय नाते
६) १८ वर्षे पूर्ण असलेली मुले आपणावरच अवलंबून असल्यास प्रमाणपत्र देणे आवश्यक आहे. ७) प्रमाणित करण्यात येते की, या देयकामध्ये मागणी केलेल्या रकमेपेक्षा प्रत्यक्ष खर्च कमी केलेला नाही.

| मुख्यालयापासून निघावयाचा तपशिल | | | पोहोचल्याचा तपशिल | | | प्रवास कोणत्या वाहनाने केला | प्रवासाचा वर्ग व भाडे | अंतर कि. मी. | १) प्रवास वर्ग- १ असल्यास तिकीट क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठिकाण | तारीख | वेळ | ठिकाण | तारीख | वेळ | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

परतीचा प्रवास तपशील

| निघावयाचा तपशिल | | | मुख्यालयी पोहोचल्याचा तपशिल | | | प्रवास कोणत्या वाहनाने केला | प्रवासाचा वर्ग व भाडे | अंतर कि. मी. | १) प्रवास वर्ग- १ असल्यास तिकीट क्रमांक व दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ठिकाण | तारीख | वेळ | ठिकाण | तारीख | वेळ | | | | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |

233

53

15

234

वैद्यकीय उपचार करुन घेणे व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करुन मिळणे या सवलती राज्यातील मान्यताप्राप्त व अनुदानित अपंगाच्या विशेष शाळातील पूर्णवेळ कर्मचा-यांना शासकीय कर्मचा-यांप्रमाणे अनुज्ञेय असण्याबाबत

महाराष्ट्र शासन
समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व पर्यटन विभाग
शासन निर्णय क्र. इडीडी-१०९२/७८७८/के. नं. १२४/सुधार-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२

दिनांक : १३, एप्रिल, १९९३.

शासन निर्णय:- शासकीय कर्मचा-यांना, जिल्हापरिषद कर्मचा-यांना, महाविद्यालयीन व विद्यापीठीय, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना मिळणा-या शासकीय व शासन प्राधिकृत रुग्णालयामध्ये वैद्यकीय उपचार करुन घेणे व वैद्यकीय खर्चाची प्रतिपूर्ती करुन मिळणे या सवलती वेळोवेळी झालेल्या व होणा-या सुधारणांसह अपंगाच्या मान्यताप्राप्त अनुदानित विशेष शाळातील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना लागू करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

२. शासनाने आता असा निर्णय घेतला आहे की, ह्या वैद्यकीय सवलती स्वयंसेवी संस्थामार्फत अपंगासाठी चालविण्यात येणा-या मान्यताप्राप्त व अनुदानित शाळातील पूर्णवेळ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांना या आदेशाच्या दिनांकापासून लागू करण्यात याव्या. त्यानुसार महाराष्ट्र राज्य सेवा [वैद्यकीय देखभाल] नियम १९६१ त्यामध्ये वेळोवेळी झालेल्या व होणा-या सुधारणासह यथोचित फेरफारांसह, उक्त कर्मचा-यांना या आदेशाच्या दिनांकापासून लागू होतील. यावर होणारा खर्च हा या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-याचे वेतन ज्या लेखाशिर्षाखालील तरतूदीतून भागविला जातो त्या खाली खर्ची टाकण्यात यावा.

३. संचालक, महिला, बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी हे आदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

४. हे आदेश सार्वजनिक आरोग्य विभाग व वित्त विभाग यांच्या सल्ल्याने व वित्त विभागाच्या अनौ. संदर्भ क्र. ४०४६/९३/व्यय-११, दि. १९. २. ९३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

ब. वि. सोनावणे
[ब. वि. सोनावणे]
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
संचालक, महिला, बाल व अपंग विकास, महाराष्ट्र राज्य, पुणे.

कृ. मा. प.

२३०

परिशिष्ट - २६

सेवेत असताना दिवंगत झालेल्या अनुदानित व विना अनुदानित खाजगी अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय क्रमांक इडीडी-२००५/प्र. क्र.३५६/सुधार-२,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक:- ४ जुलै, २००९

वाचा :- १) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्र. एसएसएन-२६९५/(३९६/९५) माशि-२, दिनांक ३१/१२/२००२
२) आयुक्त, अपंग कल्याण, पुणे यांचे पत्र क्र. अकआ/अनुकंपानियुक्ती/२००६-०७/२६३६, दिनांक ३१/१०/२००६

प्रस्तावना : शासन सेवेत असताना शासकीय कर्मचाऱ्यांचा मृत्यू झाल्याकारणाने त्यांच्या जवळच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर शासन सेवेत सामावून घेण्याबाबत राज्य शासनाने धोरण निश्चित केलेले आहे. तसेच शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील अनुदानित व विनाअनुदानित खाजगी शाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या जवळच्या नातेवाईकास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतचे धोरण अंमलात आणलेले आहे. त्याच धर्तीवर योग्य त्या फेरफारासह राज्यातील अनुज्ञाप्ती व अनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांतील कर्मचाऱ्यांचा सेवेत असताना मृत्यू झाल्यास त्यांच्या पात्र कुटुंबियास संस्थास्तरावर गट-क व गट-ड मध्ये अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची योजना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय : शासन सेवेत असताना तसेच शालेय शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखालील खाजगी विनाअनुदानित व अनुदानित शाळेत कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबतची योजना लागू करण्यात आली असून, त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक २२ ऑगस्ट, २००५ च्या शासन निर्णयानुसार फक्त सेवेत असताना दिवंगत झालेल्या गट-क, व गट-ड मधील कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास अनुकंपा तत्त्वावर ज्या अटी व शर्तीनुसार नियुक्ती देण्याची योजना लागू करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर राज्यातील अनुज्ञाप्ती प्राप्त व अनुदान प्राप्त आणि विनाअनुदान प्राप्त अपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळांमध्ये कार्यरत असताना दिवंगत झालेल्या विशेष शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास संस्थास्तरावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याची योजना या शासन निर्णयान्वये लागू करण्यास मान्यता देण्यात येत आहे. दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांचे पात्र कुटुंबिय पुढील अटी व शर्तीच्या अधिन राहून संस्थास्तरावर अनुकंपा तत्वावर नियुक्ती मिळण्यास पात्र असतील.

१) अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्याबाबत राज्यातील सर्व अनुज्ञाप्ती प्राप्त व अनुदान प्राप्त तसेच विनाअनुदान तत्वावर सुरू असलेल्या प्राथमिक व माध्यमिक अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळेतील सर्व विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना सदरहू योजना लागू राहील.

२) गट-ड व गट-क मध्ये कार्यरत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास संस्थेच्या सेवेत सामावून घेण्याबाबतचे नियम सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ नुसार राहतील.

३) संबंधित कर्मचाऱ्यांच्या नातेवाईकांनी संस्थेकडे नोकरीसाठी करावयाचा अर्ज व त्यासोबत सादर करावयाची कागदपत्रे याबाबतची माहिती परिशिष्ट-ब मध्ये नमूद केल्यानुसार राहील.

४) ही योजना प्रथमच लागू करण्यात येत असल्याने यापूर्वी दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र नातेवाईकांना अनुकंपा

तत्वावर नियुक्ती देण्याबाबत त्यांनी केलेल्या विनंतीस अनुसरून नियुक्ती द्यावी. तथापि, अशी विनंती संबंधितांनी हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून १ वर्षांच्या आत करणे आवश्यक राहील.

५) कर्मचारी मयत झाल्यावर तीन महिन्याच्या आत किंवा कुटुंब निवृत्ती वेतनाचे कागदपत्र सादर करताना संबंधित संस्थेने आवश्यक माहिती परिशिष्ठ-क नुसार त्यांचे नातेवाईकांना उपलब्ध करून द्यावी व त्यानंतर विहित प्रपत्रातील अर्ज १ महिन्याच्या आत संबंधित संस्थेकडे सादर करावा व त्याची प्रत समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जि.प./ विशेष जिल्हा समाज अधिकारी, मुंबई शहर/उपनगर यांचेकडे सादर करावे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांना अनुकंपा योजनेची माहिती व विहित कागदपत्रे विहित मुदतीत देण्याची जबाबदारी समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जि. प./ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर/ उपनगर यांची राहील.

६) प्राथमिक व माध्यमिक अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांच्या बाबतीत सर्व समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जि.प.व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर यांनी सोबत जोडलेल्या परिशिष्ठ-ड मधील माहिती विभागीय समाज कल्याण अधिकारी यांचेमार्फत आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांचेकडे पाठवावी.

७) प्राथमिक व माध्यमिक अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांमधील गट-क व गट-ड मधील सरळ सेवेच्या पदांवर संस्थेत अनुकंपा तत्वावर नियुक्ती देता येईल. तसेच जी पदे भरण्यास शासनाने मंजूरी दिलेली आहे अशाच पदावरील नियुक्ती देण्यासाठी हे आदेश लागू राहतील.

२. सदरहू शासन निर्णय मान्यता व अनुदान प्राप्त आणि विनाअनुदान तत्वावरील अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळांना/संस्थांना सर्व संबंधित समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांनी त्यांचे स्तरावरून तातडीने पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा.

३. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संगणक सांकेतांक २००९०७०४१४०२११००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(ज. न. राठोड)
उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. मंत्री (सामाजिक न्याय) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (सामाजिक न्याय)यांचे खाजगी सचिव
मा. मुख्यसचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे कार्यालय
आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व जिल्हा समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर
महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता)/ (लेखा परिक्षा), मुंबई/नागपूर
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई/ सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई
कक्ष अधिकारी (अर्थसंकल्प) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती का. सुधार-२

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र.इडीडी–२००५/ प्र.क्र. ३५६/सुधार–२, दिनांक ४ जुलै, २००९ चे सहपत्र–नियमावली.

## परिशिष्ट –अ

१) राज्यातील अनुज्ञाप्ती प्राप्त व अनुदान प्राप्त आणि विना अनुदानित खाजगी अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळामध्ये संस्थास्तरावर अनुकंपा तत्वावर करावयाच्या नेमणुकांना हे नियम लागू राहतील.

२) अनुज्ञाप्ती प्राप्त व अनुदान प्राप्त आणि विनाअनुदानित खाजगी अपंगांच्या विशेष शाळा व कार्यशाळांमधील विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे (रूपांतरित स्थायी व अस्थायी आस्थापनावरील कर्मचारी धरून) पात्र कुटुंबियास वा नियमानुसार अनुकंपा कारणास्तव प्राथमिक व माध्यमिक अपंगांच्या विशेष शाळा व कर्मशाळातील विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर पदावरील सेवेसाठी संस्थास्तरावर नेमणूकीस पात्र असतील.

३) अ) विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे पुढे नमूद केलेले नातेवाईक या योजनेअंतर्गत पात्र असतील.

१) दिवंगत विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पत्नी/पती/मुलगा किंवा अवलंबून असलेली अविवाहित मुलगी अथवा मृत्यूपूर्वी कायदेशीररित्या दत्तक घेतलेला/ घेतलेली मुलगा/ अविवाहीत मुलगी/घटस्फोटीत/विधवा मुलगी/बहिण व शासन वेळोवेळी विहित करेल असा लगतचा कुटुंबिय.

२) विशेष शिक्षक/ शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा मुलगा हयात नसेल तसेच त्यांच्या कुटुंबातील पात्र कुटुंबियापैकी अन्य कोणीही अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी पात्र नसेल तर त्याची सून या योजनेअंतर्गत पात्र समजण्यात यावी.

३) केवळ अविवाहीत विशेष शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्याच्यावर सर्वस्वी अवलंबून असणारा भाऊ किंवा अविवाहित बहिण या योजनेसाठी पात्र समजण्यात येईल. याशिवाय अन्य कोणत्याही कुटुंबियास या योजनेचा फायदा मिळणार नाही.

ब) सदर नेमणूक कर्मचाऱ्यांच्या फक्त एकाच पात्र कुटुंबियास देता येईल.

क) उपरोक्त योजनेअंतर्गत नियुक्ती देण्यापूर्वी संबंधितांकडून कुटुंबातील अन्य व्यक्तींचा सांभाळ करण्याबाबत प्रतिज्ञापत्र घेण्यात यावे.

ड) ज्या कर्मचाऱ्यांना वैयक्तिक कायद्यानुसार एका पेक्षा जास्त लग्न करण्यास प्रतिबंध करण्यात आला नसेल, अशा कर्मचाऱ्यांच्या एकापेक्षा जास्त पत्नी हयात असल्यास ज्या पत्नीला किंवा तिच्या मुलाला/ अविवाहित मुलीला अनुकंपा तत्वावर नियुक्ती द्यावयाची आहे. त्या व्यतिरिक्त अन्य पत्नीचे ना हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

४) अ) या नियमानुसार नियुक्ती मिळविण्यासाठी विहीत प्रपत्रात केलेल्या अर्जाद्वारे नियुक्ती देण्यासाठी प्रतिभासूचीव नाव दाखल करता येईल.

ब) संबंधित पदासाठी विहित शैक्षणिक अर्हता व निम्न वयोमर्यादा याबाबतच्या अटी कटाक्षाने पाळण्यात येतील. कमाल वयोमर्यादा ही ४० वर्षापर्यंत राहील.

क) दिवंगत कर्मचाऱ्यांची पत्नी शैक्षणिक पात्रतेव्यतिरिक्त इतर अटी पूर्ण करीत असल्यास तिच्याबाबतीत गट–ड च्या पदावर नेमणूकीसाठी शैक्षणिक पात्रतेची अट शिथिल करता येईल व ही अट शिथिल करण्याचे अधिकार आयुक्त अपंग कल्याण, पुणे यांना राहतील.

ड) विशेष शिक्षक व शिक्षकेत्तर पदावर अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी/नियुक्तीच्या वेळी पात्र असणाऱ्या कर्मचाऱ्यांना पदाच्या उपलब्धते अभावी शिक्षकेतर पदावर नियुक्ती दिल्यास पद उपलब्ध होताच विशेष शिक्षक व शिक्षकेने पदावर त्याला प्राधान्याने नियुक्ती देण्यात यावी, अशी नियुक्ती सरळसेवा नियुक्तीने भरण्यात येणाऱ्या पदावरील समजण्यात यावी शिक्षकेतर पदावर अनुकंपा योजनेअन्वये नियुक्ती देण्याच्या आदेशात तसा स्पष्ट उल्लेख करण्यात यावा. तसा उल्लेख करण्यात आला असेल तरच विशेष शिक्षक वा शिक्षकेतर पदावर नियुक्ती देता येईल. परंतु त्यासाठी वरील अनुक्रमांक ४-ब मध्ये विहित केलेली शैक्षणिक अर्हतेची अट पूर्ण होणे आवश्यक राहील.

५) अ) अनुकंपा कारणास्तव विशेष शिक्षक व शिक्षकेतर पदावर नेमणूकीसाठीचा अर्ज कर्मचारी दिवंगत झालेल्या दिवसापासून एक वर्षाच्या आत करणे आवश्यक आहे.

ब) सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सज्ञान वारस पात्र ठरत नसल्यास अज्ञान वारसदारांच्या बाबतीत तो सज्ञान म्हणजेच १८ वर्षांचा झाल्यावर १ वर्षांच्या आत या योजनेखाली नोकरीसाठी अर्ज करणे बंधनकारक राहील.

६) अ) प्रत्येक समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांच्या कार्यालयात अनुकंपा तत्वावर नियुक्तीसाठी येणाऱ्या त्या जिल्ह्यातील सर्व अर्जाची अटी स्वीकृतीच्या दिनांकापासून संस्थानिहाय प्रतिक्षासूची ठेवावी. असे करताना शिक्षक व शिक्षकेतर यासाठी स्वतः प्रतिक्षासूची ठेवावी. असे करताना शिक्षक व शिक्षकेतर यासाठी स्वतः:च प्रतिक्षासूची अर्ज परिपूर्ण/सर्व विहीत कागदपत्रासह प्राप्त झाल्यावरच नाव प्रतिक्षासूचीमध्ये दाखल करण्यात यावे.

ब) संबंधित संस्था/समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद/विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर व उपनगर यांना प्राप्त झालेल्या अर्जाची तपासणी करून ज्येष्ठतेनुसार नियुक्तीस पात्र अर्जदारास त्याच्या अर्हतेनुसार संबंधीत अपंगांच्या विशेष शाळेत /कर्मशाळेत पद उपलब्ध असल्यास त्याच विशेष शाळेत कर्मशाळेत वा त्याच संस्थेच्या इतर विशेष शाळेत/कर्मशाळेत नियुक्तीसाठी विचार करावा.

क) जे शाळा प्रमुख त्यांच्या शाळेतील उपलब्ध असलेल्या पदांची माहिती या माहितीची विचारणा करणाऱ्या समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी मुंबई शहर व उपनगर यांना देणार नाहीत अशा शाळा प्रमुखाविरूद्ध अस्तित्वात असलेल्या अपंगांच्या शाळा संहितातील नियमानुसार कारवाई करण्यात येईल.

७) अ) अनुकंपा तत्वावर नियुक्तीकरिता मासिक उत्पन्नाची तसेच ठोक रकमेची मर्यादा राहणार नाही.

ब) एखाद्या कुटुंबात मृत कर्मचाऱ्यांचे पात्र कुटुंबियापैकी एखादा सदस्य पूर्वीच सेवेत असल्यास व तो सदस्य त्यांच्या कुटुंबातील अन्य सदस्यांना आधार देत नसल्यास अशा प्रकरणात त्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची आहे किंवा कसे, हे नियुक्ती अधिकाऱ्याने प्रकरण परत्वे तपासणी करून ठरवावे व त्यांनी ठाम खात्री झाल्यावरच अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या योजनेचा लाभ देण्यात यावा.

या संदर्भात नियुक्ती अधिकाऱ्याने सदर कुटुंबास मिळणाऱ्या निवृत्त वेतनाची रक्कम. कुटुंबातील व्यक्तींची संख्या, त्याची मालमत्ता, दायित्व, गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मृत झाला असल्यास त्यावर करण्यात आलेला वैद्यकीय खर्च, कुटुंबातील मिळवत्या व्यक्ती, इत्यादी बाबी विचारात घेणे आवश्यक आहे.

८) अनुकंपा तत्वावर नियुक्तीच्यावेळी बिंदूनामावली विचारात घेणे आवश्यक नाही.

९) जे उमेदवार प्रतीक्षा यादीवर आहेत. परंतु विहित वयोमर्यादेमध्ये त्यांच्या अर्हतेनुसार पद रिक्त झाले नाही, तर अशा उमेदवारांचे नाव वयाची ४० वर्षे पूर्ण होईपर्यंत प्रतिक्षा यादीवर राहील व त्यानंतर त्याची प्रतीक्षा यादीवर आवश्यक ती नोंद घेऊन त्याचे नाव सुचीतून काढून टाकण्यात यावे.

१०) अनुकंपा तत्वावरील उमेदवाराने सेवेत चतुर्थश्रेणी पदावर नियुक्ती मिळाल्यानंतर सेवेत असताना उच्चअर्हता प्राप्त केली तर तो प्रचलित नियमानुसार पुढील पदावर पदोन्नतीसाठी पात्र ठरू शकेल.

११) अनुकंपा तत्वावरील नियुक्तीच्या वेळी उमेदवाराच्या अर्हतेनुसार रिक्त पद उपलब्ध असेल तरच संस्था

त्यास त्या पदावर नियुक्ती देऊ शकेल.

१२) सदरहू अपंग शाळा ह्या जिल्हास्तरावर कार्यरत असून त्यांचे सनियंत्रण जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांचेकडे असते त्यामुळे सदर प्रतिक्षासूची दुहेरी स्वरूपात नियुक्ती प्राधिकारी म्हणून संबंधीत संस्था व त्या जिल्ह्याचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी/विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी मुंबई शहर/ उपनगर या दोघांकडे ठेवण्यात यावी.

१३) नियुक्ती संदर्भात अडचण निर्माण झाल्यास संस्थेच्या निर्णयाविरूद्ध संबंधित समाज कल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद/ विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, मुंबई शहर/उपनगर/ आयुक्त, अपंग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडे दाद मागता येईल.

१४) अनुकंपा तत्वावरील नियुक्ती करताना संस्था हे युनिट (एकक) गृहित धरण्यात यावे.

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी–२००५/ प्र.क्र. ३५६/
सुधार–२, दिनांक ४ जुलै, २००९ चे सहपत्र

परिशिष्ट–ब

सेवेत असताना दिवंगत झालेल्या कर्मचाऱ्यांच्या पात्र कुटुंबियास
अनुकंपा तत्वावर नेमणूक देतेवेळी भरावयाचे प्रपत्र

भाग – १

१) अ) दिवंगत कर्मचाऱ्यांचे
नाव ______
ब) जन्म
दिनांक ______
क) मृत्यूचा
दिनांक ______
ड) नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीचा दिनांक ______

२) अ) ज्या व्यक्तीस नियुक्ती द्यावयाची आहे त्या व्यक्तीचे नाव ______
ब) त्यांचे/तिचे कर्मचाऱ्यांशी नाते ______
क) जन्म दिनांक ______
ड) शैक्षणिक अर्हता ______
ई) कुटुंबियांपैकी दुसऱ्या कोणा कुटुंबियाला अनुकंपा तत्वावर नियुक्ती दिली आहे काय? ______

३) अ) स्थावर मालमत्तेच्या उत्पन्नासह पुढील योजनांनुसार मिळालेली एकूण रक्कम ______
ब) कुटुंब निवृत्ती वेतन ______
क) स्थावर मालमत्तेपासूनचे वा इतर मासिक उत्पन्न ______
ड) मृत्यू–नि–सेवानिवृत्ती उत्पदान ______
इ) भविष्य निर्वाह निधांतील बचत ______
ई) ठेव संलग्न विमा योजना ______
फ) आयुर्विम्याची रक्कम ______

४) कर्मचाऱ्यांच्या कुटुंबातील सर्व अवलंबून असलेल्या व्यक्तीचा तपशील
(त्यापैकी कोणी नोकरी / व्यवसाय करीत असल्यास त्याचे मासिक उत्पन्न याबाबतची माहिती)

| अ. क्र. | नाव | खाजगीअपंगांच्या विशेष शाळा/ कर्मशाळेतील कर्मचाऱ्यांची नावे व वय | नोकरी व्यवसाय करीत असल्यास त्यांचे मासिक उत्पन्न | शेतीपासून या अन्य उत्पन्नाचे मार्ग असल्यास त्याच्यापासूनचे मासिक उत्पन्न |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |
| ६ | | | | |

प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे असे घोषित करतो/करते की, वर नमूद केलेल्या बाबी माझ्या समजूतीप्रमाणे दिल्या आहेत. वरील बाबीपैकी एकही बाब जर भविष्यात खोटी किंवा चुकीची आढळली तर मी नियमानुसार अपात्र ठरीन याची मला जाणीव करून देण्यात आलेली आहे.

दिनांक

उमेदवाराचे नाव व सही

श्री./ श्रीमती

हे माझ्या परिचयाचे असून त्यांनी केलेल्या बाबी खऱ्या आहेत.

दिनांक

साक्षीदाराची सही (१)

नाव व पत्ता (२)

भाग –२

१. अ) ज्याला नियुक्ती द्यावयाची आहे त्या उमेदवाराचे नाव

ब) त्याचे/तिचे कर्मचाऱ्याशी नाते

क) शैक्षणिक
अर्हता ..............................................................................

ड) वय जन्म तारिख ..............................................................................

इ) अनुभव काही असल्यास ..............................................................................
फ) ज्या पावर नियुक्ती द्यावयाची आहे ते पद व शाळेचे नाव
..............................................................................

२. उमेदवाराने अर्ज केल्याचा दिनांक
..............................................................................

३. उमेदवाराने प्रकरण सादर करण्यास उशीर झाला असल्यास त्याचा खुलासा
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................
..............................................................................

मी उमेदवारांना नमूद केलेल्या भाग-१ मधील बाबी संबंधातील सर्व कागदपत्रे तपासली आहेत. व तो योग्य असून त्यांना अनुकंपा तत्वावर नियुक्ती देण्यासाठी माझे संपूर्ण समाधान झालेले आहे.

दिनांक

मुख्याध्यापकाची/व्यवस्थापकीय अधीक्षकाची सही
विशेष शाळेचे/कर्मशाळेचे नाव व पत्ता

शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इडीडी-२००५/ प्र.क्र. ३५६/ सुधार-२, दिनांक ४ जुलै, २००९ चे सहपत्र

## परिशिष्ट-क

## राज्यातील मान्यताप्राप्त खाजगी अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळांतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियाकरिता अनुकंपा तत्वावर नियुक्ती योजनेची वैशिष्ट्ये

| | | |
|---|---|---|
| १ | उद्देश | खाजगी अपंगांच्या विशेष शाळा/कर्मशाळेतील कर्माऱ्यांच्या कुटुंबियांना त्वरीत आर्थिक आधार मिळणे. |
| २ | पात्र नातेवाईक | अ) पती/पत्नी, गुलगा, अविवाहित मुलगी<br>ब) अविवाहित कर्मचाऱ्यांच्या बाबतीत सर्वस्वी अवलंबून असणारा<br>अविवाहीत भाऊ अथवा बहिण अथवा घटस्फोटीत/विधवा मुलगी/बहिण<br>क) मृत कर्मचाऱ्यांचा मुलगा हयात नसेल तर त्यांची सून |
| ३ | अर्ज भरण्याची मुदत | मृत्यूच्या/अकाली सेवानिवृत्तीच्या दिनांकापासून ३ महिने |
| ४ | शैक्षणिक अर्हता | त्या त्या पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार तथापि विधवेच्या बाबतीत गट-'ड' (चतुर्थश्रेणी) पदावरील नियुक्तीकरीता शिथिलक्षम. |
| ५ | अर्ज | शक्यतो विहित प्रपत्रात करणे |

**टिप:- उपरोक्त माहिती मिळाल्याबाबत कुटुंबियांकडून पोच/घेणे आवश्यक आहे.**

## परिशिष्ट 17

### सेवा ज्येष्ठतेची सर्वसाधारण तत्वे

(1) या नियमावलीतील अन्य तरतुदींच्या अधीनतेने कोणतेही पद, संवर्ग किंवा सेवा यामधील कर्मचाऱ्याची ज्येष्ठता सामान्यपणे त्यांच्या सेवा त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील अखंडीत सेवाकालावरुन निश्चित करण्यात येईल.

परंतु जेव्हा रजा, प्रशिक्षण किंवा अन्यथा प्रतिनियुक्ती अगर परकीयक सेवा अगर कोणत्याही अन्य पदावरील अस्थायी स्थानापन्नता या कारणास्तव त्या पदावर संवर्गात किंवा सेवेत त्या कर्मचाऱ्याची अनुपस्थिती होईल तेव्हा, तो कर्मचारी रजेवर किंवा प्रतिनियुक्तीवर गेला नसता अथवा अशा अन्य पदावर त्याची अस्थायी नेमणूक झाली नसती तर एरव्ही तो उक्त पदावर, संवर्गात किंवा सेवेत राहीला असता असे सक्षम प्राधिकाऱ्याने प्रमाणित केले तर असा कोणतीही अनुपस्थितीचा कालावधी हा अशा सेवाकालाची गणना करण्याच्या प्रयोजनार्थ हिशोबात घेतला जाईल.

परंतु, आणखी असे की, अभावित नेमणूक म्हणून त्याने काही सेवा केला असल्यास ती सेवा सेवाकालाच्या गणनेतुन वगळली जाईल आणि संबंधित सेवा भरती नियमावलींच्या तरतुदीनुसार केलेली त्याची रितसर नेमणूक ज्या तारखेला झाली असेल त्या तारखेला तो त्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत नेमला गेला होता असे ज्येष्ठतेच्या प्रयोजनार्थ मानले जाईल.

(2) पोटनियम (1) मध्ये काहीही अंतर्भुत असले तरी–

(अ) कोणत्याही पदावरील, संवर्गातील किंवा सेवेतील नेमणुकीसाठी एकाच तुकडीत निवड होवून थेट भरती झालेल्या व्यक्तींनी नेमणूक आदेश निघाल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत किंवा सक्षम प्राधिकारी स्वविवेकानुसार वाढवून देईल अशा कालावधीत जर नेमणूकी जर नेमणूकीचा स्वीकार केला असेल तर त्यांच्या आपसातील ज्येष्ठता आयोगाने वा निवड मंडळाने किंवा प्रकरणपरत्वे सक्षम प्राधिकाऱ्याकडून नामनिर्देशनाव्दारे झालेल्या थेट भरतीच्या बाबतीत सदर सक्षम प्राधिकाऱ्याने लावलेल्या पसंतीक्रमानुसार निर्धारित केली जाईल.

(ब) निवड सुचीतुन पदोन्नती मिळालेल्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत अशा निवडसूचीत त्यांनी नांवे ज्या क्रमाने असतील त्याच क्रमानुसार त्यांची आपसातील ज्येष्ठता राहील, जर निवडसुची दोन भागात तयार केलेली असेल तर, पहिल्या भागात बिनशर्त निवड झालेल्यांची नांवे अंतर्भुत असतील व दुसऱ्या भागात निवड झालेल्यांची नांवे असतील. पहिल्या भागात समाविष्ट झालेल्या सर्व व्यक्तींचा क्रम दुसऱ्या भागातील समाविष्ट केलेल्या व्यक्तींच्या वर लागेल.

परंतु निवड सुचीतल नांवे जया क्रमाने लावलेली आहेत तो क्रम मागाहून आढावा घेतल्यामुळे बदलण्यात आला तर, संबंधित कर्मचाऱ्यांचा ज्येष्ठताक्रम त्यांच्या या सुधारित क्रमानुसार फेरमांडणी करण्यात येवून निर्धारित केला जाईल.

(क) बदली झालेला कर्मचारी ज्या पदावर, संवर्गात किंवा सेवेत तो बदली झालेला आहे त्या पदावरील, संवर्गातील किंवा सेवतील अन्य कर्मचाऱ्यांच्या तुलनेने त्याची ज्येष्ठता, तो जेथे बदली झाला त्या पदाचा, संवर्गाचा किंवा सेवेचा वर्ग आणि वेतनमान, तेथील त्याचा सेवाकाल आणि त्याच्या बदलीस कारणीभूत झालेली परिस्थिती यथायोग्यपणे लक्षात घेवून सक्षम प्राधिकरी निर्धारित करील.

(3) जेथे कोण्त्याही दोन किंवा अधिक व्यक्तींच्या एखादे पद, संवर्ग किंवा सेवा यातील नेमणुकीच्या तारखा, आवश्यक तर, मानीव तारीख नेमुन दिल्यानंतर निर्धारित केलेल्या तारखा एकच असतील तर वयाने ज्येष्ठ असलेली व्यक्ती जयेष्ठताक्रम निर्धारित करण्याच्या प्रयोजनार्थ ज्येष्ठ म्हणून मानली जाईल.

(4) एकाच पालक संस्थेच्या एकाच प्रवर्गाच्या एकापेक्षा जास्त शाळा/कर्मशाळा अनुज्ञाप्ती प्राप्त तव्दतच अनुदान तत्वावर मान्यताप्राप्त असतील तर अशा शाळा/कर्मशाळांतील कर्मचाऱ्यांची एकत्रितपणे सेवाज्येष्ठता यादी अद्ययावत ठेवावी.